म. ग्रं. सं. ठाणें

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ८६५

REFBK-0004929

REFBK-0004929

श्री. रा. रा. केशव लक्ष्मण ओगले यां

यांचे सेवेशी प्रो. चिंतामणराव जोश

यांचे नमस्कारासह

मननार्थ व अभिप्रायार्थ

सप्रेम व सविनय भेट

व्यंकटेश माधव दात

[व]द्य व. १०

शके १८५५

[गौ]लीगुडा

हैद्राबाद दक्षिण

॥ श्रीगुरु प्रसन्न ॥

४९२९

# श्रीगुरुकरुणामृत

## उमर खय्यामचे रुबायांचा भावार्थ.

REFBK-0004929

व्यंकटेश माधव दातार बी. ए.
डेप्युटी फिनान्षियल् सेक्रेटरी,
एच्. ई. एच्. दि नैझाम्स् गव्हर्नमेंट. हैद्राबाद दक्षिण.

—:o:—

दक्कन लॉ-रिपोर्ट प्रिंटिंग प्रेस
जामबाग हैद्राबाद, द.

—:o:—

एप्रिल १९३३ ]  [ रुपये २॥

# अनुक्रमणिका.


| परिच्छेद | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १—३ | गुरुकरुणामृतास आरंभ | १ |
| ४—१६ | उमरचें चरित्र पूर्वार्ध. | २—४ |
| १७—२४ | उमरचे ग्रंथ व तात्विक मत. | ५—१० |
| २५—३५ | उमरचा अंतकाल व आख्यायिका. | १०—१४ |
| ३६—३८ | अरबी व फार्सी रुबाया. | १५—१७ |
| ३९—४४ | उमरच्या रुबायांच्या [illegible] व हस्तलिखित प्रती. | १८—२२ |
| ४५—५५ | क्रिर्तेजनच्या चाळणी[illegible]. | २३—३२ |
| ५६—७० | कवितेंत मद्य शब्द भक्ति ज्ञान प्रेम वाचक आहे. | ३३—४२ |
| ७१—७३ | उमरचें रुबायांची किल्ली. | ४३—४७ |
| ७४—७५ | "[illegible] स रमजानात शुभ समय अस[illegible] काय ?" | ४८—५२ |
| ७६—९० | रुबायांचे अलंकार. | ५३—६० |
| ९१—९६ | उमरचे आशयाविषयी कैक पंडितांची मतें. | ६१—६५ |
| ९७ | उमरच्या अरबी कवितांचें भाषांतर. | ६६—६९ |
| ९८ | वर्गीकरण, नवीन उपलब्ध हस्तलिखित त[illegible]खाना. | ७० |
| ९९ | व्हिन्फील्डचें वर्गीकरण. | ७१—७२ |
| १०० | प्रो. पटवर्धनचें "कामरूपी तत्त्व अमर आहे." | ७३—७४ |
| १०१ | नैसर्गिक वर्गीकरण. | ७५—७६ |
| १०२—१०३ | वर्ग १ विवेक व वैराग्य. उमरचा किता. | ७७—८२ |
| १०४—१०५ | ,, २ वाद. | ८४—९० |
| १०६ | ,, ३ अनुभव. | ९१—९३ |
| १०७ | ,, ४ नीति. | ९४—१०० |
| १०८ | ,, ५ प्रेम व नारदीय भक्तिसूत्र. | १०१—१३६ |
| १०९ | ,, ६ ईशस्तवन. | १३६—१४२ |
| ११० | आभार व सज्जन वाचकांस विनंति. | १४३—१४७ |
| | शुद्धिपत्र. | १४८—१५३ |
| | श्लोक | १—१०७ |

॥ श्रीगुरु प्रसन्न ॥

# विनंति

## १ आरंभ.

१. **गुरु माउली ब्रह्मानंद मायींनीं** शके १८३८ चे मार्गशीर्षांत [ इ० १९१६ डिसेंबर ] निजानंद महाराजाचे उत्सवांत भजनोत्तर गोष्ट काढली कीं:—झऱ्यांतून पाणी पितळेच्या बादलीनें अगर लोखंडाचे पोहऱ्यानें काढलें तरी गोडी सारखीच. प्रभु एक व त्याचे दरबारांतील संत सरदार त्यांतलेच ते एक. कबीर, नानक, तुळसीदास, सूरदास, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम हे जगदंबेच्या मंगळसूत्राचे मणी. सर्वांचें अंतरंग एकच आहे.

इतक्यांत कुणी शंका काढली कीं:—हे सर्व वैदिक धर्माचे म्हणून सारखें बोलले. यावर बेंदरचे ब्रम्हचारी रामगुरू बोलले कीं:—सर्व ही पंथांत मुकाम एक व अनुभव सारखाच आहे.

२ ओघानुसार नझीर अकबरादी, सादी, हाफिज, उमर खय्याम यांच्या कांहीं कवितांचा विचार झाला. उमरच्या कांहीं श्लोकांचा अर्थ ऐकून मायी म्हणाल्या, ' हा फार चटकन् हृदयास झोंबेल असें बोलतो, पण याची भाषा समजायला मध्यस्थी पाहिजे. कुणी मराठींत सांगेल तेव्हां ! ' रामगुरूंना हें सहन न होऊन म्हणाले ' बाबा ! माईकू इसका तरजुमा कर देना ' मायींनीं ही हीच गोड आज्ञा केली. पौषांत आरंभ, माघांत हें प्रस्तुत रूपांतर संपूर्ण झालें. त्यांच्या कृपेनें, आज्ञेनें, व शक्तीनें तयार झालें म्हणून याला **गुरुकरुणामृत** हें नांव शोभलें.

३ **गुरुकरुणामृताची** हस्तलिखित प्रत मायीजवळ होती, तीवरून रामगुरूंनीं संपूर्ण व इतर मित्रमंडळीनें संपूर्ण अथवा आवडतील तसे श्लोक लिहून घेतले; पण येवढयानें निभेना म्हणून कृपामूर्ति **पांगारकर** महाराजांनीं आपले **मुमुक्षूचे** दोन अंकांत जागा दिली. पुढें कांहीं सज्जनांचे सूचनेनुसार गुरुमाउलीची आज्ञा स्वतंत्र पुस्तकरूपानें छापण्याची झाली. **गुरुकरुणामृत** हें उमर खय्यामचे सुभाषितांचा भावार्थ आहे.

## २ उमरखय्यामचं चरित्र.

४ एक म्हणती नंदाचा । एक म्हणती वसुदेवाचा । ठाव नाहीं बापाचा । अकुळीं साचा श्रीकृष्ण ॥ त्याप्रमाणें उमरचा बाप कुणी म्हणतात इब्राहीम व त्याचा पुतण्या कवी खाकानी म्हणतो उस्मान होतें. याचे आजाचें वेळेपर्यंत यांचे घराण्यांत तंबूचा धंदा होता. बापाचे हयातींत तो सुटला होता. गांव सोडून दुसरीकडे मनुष्य राहू लागला म्हणजे सोडलेल्या गांवाचें व धंदा सोडला म्हणजे सोडलेल्या धंद्याचें त्याप्रमाणें खय्याम हें या घराण्याचें आडनांव पडलें. इस्लामी धर्माचा प्रसार होण्यापूर्वी आर्यावर्ताप्रमाणें इराणांतही ब्राम्हण म्हणजे दस्तूर व तदितर धंदे यांत जातिभेद मानीत.इस्लाम प्रसारानंतर कांहीं एक कालपर्यंत लोकांत हा जातिभेद बाहेर नसला तरी अंतःकरणांत वागत असे. उमरचा बापही पढला शिकलेला होता तरी पिढीजाद धंद्यावरून त्याचे घराण्यास खैय्याम असें किंचित तिरस्कृत नांव पडलें असावें. उमरनें हेच आपलें कवित्वातील नांव स्वीकारिलें.

५ खाजा निजामुल्मुल्क (जन्म ४०८ हिजरी) सजल्की राजघराण्यांतील अल्प अर्सलान व मलिकशाह या दोघा राजांचे कारकीर्दींत दिवाण होता. तो उमरचा सहाध्यायी होता व आपले दस्तूरूल वुजरा आणि वसीयत या नावाचे ग्रंथांत लिहितो कीं तो स्वतः अध्ययनासाठीं स० ४३० हिजरीमध्यें नीपापुरांतील इमाम मुवफ्फक याचे गुरुकुलात गेला असतां तेथें उमर आणि हसन सब्बाह नुकतेच आले होते, त्यावेळेस उमरचें वय विद्याभ्यासाचें होतें. यावरून उमरचा जन्म हि. ४०९ ते ४१४ ( ई० १०१८ ते १०२३ ) मध्यें झाला असावा. उमर हा इमाम मुवफ्फकचें गुरुकुलांत आध्यात्मिक, धार्मिक, नैतिक विद्येंत पारंगत झाला; यावरून त्याला गियासुद्दीन म्हणजे धर्मोद्धारक ही पदवी मिळाली. वादविवादांत हा अजिक्य असे म्हणून अबुल्फतह अर्थात विजयवीर ही पदवी; धार्मिक प्रश्नाचा निवाडा देण्यात अग्रेसर म्हणून इमामुल् खुरासान् म्हणजे खुरासानचे पीठाचा आचार्य ही पदवी जनपदाकडून त्याला मिळाली; सत्य-मिथ्या निर्णयांत न्यायाधीश म्हणून हुज्जतुल्हक ही पदवी आणि तत्वविद्येंत

५८

अग्रगण्य म्हणून मलिकुल-हुकमा अर्थात तत्त्वज्ञ—मुकुटमणी ही उच्चतर पदवी ईराणचे सम्राटाकडून मिळाली.

६ सजलूकी घराण्यांत एका मागून एक राजे झाले ते असे:—सुलतान रुकनुद्दीन तगरूलबेग हा ४२९ हिजरीमध्यें निषापूर येथें राज्यपदारूढ झाला त्यावेळेस उमर १९ वर्षांचा होता. पुढें इ० १०६३ मध्यें अल्प अर्सलान इ० १०७२ हि.४६५मध्यें मलिकशाह हि.४८५ इ० १०९२मध्यें सुलतान महमूद इ.१०९४ वारगियारूक इ.११०४मध्यें मलिषाह द्वितिय इ.११०४मध्यें महम्मद इ.१११७ मध्यें संजर असे राजे राज्यपदारूढ झाले. उमरचा अंतकाल इ. ११२३ मध्यें झाला. अख्यायिका अशी आहे कीं, हे सर्व राजे उमर दरबारांत कधीं आला असतां त्याला राज्यासनावर आपले बाजूस बसवीत.

७ निजामुल्मुल्क हा अल्प अर्सलान आणि मलिकषाह याचे कारकीर्दींत दिवाण इ० १०६३ पासून इ० १०९२ पर्यंत अदमासें तीस वर्षें होता. बालपणाच्या करारप्रमाणें त्यानें हसन बिन सब्बाह यास कोशाध्यक्ष केलें व पुढें हाच कृतघ्न झाला; आणि तो दुसरा सहाध्यायी उमर यास ही दरबारांतील उच्च पदवी देण्यास उद्युक्त झाला. मोठे अधिकारांत स्वहिताची हानि आहे, म्हणून उमरनें हें नाकारिलें; निजामुल्मुल्क यानें नीषापूरचे खजान्यांतून सालीना १२०० मिसकाल [ होन ४॥ मासे ] वेतन उमर खय्याम यास नेमलें.

८ सारांश उमरला द्रव्याचा, अधिकाराचा जनांत मान मान्यतेचा अगदीं हव्यास नव्हता. तो म्हणतो:—

जरी देसि माते मला पात्र रोटी । बसाया मिळे जैं तुझे दारिं ओटी ॥
जरी पाणि पीण्यासी देसी नरोटी । कशाला कुणाला मी तरी लाळ घोटीं? २८८
अशा घोर लोकीं शहाणा कशासी । धना दौलतीची मना देत फासी ॥
निजे घेउनी जो तिजोरी उशासी । तयाची हडें पुत्र फेकी विदेशीं ॥ १७

९ विद्याव्यासंग आणि तत्त्वार्थचिंतन यांत तदाकार अशा उमरला संसार मांडण्यास सवड राहिली [illegible] सबबीं त्यान्नें मत:-त्यागेनैके अमृतमानशु : अशा उपनिषद् वाक्याप्रमाणें आ

धरी शौर्य, संसार निःशेष सोडी । स्त्रिया पुत्रका सर्व संबंध तोडी ॥
जरी घेसि काडी, बने ती पहाडी । कसें बंधनी चालसी? बंध तोडी ५००

१० बहुधा लौकिकांत न वावरतां तो एकांतात अथवा सज्जनाचे सहवासांत रहात असे.

जयाचें मना एकले राहवेना । उपाधींत गुंते, परी साहवेना ॥
मनीं मोकळा तो सुखाचा ठिकाणा । इथें येर तें दुःख साहित्य नाना २२२

११ खय्यामचे पूर्वीं अथवा तत्कालीन बहुतेक कवी राजाश्रयाकरितां राजस्तुतीचा अंगिकार करणें गौण मानीत नसत. उलट त्यांची लालसा असे. उमर खय्याम मात्र या बाबतींत अगदीं निस्पृह होता. यानें कोणत्याही राजाची फाजील स्तुति कधींच केली नाहीं; कारण उमरचे शुद्धदृष्टींत राज्य वैभवाचें नश्वरत्व नेहमीं खेळत असे.

वयोमान शें दोनशें कांहि लाव । तुला सोडणें भाग हा जीर्ण गांव ॥
असो चोर कीं साव कीं रंकराव । इथें शेवटीं वीकतो एकभाव ५०१

१२ सुलतान मलिशाहचे कारकीर्दीत इ.१०७५मध्यें ग्रहवेध-शाळा स्थापून त्यानें ग्रहगतीचीं कोष्टकें तयार केलीं आणि १०७९ मध्यें पचांग शोधन करून मार्च१५ इ.१०७९ पासून मलिकशाही शक कायम केला. उमर खय्याम फलज्योतिषांतही प्रवीण होता. यानें सांगितलेलीं भविष्यें व मुहूर्त खरे ठरत याविषयीं कैक आख्याइका आहेत. खय्यामचे पूर्वीं आर्यावर्त आणि ग्रीस देशांतून वैद्यक, गणित, ज्योतिष, न्याय, तर्क वेदांत इत्यादि शास्त्रांचा प्रसार इराणमध्यें झाला होता. त्याचे पूर्वीं एक पीढीनें वडील असा मोठा तत्वज्ञ अबू अलीसीना (जन्म इ. ९८४ मृति इ. १०३७) सर्व शास्त्र पारंगत प्रख्यात होता.

१३ खय्याम ही त्याचे सारखाच असून ग्रीक फिलासफीचा पाठ देत असे. यावरून तो मुसलमानी मताचा नसून ग्रीक मतानुयायी आहे, असाही त्याचे प्रतिस्पर्ध्यांकडून आरोप होता. त्याविषयीं त्याचे स्वताचे उद्गार असे आहेत:—

अरी बोलती मी असें ज्ञानयोगी । हरी, काय मी होय ऐसी अभागी ? ॥
तुझ्या चिंतनें ऊर झाले दुभंगी । सख्या प्राणनाथा तुझ्या मीच जोगी ६६६

१४ स्वताचे विचार ग्रंथरूपानें अगर काव्यांत तो निर्भिडतेनें प्रगट करी [श्लोक ६४९]यामुळें त्याचे शत्रूंना त्याचा बराच छळ करण्याची सवलत मिळाली.

१५ एकदां तत्कालीन सूफी कीमियाये सआदत अर्थात् सच्छील रसायन नामक ग्रंथाचा कर्ता इमाम गज्जाली उमर खय्यामला वादांत जिंकण्याकरितांच आला. वाद आकाश तत्वाचे परिमाणु संबंधानें होता. अतिथि–मानभंगास भिऊन उमर खय्यामनें बरीच टाळाटाळ केली. व सांगितलें कीं, या प्रश्नाचा निवाडा " अरायसुन्नफीसा " नामक ग्रंथांत मी केला आहे, परतु इमाम गज्जालीचे मनांत त्याला पराभूत करण्याचें म्हणून वादास बुध्या प्रवर्तविलें; कैक तास खय्याम प्रतिपादन करीत राहिला. अस्तमानचे नमाजाचें पाचारण झालें, तेव्हां गज्जाली ' सत्यमेव जयते ' असें म्हणून उठून गेला.

१६ जशा वेदांच्या तद्वत् कुराणाच्या किरआत म्हणजे पठण–पद्धति सात आहेत. त्या सातही पद्धतीनें कुराण त्यास मुखोद्गत होतें. त्याची स्मरणशक्ति अचाट होती, प्रवासांत कोणताही नवीन ग्रथ त्यानें सातदां वाचला म्हणजे तो कालांतरानें सुद्धां घरीं येऊन अक्षरशः लिहून काढूं शके.

१७ उमर खय्याम विरचित ग्रंथ आहेत. ते असे:—

१ **सुभाषित रुबाया** फारसी भाषेंत यांत सर्व तात्विक व पारमार्थिक विचार आहेत. कैक भाषेंत भाषांतरें झालीं.

२ **बीजगणित**, अरबी भाषेंत. इ.१८५१ मध्यें फ्रेंच भाषेंत याचें भाषांतर झालें आहे.

३ **युक्लिडच्या** भूमितीवर सिद्धांत व त्याच्या सोडवणुकी ही लंडनचे पुस्तकालयांत संग्रहीत आहे.

४ **जीच** ग्रहगतीची कोष्टकें. खय्यामनें इतर ज्योतिर्विदांचे सहाय्यानें केलीं.

५ **पदार्थ विज्ञानशास्त्र**. अरबींत.

६ जीवाचे अस्तित्व फारसी भाषेंत—लंडन ग्रंथालयांत आहे.

७ **जगत व दैव** यावर षहजोरी याचा हवाला देत आहे.

८ खेडामध्यें सोने व चांदी यांचें प्रमाण शोधून काढण्याविषयीं छोटेसें पुस्तक.

९ उल् अज्मुल् अम्कना वातावरणांतील भेद व ऋतुंचीं कारणें. वराहमिहिराचार्यांचें चित्रमयूर शास्त्रप्रमाणें.

१० अरबी भाषेंत कविता. कांहीं वेंचे उपलब्ध आहेत.

११ रोजतुल्कुलूब अर्थात हृदयाराम. या ग्रंथाचा क्रितेन्जननें पहिल्यानें शोध लाविला.

१८ उमर खय्यामचें तात्विक मत काय होतें याविषयीं भिन्न मतें आहेत. अंदाजा मात्र त्यानें स्वतः लिहिलेल्या वरील रोजतुल्कुलूब—हृदयाराम या पुस्तकावरून होऊं शकतो. तो असें लिहितोः—

**शेवटलें प्रकरण.** परमात्म्याची ओळख करून घेणारांचे चार वर्ग आहेत.

**पहिला वर्गः**—मुतकल्लमी. हे परंपरागत श्रद्धेवर व त्याला अनुकूल अशा शाब्दिक अथवा मीमांसक(Philosophical Theology) प्रमाणावर टेंक ठेवून तात्पुरताच आध्यात्माचा स्वीकार करितात.

**दुसरा वर्गः**—तत्वज्ञ नैय्यायिकांचा, यांचें समाधान शब्दावर श्रद्धा ठेवल्यानें होत नसून ते सुबुद्धि व तर्क यांचे सहाय्यानें विचार करितात. परंतु त्यांचा तर्क कुंठित होऊन तर्कास सोडून द्यावें लागतें.

**तिसरा वर्गः**—इस्माइली; यांचें मत असें आहे कीं सत्यपरंपरेनें ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय तें ज्ञान खरें नाहीं. कारण जगदीश प्रभूचें स्वरूप व गुण अनंत असल्यामुळें प्रमाण व बुद्धि पराभूत व आश्चर्यचकित होतात. याकरितां सत्य परंपरेचा आश्रय आवश्य आहे.

**चौथा वर्गः**—सूफी पंथाचा; हे केवळ तर्क व विचार यानें ज्ञानप्राप्ति होईल असें न मनितां, अंतःकरण शुद्धि नैतिक आचरण यांचें योगानें जीवात्म्यास स्वाभाविक मालिन्य आणि शारीरिक विकारापासून स्वच्छ करितात, व या प्रकारें जेव्हां अंतःकरण केवळ परिशुद्ध होतें तेव्हां त्यामध्यें दैवी साक्षात्कारांत सत्य स्वरूपाचा आविर्भाव निःसंशय तेथें प्रगट होतो; व हा पंथ सर्वांत उत्तम आहे. कारण हें माहित आहेच कीं, कोणतीही परिपूर्णता जीवास देणें श्रीप्रभूला कठीण नाहीं. व त्यानें कोणतेंच आवरण अथवा प्रतिबंध, स्वरूपाचे

दर्शनाआड ठेवला नाहीं. परंतु जी कांहीं जीवास आडकाठी आहे ती त्याचें स्वाभाविक मालिन्याची आहे. हेंच आवरण भंगलें आणि प्रतिबंध दूर झालों म्हणजे वस्तुस्थिति जसी आहे तसी यथातथ्य उदयास येते. व याच अर्थानें महम्मद पैगंबर सद्गुरू समर्थांनी (नमोनमः) असें सांगितलें आहे, कीं, " निश्चयानें तुमचें प्रभूकडून तुमचे आयुष्यांत तुम्हाला चैतन्य दिलें आहे. हें जाणा आणि क्षणोक्षणीं त्यानें दिलेल्या सुखसंपत्तीचे त्याचें स्तुतीनें, आणि सदाचारानें निवेदन करा."

१९ सदरील उताऱ्यावरून असें दिसतें कीं खय्यामास पहिले तीन गणां-पेक्षां सूफी सांप्रदाय अधिक श्रेयस्कर वाटला. सूफी सांप्रदायाचे सांख्य योग आणि वेदांत यांच्याशीं सादृश्य आहे.

योगसूत्रः—योगश्चित्तवृत्ति निरोधः । तदाद्रष्टुः स्वरूपऽवस्थानम् । पाद १ सूत्र २।३
मुक्ताभिरावृतं सूत्रं मुक्तयोर्मध्य ईक्ष्यते तथाऽवृता विकल्पैश्चितस्पष्टा मध्यंविकल्पयोः'

२० आतां उपरिनिर्दिष्ट चार पंथाचें किंचित् स्पष्टीकरण अवश्य आहेः— हजरत महंमद पैगंबर हे समाधि अवस्थेंत असतांना जिब्रईल नामक देवदूत त्यांना जीं अशरीरी वाणीनें वाक्यें उच्चारण्यास सांगत तीं हजरत उच्चारीत व लेखक संग्रहीत करीत असत, याला कुराण संज्ञा. इतर अवस्थेंमध्यें पैगंबराचे मुखांतून जीं वचनें प्रसंगोपात निघालीं याचे संग्रहास हदीस संज्ञा आहे. जसें वेदास सनातन आर्य, तसेच कुराणास मुसलमान, अपौरुष अर्थात् ईशप्रणीत मानितात. हिजरीचें पहिलें शतकांत पैगंबर नंतर कुराणाचे अर्थाविषयीं वाद-विवाद उत्पन्न होऊन ईश्वर केवळ निर्गुण अकर्ता व जीव सर्व स्वतंत्र मानणारा मोअतजली, 'ईश सर्व गुणानें साकार' मानणारा सिफती पंथ, हजरत अलीस न मानणारे खारजी, हजरत अली व त्याचे कुळासच मानणारे शिआ; त्याच-प्रमाणें मालिकी शाफई, हनफी, हंबली असे सुन्नी पंथ झाले. या अनेक मतांचे वाद मिटावे म्हणून हिजरी चौथे इ. स. १० वे शतकांत तात्विक पद्धतीवर धर्माची मांडणी अबू मूसाअल् अश्अरी यानें केली तीं कुराण हदीस आणि युक्तिवाद यांस अनुकूल मीमांसा आहे. याच विद्येचें नांव षरा अथवा मिमांसा

हा उमर खय्याममें निर्दिष्ट केलेला पहिला वर्ग. याचें साम्य आर्य–धर्मांचे पूर्व मीमांसकांशीं जुळतें.

२१ त्याच अवसरांत बसरा शहरांत **इख्वानुस्सफा** म्हणजे श्वेतबांधव-मंडळ नांवाची तत्त्वज्ञांची संस्था झाली याचे भौतिक व अध्यात्मिक उभय विषयावर बरेंच मननीय ग्रथ झाले. हा केवळ तत्त्वज्ञांचा दुसरा वर्ग. याचा समावेश आपले वैशेषिक न्याय तर्क या शास्त्रांत होतो.

२२ **षिआ** पंथाचे अस मत आहे कीं हजरत पैगंबरनीं बाह्यांग कर्म सर्व जगास सांगितलें, परंतु अंतरंग रहस्य एका हजरत अलीस माहीत होतें. त्याचे वंश सय्यद म्हणजे पुढारी. त्यांचे वंशांशी प्रेम हें मुख्य धर्माचें कर्तव्य. या **हजरत अलीचें** घराण्यांतील ११ वा गुरूपदारूढ पुरुष म्हणजे इमाम हजरत **इस्माईल** होता, याचें नांवानें इस्माईली पंथ निघाला. उमर खय्याम आणि निजामुल्मुल्क याचा सहाध्यायी या मताचा पुरस्कर्ता झाला. पुढें राजकारणी हषीषी नांवाची बंडखोर संस्था यानें काढून यानें निजामुल्मुल्क याचा कृतघ्नपणानें वध करविला. असो. या बंडखोर राजकारणी टोळीचा **इस्माईली** पंथाचें तात्विक मताशीं संबंध नाहीं. मुख्य तत्व **हजरत अली** याचें घराण्यांत परंपरेनें **इमामत्व** म्हणजे **आचार्यत्व** ज्या पुरुषास असेल त्याचे मध्यस्थीनें **मारफतीनें** ईश्वर तत्त्वास जाणावें. ' आचार्यवान् वेद ' अर्थात् तत्त्वज्ञान गुरुगम्य आहे, हाच मुख्यतः या मताचा आशय घ्यावयाचा. हा उमर खय्याममें सांगितलेला तिसरा वर्ग.

२३ चतुर्थ सूफी लोकांचा वर्ग हिजरीचे पहिले शतकांत राबिआ नामक साध्वीपासून झाला. परमात्म्याशीं प्रेमानें संलग्न होणें हेंच जीवाचें केवळ कर्तव्य आहे. तद्व्यतिरिक्त इतर वस्तूचा त्याग केला पाहिजे. 'त्यागेनैके अमृत मानशुः' अशा वचनाप्रमाणें हें मत आहे. या मताचा प्रसार हिजरी दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत इराणांत बहुत झाला.

अबू सइद बिन अबुलखैर याचा स्वताचे शिष्यास असा उपदेश असे कीं परमात्म–प्राप्तीची इच्छा असेल त्यानें सर्वसंगपरित्याग करून भैक्ष्याचरण अथवा अयाचित वृत्ति स्वीकारावी. कर्मकांडी स्वर्ग प्राप्तीचे इच्छेनें सत्कर्माचरण करि-

तात. सांख्य व योग यास स्वर्गाचे महत्व नाहीं. उदाहरण:—पातंजल सूत्र: द्रष्टानुश्रविक विषय वितृष्यस्य वशीकार संज्ञा वैराग्यम् ॥ केवळ पूर्व मीमांसा शास्त्रानेच परिपूर्ण दु:ख विच्छेद होत नाहीं म्हणून सांख्य शास्त्राचे प्रवृतीची अवश्यकता दाखविण्यास कारिका:—द्रष्टावदानुश्रविक: सह्यविशुद्धिक्षयातिशय युक्त: । तद्विपरीत: श्रेयान् द्रष्टादश्यज्ञ दर्शित्वात् ॥ ज्ञानोत्तर भक्तिमार्ग ही कर्माचें महत्व मानीत नाहीं.श्रीभगवद्गीता॥ त्रैविद्यामां सोमपा: पूतपापायज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते ॥ ज्ञानेश्वराय म्हणतात:—

जे श्रुतित्रयाते जाणोनि । शतवरी यज्ञ करोनि । यजिलिया माते चुकोनि । स्वर्गावरिती ॥१॥ जैसे कल्पतरू तळवटी । बैसोनि झोळिये देतसे गाठी ॥ मग निदैव निघे किरीटी । दैन्यचि करू ॥२॥ तैसे शतक्रतु यजिले माते । कीं इच्छितातिं स्वर्ग सुखातें । आतां पुण्य की हें निरुतें । पाप नोहे ? ॥३॥ म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्ग । तो अज्ञानाचा पुण्य मार्ग । ज्ञानिये तयाते उपसर्ग । हानी म्हणती ॥४॥ सूफी लोकांचेंही असेंच मत. खय्यामनें तर आपले सुभाषितांत स्वर्गाची उघड उघड टवाळी केली. उदाहरण:—

गुरु माय गंगा किनारा अम्हाला । बहू चांगलें स्वर्ग राहो तुम्हाला ॥<br>
कुणाची कथा ती कानांत घाला । न नर्कीं रिघाला, न स्वर्गोनि आला १२४

स्वर्ग जर चांगला तर तेथून कोणी इथें परत येणार नाहीं, नरक जर वाईट तर तेथें कोणी प्रामाणिक मनुष्य जाणार नाहीं, मग अशा स्वर्ग नरक द्वयाचा अनुभवणारा पुरुष कोणी साक्ष देण्यास नाहीं तर, त्याचें अस्तित्व प्रतिपादन सिद्ध होत नाहीं. रमजान उपासादिक बाह्य साधनें व्यर्थ आहेत.

मला वेधिलें जैं उपासें जपानें । मला वाटलें काम झालें तपानें ॥<br>
फिटें सोवळें तेथ एका अपानें । सुटे तो निराहार एकाचि पानें ॥३२९ ॥

खय्यामचें सुभाषितांचें विवरण पुढील प्रकरणांत आहे त्यावरून त्याचे व सूफी मताचे मतांचा निवाडा होईल. असो आतां उमर खय्यामचें चरित्रास वळूं.

२४ साधारण मनुष्य सूक्ष्म विचाराच्या गोष्टी समजूं शकत नाहीं, धर्म ग्रंथांत स्वर्ग इत्यादि स्थिति वाचक शब्द स्थलवाचक भासूं लागतात; स्वर्ग हा स्थल नाहीं असें म्हणणारास तो शत्रु लेखतो. श्रीभगवंतांनीं ' न बुद्धि भेदं

जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ' ॥ असा उपदेश केला, तो केव्हां केव्हां भक्तीच्या आवेशांत भक्त विसरतात; तेव्हां स्वर्गध्वंस केलेल्याचें प्रायश्चितही त्यांना भोगावें लागतें. उमरचा मित्र निजामुल्मुल्क हा हसन बिन सब्बाहचे मारेकऱ्याचे कट्यारीस बळी पडल्यानंतर मलिकशाहही याच बंडखोरांचे विषास बळी पडला. इकडे मुल्ला लोकांची करडी नजर उमरवर होतीच. त्यांनीं त्याजवर कैक किटाळे आणिलीं, तरी तो निर्भिडपणा सोडीना. त्याला दंभ दाक्षिण्य व लौकिक याचा अगदीं तिटकारा असे.

ध्वनी रासभाचा असे लोक बोल । बहू नाद ढोला परी आंत फोल ॥
झुकायासि याना न लागे कमाल । करी लौकिका, लौकिका हे हमाल ३१८
कुणी निंदितो काय त्याचें आम्हाला । बुरें एक नाहीं, गणी शंभराला ॥
गुरूनें मला आरसा स्वच्छ केला । बघे जो मला देखतो तो स्वताला ३७०
अरी तो मला सर्वदा देत शाप । परी काय कीजे अहो माय बाप ॥
मनोदर्पणीं देखतो रूप आप । स्वताचें गुणांचें वदे तो प्रताप ॥ ३४७ ॥

तसेंच श्लोक ३५१–३६२–३६८ पहा.

२५ बीज गणिताचे प्रस्तावनेंत असें लिहितोः—

" आमुचा अनुभव असा आहे कीं, विद्याव्यासंगी नरांचा वर्ग फार त्रुटित होत आहे. कारण एकीकडे त्यांची संख्या अल्प व दुसरीकडे कष्ट फार. म्हणून संख्या घटत चालली आहे. ही अल्प संख्या जरी आहे तरी ती अनंत कष्टानें केवळ संशोधनात व विद्येच्या प्रगटी–करण्यांत आपले दीर्घ आयुष्याचा विनियोग करीत आहे. असें असूनही या कालचे बहुतेक शहाणे लोक खऱ्यास खोट्याचा पेहराव देतात, लौकिक व दाक्षिण्य सोडीत नाहींत. त्यांचा जो कांहीं शहाणपणा असेल तो विद्येच्या पायमल्लीत खर्च करितात. कुणी सत्य जिज्ञासू, व सच्चा परमार्थी सत्याकरितां आत्मसमर्पण करीत असून असत्याचें खंडण आणि दंभाचा त्याग करील तर त्याची लोक कुचेष्टा करितात, त्याला भेडवितात. "

२६ खय्याम लोकांपासून दूर राहात असे.

स्वता आवडे दोष पाडे म्हणावें । परी नावडे दोष लोकें गणावे ॥
अशा या जगाला बघूनी स्वभावें । मला आवडें या जगा दूर जावें ॥१२१॥

कुणासी नको सख्य तूं अंगिकारूं । जनाची गडी ती भली दूरदूरू ॥
मनाचा तुला फ़ार विश्वास थोरू । असे चोरटे वाटमारू लुटारू ॥ ५६ ॥

२७ उमर खय्यामची कविता जितकी सूक्ष्म विचाराची आहे तिथवर सामान्य जनतेची पोहोंच नसे व त्याचे विद्वत्तेमुळें बरेंच शत्रु झाले होते. त्यांनीं असा फतवा म्हणजे निकाल दिला कीं, तो निरीश्वर काफिर पैगंबरास न मानणारा आणि दहरिया म्हणजे भौतिक–वादी आहे. याविषयीं स्वत: खय्याम म्हणतो:–

जगीं दोन कीं तीन धर्माधिकारी । स्वता दीड हे, अर्ध पृथ्वी बिचारी ॥
उगें बैस. यांचे परी जो चुकारी । नसे वाळिती त्यासि लेखुनी वैरी ॥३६९॥

हैद्राबाद स्टेट लायब्ररींत एक रूबाईची हि० १०१७ पूर्वची अपूर्ण जुनाट हस्तलिखित प्रत आहे. त्यांत लेखक असे म्हणतो कीं, " षरानें (धर्मानें) याच्या वचनावर बहिष्कार घातला आहे."

२८ खय्याम आपले ग्रंथाची वाताहत झालेली स्थिति पाहून असें म्हणतो:–

मनें रोविला शब्द पांडित्य डेरा । तुझें दारिं तें वेंचिलें सर्व केरा ॥
तुवा कापिले वासना मेख दोरा । दिलें सर्व गाबाळ तें शून्य चोरा ॥१४६ ॥

२९ सरते शेवटीं त्याला ठार करण्याचा निश्चय मुल्लांनीं केला, तेव्हां त्यानें नीषापूर सोडून यात्रार्थ प्रयाण केलें व पुढें मौन धारण केलें.

अम्ही चाललों, जाहला शोक काला । अपूऱ्या रहातील चिद्रत्नमाळा ॥
न मी वर्णिलें योग्यसें मोहनाला । मुका राहिलों या जनांचे गुणाला ॥ ३५० ॥

त्यानें मक्केंत जाऊन हज्ज केले. नंतर मदीनेंत कैक दिवस पैगंबरचे समाधीजवळ राहिला व त्याचे धर्मातील पवित्र स्थानांचीं दर्शन घेत घेत तो बगदाद येथें आला. तेथील जनपदानीं त्यास व्याख्यान देण्यास विनंति केली असतां त्यानें नाकारिलें व सांगितलें कीं, हा व्यासंग मी सोडला आहे. सरते शेवटीं उमर नीषापुरांत स्वस्थानीं आला. मार्गांत एका धर्मशाळेंत बसला असतां तेथें पक्ष्यांचा फार उपद्रव असे म्हणून खय्यामनें मृण्मय पक्षी करून त्या धर्मशाळेवर ठेविला तेव्हांपासून पक्ष्यांचा उपद्रव नाहींसा झाला.

३० उमर खय्यामनें ५१७ हि० ११२३ इ० मध्यें शतमानाउपर वयांत देह सोडला. तो असा कीं, एके दिवशीं अबू अली सीना याचा किताबु-ष्षिफा ( दुःख निवृत्ति ) नामक ग्रंथ वाचीत असतांना एकत्व व अनंतत्व याचे विवेचनावर आला. त्यानें दांत कोरणें त्या जागेंत ठेविलें. तात्काळ उठून वजू ( आचमन ) केलें आणि निमाज [ प्रार्थना ] केली. मृत्युपत्र करून अस्त-मान पावेतों अन्नजल विवर्जित प्रायोपवेशन केलें. आणि अस्तमानाचे सुमारास रात्रीची प्रार्थना रात्र होण्याचे पूर्वींच करून नंतर जमीनीवर माथा ठेवून म्हणाला. ' प्रभो माझे अपराधांची क्षमा कर. जिथपर्यंत शक्य तितपर्यंत मी तुला जाणण्याचा प्रयत्न केला.*

३१ खय्यामचा पुतण्या खाकानी ( तोह्फतुल् इराकैन् या ग्रंथाचा कर्ता ) यानें मरसिया म्हणजे शोकप्रदर्शन काव्य उमरचे अंतकालावर लिहिलें आहे. उमरची समाधी नीषापूर येथें एका बागेच्या भिंतीजवळ केली. मरणाचे ११ वर्षांपूर्वी हि० ५०६ मध्यें त्याचा शिष्य निजामी ऊरूजी यास त्यानें सहज संभाषणांत सांगितलें कीं, माझी समाधी अशा ठिकाणीं होईल कीं, वर्षांतून दोनदां वृक्ष त्यावर पुष्पवृष्टी करितील. मरणानंतर १३ वर्षांनीं हा प्रिय शिष्य-हि ५३० मध्यें जेव्हां समाधीचे दर्शनास आला तेव्हां जांब आणि पीचूचे पुष्पांचा ढीग त्याचे समाधीवर पडलेला त्यानें पाहिला. असो. चांग-ल्याची कदर त्याचे ह्यातींत मानवांनीं केली नाहीं म्हणून काय झालें ! देवानें त्याची कदर केली. वृक्षादिक कदर करतील हें खय्यामास माहित होतें.

३२ खय्यामचे सुभाषितासंबंधानें कैक अख्यायिका आहेत. परंतु चतुर कीर्तनकार एकादे सुभाषितावर कहाणी कशी रचूं शकतात याचा अनुभव येतोच. समस्या–पूरणांत कवी तीन चरणाची कहाणी चौथें चरणाचें सम-र्थनाकरितां कशी घडवितात हेंही विदित आहे. उदाहरणः–ठठंच ठठं ठठ ची अख्यायिका. असो. कधीं अशी अख्यायिका सुभाषिताची अर्थ पोषक व कधीं दूषक असूं शकते.

---

*षम्सुद्दीन महम्मद बिन् महमूद षहरजोरी कृत निज्हतुल् अरवाह प्राचीन तत्त्वज्ञांचा इतिहास.

३३ पहिली कहाणी.

शिवा कुंभ माझा तुवा भंगियेला । सुखाचा दिवा तूंच कीं मालवीला ॥
तुवा जीव माझा धुळीं कालवीला । धुळी फाकितो मी, तुझी मस्त लीला ८२६.
गुन्हा जो करीना असे कोण ऐसा ? । न केल्या गुन्हा वाचला जीव कैसा ? ॥
चुके मी, जरी देसि खोटाचि पैसा । बुरा मी, प्रभो काय तूं होसि तैसा ? ७५७

या श्लोकद्वयावर आख्यायिका अशी आहे कीं, उमरचे हातांतून प्याला पडून फुटला, तेव्हां ८२६वी रुबाई त्यानें म्हटली कीं, लागलेंच त्याचें तोंड काळें ठिक्कर पडलें; कारण ईश्वरास उन्मत्त म्हटलें हा अपमान सहन झाला नाहीं! उमर आरशांत आपला चेहरा पाहून पश्चात्ताप पावला, व श्लोक ७५७ म्हणतांच त्याचा चेहरा पूर्ववत् स्वच्छ झाला. वास्तविक श्लोक अंक ८२६ हा यदृच्छा Chance या तत्वास उद्देशून आहे. इच्छित कामनेचें मद्य पीण्याचे पूर्वीं देह नष्ट होतो. कर्माचे परिपाकाचा नियम जीवाचे तर्कांत येत नाहीं. ७५७ च्या रुबाईंत ईश्वराची कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं अशी जी अद्‌भुत शक्ती आहे तिचें समर्थन आहे. केवळ कर्मवादी ईश्वर फक्त चांगले कर्माचें बक्षीस आणि वाईटाचें शासन देतो, असें प्रतिपादितात. भागवत मत व भक्तांचा अनुभव याचेपेक्षां विलक्षण आहे. 'भजंति ये यथा देवान्देवाश्चापितथैवतान् । छायेव जीवस्त्चिवा: साधवो दीनवत्सला:' ॥ नुसते नामोच्चारणानें पापी अजामिळाचा उद्धार झाला, असें केवळ नाम माहात्म्य आणि देवाचें व भक्ताचे सामर्थ्य आहे. सारांश दुसरा श्लोक हाच भक्तिपंथाचा आशय दर्शवितो.

३४ दुसरी कहाणी:—मरणोत्तर खय्याम आपले आईचे स्वप्नांत आला असतां आईनें विचारिलें कीं तुझी काय आवस्था आहे ? उमरनें उत्तर दिलें कीं, प्रभूनें मला सर्व अपराधाची क्षमा या रुबाईमुळें केली.

उरीं पोळला भाजला राख झाला । स्वता पेटसी कुंभिपाकांत ज्वाळा ॥
कराया दया सांगसी तू दयाळा । असा कोण पंतोजि तूरे घसाळा? ॥१००८॥

वरील रुबाईचें भाषांतर कैकांना फार कठीण झालें आहे. भक्तांना यांत आत्मनिवेदनाची व हरीप्रेमाची परमावधी अनुभवास येईल. हरीला 'क्षमा कर' म्हणण्याचा सुद्धां जिवास अधिकार पोहोंचत नाहीं. तुकोबाराय म्हणतात:—

' चुकल्या कामाचा मागें मी मुशारा । लाज फजित खोरा मज नाहीं ॥ आतां अख्याइका खरी कां खोटी ? उमरचें वय मरणकालीं शतमानावर तेव्हां त्याचें आईचें किती होतें ? मरणोत्तर किती वर्षांनीं हा दृष्टांत झाला, व आईनें कुणाला सांगितला, व परंपरेनें कुणी ऐकिला व नोंदला, यासर्व गोष्टी माहित नसल्यामुळें निर्णय कसा करावा? अशीच अख्याइका 'षाहनामा ' चा कर्ता कवि फर्दूसीची आहे. यानें आजन्म ईराणचे प्राचीन काफिर राजांची नरस्तुती केली त्यामुळें, किंवा सुलतान महमूदचा धिःकार करून राजरोष जोडल्यामुळें, मरणोत्तर जातभाई उचलावयास आले नाहींत. बराबर नमाज इत्यादि और्ध्वदेहिक क्रियेशिवाय कसेंबसें पुरून टाकिलें. अर्थात् मान्य मुसलमानाच्या सद्गतीस तो जाणार नाहीं हें साधारण लोकमत होतें. अख्याइका अशी पुढें निघाली कीं, एका सूफी योग्यानें समाधि आवस्थेमध्यें फर्दूशीस स्वर्गाचें नंदनवनांत सुखानें विहरतांना पाहिलें. त्यानें समाधि आवस्थेंतच फर्दूशीस विचारिले कीं, देवानें इतकी उत्तम गती तुला कां दिली ? फर्दूशी म्हणाला मरणोत्तर मुनकिर नकीर म्हणजे चित्रगुप्त यांनीं पुण्यपापाचा हिशेब तपासून सांगितलें कीं, आजन्म यानें नरस्तुतीच केली. मात्र एकदां असे बोलला:—' कथूं या त्या अनामाचेंचि नावें । कुठें ही वाहता जो शीघ्र धावें ॥ प्रभू आशुतोष, इतक्यानेंच त्यानें परमानंद—पदीं मला ठेविलें. या कहाण्या ऐतिहासिक दृष्टीनें नसल्या तरी तात्विक दृष्टीनें अगदी सत्य आहेत.

३५ तिसरी कहाणी:—एकदां नीशापुरांत प्रचंड भूकंपानें वाडें, विद्यालयें उध्वस्त झाले असतां, बांधकाम चाललें; त्यांत भारवाही एक गाढव मेटाकुटीस येऊन मृतप्राय कितीहि प्रयत्न केले तरी हालेना. उमर खय्याम पुनर्जन्माचें प्रतिपादन करीत असे, तो आकस्मात तेथें आला. तें गाढव एका मृत मुल्लाचा अवतार आहे असे उमरनें जाणून त्यास उद्देशून म्हणाला.:—

निगूरे वनीं तापतां चूर झाले । नरा सोडुनी वानरीं शूर झाले ॥
वळूनी नखें एक तें खूर झालें । जटा दाढिचें पुच्छ भर्पूर झालें ॥ ७८८ ॥

एवढें म्हटल्याबरोबर गाढव चटदिशी उठून चालूं लागले. मूळ रुबाईत तपश्चर्येकरितां, अथवा दीर्घकाल प्रवासास जाऊन, परत आलेल्या मनुष्याचें वर्णन

गाढवाचें रुपकावर आहे. कहाणीचा आशय एवढाच कीं उमर खय्याम पुनर्जन्म मानीत असे व त्यास गाढवाचा मागील जन्म अवगत झाला. रोहिदास संताविषयीं ही याच प्रकारची अख्याइका आहे.

### ३. रुबाईचे वृत्त.

३६ यद्यपि फार्सी भाषा आर्य असून इस्लामचे पूर्वकालीन झेंद ( छंद ) यांतील पद्यें व गाथा ऋग्यजुच्छंदाप्रमाणें आहेत, तथापि फार्शीचे व्याकरण व छंदशास्त्र अरबीचे पद्धतीवर इस्लामचे प्रचारानंतर लिहिले गेले आहे. संस्कृताप्रमाणें अरबींतही सुभाषितें चतुश्चरणी श्लोकांत लिहिण्याची पद्धत आहे. अत्यंत प्राचीन उपलब्ध अरबींतील श्लोक इस्लामचे पूर्वी हूद पैगंबरच्या वेळचे मानिले जातात.

३७ हजरत महम्मद पैगंबरचा जामात व प्रिय शिष्य हजरत अली मुर्तजा यांच्या अरबी दोन रुबायांचे विचार व वृतें खाली दिलेल्या भाषांतरावरून दिसून येतील.

निजात उद्भव हा मम, ठिकाण विज्ञानीं ।
म्हणोत अरबि कुणी मज, गणोत ईराणी. ॥
सुपूत तोचि वदे जो, 'उभा असे हा मी.'।
न पूत जो पितरांचा प्रभाव वाखाणी ॥ १ ॥
जहालें हृदय माझें योग्य वरण्या विश्वरूपाला ।
गमें तें कुरण हरिणाला, गमे मंदिर भक्ताला ॥
धरीं मी प्रेमपंथाला, म्हणूनी जेथ मी देखे, ।
शिरीं वंदूनी येती सर्वही माझें सुपंथाला ॥ २ ॥

३८ अशा चौचरणी श्लोकांत चारी चरणास यमक असलें तर उत्तमच परंतु तिसरें चरणांत नसलें तरी खपतें. श्रीज्ञानोबारायांनीं अठराव्या अध्यायांत गद्य कविता ओवीची प्रशंसा केली आहे कीं:—परि मऱ्हाटा बोलरंगें । कवळिता पै गीतांगे ॥ तै गातयाचेनि पांगें । एकाढयता नोहे ॥१॥ नाना गुंफिली कां मोकळीं ॥ उणीं न होती परिमळीं । वसंतागमींचीं बाटोळीं । मोगरीं जैसी ॥२॥ तैसा गाणिवेने मिखी । गीतेवीण ही रंगदावी । ती लाभाचा प्रबंध

ओवी। केला मिया ॥३॥ आर्या अथवा श्लोक साधे अथवा गायनांत म्हणले जातात, तशीच रुबाई साधी किंवा ताल सुरांत म्हणता येते. ठुमरी ( खुमरी ) फार्शीत असते तेव्हां रुबाईतच असते. फार्शीत अद्यापही रुबाईस दोबैती किंवा तराना म्हणतात. औरंगजेबची कन्या जेबोन्निसा 'सखुन' हिची रुबाई सर्व गवयांच्या पाठांत असलेली अध्यात्म अर्थानें सर्वांगसुंदर आहे.

बुल्बुलज् गुल् बुगजरद् गर् दर्चमन् बीनद् मरा ।
बुत्परस्ती कै कुनद्गर ब्रिहमन्बीनद् मरा ॥
दर्सखुन्पिन्हाँ शुदमूचूँ बूय गुल् दर्बर्गे गुल् ।
मैल दीदन् हर्के दारद् दर् सखुन् बीनद् मरा ॥ १ ॥

सोडि भृंगहि पुष्करा, देखूनि उद्यानीं मला ।
मूर्तिपूजा कैं करी द्विज, पाहता नयनीं मला ॥
मी असे शब्दांत गुप्त सुवास जेवि वसे फुलीं ।
जो बघूं मज इच्छितो पाहील या वचनीं मला ॥ १ ॥

गवयी लोक गजल म्हणतांना मध्यंतरी अशी रुबाई तराना म्हणतात. ही चाल अकबर बादशाहपासून पडली. त्याचा असा हुकूम असे कीं, हाफिजचे गजली-बरोबर उमर खय्यामची रुबाई म्हटली पाहिजे. ( आईन अकबरी ) व या-मुळेंच हाफिजचे पुरातन लेखी प्रतींत उमरच्या रुबाया सांपडतात. ( उदाहरण पुढें येईल. ) असो रुबाई म्हणजे आपला श्लोक.

३७ वरील उदाहरणावरून दिसून येईल कीं, सुभाषितें श्लोकांत ( अर्थात् ) रुबाईत गाण्याची पद्धत अरबींत व फार्शीत आहे. परंतु इतर वृत्तापेक्षां रुबाई-करितां फार्शीत हजज वृत्ताचा जास्त प्रचार आहे. त्याविषयीं आख्यायिका अशी आहे कीं, हजज वृत्त इराणांत माहीत नव्हतें. याकूब सफ्फार (म॰ कि॰ २९०)चे कारकीर्दीत त्याचा प्रचार इराणांत, त्याच्या लहान मुलानें पाडला. मुलगा आक्रोडाचा चेंडू करून खेळत असतांना आक्रोड गारींत पडला व मुलगा म्हणाला:—' गल्तां गल्तां हमी रवद्तादर गो ' ' फिर्ता फिर्ता पळेच गारि-मधें तो ' दरबारांत अरबी कवि होते. त्यांनीं सांगितलें कीं, हा मुलगा बाल

कवि आहे. हें हजज वृत्त आहे. तीन चरणें मिसळुन रूदकी नामक कवीनें समस्यापूर्ण केली. राजपुत्राचे मुखांतून निघालेले वृत्त राजांस व त्यामुळें आश्रित कवींनां आवडलें व आबाल वृध्दांत प्रसिध्द झालें. बहुतेक सूफी पुढें याच वृत्तांत सूक्ष्मविचार प्रकट करूं लागले. शुष्क फकिरांना सुध्दां कवितेची आर्द्रता या वृत्तानें आणिली म्हणून कवि रूदकीनें याला तराना आई असें नांव ठेविलें. सारांश फार्सींत अधिक प्रचारांतील रुबाई—हजज वृत्तातलीं, यांत अखरम व अखरब असे दोन प्रकार आरंभी मगण अथवा तगण असेल त्याप्रमाणें आहेत. प्रत्येकांत १२ प्रस्तार असे हजज वृत्ताचे रुबाईचे २४ भेद आहेत. प्रत्येक चरणांत २० मात्रा असतात. थोडक्यांत मराठी वाचकास त्याची खूण व म्हणण्याची पद्धत कळण्यास इतकें पुरें आहे कीं, मगण अथवा तगणानें आरंभून मोरोपंती आर्येचे समचरणांत २ मात्रा अधिक असल्या म्हणजे हजज वृत्तांचे रुबाईचें चरण होतें. उदाहरणः—

'कृष्णा विष्णू मुकुंद घन नीळारे'। 'पीतांबरधारि देवकी बाळारे'॥

आणि उमरचें हेंच वृत्त बहुधा साऱ्या रुबाईत आहे.

३८ खय्यामचें पूर्वी व समकालीं रुबाईत बोलणारे रुदकीनंतर सूफी खाजा अबूसईद अबुल्खैर (मृ. ४०४ हि.) अबूइस्माईल अन्सारी [ज० हि. ३९४ मृ.हि.४८१] अबुल्हसन खिरकानी (मृ.४२५हि.) अबू अलीसीना [मृ.हि.४८८] दरीभाषेंत बाबाताहिर हमदानी [मृ ४१०] अतार नीशापूरी (मृ.हि. ५१२) खय्यामनंतर अनवरी, जहीर फारयाबी, सनाई, खाकानी, कमाल इस्माईल, सलमान सावजी, सादी, जामी, हाफिज, सूफी सरमद यांनीं ही रुबाई गायली आहे. परंतु रुबाईत विशेष ख्याती—अबूसईद—अबुलखैर, बाबा ताहिर उमर खय्याम, आणि सूफी सरमद यांचीच आहे. व सर्वांत उच्च कोटीची रुबाई उमर खय्यामची आहे.

## ४ उमरच्या किती रुबाया?

३९ हें प्रकरण चिकित्सात्मक आहे म्हणून केवळ चिकित्सात्मक व संशोधक दृष्टी ज्यांची असेल त्यांनीं हें प्रकरण लक्षपूर्वक वाचावें. चरित्र प्रकरणांत

उल्लेख केल्याप्रमाणें उमर खय्यामचें सुभाषितावर बहिष्कार पडल्यानंतर त्याची बाळगण्याची किती जोखम असेल याची कांहींशी कल्पना आजकालच्या परिस्थितीवरून होऊं शकते. तो स्वतः म्हणत आहे:–

अम्ही चाललो, जाहला शोक काला । अपूऱ्या रहातील चिद्रत्न माळा ।
न मी वर्णिले योग्यसे मोहनाला । मुकें राहिलो या जनांचे गुणाला ॥ ३५० ॥

त्यांतून रुबाईसारख त्रुटित पद्य वाटेल त्याचें नांवावर सहज लेखलें जातें. उमरच्या रुबाया सर्वांगसुंदर असल्यानें कैकांच्या पाठांत जितक्या व जशा असतील त्याप्रमाणें [१] 'दीवान' म्हणजे यमकानुक्रमी पुस्तकांत स्वतंत्र त्याचेच नांवाखालीं; [२] 'बयाज' म्हणजे वेंचे; [३] 'हाषिया' म्हणजे हाफिजसारख्या अन्य कवींच्या दीवानचे समोंवतील जाग्यांवर वेंचे; [४] 'हवाला' म्हणजे दुसरे ग्रंथकारानें उद्धृत केलेलें; [५] 'टाचग' म्हणजे धंदेवाले लेखकांनीं लेखनाकरितां नियमित उतरून घेतलेलें. अशा संग्रहीत आहेत. सन ७२१ हिजरीपासून १२०० हिजरीपर्यंतची पांच प्रकारांची हस्तलिखितें प्रसिद्धीस आलीं आहेत.

४० हिंदुस्थान, ईराणमध्यें हा कवी प्रसिद्ध आहे. जशी श्रीज्ञानोबारायाची ओवी तशी उमरची रुबाई लक्षावधी सुभाषितांतून निवडून येते. परंतु उमरचा आशय समजण्यास कठीण आणि त्याचें काव्य पहिल्यानें बहिष्कृत म्हणून त्याचे मर्मज्ञ बहुधा कमीच होते. आजला उमर खय्यामचें कवितेचें महत्त्व जगापुढें यूरोप अमेरिकेनें आणिलें आहे. फ्रेंच प्रो.वीपकें यानें प्रथमतः उमरचें बीजगणिताचें भाषांतर केलें. त्याचे प्रस्तावनेंत तुच्छत्वदर्शक उद्गार रुबायाविषयीं काढले. इंग्रजी कवी बटलरकृत [इ.१६६३] ह्यूडिब्रासमध्यें उमरचें वर्णन आहे. डॉक्टर थामनहैड आक्स्लफोर्ड विद्यापीट, यानें १७००मध्यें फार्सी कवींचें विवेचनाचें ग्रंथांत उमरचा उल्लेख केला; १८१८ मध्यें वेना येथें फॉन ह्यामर पुर्गस्तालनें २५ रुबायाचें भाषांतर केलें. इ. १८२७ मध्यें फ्रेड्रिक रुकर्टनें फार्शी 'कविता' या पुस्तकांत असा उल्लेख केला कीं, उमरची कविता फार्शींत सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे. इ.स. १८४६ मध्यें सर जॉर्ज औस्ले यांनीं बाडलिन

लायब्ररीस १५८ रुबायांची हस्तलिखित प्रत दिली. १८५७ मध्यें गार्सेन टेसीनें १० रुबायांचें फ्रेंच भाषांतर प्रसिद्ध केलें. मार्च १८५८ मध्यें प्रो. कोवेलनें [कलकत्ता रिव्ह्यू] ३० रुबायांचें भाषातर केलें; व उमर खय्यामचा दीवानही छापला. फिज्जेरल्डनें १८५९ मध्यें उपरनिर्दिष्ट औस्ले हस्तलिखित आणि प्रो. कौलेच्या प्रतीवरून ७५ रुबायांचें भाषांतर केलें. १८६७ मध्यें जेबीनिकोलानें तेहरानचे प्रतीवरून ४५९ रुबायाचें फ्रेंच भाषांतर केलें. १८६८ मध्यें फिज्जेरल्डनें पहिलें भाषांतर सुधारून व वाढवून ११० व्हर्सेस छापिलें. ही दुसरी आवृत्ती यांत पुन्हां फेरफार करून ९ व्हर्सेस गाळून १८७२मध्यें १०१ व्हर्सेची तिसरी, पुन्हां सुधारून १८७९ मध्यें चौथी आवृत्ती १०१ रुबायांची निघाली.

४१ प्रथमत: फिज्जेरल्डनें मद्य व प्रेम हें वैषयिक अर्थ स्वीकारलें आणि इ. स. १८६७ मध्यें जे. बी. निकोला यानें त्यांत सर्व अध्यात्मपर अर्थ घेतला होता. फिज्जेरल्डनें दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत स्वताचें मत असें प्रगट केले कीं,उमरचें मद्य म्हणजें द्राक्षासवच आहे. हा वाद मुख्यत: चर्चेस कारणीभूत झाला व अद्यापही होत आहे. सर्व जगांत उमर खय्यामचें सुभाषितांचा अर्थ हृदयंगम व गहन आहे याची कल्पना त्याचे रुबायींची भाषांतरे व चर्चा ज्या आज पावेतो झाल्या त्यावरून होऊं शकते. नुसत्या उमरवर लिहिलेल्या पुस्तकाची यादी बिबलियोग्रफी अँब्रोज जार्ज पाटर यानें दिली आहे (इंगपेन अँन्ड ग्रँट लंटन १९२९) त्यावरून असें दिसतें कीं, फिज्जेरल्डचें भाषांतराच्या ३१० आवृत्त्या इंग्लंड अमेरिका येथें निरनिराळया छापखान्यांत निघाल्या. इतर ग्रंथकारांची कमी जास्त रुबायाची इंग्रजींत १०० भाषांतरें आहेत. इतर युरोपियन २१ भाषेंत १२४ आणि आशियाचें भाषेंत २९भाषांतरें झालीं. त्यांत संस्कृतांत गिरिधर शर्मानें फिज्जेरल्डचे पहिल्या आवृत्तीवरून (७५रुबायांचें); उर्दूत ३ भाषांतरें अनुक्रमें ७६४,९०८आणि ८९५ रुबायांची उडियांत७५रुबायाचें; बंगालींत ३ भाषांतरें अनुक्रमें ३१० व फिज्जेरल्डचें १०१ व ७५ रुबायाचे. गुजराथींत ७ भाषांतरें–अनुक्रमें ५००,४०,५०,३३०,६,५०० रुबायींची; मराठींत पटवर्धनकृत ५२४ रुबायांचें, तामिळमध्यें फिज्जेरल्डचें ७५ रुबायांचें, हिंदींतही ३ भाषांतरें झाली आहेत. उमरचें कवितेचें विवेचनावर ९८ ग्रंथ, ३४ नाटके

प्रहसनें, खय्यामक्लबचे ६ ग्रंथ इतर ७६ मासिकांत कैक वर्षें या विषयीं चर्चा. उमरचे रुबायासारखे पण केवळ विनोदात्मक पद्यांचे इंग्रजींत ३९६ ग्रंथ झाले आहेत. यावरून उमरनें या जगांत केवढा दंगा मांडला आहे याची कल्पना होईल. सदर यादींत नसलेले कैक ग्रंथ आहेत. उदाहरणार्थ:—माधव ज्यूलियन-कृत फिज्जेरल्डचे ७५ रुबायांचें मराठींत भाषांतर.

४२ सदर यादींत मूळ रुबायांच्या ५१ हस्तलिखित प्रतींचा उल्लेख आहे तो असा:—लंडनम्युजियम [ ५ ] पॅरिस नॅशनल [ ११ ] बर्लिन [ ७ ] मुंबई [ १ ] लखनौ [ १ ] वेना (२) आक्सफोर्ड [ ३ ] केंब्रिज [२] मॅचेस्टर [१] इंडिया ऑफिस लंडन [ २ ] बॅरेज [ ५ ] गोथा [ १ ] खुदाबख्ष लायब्ररी बंकीपूर [१] टोंक (१) कलकत्ता [२] लैडन [२] लेनिनगार्ड (१) रोजेन संपादित [३] पाटर [१]. वरील पैकीं कांहीं दीवान, व कांहीं बजाज, हाषिया, हवाला यांत मोडतात परंतु यांत उल्लेख नसलेल्या पुरातन हस्तलिखित ५ प्रती हैद्राबाद येथें २ महिन्याच्या अवधींत या लेखकांच्या पहाण्यांत आल्या आहेत; याशिवाय आणीकही प्रतींचा शोध लागत आहे. अशा हस्तलिखित प्रती-वरून ३५ दीवान जगांत छापले आहेत. यासर्व प्रती एकत्रित करून पाहिल्या तरच मूळ रुबाया किती उपलब्ध आहेत याचा अंदाज होईल. ५३ वर्षापूर्वीं मे १८७९ च्या फ्रेजर्स मेगझीनमध्यें मिसेस जेसी क्याडेल नामक विदुषीनें यूरोपांतील त्यावेळेस उपलब्ध प्रती स्वता पाहून फिज्जेरल्डचें भाषां-नापसंत केलें* आणि असें प्रसिद्ध केलें कीं, निदान१२०० पेक्षां अधिक रुबाया या हस्तलिखित प्रतींत लेखिल्या जातात. ही त्यावेळेची हकीकत आहे. सदर यादींत ज्या हस्तलिखित प्रती दाखल आहेत त्यापैकीं किती तेव्हां त्या विदुषीनें पाहिल्या, आणि मागावून जगा समोर आल्या त्यांत किती नवीन रुबाया सांपड-तील हें समजेल तेव्हां आज उपलब्ध असलेल्या रुबायांची सख्या समजेल. बहुधा हिंदुस्थान व ईराणांतूनच या प्रती तेथें गेल्या—परंतु मेल्यावाचून स्वर्ग, आणि यूरोपांत गेल्यावाचून तिथल्या हस्तलिखित प्रती दिसूं शकत नाहींत.

*" We feel disapisfied with Mr. *Fitzgerald's* verses for in them we get some ideas the Persian lines do not coutain and lose many that they do. "

४३. शके १८३८मध्यें उमर खय्यामचें **गुरुकरुणामृत** सदर बिबलियाग्रफींत [ पान ३०८ नं. १६ वर ] नोंदलेल्या दक्षिण हैद्राबादच्या प्रतीवरून झालें. ही शिळा छापी प्रत खुद निजाम सरकार आला **हजरत–कद्र कुद्रस्त–मुजफ्फरूल् मुमालिक–सिपह सालार–फत्तेजंग–निजामुद्दौला–निजामुल्मुल्क आसिफजाह–नवाब मीर महबूब अली खान बहादुर** यांचे कारकीर्दींत त्यांचे **मतबए रिकाबखास** नामक छापखान्यांत **महम्मद फैय्याजुद्दीन फैय्याज** या विद्वानानें अनेक हस्तलिखित प्रतीवरून शुद्ध पाठासहित ४० वर्षांपूर्वीं **रमजान** १३११ हिजरीमध्यें छापिली; आज ही प्रत हैद्राबादीं ही विक्रीस दुर्मिळ आहे. ही प्रत ज्या हस्तलिखित प्रतीवरून छापिली तींत ९३५ रुबाया होत्या. व हाषिया म्हणजे बाजूस १ आणि परिशिष्ट इतर प्रतींतून ९४ चे जोडून एकूण १०३० रुबाया छापिल्या. भाषांतर करितांना १४ रुबाया कांहीं यमक अथवा चरणानुक्रम भेदानें व कांहीं केवळ शब्दशः पुनरुक्त दिसल्या. अशा १४ रुबायांस सोडून प्रथम १०१६ श्लोक झाले.

४४ पहिल्यानें **गुरुकरुणामृत** छापावे असा हेतू नव्हता. आतां जेव्हां छापण्यास आरंभ झाला, तेव्हां कृपामूर्ती **नरहरशास्त्री खरसीकर** यांनीं प्रस्तावना लिहिण्याची आवश्यकता दर्शवून श्रावण अखेरीस आरंभ करविला; आणि वाटलें कीं, मूळ फार्सीच्या उपलब्ध प्रती तपासून पहावें. ज्या उपलब्ध झाल्या त्या अशा:–

(अ) फ्रेड्रिक रोशनच्या कावियानि प्रेस बर्लिन (१९८८)(हि.७२१) रुबाया ३२९ ( हि.९३० ) रुबाया ६१ (हि.७४१) १३ या तीन्हींत मिळून पृथक ( ३८४ ) रुबाया होतात.

(आ) हेरोन ॲलनकृत औस्ले हस्तलिखित (८८५हि.) १५८ रुबाया.

(इ) जेबीनिकोला ( पॅरिस १८६७ ) ४५४ रुबाया.

(ई) व्हिनफील्ड ( ट्रूबनर १८८३ ) ५०० रुबाया.

(उ) अब्दुल्ला जेवद्तबे ( इस्तंबोल १९२६ ) ५७६ रुबाया.

(ऊ) १ लखनौ **नवलकिशोर** [१९२४ सातवी आवृत्ती] ७७० रुबाया.

(ऊ) २ ,, ,, [ सहावी ,, ] ७६४ ,,

(ऊ) ३ सय्यद महम्मद लायक हुसेन दिल्ली ७६४ रुबाया.

(ऊ) ४ मौ. नसीरुद्दीन संशोधित लाहोर ७६४ रुबाया.

(ए) १ „ इमामुद्दीन „ रोज बाजार प्रेस अमृतसर ९१४ रुबाया.

(ए) २ „ जलालुद्दीन अहमद जाफरी अलहाबाद ९०८ „

(ऐ) मुंबई [हि. १३४६] ७३६ रुबाया.

(ओ) क्रिस्तजन छानित १२१ रुबाया.*

याशिवाय हस्तलिखित प्रती हैद्राबाद येथें आतांपर्यंत पहाण्यांत आल्या त्या अशा:-

(क) हैद्राबाद स्टेट लायब्ररी:–हि.१०१७ चे पूर्वीची अपूर्ण रदीफदालचे मध्यापर्यंत ३०९ रुबाया. संपूर्ण असतील तर ५००वर रुबाया पाहिजेत.

(ख) सय्यद लायक हुसेनः-(हि. ९१५) १२० रुबाया. सुलतान हुसेन हीरातचा राजा यांचे ग्रंथालयांतून शाहजहान पादशहाची राणी फानियाजहान आरा बेगम इचें वाचनांत असलेली. यांत उमर खय्यामचें चित्र, अंगांत एक कफनी व उघडें मस्तकानें निर्जन स्थळीं बसलेला, असें आहे शिवाय पुष्कळ कलमी चित्रें आहेत. हा ग्रंथ राज पुस्तकालयाचा म्हणून जगांत दुर्मिळ आहे.

(ग) लैक्स इकोज [ मॅगज ब्रदर्स ३४ कंडूटस्ट्रीट लंडन] मध्यें महम्मद एहसानच हस्तलिखित टांचणाचा फोटो. हि. ११४५ रुबाया ९१.

(घ) या लेखकांस नवीन उपलब्ध २ जुनी हस्तलिखितें १०००हि. ६८९ व ४१० रुबाया.

४५ परिच्छेद ४० मध्यें निर्दिष्ट हस्तलिखित प्रती पैकीं ज्या कांहीं मिसेस क्याडेलनी ५० वर्षांपूर्वीं पाहिल्या असतील त्यामध्यें १२०० वर अगदीं पृथक रुबाया उमरचें नांवें गणिल्या आहेत असा तिचा शोध होता, परंतु त्या विदुषीचे आयुष्य मधेंच संपलें म्हणून अशा प्रथक १२०० रुबाया एकत्रित असलेली कोणतीही प्रत आज उपलब्ध नाहीं. त्यावेळीं इ.स. १४६० आक्सफोर्ड विद्यापिठातली औस्ले प्रत १५८ रुबायांची जुनी गणली जात होती, आणि केंब्रिज विद्यापीठाची १७८१ चीं प्रत ८०१ रुबायांची अर्वाचीन, म्हणून ही शंका उपस्थित झाली कीं आधीच्या संग्रहांत जितक्या तितक्याच खऱ्या असा-

* Critical studies in the Rubaiyat of Umar Khayyam.

व्यात व नवीन संग्रहांत प्रक्षिप्त असाव्यात. परंतु ही शंका निर्मूल आहे. कारण इ. १४६०चे पूर्वीचें १३२१ इ. चे हस्तलिखित रोजेनचे प्रतींत ३२९ आहेत व हि. ७८७ (१३८४) चे पॅरिसच्या प्रतींत २१३ व १४६० नंतर कैक हस्तलिखितांत १५८ पेक्षा कमी आहेत. अर्थात आधींच्या प्रतीं कमी असतात हें, आणि मागल्या प्रतींत जास्ती आहेत हें, अशीं दोन्ही विधानें वरील उदाहरणावरून निर्मूल ठरतात. याशिवाय ज्या हस्तलिखितावर तारीख नाहीं ते औस्ले प्रतीचे पूर्वींचे हस्तलिखितावरून ही असणे असंभवनीय नाहीं. हिंदुस्थान ईराण इत्यादि देशांतील हवेच्या मानानें हस्तलिखित दोनशे वर्षेपर्यंत सुद्धां खास कमाई केलेला कागद नसेल तर टिकूं शकणें कठीण आहे. अशा परिस्थीतींत पूर्वींचे नष्टप्राय हस्तलिखिताचे नकलेस धरून चालावे लागते. ' पुराणमित्येव न साधु सर्वं ' या न्यायानें पुरातन म्हणून पूर्ण अथवा नूतन म्हणून प्रक्षिप्त प्रत समजणें केवळ भ्रममूलक आहे.

४६ पुढें उमरचें नावावर गणलेल्या रुबाया दुसरे कवींचे ग्रंथाचे प्रतींत शब्दाचे फेरबदलीनें अगर तशाच दिसूं लागल्या. याचें कारण परिच्छेद ३८ मध्यें निर्दिष्ट आहे कीं, उमरचे रुबायीवर धराचा बहिष्कार होता. लेखकांनीं दुसरे धरास मान्य अशा रुग्रहात जपून ठेविल्या होत्या. सन १८९७मध्यें रशियन संशोधक प्रो. वेलुंटाइन झ्युकॉफ्स्कि ( Prof. Valentine Schukovski ) यास निकोलाची प्रत ( इ ) मध्यें ४५४ पैकीं ८२ फिरत्या रुबाया सांपडल्या. पुढें आणीक सात वर्षे शोध करितां करितां संशोधक **आर्थर क्रिस्तेंजन** यास १९०४ मध्यें १९ आणि याच संशोधकास पुढें २३ वर्षांत १९२७ मध्यें सात अशा एकत्र १०८ फिरत्या दिसल्या. अशा फिरत्या कविताची चिकित्सा करतेवेळीं हें तत्त्व ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं दोन पुरुषांस कालांतरानें एकाच विचाराची स्फूर्ती अशक्य नसून अध्यात्मशास्त्राचे अनुभवानें स्वाभाविक व सहज आहे. कारण एकदां एका पुरुषांस एक विचार स्पष्टपणे उद्भवला तर कालांतरानें त्याचे चित्तासी एकतान झालेल्या दुसऱ्या पुरुषासही तोच विचार त्याच शब्दांत फोनोग्राफप्रमाणें उद्भवतो. उदाहरणः—
॥ असित गिरि समंस्यात् कज्जलं सिंधुपात्रे सुरतरुवर शाखा लेखनी पत्रमुर्वी ॥

लिखति यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं तदपि तव गुणानां ईश पारं नयाति ॥ या पुष्पदंतोक्तीचेच शब्द बैबल, व कुराण ( सूरा ३१ लुकमान आयत वलो-अन्ना) या दोन्हींत आहेत. म्हणून पुष्पदंताचे स्तोत्रांत, बैबलांत अथवा कुराणांत हे शब्द प्रक्षिप्त आहेत असा आरोप कुठपत समंजस म्हणावा ? फिरत्या १०८ पैकीं औस्ले प्रतींत १९ आहेत. त्यापैकीं चार गुरुकरुणामृत अंक ११, ४७, ७५ व १०११ तालिब आमली नामक कवीच्या संग्रहांत सांपडल्या. तालिब आमली १००४ हि. मध्यें मृत झाला. औस्ले प्रत ८६७ हि. ची आहे. अतएव फिरत्या दिसल्या तरी तालिब आमलीच्या नाहींत हें निर्विवाद आहे व त्याच प्रमाणें आणिकही दुसऱ्यांच्या नसणें संभवतें.

४७ आतां फिरत्या रुबाया दिसूं लागल्या म्हणून संशोधक क्रिस्तेंजननें आपले चिकित्सात्मक ग्रंथांत * असे मत निदर्शित केलें कीं, ' केवळ १२ रुबाया ज्यामध्यें उमर खय्यामचा नामनिर्देश आहे त्या त्या मात्र कदाचित् त्याच्या असतील कारण अशा रुबाया दुसरे कवीचे वाडांत संचार करूं शकणार नाहींत. स्वता रुबाईचें वृत्त नाम बदलण्यास प्रतिबंधक राहील.' वरील अवतरणांत **कदाचित्** शब्द प्रक्षिप्त वादाचे परीक्षणांत आवश्य लक्षांत घेण्यासारखा आहे. कारण मुळींच नामनिर्देश नाहींत अशा महाराष्ट्र वाङ्मयांत सहस्रावधी, लक्षावधी ओव्या आर्या श्लोक आहेत. व हस्तलिखित प्रती मिळूं शकत नाहींत तेव्हां बहुतेक काव्य प्रक्षिप्त आहे असें प्रतिपादन क्रिस्तेंजनचें विचारसरणीप्रमाणें होऊं शकते. खय्याम नाम निर्देश असलेल्या क्रिस्तेंजनांस मान्य बारा रुबाया गुरुकरुणामृतांत ६७,१४६,१५२,२१६,४२३ ५३७,६८९,६९०,७२६,७९९,९०६,५६४ या अंकांत आहेत.

४८ जर्मन संशोधक प्रो. **रोजेन** यास वरील क्रिस्तेंजनचें विधानाची परीक्षा करितांना श्लोक १४६ चे आशयाची रुबाई शब्दाचे फेरबदलीनें मौलाना **रूमचे** रुबाईत सांपडली. श्लोक ६८९ व ६९० यांत उमरचें नांव दुसऱ्यानें कोणी घातलें असावें असें ते म्हणतात. श्लोक ४२३ व ९०६ प्रो. **रोजेनचे** प्रतींत नाहींत म्हणून त्याविषयीं त्यांना शंका आणि २१८ मध्यें त्याचें प्रतींत

*( Heidelberg 1904. )

[ व हैद्राबादचें प्रतींतही ] उमरचें नांव नाहीं म्हणून क्रिस्तेंजनचें बारा पैकीं ६ प्रो. **रोजेन** बेकार ठरवितात. परंतु उमरचें रुबायांचे संग्रहांत नसून इतर प्राचीन ग्रंथकारांनीं उदाहरणार्थ दिलेल्या आणिक रुबायांचा प्रो. **रोजेननीं** शोध लावला तो असा:–२ गुरुकरुणामृत अंक ४९ व ८१ **नजमुद्दीन** राजीकृत मर्सादुल्इिबादत मधून; २ गुरुकरुणामृत अंक २७० व ३३० षहरजोरी कृत **निज्हतुल्** अरवाह नामक ग्रंथांतून; २ रुबाया हि. स. ८०८ मध्यें लिहिलेल्या फर्दूसुत्तवारीख मधून; आणि १३ रुबाया हि. ७४१ **बद्रजाजर्मी** नामक कवीचें का० –नवनीतांतून. याप्रमाणें प्रो. रोजेन यास सांप्रत सापडलेल्या १९ पैकीं १५ रुबाया पूर्वींपासूनच हैद्राबादचे प्रतींत आहेत.

४९ **खय्याम** नांव आहे म्हणून १२ रुबाया **कदाचित्** उमरच्या असतील हे क्रिस्तेंजनचे विधान प्रो. रोजेननें सदर प्रमाणें चुकीचें असे प्रसिद्ध केल, त्यामुळें पुन्हां क्रिस्तेंजन उमरच्या रुबायाकडे वळले. त्यांनीं उमर खय्यामचे रुबायाची चिकित्सा या ग्रंथांत [ ग्रंथ ओ ] पुन्हां ऊहापोह केला. त्याचे सविस्तर परीक्षण ईश इच्छा असल्यास गुरुकरुणामृताचा दुसरा भाग मूळ फार्सी रुबायाचा इंग्रजी प्रस्तावनेसहित छापताना होईल. परंतु प्रो. पटवर्धनचें भाषांतरांत क्रिस्तेंजननें निवडलेल्या १२१ रुबायास उमरच्या खऱ्या आणि उर्वरीत व्हिनफील्डच्या 'प्रक्षिप्त' असें म्हटले आहे, यामुळें मराठी वाचकाकरितां क्रिस्तेंजनच्या चिकित्सेचे थोडेसे परीक्षण आवश्य आहे. पाश्चात्य पंडितांची अपरीक्षित मतें डोळे झांकून बिनधोक गिळणें साहस आहे. परिच्छेद ४२ मध्यें निर्दिष्ट ५१ पैकीं १४ हस्तलिखितांच्या नकला क्रिस्तेंजननें पैदा केल्या आणि २ प्रती फक्त लंडनमध्यें असतांना तपासून पाहिल्या. या सोळा प्रती तपासतांना त्याना असे दिसून आलें कीं, कांहींत यमकानुक्रम आहे. एका प्रतींमध्यें ४ पॅरीस २५८ प्रथक रुबायाचा संग्रह आहे. ती यमकानुक्रमाची असूनही मधून मधून ११९ रुबायांत आद्य वर्णानुक्रम आहे म्हणून या प्रतीचें त्यांनीं मधून मधून तुकडे पाडून दोन भाग केलें. एक भाग १४९ रुबायाचा वर्ग (अ २) मध्यें व दुसरा ११९ रुबयाचा वर्ग (अ ३) मध्यें त्यांनीं ठेविला. त्याचप्रमाणें कलकत्याच्या प्रतींत ४३८ प्रथमतः यमकानुक्रमी असून नंतर ५४ चे परिशिष्ट होते.

या एकूण ४९२ प्रथक रुबाया आहेत, परंतु ४३८ रुबाया (ब) वर्गांत, व ५४ (अ२)वर्गांत त्यांनीं ठेविल्या नंतर ज्या रदीफी प्रतींत परिच्छेद ३४मधली उमरच्या आईची अख्याइका व रुबाई आरंभी आहे त्या प्रती एका मातृ–लिखितावरून उद्धृत असतील अशी कल्पना केली, त्याचा वर्ग (ब) आणि जींत ती कहाणी व रुबाई नाहीं त्या वेगळ्या मातृ प्रतीहून असें विधान केलें व त्याला वर्ग (अ २) मध्यें कल्पिला. कांहीं बिन रदीफी प्रतींत त्यांना विषयानुक्रम दिसून आला कारण गोयंद, मैखुर, मैखुर्दन अशा शब्दांच्या रुबाया एकत्रित दिसल्या त्याला वर्ग (अ २) मध्यें; व जीमध्यें यमकानुक्रम अथवा विषयानुक्रम कांहींच नाहीं अशी एकच प्रत पॅरीस नं. १ वर्ग (अ१) मध्यें, आणि जाजर्मी कवीचे उद्धृत १३ रुबायांस तिसरा वर्ग. (क) मध्यें ठेविलें. नंतर त्यांनीं फार्सी लेखक उतारा कसा करीत असावेत याची मानसिक कल्पना बसवून [कारण कैक शतकापूर्वीं लेखक लिहित असतांना क्रिस्तेंजन नव्हते] असें म्हणतातः—

" बहुत करून नियमानें लेखक कोठें कोठें आपल्या उताऱ्यांत आपलें स्मरणांतून दुसऱ्या रुबाया ज्या खय्यामचें नांवावर प्रचलित असतील त्याही लिहितो "

पुन्हां हेच साहेब असेंही म्हणतातः—

" परंतु दुसऱ्या बाजूनें लेखक उतारा करितांना मूळांतून कमी जास्त प्रमाणांत रुबाया गाळून टाकितो. कांहीं वेळा स्थळ संकोचामुळें त्याचा उद्देश अमुक संख्या किंवा अमुक पानें लिहिण्याचा असतो म्हणून प्रथम दर्शनी हें **विधान योग्य नाहीं कीं कोणती रुबाई एक किंवा दोन प्रतींत नाहीं म्हणून ती मातृ–लिखितांत नसेल.** " पुढें क्रिस्तेंजन असें विधान करितात. (ओ.पृ.५) " वर्णानुक्रम पद्धतींत रुबाई लिहिण्याची चाल **सादीनें** पाडली असावी, कारण हाफिजच्या उपलब्ध पुरातन बाडांत ती नाहीं " हे विधानही केवळ कल्पना मात्र आहे. हीब्रू अरबी ग्रंथांत वर्णानुक्रमाची पद्धत प्राचीन आहे. उदाहरणः—जुना करार साम (नंबर ११९) अलिफ, बेथ, गिमेल अशा वर्णानुक्रमांत आहे. इस्लाम जुन्या करारास उमरचे काळीं पांचशे वर्षे प्रमाण मानीत आला होता. त्या मधील सामांतली वर्णानुक्रम पद्धती उमरला व त्याचे-नंतर दोन शतकापर्यंत कोणाच विद्वानाला सूचली नाहीं, ही क्रिस्तेंजनची

कल्पनाकोटि कितपत खरी समजावी? शिवाय त्यांना हे माहित असेलच ज्यामध्यें यमकानुक्रम पद्धती आहे त्या संग्रहास ' दीवान ' म्हणतात. खुद्द उमर खय्या-मचें रुबाईंत ' दीवान ' शब्दाचा उल्लेख आला आहे उदाहरण:—गुरुकरुणामृत ९२१. ज्या संग्रहांत ही पद्धत नाहीं ते अर्थात वेंचे होत. पुन्हां क्रिस्तेंजनचें हें विधान आहे 'कीं, यमकानुक्रमरहित संग्रह कवीनें कविता लिहिली त्याचे काला-नुसार अनुक्रमांत असावा ' हेही विधान निराधार कल्पना आहे; कारण त्यांनीं यमकानुरहित जे संग्रह निवडले त्यामध्यें परस्परांचा अनुक्रम पाहिजे होता; तो त्यांचे ग्रंथ ( ओ ) तील पृ. १३४ ते १७८ चे कोष्टकांत दिसून येत नाहीं. असो नंतर त्यांनीं लखनौची प्रत भिन्न प्रतींतील रुबायांच्या संमेलनार्थ गृहीत धरून त्याचे समोर ज्या ज्या प्रतींतल्या ज्या ज्या रुबाया असतील त्याचे अनुक्रमांक मांडिले. नंतर त्यांनीं स्वयंकृत हा नियम केला कीं (ब) वर्गांतील पांच प्रतींत रुबाई असून पुन्हां तीच रुबाई जर [अ२] वर्गांतील २ प्रतींत आणि बाकी [अ१], [अ३],(क) या वर्गांपैकीं १ प्रतींत असेल, अगर [अ२] चे एका प्रतींत आणि [अ१], [अ३], (क) यापैकीं दोन प्रतींत असेल अगर [अ२] चे चार प्रतींत असेल तर ती मात्र ग्राह्य. याप्रमाणें गाळून त्यांनीं १२१ रुबाया शिल्लक ठेविल्या. उर्वरीत संबंधानें ते म्हणतात [पृ.३९] 'याप्रमाणें १२१ रुबाया मिळतात. " हें निर्विवाद आहे कीं, उर्वरीत रुबायामध्यें खास उम-रच्या असणें शक्य आहे किंवा असतीलच. परंतु कोठेतरी सीमा रेखिली पाहिजे. आणि माझें मतें वरील नियमित प्रती पेक्षां कमी प्रतीवरून घेणें निर्धास्त नाहीं. माझें मतें निकोला विन्फील्ड किंवा लखनौचे किंवा दुसऱ्या आधुनिक मुद्रित प्रतींत असलेल्या रुबाया एकाच हस्तलिखित प्रतींत असतील तरी त्या सुद्धां निःसंशय प्रक्षिप्त आहेत. " याची पहिली सीमा खय्याम नाम असलेल्या बाराची! आतां बारादाही विसासेचो !

५० वरील चिकित्सेवरून " काड्याच्या अणिवर देऊळ रचिलें आधीं कळस मग पाया रे" या संतोक्तीची आठवण होते. सूज्ञ व संशोधक वाचकांनीं खालीं लिहिलेले कोष्टक व मुद्दे यावरून विचार करावा. कोष्टकामध्यें ज्या लिखि-तात कांहीं पानें अथवा वरदीफें नाहींत त्यास अपूर्ण संज्ञा दिली आहे; व केवळ

जे वेंचेच आहेत ते वेंचे म्हणून नाम निर्दिष्ट आहेत. आतां कोष्टकावरून मि. क्रिस्तेंजनची पद्धति किती अपूर्ण व त्यामुळें खऱ्या रुबाया किती गळून जातात हे खालीं दिलेल्या मुद्यावरून कोणास ही स्पष्ट दिसून येईल.

१ एकूण ५१ हस्तलिखिता पैकीं केवळ १६ प्रतीचाच विचार केला, यावरून संपूर्ण प्रतीचा विचार झालाच नाहीं.

२ ज्या सोळा त्यांनीं घेतल्या त्यापैकीं पुन्हां कलकत्ता आणि पॅरिसचे लिखितास फोडून भिन्न वर्गांत ठेविलें. नं. ४ कलकत्ता परिशिष्टातली प्रत्येक रुबाई जर प्रथमतःच नं. १० मूळ कलकत्त्याहून भिन्न आहे तर अटी प्रमाण नं. ४ पैकीं ५४ चा आणि नं. १० पैकीं ४३८ चा मेळ कसा बसावा ? आणि त्याचप्रमाणें ४ पॅरीसपैकीं नं.७ चे १४९ रुबाया आणि नं. ८ चे ११९ रुबाया एकाच प्रतीच्या व भिन्न आहेत त्याचा मेळ कसा बसावा ?

३ ज्या थोड्याशा प्रती त्यांनीं घेतल्या त्यापैकीं अर्धाधिक अपूर्ण अगर वेंचे आहेत. परंतु त्यांचे अटीमध्यें सर्वांचे महत्व ' टकाशेर भाजा टका शेर खाजा ' या न्यायानें सारखेच लेखलें आहे. चारशे पेक्षां अधिक रुबाया पुन्हां ७५,३४,१३, रुबायांचे वेच्यांत सांपडाव्या कशा ?

४ रुबाई संग्रहीत करण्याकरितां त्यांनीं ही अट कल्पिली. कीं, ( ब ) वर्गांतील ५ आणि इतर वर्गांतील ३ अथवा ४ प्रतींत रुबाई असावी. ही अट त्या प्रतीच्या भिन्न कालांतील वेगवेगळ्या ठिकाणच्या असल्यामुळें अनावश्य होती. अर्धेधिक लिखितें अपूर्ण व वेंचे असल्यामुळें या अटीनें अस्सल रत्नें गाळून फेकण्या पलीकडे कांहीं निष्पन्न झाले नाहीं.

काष्टक

# क्रिस्तेंजनची चाळणी.

| नंबर. | वर्ग व प्रतीचें नांव. | इ. स. | संपूर्ण किंवा अपूर्ण. | एकूण रुबाया. | लखनौसी. संमेलित. |
|---|---|---|---|---|---|
| | वर्ग १ ( अ ) | | | | |
| १ | १ पॅरीस | १४९६ | वेंचे | २१३ | १६३ |
| | वर्ग २ ( अ | | | | |
| २ | २ पॅरीस | १५२८ | वचे | ३४९ | ३१६ |
| ३ | १ रोजेन | १३२१ | दीवान | ३२९ | ३०९ |
| ४ | परिशिष्ट कलकत्ता | १८३६ | भंगित | ५४ | ४८ |
| ५ | ३ पॅरीस | १५४० | वेंचे | ७५ | ३८ |
| ६ | १ बॉडलियन | १४६० | दीवान | १५८ | १२९ |
| ७ | ४ पॅरीस (अ) | १४७४ | भंगित | १४९ | १२७ |
| | वर्ग ३ ( अ ) | | | | |
| ८ | ४ पॅरीस (ब) | १४७४ | भंगित | ११९ | ९७ |
| | वर्ग ( ब ) | | | | |
| ९ | २ बॉडलियॅन | १७०३ | अपूर्ण | ४०६ | ३८३ |
| १० | मूळ कलकत्ता | १८३६ | भंगित | ४३८ | ४१४ |
| ११ | बर्लिन | १६४८ | अपूर्ण | २३८ | १५२ |
| १२ | ३ लंडन म्यूजियम | १५६९ | दीवान | ४०० | ३८८ |
| १३ | लिंगार्ड | ? | अपूर्ण | २३७ | २३७ |
| १४ | १ लंडन म्यूजियम | १५६९ | ,, | २६९ | २२२ |
| १५ | २ लंडन म्यूजियम | १६२३ | दीवान | ५४५ | ४५० |
| १६ | ५ पॅरीस | १५०० | वेंचे | ३४ | २७ |
| १७ | २ रोजेन (दीवानि हाफिजमध्यें) | १५२३ | ,, | ६३ | ५४ |
| | वर्ग ( क ) | | | | |
| १८ | ३ रोजेन (बदर जाजर्मी) | १३४० | ,, | १३ | ९ |

५१ वरील पद्धत स्वीकारल्यामुळें बदर जाजर्मी या ईराणच्या ६०० वर्षांपूर्वीचे प्राचीन कवीनें काव्य विवेचनाकरितां उमरचे १३ चेंचे दिलें त्यापैकीं ६ ग्राह्य करून क्रिस्तेंजन ७ फेंकून देतात. शिवाय खय्याम नांव असलेल्या व स्वतः यांनींच पूर्वीं निवडलेल्या १२ रुबायांपैकीं फक्त २ शिल्लक राहून १० गळून जातात. बदर जाजर्मी सारख्या प्राचीन कवीनें निवडलेली रत्नें ते फेंकून देतात तेव्हां स्वतःचे कल्पनेपेक्षां त्यांना कोणालाही प्रमाण मानण्याची आवश्यकता दिसली नाहीं. हस्तलिखितात एकच रुबाई असेल तर ती प्रक्षिप्त असे ते समजत होते तर, कोणतेही दोन हस्तलिखितात जी एक रुबाई सामान्य आहे ती ग्राह्य करून बाकीच्या संशयास्पद समजण्यास त्यांचे मताप्रमाणें हरकत नव्हती. अशा रीतीनें त्यांनीं तपासलेल्या अत्यल्प १६ प्रतींत ९०० पेक्षां अधिक रुबाया ग्राह्य होऊं शकतात; परंतु—त्यांना सीमा पाहिजे होती—ती कोणती ? कोणत्या कळसाकरितां या कांट्याचे अणीवरची इमारत ? असो, मि. क्रिस्तेंजननें १२१ रुबाया संकलित करून त्याचे इंग्रजींत भाषांतर डॉक्टर अलफ्. आह्देकडून करवून मग आपला आशय दिला आहे कीं, फिज्जेरल्डनें उमर खय्यामचा अर्थ पूर्णपणें जाणला !

५२ कांहीं पाश्चात्य पंडित फार्सी भाषा शिकून उहापोह करितांना प्राच्य पंडितांना बहुधा केवळ कस्पट समजतात, याचें उदाहरण वरील क्रिस्तेंजनच्या पद्धतीचें निरीक्षणांत येत आहे. वास्तविक पाश्चात्य पंडिता इतकें नसतील तर कांहीं अंशीं तरी विद्वान व संशोधक उहापोह करणारे, ज्यांना जन्मापासून अर्बी, फार्सीचा अभ्यास आहे असें कैक विद्वान मागें झालें, आज आहेत, व पुढेंही होतील. उदाहरणार्थ मुनशी **नवल किशोर** याचे फार्सी वाङ्मयासंबंधानें जगांवर किती उपकार आहेत याचे वर्णन करावे तेवढें थोडें. कैक दुर्मिळ हस्तलिखित प्रती संपादन करून कक विद्वान फार्सी भाषाभिज्ञाकडून शोधून अनेक प्राचीन दुर्मिळ ग्रंथ छापले. तो स्वतः जाडा विद्वान होता. **नवल किशोर** प्रेसमध्यें इ.स. १८६८ मध्यें उमर खय्यामची पहिली आवृत्ती ७१७ रुबायांची, १८७८ मध्यें दुसरी आवृत्ती लेखी शुद्ध प्रत संपादन करून ७६३ रुबायांची निघाली. १८८२ व १८८३ तिसरी व चौथी आवृत्ती निघाली.

पांचवी आवृत्ती १८९४मध्यें ७ नवीन उपलब्ध रुबाया सहित ७७० रुबायांची निघाली. हिचीच पुढें सहावी व १९२४मध्यें सातवी आवृत्ती निघाली. १८९४ चे प्रतीला आधारभूत घेऊन इतर प्रतींतील रुबायांची मांडणी मि. क्रिस्तेंजननें केली. मुनशी नवल किशोरची पांचवी आवृत्ती व नतर तीस वर्षांपर्यंत संख्या ७७० च राहिली यावरून त्याचा हेतू संख्या फुगविण्याचा नाहीं हे प्रांजल मनुष्य कबूल करील. १८९४मध्यें नवल किशोरला माहित नव्हतें कीं पुढें ३३ वर्षांनंदर मि. क्रिस्तेंजन १९२७ मध्यें त्याचे प्रतीवर प्रक्षिप्तत्वाचा आक्षेप घेतील. ही कल्पनाच हिंदुस्थानांतील मौलवी लोकांना आली नाहीं. क्रिस्तेंजनचें कोष्टक ( ग्रंथ ओ ) पान १३४ ते १६३ वरून स्पष्ट दिसत आहे कीं, लखनौचे प्रतीतील रुबाया, १६ लिखितांपैकीं बहुधा दोनपेक्षां अधिक लिखितांत सांपडतात; मग ही प्रत ग्राह्य करण्यास काय हरकत होती ? मि. क्रिस्तेंजनच्या सदर चिकित्सेवरून हिंदुस्थानांतील ग्रंथ प्रकाशकांनीं पुढें ही शिकवण घेतली पाहिजे कीं, मुद्रित ग्रंथ कोणकोणते प्रतीवरून छापला; व हस्तलिखित प्रती कोठें जपून ठेविल्या आहेत, याचा उल्लेख आवश्य देत जावा.

५३ कविता परीक्षणाचे दोन प्रकार आहेत. सुपासारखा सारग्राही व चाळणीसारखा सार त्यागी. मि. क्रिस्तेंजन् स्वत: म्हणतात कीं, रुबाई एक लिखितांत असली तर " प्रक्षिप्त. " पहिली पद्धत त्यांनीं स्वीकारली असती तर १६ पैकीं दोन प्रथक लिखितांत असलेल्या ९१२ रुबाया ग्राह्य करून फक्त बाकी पुरतांच विचार करण्याकरितां दुसरीं हस्तलिखितें तपासावयास पाहिजें होतीं. त्यांनीं हस्तलिखितांचे संमेलन परिश्रमानें केलें हें जगावर उपकार आहेत, कारण ९१२ ग्राह्य झाल्या. पुढें याच प्रकारानें सर्वही लिखितें चाळून पाहिलीं तर मातृलिखित सुद्धां तयार होऊं शकते. अशा प्राचीन लेखासंबंधानें उहापोह करितांना मूळ साक्ष हस्तलिखितावरच असते. दोन कालांतरातल्या प्रतींत रुबाई सांपडली तर दोन्ही लेखक, व त्या अवधींत इतर वाचक, ती उमरचे लेखित होते हें निर्विवाद आहे. तेव्हां स्पष्ट रीतीनें पाठ अबद्ध अथवा अर्थ विसंगत नसतांना ती ग्रहण करणें युक्त आहे. हाच सारग्राही पक्ष लखनौ, हैद्राबाद, इस्तंबोल, येथील व निकोला व्हीनफिल्ड याचे प्रतींत स्वीकारला आहे. प्राचीन कोणतेही लिखितांतली

रुबाई दुसरे कवीनें केली असे निर्विवाद सिद्ध होईल, तेव्हांच उमरचें संग्रहांतून त्याज्य होईल. यद्यपि १०८ फिरत्या रुबाया दिसल्या तरी त्या दुसऱ्या कवीनें केल्या असें जोपर्यंत सिद्ध झालें नाहीं तोपर्यंत तिचा त्याग अनुचित होय. क्रिस्तें-जननें १६ चाळणींतून गाळून ज्या शिल्लक ठेविल्या, त्यामध्येंही फिरत्या रुबाया-पैकीं कांहीं आहेतच. यावरून फिरत्या रुबायांचा वादही सिद्ध होत नाही. फिरत्या रुबाया अदमासें शंभर व त्याच मुळें ११०० रत्नांचा त्याग अनुचित आहे.

५४ ही प्रस्तावना लिहीत असतांना परिच्छेद ४२ मध्यें निर्देशित ५ हस्त-लिखितें या दासाच्या नजरेंत हैद्राबादेस आलीं, त्यापैकीं पहिली ४ यूरोपांत प्रसिध्द नाहींत. याशिवाय २९ जुलै १९३२ मुशीर दकनचा अंक नजरेंत आला. त्यांत ही हकीकत आहे कीं, बंगालचे एशियाटिक सोसायटीचे सभेंत प्रो. **महफूजुल्हकचे** यांनीं असें जाहीर केलें कीं, लखनौ येथें मि. **गौरी प्रसाद सुखसेन** यांचेजवळ, औस्ले प्रतीचे पूर्वीचा रुबाई संग्रह १४२३ इ. चा उपलब्ध झाला आहे. यांत २०६ रुबाया आहेत, पैकीं ५५ कोणतेच हस्तलिखित अगर मुद्रित प्रतींत नाहींत. या ५५ रुबाया पूर्वींचे कोणतेही प्रतींत नसतील, तर रुबायांची संख्या साडे बाराशेचे वर जातें. सारांश उमरच्या रुबायाची अद्याप परमावधी झाली नाहीं. जसजशीं पुरातन लिखितें उघडकीस येतील त्याप्रमाणें अधिक रुबाया संग्रहीत होतील. म्हणून **ऑटो राथफेल्ड** ( तारापूरवाला मुंबई १९२२) चें मताप्रमाणें 'उत्तम मार्ग हाच आहे कीं, उघड उघड अशुध्दत्वादि दोषामुळें ज्या प्रथमतःच अ-ग्राह्य नसतील—त्याचा संग्रह प्रतींत करावा. वाचतांना हे लक्षांत ठेवावें कीं, या संग्रहांत कांहीं इतर कवींच्या असणें संभवनीय आहे.' या तत्वास अनुसरून गुरुकरुणामृताचे १०१७ श्लोकापासून पुढचें श्लोक आतां ग्रंथ छापीत अस-तांना प्रो. **रोजेन, औस्ले, निकोला, जेवदत** बे इत्येदिकांचे प्रतींतून हैद्राबादचे प्रतींत पूर्वीं नसणारे रुबायांचा भावार्थ दिला आहे. यांतील हेतू हाच आहे कीं गुरुकरुणामृताची प्रत शक्य तितकी पूर्ण व्हावी.

५५ कवींचे लेखन सर्व किंवा शतांश सुध्दां प्रसिध्दीस येत नाहीं हा हिंदु-स्थानातला अनुभव आहे. श्रीसमर्थ **रामदास** स्वामी महाराज कवित्व

स्फूर्ति झाल्यानंतर कक वर्षे, वडा रुचकीच्या पानावर कविता लिहून, कृष्णा-बाईचे प्रवाहांत अर्पीत असत; अशी कथा दासविश्रामधामांत आहे. तुकोबा-रायाचे चार लक्षांतून आज अदमासें चार हजार अभंग उपलब्ध आहेत. आंबा जोगाईचे प्रसिध्द कवि दिगंबरानंद उर्फ दासोपंत यांचा महाभारताचे तोडीचा सव्वा लक्ष गीतार्णव प्रसिध्द झाला नाहीं; फक्त मोठें देवघरांत मुख्य प्रत, आणि शिष्यापाशीं कांहीं अध्याय, पाहावयास सांपडतात. याविषयीं अख्या-इका अशी आहे कीं, श्रीएकनाथ महाराज यांचें दर्शनास गेले असतां प्रहर-भर उभे राहिले. दासोपंत ढब्बू पैसाभार शाई संपेपर्यंत मानवर उचलित नसत; त्याप्रमाणें लखन संपल्यानंतर वर पहातात तों एकनाथ महाराज ! दासोपंतांनीं क्षमा मागून सागितलें कीं, गीतार्णव लिहित आहे. नाथ म्हणाले " हें वाचील कोण?" 'दासोपंताचे कैक हजार पदें, अभंग, लहानपणीं दिवा ळीच्या फुलबाज्याकरितां आम्हीं खर्चिलें हो !' असे तेथील रहिवासी कळवळून सांगतात. सारांश गेल्या पाऊण शतकांत जे उमरचे रुबायांचे संग्रह जगा-समोर आले त्यांत बारा तेराशे रुबाया त्याचे नांवावर लेखिल्या जातात, त्यापैकीं अदमासें शंभर रुबाई विपयीं दुसऱ्याच्या असतील नसतील ही शंका आहे. ज्याप्रमाणें महाराष्ट्रांतील संत वाङ्मयांचीं, तद्वतच उमरचे रुबायांचीं लिखितें जगासमोर येत आहेत. व सारग्राही संशोधकाचे श्रमानें कधीं तरी त्रुटित सुभाषितें पूर्णपणें जगांत अजरामर राहतील. स्वतःचे रुबायाविषयीं उमर म्हणत आहे.

न घे शोक, हा सूर्य जो पैं प्रकाशें, । तुझें नाम कीं रूप विश्वीं विलासें ॥
नभीं तारका खेळती सावकासें, । जगीं सूख तो पैं तुझें रास–हासें ९६९

---

### ५ परिभाषा व अर्थ–पद्धति.

५६ उमरच्या रुबायांची पूर्वी प्रसिद्ध झालेलीं भाषांतरें हें विनंतिपत्र लिहितांना पाहिलीं तीं हीं:–

[अ] एडवर्ड फिज्जेरल्डकृत पद्यात्मकः—

१ पहिली आवृत्ति (१८५९) ची पुनरावृत्ती सचित्र ७५ रुबाया.

२ दुसरी „ (१८६८) (अ ५ मध्यें) ११० रुबाया.

३ चौथी आवृत्ति (१८७९) बर्नार्ड कारिच लंडन १०१

४ पांचवी „ (१८९९) मॅकमिलन लंडन १०१ „

५ नथन हैस्कलडोलकृत पूर्वीच्या चारी आवृत्ती विन्फील्ड, गार्नर, म्याकार्थी, निकोला, बोडेन्स्टेट, फॉन श्याक, यांचें तुलनात्मक भाषांतरासहित. ( मॅकमिलन लंडन १८९८ )

६ हॅरोन ॲलन कृत अनुवाद मूळ फार्सी रुबायांचे शोधासह ( बर्नार्ड-कारिच १८९९) यात पांचव्या आवृत्तीच्या १०१, पहिलीच्या ३, दुसरीतील ८, टिपणांतील ५, एकूण ११७ पद्यांचा उल्लेख आहे.

अअ [अ] १ चें माधव ज्यूलियन मराठी पद्यात्मक भाषांतर (आर्य संस्कृति-मुद्रणालय पुणें.) ७५ रुबाया, मूळासह.

आ हॅरोन ॲलेनकृत बॉडलियन औस्ले प्रतीचें गद्यात्मक. ( निकोलस लंडन १८९८) १५८ रुबाया.

इ तहरानच निकोला कृत हस्तलिखित प्रतीवरून फ्रेंच भाषेत गद्यात्मक मूळासह ४६४ रुबाया (पॅरीस)

इइ सदरचें इंग्रजींत लॉर्ड कार्वोकृत गद्य. ( बास्टन )

ई प्रो. रोजेनचें, इंग्रजी गद्य ३८३ रुबायांचें, मूळासह.

उ विन्फील्डकृत पद्यात्मक इंग्रजी [लंडन१८८३]५०० रुबायांचें मूळासह.

उउ विन्फील्ड कृत पद्यात्मक ३९५ रुबायांचें मूळासह.

ऊ डॉ. अल्फ्रेड ब्राहदेकृत क्रिस्तेंजन छानित १२१ रुबायांचें गद्य मूळासह.

उऊ प्रो. मा. त्रिं. पटवर्धन कृत मराठी पद्य [आर्य संस्कृति पुणें १९२९] ५२४ रुबाया. सदर (उ ऊ) वरून.

ए ह्टले म्याकार्थी [लंडन डेविटनट् १८९८] गद्यात्मक ३७३ रुबाया.

ऐ सय्यद म. लायक हुसेन कृत उर्दू पद्य ७६४ रुबायांचें मूळासह.

ऐऐ जान्सन पाशा नवल किशोरचे प्रतीवरून (लंडन कीगेनपाल१९१४) पद्यात्मक इंग्रजी ७६२ रुबायांचें.

ओ अबदुल्ला जेवदत बे कृत तुर्कीत गद्य ५७६ रुबायांचें मूळासह.

याशिवायही इंग्रजींत, उर्दूत कैक भाषांतरें पाहिलीं.

५७ वरील ग्रंथ [अ६] मध्यें [पृ.१२] हॅरोन अॅलननें असें व्यक्त केलें आहे कीं, फिज्जेरल्डचें पाचव्या आवृत्तीच्या १०१ पैकीं ४९ व्हर्सेस प्रथक मूळ रुबायांची रूपांतरें आहेत; ४४ व्हर्सेस मध्यें दोन अथवा तीन पृथक रुबायांचे ध्वनी आहेत; २ व्हर्सेस ग्रंथ (इ) वरून; २ व्हर्सेस फरीदुद्दीन अत्तारचें मंत-कुत्तैर वरून; २ व्हर्सेस उमर खय्यामचे सारांश रूप आहेत; आणि १ केवळ निराधार. सदर ग्रंथ [अ२] मध्यें [पृ. २४] फिज्जेरल्ड साहेब म्हणतातः—
' उमरचें सर्व गीतांचें पालुपद वस्तुतः खाऊया नसले तरी " पीऊया कारण उद्यां मरूं " हें आहे. जर हाफिजनें अन्य अर्थ घेतला असेल तर त्यांत त्यानें सत्यतः ही मोठी चूक केली कीं, अशा व्द्यर्थी परिभाषेच्या कवनांत निज आयुष्य व बुद्धिमत्ता घालविली, ज्या परिभाषेचा विनियोग तेव्हांपासून आज पावेतों अध्यात्मेतर काव्यांतही होत आहे. कसेंही असो, ज्या अर्थी उमर सूफी अथवा संत होता असें कैक विद्वानाचें मत आहे, व परंपरेनें असेंच मानितात, म्हणून ज्यांची इच्छा असेल त्यांनीं उमरचें मद्य साकी या शब्दांचा अध्यात्मपर अर्थ घ्यावा. परंतु ऐतिह्य दृष्टीनें ज्याअर्थी उमर तत्त्ववेत्ता असून त्याची शास्त्र दृष्टी व बुद्धिमत्ता तद्देशीय तत्कालीन लोकमतीचे पल्ल्याबाहेर होती, तत्त्ववेत्त्याप्रमाणें अल्पैषणी व विषयभोगादिकांविषयीं रिक्त-पाणि होता, त्याअर्थी आमचें (फिज्जेरल्डचें) मताप्रमाणें इतर वाचक असें मानूं शकतात कीं, उमरचें काव्यांत मद्याचा अर्थ केवळ द्राक्षासव घ्यावा. त्यानें मद्याचें जितकें वर्णन तितकें ग्रहण केलें नाहीं; व हें शब्द मद्य साकी या शब्दांचा अध्यात्म अर्थ घेणाऱ्या दांभिक व हताश लोकांस खिजविण्याकरितां वापरले. "

५८ फिज्जेरल्डचें फार्सी अध्ययन व कोश व्याकरण ग्रंथ सामुग्रीविषयीं सविस्तर माहिती सदर ग्रंथ अ.६ मध्यें (पृ.१३ते३७) दिली आहे. त्याचें भाषांतर इंग्रजी काव्य दृष्टीनें सर्व मान्य, परंतु उमरचा सत्य आशय फिज्जेरल्डनें वठविला हें तत्कालीन मिसेस क्याडेल, म्याकार्थी, निकोला इत्यादि फार्सी भाषाभिज्ञानीं मानिलें नाहीं. चर्चा पहिली पासून पांचव्या आवृत्तीपर्यंत ( १८५९-१८९९ ) हात आली, अद्याप चालूं आहे. फिज्जेरल्डच्या कविता इंग्रजींत माननीय म्हणून चित्रकार व मुद्रणालयें हेंही आपलें कौशल्य जगापुढें आणित

आहेत. परंतु फार्शी भाषाभिज्ञास फिज्जेरल्डचा आशय अमान्य आहे.

५९ सदर ग्रंथ [इ] चा कर्ता फ्रेंच कौन्सिल [ प्रतिनिधी ] ईराणमध्यें कैक वर्षें राहिला, त्यानें तद्देशस्थ भाषाभिज्ञाचें सहाय्यानें अभ्यास केल्यानंतर रुबायांचें रहस्य समजून मद्य साकी इत्यादिकांचा अध्यात्मपर अर्थ लावला ग्रंथ[इइ]मध्यें ही हीच पद्धत स्वीकारली आहे. हीं दोन्ही गद्य भाषांतरें फार उच्च कोटीचीं आहेत. मूळास जोडून पाहिल्यास मूळाचा व भाषांतराचा अर्थ खुलतो.

६० इतर भाषांतरें पारिभाषिक शब्द तसेंच कायम ठेवून केली आहेत, तीं अत्यंत परिश्रमाची फळें आहेत. पैकीं आ, ई, उ, ऊ, ऐ, ओ याचे मूळ ही निर्देशित आहे म्हणून जरी परिभाषा उकलली नाहीं तरी मूळाचे अनुसंधान उकलूं शकेल. (ए ऐ) **जान्सन पाषाचें** भाषांतर **नवल किशोरचें** द्वितीय आवृत्तीचें अनुक्रमांत आहे म्हणून मूळाचा शोध सहजीं लागूं शकतो.

६१ ग्रंथ ( उऊ ) मध्यें (प्रस्तावना पृ.९ ) ग्रंथकार उमरचें कवनाचे रहस्य सांगतांना म्हणतात:–"क्रिस्तेंजननें ठरविलेल्या १२१ रुबायावरून उमरचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर प्रथमत: यांत मुमुक्षु मताचा, सूफी मताचा जवळ जवळ अभाव आहे ही गोष्ट प्रामुख्यानें नजरेंत भरते. सूफी विचार व परिभाषा ज्यांत आहेत अशा तीन चारच रुबाया आहेत. बाकींत निराशावाद हा मूलत: दिसतो......मृत्यु म्हणजे मानवी जीविताचा अंत होय......मनुष्याला पुनर्भूतीची मुळीच आशा नाहीं......लोक ज्याला पाप म्हणतात तें जर हातून घडलें तर त्याचा दोष अगतिक मानवावर नसून तो त्या निर्घृण सर्व शक्तिमान् अतर्क्य नियतीवरच लादला पाहिजे......दु:ख हेंच हलाहल आहे व मद्य हाच त्यावर उतार आहे.......पर्वा कां ? खुशाल मदिरा सेवावी" क्रिस्तेंजनचें पद्धतीचें निरीक्षण मागील प्रकरणांत झालें आहे. त्यांनीं चाळून घेतलेल्या १२१ रुबायांचें डॉ. ब्राह्मदेकृत भाषांतर ग्रंथ [उ] चे पृ. ४३ ते ५४ पाहावें. या १२१ रुबायांत एक मिळवून १२२ जाडे अंकांत प्रो. **पटर्धनचें** पुस्तक (उऊ) मध्यें दिल्या आहेत. १२२ वी पटवर्धनची, २८८ गु.क. १८५ या १२२ रुबायांचा भावार्थ गुरुकरुणामृतावरून पाहाण्याकरितां कोष्टक परिशिष्ट (अ) मध्यें देत आहे.

६२ पुढें प्रो. **पटवर्धन** म्हणतात (प्र.प.१०):–"आतां उरलेल्या प्रक्षिप्त पण युयुक्षुवादी रुबायांत काय आहे तें पाहूं. मृत्यूचें भय म्हणजे बुद्धिभ्रम होय... ...सद्गुरु कृपेनें आत्मज्ञान झाल्यावर 'जातस्यहि ध्रुवो मृत्यु ध्रुवं जन्ममृतस्य' या दोन्ही आवस्था ज्ञात्याला रहात नाहींत...' आपुलें मरण डोळा पाहिलें' कीं शाश्वत जीविताचा लाभ होतो......परंतु भक्ताची स्थिति आरंभी आरंभी चमत्कारिक व अवर्णनीय होते. स्पष्टी करूं म्हटल्यास जमेलच असें वाटत नाहीं. आणि शिवाय जनता जड असल्यामुळें गैर समज माजावयाचे. अशा वेळीं मदिराच पाहिजे. बुद्धिधर्माशी नातें सोडून देऊन द्राक्षकन्येशी लग्न करावयाला पाहिजे." पुढें (प्र. प. ११) म्हणतातः–" ज्या मदिरेंत फार्सी कविता यथेच्छ विहार करितांना आढळतें ती मदिरा कोणती ? इस्लामी लोकांचें म्हणणें असें कीं ही मदिरा म्हणजे द्राक्षासव नसून भक्ति होय. उमर हा दारूबाज होता कीं सूफी भक्त होता ? " सारांश क्रिस्तेंजनच्या निश्चित १२१, पटवर्धनची१ (२८८) अशा ठळक टाईपाच्या १२२, आणि उर्वरीत धनुष्यांकित ४०२ "प्रक्षिप्त पण सूफी मतांच्या" सुभाषितांचा समारोप मदिरेंत व " द्राक्षाकन्येशी लग्न" लावण्यांत झाला, आणि उहापोह करूनही निकाल नाहीं.

६३ ज्या मुसलमानांत सूफी मताचा प्रसार झाला, व फार्सी कविता ज्यांचे अंगवळणी आहे, त्यांनीं मदिरेचा अर्थ भक्ति घेतला तर उलटपक्षीं इतरांस विपरीत अर्थ करण्याचा काय अधिकार आहे ? भाषेंचे शब्द तद्देशीय जन कवितेंत ज्या अलंकारी अर्थानें वापरितात तो अर्थ सोडून, उलटपक्षीं कुत्सित अर्थ घेणारांचें मत तद्देशीय लोकांचे मतापेक्षां श्रेष्ठ गणलें जावें काय ?

६४ परत्माचें भक्तासी नातें हिब्रू बैबल ( सालोमन गीत ) मध्यें पतिपत्नीचें, नव्या करारांत पितापुत्राचें, सूफी लोकांत कामिनी–कामुकाचें, व श्रीमद्भागवतांत गोपीकृष्णाचें वर्णिलें आहे. ॥ तुका म्हणे जें जें बोला । तें तें साजें या विठ्ठला ॥ वैषयिक प्रेमाचें वर्णन बैबलमध्यें किंवा भागवतात अध्यात्म अर्थानेंच आहे. मद्य शब्द अध्यात्म अर्थानेंच संस्कृतांत ही वापरलेला आहे. उदाहरणः–कुलशेखरकृत मुकुंदमालाः। श्रीगोविंद पदांभोज–मधुनामहदद्भुतं ॥

यत्पायिनो न मुह्यंति मुह्यंति यदपायिनः ॥१॥ यांत मधु शब्द मोह--उत्पादक मद्याचें अर्थीं योजून हरिभक्तिचें मधुसेवनांत मोहनाश व असेवनांत मोह हा अद्‌भुत अलंकार साधिला आहे.

६५ ऋग्वेद म. १।१५४।४॥ **यस्यत्री पूर्णा मधुना पदान्यक्षीयमाणा स्वधया मदन्ति ॥**

सायण भाष्यः—यस्य विष्णोः, मधुना मधुरेण दिव्यामृतेन, पूर्णा पूर्णानि, त्रीणिपदानि प्रक्षेपणानि, अक्षीयमाणा अक्षीयमाणानि, स्वधया अन्नेन, मदंति मादयंति ॥ या दिव्यऋचेंत मधु शब्द भक्तिप्रेम वाचक असून मादकत्व आणि हरीचें तीनपादाबुजांचें व तद्विषयक प्रेमाचें अक्षयत्व ही दर्शविलें आहे.-

**त्रिसुपर्णः—ब्रम्हमेतुमां, मधुमेतुमां, ब्रम्हमेव मधु मेतु मां ॥ ब्रम्हमेधया, मधुमेधया, ब्रम्हमेवमधुमेधया, ॥ ब्रम्हमेधवा, मधुमेधवा, ब्रम्हमेव मधुमेधवा ॥ १ ॥**

इत्यादि वाक्यामध्यें ब्रम्ह, ज्ञान, व मधु [प्रेम] याचें एकत्व दर्शित आहे. भक्तिज्ञानच प्रभु आहे असा स्पष्ट निर्देश आहे. झेंद अवस्थांतही मधु—**मद** शब्द अशाच अध्यात्मपर अर्थानें व्यक्त आहे. उदाहरणः—यजष्ण १०।८ यातें **मद** ज्ञान भक्ति, दर्शवीत आहे. संस्कृत **मधु** चा आवस्थेंत **मद** पुढें फार्सीत **मद, मुदाम, मुल,** अशी रूपांतरें झालीं. **मुदाम** शब्दानें **मद्य** प्रेम याचे अक्षयत्व **उमरनें** दाखविलें आहे.

असे मान्य प्रामाण्य हा वेद बोल । परी त्यांतही शोधिति सार फोल ॥
गुरू शब्द एकैक ऐसा अमोल । सदा सार अर्थें घनानंद खोल १८

६६ अधिक प्रचारांतला शब्द सुरावाचक **मय** हा आहे. गुरुकरुणामृताचे प्रथम १०१६ श्लोक ज्या हैद्राबादचे प्रतीवरून झाले. त्यांत फक्त ३१३ रुबायांत **मद्य** शब्द व्यक्त आहे, पैकीं १९४ मध्यें **मय,** ६४ मध्यें **बादा,** ३० मध्यें षराब, आबिअंगूर, खूनेरज, ( द्राक्षारक्त, ) मुदाम, मुल किंवा हें मिश्रित शब्द वापरिले आहेत. साराश ७०० मध्यें मद्याचें पर्याय शब्द नाहींत. ज्या ३०० मध्यें आहेत त्यांत सुमारें २०० मध्यें **मय** शब्दच वापरला आहे. आतां फार्सीची आदिभाषा झेंद व संस्कृत यांत **मय** शब्दाचा यौगिक धात्वर्थ आणि

प्रचलित हेत्वर्थ काय होतात, याचा विचार अवश्य आहे. पुराणांतरीं **मयासुराचें** वर्णनांत त्याचें ज्ञान विज्ञान व स्वतंत्र सृष्टि निर्माण सामर्थ्य कथित आहे. मय आणि माया दोन्ही एकाच मूळ धातूपासून असावेत–दोन्ही शब्दांच्या अर्थ–व्याप्तींत सादृश्य आहे. ' मीयते ' म्हणजे ज्या योगानें वस्तूचें प्रमाण सिद्ध होते, ' मिमीते ' जानीते म्हणजे ज्या योगें ज्ञान होतें, ' माति ' स्वात्मनां दर्शयति–स्वस्वरूपास दाखविते, ती माया. प्रज्ञाशक्ति, चिच्छक्ति, संकल्पशक्ति, इच्छाशक्ति, अध्यात्मशक्ति, अद्भुत कौशल्य, कपट, गारुड, ऐंद्राजाल, आभास इत्यादि अर्थानें मायाशब्द ऋग्वेदांत आला आहे. ऋग्वेद मंडल ३–६०–१ **याभिर्मायाभिः** ह्याऋचेंत उपासना अर्थानें; मं० ३–६१–७ **महीमित्रस्य वरुणस्य माया॰** या मंत्रांत तेजोमय प्रभारूप; मं० ४–३०–२१ मं० ५–३०–६ यांत शक्ति अर्थानें मायाशब्द श्रुत आहे. मं० ६–५८–१ **विश्वाहि माया अवासि॰** या मंत्राचा अर्थ लावतांना यास्काचार्यांनीं माया म्हणजे प्रज्ञा, जाणीव, असा अर्थ घेतला आहे. निघंटुमध्यें ' माया ' शब्द प्रज्ञेच्या नामनिदर्शनांत आहे.

६७ त्याचप्रमाणें वेदांत **मय** शब्द पारमार्थिक सुखवाचक आहे. नित्य संधेतला मंत्रः–**आपोहिष्ठा मयो भुवः** ( मं १०–९–१ ) यांत मयोभुवः सुखोत्पादक असा अर्थ आहे. तें सुख कोणतें याचें स्पष्टीकरण रुद्राध्यायांत आहे.

**॥ नमः शंभवेच मयो भवेच नमः शंकरायच मयस्करायच ॥**

सायण भाष्यः–शं सुखं भावयतीति शंभुः मयः सुखं भाज्यतीती मयोभुः। एकं विषय सुखं द्वितीयं मोक्षसुखंमिति तयोर्विवेकः ॥ पुत्रादिरूपेण शं लोकिकं सुखं करोतीती शंकरः । आचार्य शास्त्रादि रूपेण मोक्षसुखं करोतीति मयस्करः ॥ या भाष्यावरून **मय** शब्द मोक्षसुखवाची आहे असें स्पष्ट आहे.

**मंत्रः–मृडानो रुद्रो तनो मयस्कृधि ॥**

सायण भाष्यः–हे रुद्र नोऽस्मान्, मृडय इहलोके सुखय, उत अपिच, नोऽस्माकं, परलोऽपि मयः सुखं कृधि.

**मंत्रः—शंचमे मयश्चमे ॥**

सायण भाष्यः–शं शब्द ऐहिक सुखवाची, मयः शब्द आमुष्मिक सुखवाची.

सारांश वेदांत **मय** शब्दाचा अर्थ ऐहिक विषय सुख नसून ज्ञान, भक्ति, प्रेम, आनंद इत्यादि पारमार्थिक सुख आहे.

६८ फार्सीची मातृभाषा झेंद ( छंद ) तींत ही **मय** शब्द जाणिव ज्ञान सद्गुण सर्वोत्तमत्व या अर्थात वापरलेला आहे उदाहरण:-यजष्ण ३३ गाथा १०, यजष्ण १० गाथा १२.

६९ परंपरेनें वास्तवतः **मय** शब्दाचा अर्थ भक्ति, प्रेम, ज्ञान, अध्यात्मिक, पारमार्थिक सुख होत असल्यानें इस्लामचे प्राक्कालीन कवि दरी, पाझेंद, पहेलवी भाषेंत, व पुढें फार्सीत त्याच अर्थानें वापरीत असणें सहज आहे. इस्लामचा प्रसार इराणांत होण्यापूर्वीं हिंदुस्थानांतून बौद्ध, वेदांत मतांचा प्रसार **उमर खय्या-मची** जन्मभूमी खुरासानमध्यें झाला होता. तेथें मुघ, मघ ( मेधावी, महात्मे ) यांचीं मंडळें अध्यात्मिक भक्तिविषयक व तात्विक विचाराकरितां होत असत. मुघ, गौर, गब्र, हे शब्द ज्ञानी, तत्त्वज्ञ, गुरु या अर्थीं आहेत. **मय** म्हणजे भक्ति, ज्ञान, याची चर्चा त्या बैठकींत असे म्हणून अशा मंडळास दैरमुगान ' मुघमंदिर ' मैखाना (मधुमंदिर), हें नांव प्राचीनपासून आहे.

७० या तीस वर्षांत जसा हिंदुस्थानांत घरोघर चहा, वामशाक्ताचे भैरवी-चक्रांत सुरा, तसेंच मघाचें मंडळांत मद्य निषिद्ध नसे. ऐतरेय ब्राम्हणांत राज्या भिषेक प्रसंगीं आसंदी आरोहणानंतर, **दधि मधु आतपवर्षा शष्पाणिच तोक्मानिच सुरा दूर्वा** इत्यादि पदार्थांनीं सुसंस्कृत होऊन; 'अथातः **सुरा कंसं हस्त आदधाति......स्वादिष्टया मदिष्टया पवस्व सोम धारया इंद्राय पातव सुत इतितां पिबेत्** ' असा विधि आगमोक्त आहे. जेथें जी वस्तु आगमोक्त विधि, तेथें ती अर्थात् निषिद्ध नाहीं. जसा गुऱ्हाळांत ऊसाचा रस तसाच या मघमंडळांत द्राक्षरस ( आबेअंगूर ), मध, गुलासाखरेचें सरबत (आबेअंगबीन्=मुल्, मद, गाध्वी, मयेनाब, आबेगोर=गौडी), आंबविलेलें 'बादा, भट्टातून गाळलेलें क्षाराप=खराब पराब, वाटण्याचा परिपाठ असेल. दर वाढीस आपण भोजनांत श्लोक, तसें तेथील ग्राहक पद, श्लोक सुभाषित म्हणत. **थिऑसफी, फ्रीमेसन** यांत जसें रहस्य मंडळ:—तसें याच्यांतही असे. मंडळात प्रवेश दीक्षेविना नसे; व प्याला प्यावा लागे. बतासे पाण्यांत

घालून आधीं गुरूनें पीऊन मग शिष्यास द्यावें हा रिवाज अद्याप इस्लामी फकिरी सांप्रदायांत आहे. शीख लोकांत नूतन शिष्यास दीक्षा देतांना लोह-पात्रांत पाणी व बत्तासे घालून तलवारीच्या दांडीनें चार शिखांनीं मंत्र म्हणत घोटून व तो प्याला नूतन शिष्यास पीण्यास देतात. आपलें येथें वैदिकश्राद्ध-पद्धतींत, व गुरूसांप्रदायांत चरण तीर्थ व प्रसाद ग्रहणाची पद्धत आहे.

७० चांगल्यास वाईट म्हणणारे सर्व आहेतच. संतांना 'टाळ कुटें' 'संताळ' म्हणणारे पंडित आपल्या या पवित्र महाराष्ट्रांत सुद्धां आहेत. इस्लामांत मद्य निषिद्ध ठरलें तरी द्राक्ष—परिप्लुत ईराणांत इस्लामानंतर हें पहिलें वळण सर्वत्र सुटलें नव्हतें. पूर्व धर्माच्या संस्था, भजनमंदिरें चालू असत. करडे मुसलमान त्यांचा छळ करीत, व हळूंहळूं '**मैखाना**' भजनमंदिरांचें ऐवजीं 'खराबत' (मद्यागार) अशी तिरस्कारी नांवें प्रचलित झालीं. याच अवसरांत खरें जिज्ञासू भक्त सूफीच्या संस्था चालू झाल्या. किंबहुना दोन्हीही संस्थांचें एकीकरण झालें. **मैखाना** म्हणजे भजनमंदिर, **कावा** म्हणजे हजरत **पैगंबर इब्राहीम** यानें मक्केंत बांधलेलें निमाज मंदिर या दोन्हींसही सूफी सारखेच मानीत. **उमर** म्हणतोः—

मशीदी मठें देऊळें ही लवाया। नमाजा पुजा दीनता सीकवाया॥
अजां शंख घंटा कृपा आळवाया। लघूताचि दावी गुरूमाय पाया॥१०१॥

याठिकाणीं सर्वही मतांचा हरिभक्तीकरतां समावेश होत असे. स्वधर्म सोडण्याचा आवश्यकता नव्हती. उलटें शिक्षण हें असें कीं, 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' याच अर्थानें **उमर** म्हणतोः—

जरी तुर्क तू जैन कीं, जंगमैय्या। अहता त्यजीं, होत चैतन्य काया॥
स्वपंथें भजे बाणसा नीट पाया। धनुर्वात दे तेढ, भोगी अपाया ८६४

सारांश सूफी लोकांस इस्लाम प्रचार आवश्य दिसला नाहीं. निजामी गंजवी (५३३—५९६ हि.) अशा 'खराबत' गुरूमंदिराविषयीं वर्णन करतोः—

**किता ( कृति )**

ज्ञात मी **गुरुमंदिरिं**,रित्र नसे मजदारीं.॥
रडलो ओरडलो, दाद न घे कवारी.॥ १ ॥

काय नव्हता श्रीसद्गुरु तेथें जागा ?
  काय मी कोण कुणी नेणति ? देति न वारी. ॥२॥
मध्यरात्रीं सरली, मारित ठेलो हाका. ॥
  एक अवधूत गवाक्षांत दिठी ओटारी. ॥३॥
तो वदे " शांत रहा, तू इच्छिसि कवणाला ?
  काय काजा स्तव तव येन इथें ही स्वारी ? " ॥४॥
बोलिलो " खोलकडी. " तो वदला " चूप चलजा, ॥
  " दार तुज रात्रिं कुणी उघडित कां शेजारी ? ॥५॥
" ही नसे मशिद तुला दार सदा ठेवि उघडें, ॥
  " येउनी तू उशिरा, मिरवसि पहिल्या हारीं. ॥६॥
" हें असें **गुरुमंदिर**, केवळ **अवधूत** इथें, ॥
  " **सावळा, वेणु, सुधा, दीप, विणालल्कारी.** ॥७॥
" विप्र, क्रुस्ती, यहुदी, काफिर, गबरू, मोमिन् ॥
  पंथ जे सर्व जगीं नांदति या दरबारीं. ॥८॥
" इच्छिसी जरि यांच्या पळभर तू सहवासा, ॥
  " होय जा पायधुळी संत-चरण-रजधारी. ॥९॥
" रे निजामी कुठवर खटखटसी दरवाजा, ॥
  " आग ही प्रीत तुला धूराचि देईल भारी ॥१०॥

यांत बहुतेक सर्व पारिभाषिक शब्द आहेत.

१ **गुरुमंदिर**=खरावात, दैरमुगान. २ **श्रीसद्गुरु**=बादा फरोष=पीरमुगा, साकी, मुग. ३ **अवधूत**, भक्त, संत=रिंद, आषक, मस्त. ४ **सावळा**=देखणा, ध्यानमूर्ती, प्रेय=पाहिद, द्रष्टा, साक्षी, मूर्ति=बुत सनम. ५ **वेणु**=नै, नाय, अनुहत अथवा वाद्य द्वयर्थी. ६ **सुधा**=बादा मै, भक्ति प्रेम ज्ञान या अर्थी. ७ दीप=प्रातिभ. ८ **विणाल्लकारी**=सरोद वाद्य गायन. ९ गबरू=गुरु किंवा दस्तूर अग्नि उपासक.

वरील वृत्तशः व शब्दशः भाषांतरावरून या सूफी मंडळाचे समदर्शित्व, भजन, ध्यान, व योग पद्धतीची कल्पना येईल.

श्री. पांगारकर महाराजांची " ज्ञानेश्वराची प्रभावळ " पहावी म्हणजे दिसून येईल कीं, त्या काळीं एका हरीकरितां सर्व ज्ञाती, मतें, योगी, ध्यानी, उपासक कसें एकत्र नांदत होते. तसेंच या सूफीचें जलसे असत. अद्याप सूफी संताचे जलसे होतात त्यांत (समा) गायन, भजन, व मद्य विरहित केवळ कवनाची किंवा अध्यात्म चर्चेची चक्री असते. कोठे केवळ सर्व समाधानानें गुरुचे कृपा दृष्टीची मार्गप्रतीक्षा करीत बसतात. कोठे खय्याम, हाफिज, रूमी, तुळशीदास, नानक, कबीर यांचे पद्याचा विचार, कोठे पंचकोशादि विवरण असते. हे सज्जन वंदनीय आहेत. आमचें गुरु माउलीचे घरीं हेंच असते. युरोप, अमेरिकेमध्यें ही स्पिरिच्युअल प्रयोगाकरितां अशी मंडळें होत आहेत. यांच्यांतही संगीत व समाधि " Trance " चा अभ्यास असतो. मात्र यांचे ध्येय मरणोत्तर जीवाचे परिस्थितीचे शोधाविषयीं असल्यामुळें, वेगळें आहे.

७१ आतां मूळ प्रश्न उमरनें **मद्य** इत्यादि शब्द पारिभाषिक अर्थानें वापरलें किंवा बाजारी अर्थानें ? या प्रश्नाचें गूढ कांहीं पाश्चात्य व तदनुयायी प्राच्य विद्वानास पडतें. चरित्र प्रकरणांत ( परिच्छेद १८ ) हें स्पष्ट झालें आहे कीं, सूफी मताकडे उमरचा कल होता. सर्व प्राच्य आणि बहुत पाश्चात्य विद्वानाचे ही हेंच मत आहे. फिज्जेरल्ड साहेबांनीं उमरचें पालुपद " पीऊ या उद्यां मरणार आहोत" असें घोकिलें. नुसतच पीऊ या असतें तर वैषयिक अर्थ संभवता; परंतु जगाचें व जीविताचें नश्वरत्व **मरणार आहोंत** या शब्दानें कवि स्पष्ट दाखवित आहे. प्रत्यक्ष मृत्यू दिसत असतांना विषय सुखाचें स्मरण पामरांत किंवा पशूंत दिसत नाहीं, तर खय्याम सारख्या ईषणात्रयत्यक्त तत्त्वज्ञाचा हेतु वैषयिक सुख अथवा मदिरा होता, हें मानणें निराधार आग्रह आहे. **बैरन** इत्यादि वैषयिक सुखावसानीं कवींचीं चरित्रें आहेत तसा उमरवर त्याचे शत्रूनीं सुद्धां कोठेंहि विषय दोषारोप दिलेला नाहीं. त्याच्या इतर गद्यग्रंथांत अथवा अरबी कवितांत द्राक्षकन्येचें वर्णन नाहीं. यावरून जो भ्रम उत्पन्न झाला तो भाषांतरकाराचें भ्रमास झाला. कोणत्याही रुबाईत मदिरावाचक शब्दाचा अर्थ काय घ्यावा ही ती रुबाई प्रत्यक्ष सांगतें. रुबाई परपक्ष खंडणात्मक, साधनांग, नीतिपर, किंवा स्वानुभव वर्णनात्मक आहे हे पाहिल्यानें ठरवावें, नंतर वैराग्यप्रद

आहे किंवा वैषयिक सुख मंडणात्मक आहे हें ज्याचें त्यास कळेल. प्रत्यक्ष मृत्युदर्शन जेथें आहे, तेथें वैषयिक भाव संभवत नाहीं. ज्या रुबाईत मृत्यु निदर्शन नाहीं, तेथें मद्य शब्दाबरोबर त्याचे प्रकाशत्व, अमृतत्व, आत्मसादृश्य, ईशसादृश्य इत्यादि गुण त्या त्या शब्दांनीं सांगितलें आहेत. उदाहरणार्थ गु० क० ३५२, हें सुभाषित क्रिस्तेंजनच्या चाळणींत शिल्लक राहिलेलें आहे. अतएव प्रक्षिप्त असेल अशी कल्पना त्यांना सुद्धां संभवत नाहीं व आम्हा कोणास शका घेण्याचे कारण नाहीं. त्याचें भाषांतर **पटवर्धन** ४३०:—

मधु सिंचन गिरि नाचवि करूनी तुष्ट । दूषित गणिती मधूस जन ते दुष्ट ॥
आज्ञापिसि कां मधुपासुनी निवृत्ती ? । जीवन हें बघ करी तनूसहि पुष्ट " ॥

प्रथम तिन्ही चरणांतील ' बादा ' शब्दाचा अर्थ सदर भाषांतरांत मधु केल आहे. परंतु चौथें चरणांत स्वतः उमर सांगतो कीं ' बादा ' काय आहे. **रूहेऽस्त कॅ तर्बियते षखस कुनद्** म्हणजे असें चैतन्य [आत्मा] आहे कीं पुरुषास नीतिशिक्षण लावते. तालीम तरबियत म्हणजे अनुक्रमें विद्याशिक्षण व नैतिकशिक्षण. तरबियतचा अर्थ देह पोषण असा कोठेंच नाहीं. मग भाषांतराचें चौथें चरणांत तनु पौष्टिक ( पोर्टवाईन ) चा अर्थ कुठून उद्भवला ? फक्त कारण हेंच कीं बिचाऱ्या **उमरनें** बादा ' रूह ' चैतन्य बुद्धिदायक आहे, पहाडास म्हणजे पाषाण हृदयास सुद्धां चैतन्य देईल, असें सांगूनही तो पदार्थ हुडकण्याकडे लक्ष गेले नाहीं. असा पदार्थ **प्रेमच** आहे व तोच **बादा** याचा येथें पारिभाषिक अर्थ:—गु० क० ३५२

पहाडासि देसी जरी प्रेम, नाचे । असे नष्ट जो निंदितो प्रेम वाचें ॥
मला सांगसी ' प्रेम नाहीं सुखाचें ' । अरे बोध, आत्मा, असें प्रेम साचें ॥

असो वरील उदाहरण केवळ **मै बादा** याचें लक्षण कवीनें प्रत्यक्ष सांगितल्यानंतरही कैक भाषांतरांत तिकडे दुर्लक्ष कसें होते याचे आहे. असा अर्थ निर्देश बहुतेक सर्वत्र आहे. उदाहरणार्थ आकस्मिक रीतीनें उद्धृत खालील श्लोक पहावेत:— ४७२ अमृतत्व, मोक्ष, ६१४ निरंकारत्व, ६४९ गुरु दत्त बोध, ९०६ आत्मा, ९९४, ५७३ प्रेमाची मदिरा, ७६४ भक्तिसुधा, ४५२ शराब मारिफत ज्ञानसुधा, ६९८ शराब आषकी प्रेम सुधा, क्वचित् शराब शब्दानें दुसरे अर्थ दर्शित

आहेत. उदाहरणः—श्लोक ४७३ मृत्यु, ६०५ शोक, ८७२ अज्ञान, पैगंबर महम्मदची व हजरत अलीनें वाढविलेली षराब. ज्या ठिकाणीं स्वर्ग-खंडण व दंभनिंदा–दंडण असते तेथें बाजारी मद्य हा अर्थ आहे.

न पीसी सुरा, बोलसी वक्र गोष्टी । गुरू पाउला दूर नेलीस दृष्टी ॥
न पीसी सुरा, वाहसी गर्व पोटीं । सुरेहूनि जाडें तुझें कृत्य कोटी ॥२॥

आतां जेथें कोणतही विशिष्ट रीतीनें निर्देश नाहीं, तशा प्रसंगाकरितां खास परिभाषेची उकल खुद **उमरनें** आपलें **खय्याम** नांव घालून केली आहे.

**तनू पात्र** त्यामाजि **पीयूष आत्मा । अनूहात वेणू** उरीं हा धमामा ॥
असे **देह कंदील** कल्पीत नामा । गुरू त्यांत हा **दीप साक्षी** रिकामा ९०६

७२ इतिहास, भुगोल, गणित, पदार्थविज्ञान, रसायन इत्यादि भौतिक शास्त्रांची भाषांतरें कोशादिकांचें सहाय्यानें, मूळांतील परिभाषा तशीच ठेवून, अथवा नवीन परिभाषा तयार करून, होऊं शकतात. धार्मिक, तात्विक, अध्यात्मिक, ग्रंथांचीं भाषांतरें त्यांतील पदार्थ अंतरंग असल्यानें मूळांतील परिभाषेस अनुसरून केली तरच मूळाचा आशय कळेल. कारण त्यांत केवळ शब्दाचें जागीं, कल्पना व विचार याचा आशय दुसरे भाषेंत सांगावयाचा असतो. उदाहरणः—ज्ञानोबाराय म्हणतातः—ज्ञानिये म्हणती **संविति** । शैव म्हणती **शक्ति** । आम्ही परम **भक्ती** । आपुली म्हणो ॥ यांत वेगवेगळ्या शास्त्राचे परिभाषेंत तिन्ही शब्दानें एकच उद्दिष्ट वस्तु **भक्ति** निवडून दिली. परभाषेंतून अशा ग्रंथांचें व त्यांतून अनेक अलंकारांनीं युक्त अशा **उमरच्या** सुभाषितांचें भाषांतर फार कठीण आहे. मूळ ग्रंथकाराचें मनोगतासी प्रथमतः समरस व्हावें लागतें व हें नैसर्गिकरीत्या सुलभ नाहीं. मूळ ग्रंथकाराचा सहधर्मी व सहभाषी अशा गुरुकडून ग्रंथकारांचे विचार व परिभाषा उमजून, दोष दृष्टीचा त्याग करून, भाषांतर केलें तरच यथार्थ–बोधक होईल. हें आद्य तत्त्व विसरून जें भाषांतर, तें मूळ–विडंबन आहे. उदाहरणः–नवा करार (**म्याथ्यू**) अध्याय ६ यांत प्रभु **येशू ख्रिस्तानें** जी प्रार्थना पद्धती शिष्यास नेमली, त्यांतील व्हर्सेस ९ व १०. "Our Father which art in Heaven." इत्यादि, याचें मराठीं भाषांतर कोणी एकानें "आमच्या आकाशांतील बापा इत्यादि"

केलें, तें महाराष्ट्र भाषेचें अनोळखीचें झाल्यानें नेणत्यास तर खरेंच दुर्बोध, पण जाणत्यांना सुद्धां टीका टवाळीचें विषय झालें ( चिपळूणकर कृत निबंध-माला पहा. ) आकाश काय ? आकाशांतील बाप काय ? ग्रीकहून इंग्रजींत भाषांतर झालें तेंव्हां कांहींसें अस्पष्ट होतें, पण इंग्रजींतून मराठींत सपसेल अर्थाचा अनर्थ झाला. त्याचप्रमाणें सावित्री गायत्रीचें भाषांतर परधर्मियानें करितांना धात्वर्थानें सविता त्यांचा " आकाशांतील बापच " आहे हे विसरून, त्याला स्थूल सूर्य समजून, नंतर धि:कार प्रदर्शक जगांत असे सांगत फिरावें, कीं प्राचीन आर्य व त्याचें अनुयायी आम्ही स्थूल सृष्टीचे उपासक आहोत. वास्तवत:

" इंद्रंमित्रं वरुणमग्नि माहु:...एकं सत्, विप्राबहुधावदंति. "

असे सनातन वेद्र, व वेद अध्यात्मपर आहेत असे व्यासादिक, आक्रोश करीत असतांनाही परमधर्मीय भाषांतरकारांचें कांनांत तें शिरकू पावत नाहीं. कुराणांतील सूरए फातिहा ( आद्य मंत्र ) मध्येंही " मालिक यौमुद्दीन " धर्म दिनाचा प्रभु याचा आणि " आकाशांतील बाप ". अथवा सविता यांचा आशय एकच आहे. किंचित सूक्ष्म दृष्टीनें, पर मताविषयीं दोष दृष्टी सोडून, वरनिर्दिष्ट केलेल्या तीन्ही धर्मांत माननीय व अत्यंत पवित्र मंत्रांचा विचार केला असतां ऋग्वेद, कुराण, व नवाकरार यांतील मुख्य ईश प्रार्थना मंत्राचा भावार्थ एकच आहे असे कोणास ही प्रत्यक्ष प्रतीत होईल.

७३ सुमारें ३७ ते ४० वर्षांपूर्वीं हैद्राबाद येथील निजाम कॉलेजांत वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध प्रो० मौ. हजरत महम्मद अबदुल अली वाला यांचें चरणापाशीं या दासास फार्सी शिकण्याचा सुयोग आला होता. मौलवी साहेबांचें वय तेव्हां सत्तरचें वर होतें. हिंदुस्थानांत यांची फार्सी अरबींत प्रवीणता प्रख्यात होती. कैक फार्सी ग्रंथावर यांच्या टीका आहेत. त्यावेळेस उमर खय्याम नुकतांच आमचे हुजूरचे रिकाब खास प्रेसमधून बाहेर पडला होता. मौलवी साहेब म्हणत कीं, उमर खय्यामचें रुबाईविषयीं जितका गैरसमज त्याचे हयातीपासून या कालपर्यंत झाला इतका कोणतेही कवी संबंधानें झाला नसेल. उमरचें रुबाईस अनुलक्षून ते नेहमीं म्हणत:—

अमोला **तया** माणिका दूर खाण । **तया** शेलक्या मोतिया भिन्न खूण ॥
असें कीं, तसें व्यर्थ सारा गुमान । कथा **प्रीतिची** तेथ भाषाचि आन १०७

ते सांगत कीं, **उमर** आपला आशय रुबाईत गुप्तवत् ठेवून वाचकांस हुडकायास लावतो, पण बहुधा त्याची किल्ली रुबाईत असते. जसें ॥ अम्लान पंकजा-माला कंठे रामस्य लीलया ॥ मुधा बुधा भ्रमंत्यत्र **प्रत्यक्षेपि** क्रियापदे ॥ या श्लोकांत, कवीनें **प्रत्यक्षेपि** क्रियापद सांगून ही श्रोता भ्रमांत पडतो, तशाच वरील रुबाईत रत्नाचें अनर्घ्यत्व व अनन्यत्व दाखवून श्रोत्याच्या मनांत **उमरनें** जिज्ञासा उत्पन्न केली, तिसरें चरणांत ईन् व ऑन हें व तें असें दृश्य पदार्थ उद्दिष्ट वस्तु नव्हें, व चौथें चरणांत तो उद्दिष्ट पदार्थ **प्रीति** आहे, असें प्रत्यक्ष सांगूनही **तया** शब्दानें परोक्षत्व ठेवलें. प्रीति दुर्लभ, अनमोल, अनन्य, दृश्य पदार्थ नव्हें व अनिर्वचनीय आहे, हा कवीचा चारी चरणांतला भाव. हें कूट उचलून भावार्थः—

गुरु**भक्ति** रत्ना बहू दूर खाण । खरें **प्रीतिची** वेगळी सर्व खूण ॥
असें कीं तसें व्यर्थ सारा गुमान । कथा **प्रीतिची** तेथ भाषाचि आन १०७

सारांश मौलवी साहेब या रीतीनें रुबायाचें अर्थाची चावी हुडकण्यास लावीत. स्वतः उमरनें ज्या चावीनें अर्थ रत्न भांडार उघडलें, ती त्यानें आपले रुबाईत जपून ठेविली आहे. शब्दशः भाषांतरः—

अनाद्यंत **प्रेमीं** मला रेखियेले । सदा **प्रेम** पाठासि मी घोकियेले ॥
अता सानुले चित्त हें चावि झाले । अनंता गुजांचे निधी उघडीले ॥ ३२६

भावतः गुरुकरुणामृतांत असा अर्थ आहेः—

अधीं ओंनमः सिद्ध पाटीं लिहीलें । पुनः तेंचि चित्तामध्यें घोकवीलें ॥
गुरुसिद्ध मातेचिया **प्रेमलीलें** । अनंता गुजांचे निधी ऊघडीले ३२६

उमरचा हा आशय प्रतीत होतो कीं अनादि सिद्ध प्रेमांत जीव निर्माण झाला, व नांदत आहे, या विचारानें हृदयस्थ प्रेमानें सर्व अर्थ रत्नांचीं भांडारें उघडता येतात. **भक्तिप्रेम** सर्वांत उच्चतम संपादनीय वस्तु आहे. अशा अर्थाच्या उमरचें काव्य संग्रहांत कैक रुबाया आहेत. विस्तार भयास्तव एकच निवेदित आहे.

सतांचें सभे प्रेम सर्दार आहे । श्रुती कीं स्मृती प्रेम ओंकार आहे ॥
जरी नेणसी प्रेम शोधूनि पाहे । सदा जीवनीं प्रेम हें सार आहें ११७

अंतर्निष्ठांचे गुजांचे दप्तराचा अधिकारी प्रेम असा मूळांत उल्लेख आहे. भक्ति प्रेमास उमरनें सुदृढ धरिलें म्हणून हजरत मुर्तजा अलीचे रुबाईप्रमाणें ( परिच्छेद ३७), उमर ही सर्व जगांत लाडका कवी झाला. आपणही याच प्रेमाच्या किल्लीनें उमरचें सुभाषित निधान उघडलें तर रत्नें सांपडतील. चावी हरवल्यास सर्व शीण व्यर्थ होऊन "पीऊ या उद्यां मरायचें आहे" या खडकावर आदळूं.

७४. कैक संग्रहकार कांही ठळक ठळक रुबाया निवडून अवांतरास पुनरुक्त समजून गाळतात. असे करण्यांत उमरवर पुनरुक्तिदोष येतो. परंतु वास्तवतः ज्याप्रमाणें न्याय–वेदांत–परिभाषा घट, स्वप्न, शुक्तिरजत, रज्जुसर्प इत्यादि थोडी, त्याचप्रमाणें उमरची परिभाषा मधु चषक, कुंभ, कालचक्र इत्यादि अल्प आहे; विचार–तरंग दोहींतही अनेक आहेत; म्हणून कैक सुभाषितांत शब्द सारखेच असले, तरी पद्यरचनेच्या भिन्नत्वानें हेत्वर्थ भिन्न होतात. म्हणून समान अर्थाचे वर्गीकरण सुद्धां सुलभ नाहीं. विन्फील्डनें रुबायांचें ७ वर्ग कल्पिलें आहेत. हि. ८६८ ( इ.स. १४६१ ) मध्यें यार अहमद तब्रेजीनें तरबखाना नामक उमरचे रुबायाचा संग्रह लिहिला त्यांत १० वर्ग केलें. कूजानामा, साकीनामा, असें पूर्वीं कैकांनीं वर्गीकरण केलें आहे. ४५ विषयात वर्गी–करणाचा प्रो. पटवर्धन साहेबांचा प्रयत्न म्हणून तो प्रयत्न प्रशंसनीय आहे. त्यांनीं अनुक्रमणिका विषय १५ ते ३९ श्लोक १३९ ते ४६२ मद्यपर लेखिले. त्यांतील वर्ग २६चा पोटभेद "मद्यास रमजानांतही शुभसमय असतो" या सदराखालीं रुबाई २९१ पासून २९६ पर्यंत लेखिल्या आहेत. आपण प्रो० पटवर्धन साहेबांची क्षमा मागून या रुबायांचा विचार करूं.

अ पटवर्धन (२९१) मद्यर्तु निघे कीं येई रमजान,
न चले मधुचें सुवर्णचलन,–रजा न.
अपीत राही मदिरा, हाय मजा न !
अनाविद्ध अन् मुक्ता–गौहरजान !

खरा पाठ ' रायहे सादा '=शुद्ध सुगंधित वायू, असा आहे. विन्फील्डचा पाठ

' रायजे सादा ' असा आहे. रायज=चालू, व सादा=शुद्ध; या दोन विशेषणांनीं विशिष्ट नाम निर्देश नाहीं. असो. विन्फील्डचे पाठावरून भाषांतर ' मधुचें सुवर्ण चलन ' असें **पटवर्धन** करितात. मूळाचें शब्दशः भाषांतर असें आहे.

आले रोजे, मद्य हंगाम गेले. । गौडी-चक्री, वायु आराम गेले. ॥
कोठे मद्याचे अनाघ्रात ठेले. । वेश्या मेळे अक्षते ठाम गेले. ॥

येथें **उमर** तात्कालीन लोकपरिस्थितीचें वर्णन करितांना लौकिक **दंभाचारावर** ताशेरा करीत आहे. रोजे उपासाचा **दंभाचार** केला म्हणून सुखाची हानि झाली. मद्याचें विधान कवीनें केलें नाहीं. श्लोक केवळ, दंभलौकिक निरासार्थ व नीति-पर आहे. भावार्थांत ' **रमजान** ' शब्दानें उपासाचा महिना न घेतां, अर्थ व्याप्तीनें **लौकिकाचार** घेतला तरच कवीचा आशय व्यक्त होतो, या आशयास अनुसरून गुरुकरुणामृतांत एक गतभर्तृका आपले सखीस सांगते:—

गु.क. ॥दुरूनी पती येत एका दिसाला,। घरीं **लौकिकाचार** एकादशीला, ॥
उपासी निजे, नाहि एकांत झाला,। प्रभाती सखा दूर गेलाचि गेला.२३५

आ पट० (२९२) नमाज रोज्याकडे लागतां चित्त ।
गमे प्राप्त कीं होईल आशा-वित्त; ॥
वायुलहर परि हाय हरी शुचितेला, ।
बुडें उपोषण,—मद्याचमन निमित्त ! ॥

गु.क. ॥ मला वेधिलें जें उपासें जपानें । मला वाटलें काम झालें तपानें ॥
॥ फिटें सोंवळें तेथ एका अपानें । सुटें तो निराहार एकाचि पानें २३९

**उमरचा** आशय 'यथा सांगतें कर्म कांहीं घडेना' या **समर्थोक्तिप्रमाणें** कर्मांग बाह्य साधनानें कृत्यकृत्यता ( मुरादे कुल्ली ) होत नसून, कर्मही यथासांग होऊं शकत नाहीं. मूळांत **उमर** कर्मवैगुण्य दाखवीत आहे, अर्थात् रुबाईच वर्गीकरण रमजानांत मद्य प्यावें या सदरांत होऊं शकत नाहीं.

इ पट० (२९३) जरी मोडिला रोजा मी रमजानीं
न होय बुध्या तें हें आणा ध्यानीं;
उपोषणें दिन गमे तमोमय रजनी,
प्रदोषभोजन मग मी दोष न मानी.

मूळांत व प्रो. **पटवर्धनचें** भाषांतरांत सुरेचें नांव नाहीं. मग सुरापानविधानाच्या वर्गांत ही रुबाई कां घ्यावी ? 'नकोरे मना क्रोध हा अंगिकारू' इत्यादि समर्थोक्तिप्रमाणें प्रत्यक्ष दुसऱ्यास सांगण्यापेक्षां, स्वतःवर दोषारोपण करून अन्योक्तिनें, नीति सांगण्याची संतकवींची हतोटी **उमरनें**ही स्वीकारिली; हें पूर्वींचें दोन उदाहरणावरून व्यक्त होते. धर्माज्ञाभंग करीत असतांही वरपांगी **कितमान** म्हणजे धर्माज्ञा मान्य आहे असें दाखवून धर्माज्ञाभंग छपविण्यास **प्रतारणा, उमरचे** समकालीन मुसलमान करीत असत. अशा **कितमान प्रतारणेवर** हा टोला आहे.

गु.क.॥ दिसा जेविलो आज एकादशीस । न मी आग्रहें मोडिला जी उपास ॥
॥ उपासीं बहू पावलो मी श्रमास । मला जाहला पारण्याचाचि भास ६२०

ई . **पट०** (२९४) रमजान शशी व्यक्त हो नभीं ईयाम,
म्हणती नसावें अतां मधुशीं काम.
पिईन इतकी मदिरा शअबानांतीं
कीं मी धुंदच पुढती आ—बयराम.

शब्दशः भाषांतर असें होतें ॥ **आर्या** ॥ म्हणतो रमजान शशी दिसला, न पडा अतां सुधा—छंदीं ॥ पीतो शाबानि भलें, जाई रमजान सर्व त्या धुंदीं ॥ मूळ रुबाई धनुष्यांकित आहे त्यावरून, आणि रमजान सरेपर्यंत धुंदी रहावी हा अर्थ बाजारी मद्यास लागू पडत नाहीं, म्हणून, येथें पारिभाषिक अर्थच घेतला पाहिजे. ज्या रुबाईत **गोयंद्**=म्हणतात, **ऐ आंके**=अरे तूं म्हणतोस कीं, इत्यादि शब्दानंतर पूर्वपक्ष कथन येतें, व नंतर उत्तर असतें, ती रुबाई पूर्वपक्ष खंडणात्मक असते. संस्कृत सुभाषितांतही हीच पद्धति आहे; जसें:—"**करमणूक**" चा माथळा.

वदंतु कतिचिद्घटात्स्वफछठेति वर्णाञ्छटाः ।
घटः पट इतीतरे पटु रटंतु वाक्पाटवात् ॥
वयं बकुल मंजरी गलदमंदमाध्वीझरी ।
धुरीण पदरीतिभिर्भणातिभिः प्रमोदामहे ॥

मूळ रुबाई पूर्वपक्षाचें निरसन आहे, व सूफी परिभाषेची, म्हणून पूर्वपक्ष हा कीं, ज्ञानोत्तर भक्ति नको, व त्याचें उत्तर रुबाई सांगते.

गु.क. ॥ कुणी बोलती ज्ञान येताचि हाती, । तरी सांडिजे सर्वही मूढ भक्ता. ॥
॥ असें नाम सेवीन, ज्याचेनि मस्ती । जरी ज्ञान ये जाय, राहे न खंती. ३८६
याच अर्थानें **श्रीसमर्थ रामदास** म्हणतात.

**पद**

नामचि कारण रे ॥ महाभय नामनिवारण रे ॥ धृ०
नामें होय चित्त शुद्धी । नामें होय दृढबुद्धी ॥१॥ नामचि०
नामें महादोष जाती । पुढें संतांची संगती ॥२॥ धृ०
**रामदास** सांगे खूण । **नामसिद्धांचें साधन** ॥३॥ धृ०

**उमरचा**ही हाच आशय आहे.

उ पट० २९५ "पिऊं नका मधु" म्हणती शास्त्रज्ञानी,
"युक्त नसे तें रजवीं अन् शअबानीं,
मास खास ते प्रभुचे प्रभुदूताचे,"
हाच खास मम म्हणुन पितों रमजानीं.

ग्रंथ संग्रहालय ... ४९२८ ... क्र. ...

वरील ( इ ) प्रमाणें ही रुबाई प्रतिपक्षास उत्तर आहे. भिन्न मासांत भिन्न कर्मे करावी या रूढीचा पूर्वपक्ष. श्री **ज्ञानोबारायांनीं** १३ व्या अध्यायांत अशा व्यभिचारी भक्तिचें लक्षण सांगितलें आहे:—॥ नित्य आराधन माझें । काजीं कुळदेवता भजे । पर्व-विशेषें कीजे । पूजा आना ॥८१६॥ माझें अधिष्ठान घरीं । आणि ओवसे आनाचे करी । पितृकार्यी अससरीं । पितरांचा होय ॥८१७॥ एकादशीच्या दिवशीं । जेंतुला पाड आम्हासि । तेंतुलाचि नागासी । पंचमीच्या दिवशीं ॥८१८॥ अशा व्यभिचारी भक्तिचें खंडन इथें आहे.

गु.क.॥असे भादवा मास कीं श्रावणाचा । कुणें पित्र कीं देवता तर्पणाचा ॥
॥मला मास तो नाहि समस्त साचा । गुरूनामिं मी मस्त राहे सदाचा १३३

ऊ पट० (२९६) जाय अता रमजान, आणि शव्वालीं
या सुख समयीं रागरंग-कव्वाली !
अन् मद्याचें बुधले घेऊन खांदीं
हमाल फिरती त्यांची गर्दी झाली.

रुबाई धनुष्यांकित अर्थात् सूफी परिभाषेची आहे. रमजान म्हणजे क्रियादिकष्ट

दंभाचे दिवस गेलें आणि भावभक्ति सुखाचें दिवस आलें, या अनुभवाचें हें वर्णन आहे.

गु.क.॥ क्रिया दंभ गेला, उरीं भाव आला । भरे रंग संगीत नृत्यादिकाला ॥
॥ कसा मेळ साहित्यरागादितांला । बहू गोड सद्भाव तो भाविकाला ९८९

अर्थात् मद्यांस ' रमजानांतही शुभ समय असतो ' या वर्गांत ही रुबाई येऊ शकत नाहीं.

७५ वास्तविक प्रो० **पटवर्धन** साहेबांचें भाषांतर ' अभिनव, मनोरंजक ' आणि छान वठलें आहे. त्यांचें परिश्रमही फार आहेत. वरील उताऱ्यावरून हे उघड आहे कीं, उमरच्या रुबाईत शब्दांहून हेत्वर्थ भिन्न असतो तो लक्षांत न घेतां, व परिभाषा न उकलतां, शब्दशः अर्थ केला तर मूळाचें विडंबन होण्याचा संभव आहे. वरील साही उदाहरणें रमजान महिन्यांत (बाजारी) मद्य प्यावें या आशयाचें परिपोषक नाहींत. फार्सी भाषा जाणणारे जहल्लक्षणेनें अर्थ-व्याप्तीपर्यंत पोहोंचून पारिभाषिक शब्दाचा यथार्थ आशय घेतात, व त्यांना विचारांचें स्वारस्य मिळतें. भाषांतरांत अशीच परिभाषा कायम ठेविली, तर अर्थ-व्याप्तीनें आशयापर्यंत वाचकांस पोहोंचविणें भाषांतरकारांचें कर्तव्य आहे. मराठींत मद्याची परिभाषा प्रचलित नाहीं, म्हणून मूळांतील मदिरा धुवून किंवा त्याएवजीं गोकुळांतील परिभाषा योजून, गुरुकरुणामृतांत केवळ भावार्थ निदर्शनाचा यथामति प्रयत्न केला आहे. मूळांत **बहिराम, जम्शीद, कैकुबाद, कैखुस्रू,** इत्यादि व्यक्तींचा, किंवा **तूस, बगदाद** इत्यादि स्थळांचा, उल्लेख अनादर-युक्त आहे; म्हणून अशा व्यक्ति स्थलाचे जागीं इकडील सुबोध व्यक्ति-स्थलांचा उल्लेख आहे. **'खय्याम'** चा उल्लेख तेथें आहे, तेथें मन घेतलें. उर्वरित परिभाषेचा अर्थ परिच्छेद ७० मध्यें निजामीचे कृतीचें भाषांतरांत झाला.

---

## ६ रुबायाचे अलंकार.

७६ कांहीं विद्वान असा संशय घेतात कीं, **उमरच्या** रुबायासारख्या दुसऱ्या रुबाया त्याचे संग्रहांत प्रक्षिप्त केल्या असतील; कारण समान अर्थाच्या अथवा भिन्न पाठांच्या रुबाया एकाच किंवा भिन्न भिन्न रुबाई संग्रहांत स पड-

तात. व या शंकेमुळें कांहीं संशोधक सर्वच लिखितास प्रक्षिप्तविद्ध समजतात. आपलें काव्य–रत्नपरिक्षक **श्रीएकनाथ महाराज** म्हणतातः–॥ ज्ञानेश्वरी पाठीं । जो ओवी करील मऱ्हाटी । तेणें अमृताचें ताटीं । जाण नरोटी ठेविली. ॥ **ज्ञानेश्वरांच्या** आणि इतर कवींच्या ओव्यांची परीक्षा **श्री एकनाथ महाराज** करूं शकत होते. रत्नांची परीक्षा शब्दानें सांगतां येत नाहीं. तुलनात्मक दृष्टीनें रत्नपरीक्षणाचा अभ्यास दीर्घकाल झाला तरच पांचांतून कांच व शुक्तिजांतून कल्चर मोती पारखी निवडूं शकतो. अशी परीक्षा करूनच बहुधा लखनौ, हैद्राबाद इत्यादि स्थलांचे संग्रह पूर्वी छापिले आहेत. आतां क्वचित् पाठ भेद आहेत; ते जीर्ण प्रतींतून उतरतांना लेखक प्रमाद, अथवा ज्याप्रमाणें फिज्जेरल्डनें आपलें १०० व्हर्सेस पांचदा तपासून वेगवेगळे पाठ केले, त्याप्रमाणें उमरनेंही आपलें आयुष्याचें कालांत रुबाया तपासून वेगळे पाठ केले असतील, या दोन्ही कारणानें, संभवते. सारांश रुबाई उमरची अथवा इतरांची हें तोच फार्सी भाषाभिज्ञ सांगूं शकेल, ज्यानें तुलनात्मक दृष्टीनें उमरचे आणि दुसरे कवींचे रुवाईचा अभ्यास केला असेल. जिज्ञासूंनीं उमरचें रुबायाचे विशिष्ट गुणांचें विवेचन, षिब्ली नोअमानीकृत षिअरुल् अजम् (षहाजहानी प्रेस, दिल्ली ) हजरत अयाज पानिपति कृत चरित्र ( परिच्छेद ५६ ऐ ) यांत, आणि **मसऊद अली वारेसी** ( किंगेनपाल–१९२२ ) **ओटो रॉथफेल्ड** [ तारापूरवाला मुंबई ] **टी. एच्. वीयर** ( जान मर्रे १९२६ ) यांचें ग्रंथांत इतर कवींच्या रुबायासह पहावेत.

७७ **उमरची** रुबाई लोकप्रिय व जगांत चर्चेचा विषय कोणते विशिष्ट गुणामुळें झाली हें भाषांतरांचे वाचकांस माहित असणें आवश्य आहे. व ते खालीं निवेदित आहे.

७८ **उमरच्या रुबाईची भाषा** सुलभ व सरळ, अन्वयाची आवश्यकता नसणारी, ज्ञानेश्वरीसारखी गद्यांत बोलल्याप्रमाणें आहे. **रुबाईचा छंद** मृदु मंजुबाही असून म्हणतांना झोल येत नाहीं. हजज वृत्तांत [ त ज र म ], [ त य स म ], [ त र स म ], आणि क्वचित् [ म भ र य ], [ म र य स ] या गणांचा अंगिकार उमरनें केला आहे. रजज वृत्तांत फक्त एकच रुबाई गु. क.

आणि तिची चाल परिच्छेद ७० तील निजामीच्या कित्याची आहे.

**१, अनुप्रास, विरोधाभास, व्युत्पत्याभास** इत्यादि **शब्दालंकार** बहुधा उमरच्या प्रत्येक रुबाईत **अप्रयास**, व **सहज** असतात. उदाहरणः— गु. क. १९ याचें मूळांत ' बाज् आ ' याचे अर्थ उलट, फिर, अंतर्मुख हो, आग्रह सोड, शरण ये, सहजच आहेत.

फिरे मागुता ऐस कीं तू कसाही । जरी पातकी घोर माघार घेई ॥
कुणाही निराशा गुरूदारिं नाहीं । अनंतापराधी तरी लाग पायीं ॥ १९ ॥

हाच भाव ' उलट उलट माघारा प्राण्या फिर. गोते खासी ' या मुक्ताबाईच्या पदांत आहे. गु० क० ५० व ७४५ यांचे मूळांत ' कू कू कू कू ' असे अशुभ कपोत–रव कोठें, कोण इत्यादि अनेकार्थी आहेत. श्लोक १९ याचे मूळांत 'मुदाम' याचे अर्थ मद्य व शाश्वत, सहज साधले आहेत. भाषांतरात श्लेषादि शब्दालंकार अशक्य व कष्टसाध्य आहेत.

८० **उमरची दृष्टांत—पद्धति** गणित, ज्योतिष, पदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रांची आहे. अध्यात्म अर्थ भौतिक शास्त्रांतील दृष्टांतानें वठविण्याची कुशलता उमरशिवाय दुसरे कोणतेही कवींचे रुबाईत आढळत नाहीं. उदाहरणः— श्लोक १२७ " उद्याची घडी आज नाहीं जमेला......नये आयु बाकींत काढावयाला " यांत बेरीज वजाबाकीचा दृष्टांत; श्लोक ११८ " गुरु एक तू देखसी अंश कोटी " यांत ' ताक '=एक, आणि कसर=अंश, या शब्दांनीं परमेश्वराचें पूर्णत्व आणि जीवांचें अंशत्व दाखविलें आहे. श्लोक २४२ " वयांतील हाती धरूं तेंचि शून्य " यांत बेरजेचें रूपक; श्लोक १६९ यांत दाही संख्याचा निर्देश; श्लोक २८२ यांत क्रमांकाचा; श्लोक ३१२ यांत गुणाकाराचा, एकास एकानें गुणलें तर एकच राहतो; श्लोक ३१७ यांत ग्रहकुंडलीचा; श्लोक ४०४ यांत ग्रहांचे गतीचा; श्लोक ५९५ यांत परिकार [ कंपास ] चा दृष्टांत, हा गुरुकरुणामृतांत फुगडीचें रूपकांत आला आहे. श्लोक ५९६ यांत चित्रदीपाचा दृष्टांत आहे. श्लोक ७०९ मध्यें पृथ्वी बैलावर व आकाशांत वृषभ आहे असें मानणारांची कुचेष्टा; श्लोक ९३५ मध्यें चंद्र स्वयंप्रकाश नसून सूर्याचें किरणाचें

परावर्तनानें चांदणें पडतें असा ज्योतिष शास्त्राचा सिद्धांत; याप्रमाणें आणि-कही शास्त्रीय शोधाचें दृष्टांत उमरचेंच रुबायांत सांपडतात.

८१ **उमरची प्रतिभा** फार्सी कवितेंत प्रचलित असलेली फूल, हरळी, नदी, मद्यपात्र, घट, चक्र, पृथ्वी, आप, तेज, वायु अशी आहे. व ही उमरनें तत्त्वार्थाचें प्रतिपादनाकरितां ग्रहित केली आहे. परंतु **उमर** ते पदार्थ ताजे-सचेतन, व प्रत्यक्ष बोलतात असा अनुभव देतो. गु. क. १९५:–रडें अभ्र हें सांगताहे वनाला ॥ विना भक्तिच्या जाचणीरे जनाला ॥ यांत अभ्र कळवळून बोध करीत आहे; गु० क० ६६ " पुरुवा बने हाचि पूरुरव्याचा " यांत मातीचा चंबू विषयासक्त व प्रियेला अलिंगन देत आहे असें निदर्शन; गु०क० ५५५ गाडग्गीं ठन्ठन् वाजवून पाहिलीं तेव्हां गाडगीं म्हणतात " घडी कोण, दे कोण, घे कोण, माती; " श्लोक ७५१चे मूळांत चेंडू थाप खाऊन उफळतांना " ऊदानद ऊदानद ऊदानद ऊ"=तो जाणत तो जाणत तो जाणत तो, असें सांगतों.

जलामातिचा देह केला सपाट । भवाग्नीमध्यें भाजिला पाठपोट ॥
सुखाचा मिळाला नसें एक घोट । रिता हात कर्मीं, रिकामेंचि पोट ॥१४॥

येथें कोरा घट सांगतों कीं, हात रिकामें व पोटही रिकामें. त्याचप्रमाणें पक्षी, फुलें इत्यादि पदार्थ तत्त्वज्ञान सांगतात.

८२ **उमरची–विचारसरणी व तर्क** दीर्घ सूत्री नसून बीज गणिताच्या पद्धतीप्रमाणें थेट प्रमेयाम झोंबते, जसें:–

मला सांगती स्वर्गिचें सूख फार, । तुझें प्रेम मातें असें गोड सार; ॥
बरें नग्द हें, काय कीजे उधार? । बरा ढोल जो वाजतो दूरदूर. ॥७५॥

यांत स्वर्ग–खंडण व भक्तिमंडण एकाच सपाट्यांत आहे. अशा सरळ विचार-सरणीनें बहुतेक सर्व रुबाया भरल्या आहेत.

८३ **उमर परपक्ष खंडणांत** अन्यत्रासिद्ध Reductio ad absurdum ची पद्धत स्वीकारून परपक्षाचें खंडण, मर्मभेद, व उपहास एकदम करितो. उदाहरण तात्कालीन तद्देशीय धरामताचे लोक असें मानीत कीं, स्वर्गांत अप्सरा व मद्य आहे, त्यांची प्राप्ती आतां सदाचारानें वागतील त्यांना होईल. या मताचें खंडन अन्यत्रासिद्ध पद्धतीनें उमर करीत आहे.

पट० ३६१ म्हणती " असती नहर हुरी आरामी
निर्मल मदिरा आणिक माक्षिक नामी "
हेंच असें जर अखेर तर युक्तच तें
कीं नित भजतो रमणी अन् मदिरा मी

गु.क.॥ वदंता असे स्वर्गं पीयूष सार । मधु क्षीर-कुल्या वहाताति पूर ॥
॥अता याग कां? झोडिजे मोति-चूर । भली रोख पै कोट होना उधार १००९

" गोयंद " या शब्दानें परपक्ष खंडणाची ही रुबाई आहे. जे लोक स्वर्गोतील अप्सरा मद्याची लालसा धरून बाह्यांगानें त्याचा त्याग करितात, त्यांचा बाह्य त्याग खोटा आहे व वैषयिक स्वर्गाची कल्पनाही खोटी आहे. ही गणिताची खंडणपद्धती ध्यानांत आली म्हणजे " यावज्जीवेत्सुखं जीवेत ऋणं कृत्वा घृतं पिबेत. " असे चार्वाक अथवा एपिक्यूरस सारखे उमरचे मत होते अशी कांहीं पाश्चात्य पंडितांची कल्पना आहे तिचे पूर्ण निरसन होते.

दुसरे उदाहरणः—

मला निंदिती 'मस्त नर्कांत लोळे.' । न ऐकेचि मी घालि कानांत बोळे. ॥
जरी प्रेममत्ता कधीं नर्क आलें । उद्यां देखसी स्वर्ग तें ओस झाले १६२

" अहो शास्त्रज्ञपंडित ! स्वर्गांत मद्य व अप्सरा आहेत असें तुमचें मत गृहीत करतो, पण 'मस्त नरकांत जातो' हें म्हणतां तें मात्र शास्त्राविरुद्ध आहे. कारण स्वर्गातले मद्यपी व अप्सरासक्त नरकांत जातील व स्वर्ग ओस राहील. हे शास्त्र विरुद्ध वचन मी ऐकत नाहीं. मी कानांत बोळे घालतो."

प्राचीन काळीं शत्रूचा वध करून त्याचें रक्त पिणें सुद्धां निषिद्ध मानीत नसत. दुःशासन वधांतील मोरोपंती आर्याः—

मग कंठ–नाळ चरचर तो सत्य करावया बिरुद कापी ।
मिटक्या देऊनि मटमट घटघट, दुःशासनासृगुदका पी ॥

उमरचे समकालीन मुसलमान ' दीन ' विरुद्धांचा छळच काय, पण वधही स्वधर्म मानीत. उमर ' अहिंसा परमो धर्मः ' मानणारा, वरील मताचें खंडण करितो. गु०क० १९२ चे मूळाचें वृत्ततः भाषांतरः–

॥ मी पीत सुरा, अरी चहू देशानीं । कोकाटति "धर्म वैरि मद्यें हानी." ॥
॥ द्राक्षासव धर्मवैरि हें जाणोनी, । पीतो धर्मारिरक्त, मी विधि मानी. ॥

वरील रुबाई " गोयंद " म्हणतात या सदरांत परपक्ष खंडणात्मक आहे. सुरापान अधर्म, पण शत्रु–वध स्वधर्म, या मतांचें खंडण मार्मिकतेनें केलें आहे.

वरील तीन्हीं उदाहरणांतील रुबाया क्रिस्तेंजनच्या चाळणींतून शिल्लक राहिलेल्या आहेत. तिन्ही ही मद्यपान समर्थक नसून परपक्ष खंडणात्मक आहेत. उमरची ही पद्धत लक्षांत न आल्यामुळें कोणी त्याला धर्मलंड, कोणी देहात्मवादी, व कोणी विषयासक्त असें समजतात.

८४ **आक्षेप व प्रश्न.** भिन्न मत परीक्षणांत मतांवर आक्षेप अथवा प्रश्न करून **उमर** वाचकांस निरुत्तर, अथवा विचार करण्यास प्रवर्त, करतो:—

लिहीना विधी माझिये संमतीनें. । भलें कीं बुरें काय माझें वतीनें? ॥
नसे काल कीं आज माझें गतीनें. । मला हांगती सांग कोणें नितीनें? ३४६

यांत जीवात्मा केवळ परतंत्र आहे या पक्षाचा तात्पुरता अंगिकार करून, त्याचे वैगुण्य दाखविण्याकरितां त्यांचे मताप्रमाणें परलोक व जीवयातना असिद्ध दाखवितो.•

रिद्धिसिद्धिवर आक्षेप:—

मनीं तें जनीं जाहलें काय शेखीं? । विधी लेख ही वाचिलें काय शेखीं? ॥
शतायू सुखा भोगिलें काय शेखीं? । चिरायू जरी राहिले काय शेखीं? ७८६

जीवास स्वकर्तव्याविषयीं जागृती उत्पन्न करण्याकरितां प्रश्न:——

बहू चांगली ही मला वर्ण व्यक्ती । सुवाचा, स्मृती, धारणा, बुद्धि, शक्ती;॥
कळेना घटीं मृत्तिकेच्या कशाला । मला चित्रिता वेचिलें कौशलाला. २४

अशा कैक रुबाया प्रश्नरूप विचारप्रवर्तक आहेत. त्यावरून **उमर** निराशा–वादी, अज्ञेय–वादी, शून्य–वादी असेल असें कैक पंडित विधान करितात. परंतु या रुबाया केवळ प्रश्नरूप असल्यामुळें हे विधान यथार्थ नाहीं.

८५ **अन्योक्ति, लापिका,** इत्यादि अलंकारांनीं **उमरचें** गूढाशय प्रच्छन्न धनासारखे आहेत. याचे रुबायांत अन्योक्ति तीन प्रकारची सांपडते. (१) अन्यानें अन्याला:—रडे अभ्र हें सांगताहे वनाला (गु.क. १९५); वदे फूल मी येथ सौगंध सारे (गु.क.१७४); (२) अन्यास उद्देशून स्वत:ला रामदासी मनाचें श्लोकाप्रमाणें; (३) अन्यास उद्देशून अन्याला; जसें:——

कुलाला करी अल्पसा हा विचार । किती मानवी मातिला लाथ मार ! ॥
नृपा रावणा कंस बाणासि धीर । भुवंडीसी चक्रावरी बेफिकीर ! ॥३२॥

लेकीस बोलले, सुनेनें उमजावे. वरील श्लोकांत कुंभारास उमर म्हणतो मोठ-मोठ्या राजांची तू अमर्यादा करितोस याचा विचार करीत नाहींस ! परंतु रोख राजवैभवाचे घमेंडीवर टोला आहे.

८६ विनोद. स्वतः उमर हास्याचे विरुद्ध आहे.

वदे फूल मद्रूप सौगंध सारे । कसें कुस्करीले मला गंधकारे ॥
दुखे भोंवरी देत गुंजरवा "रे । हसे एकदा तो रडे जन्म सारे" ॥१७४

अर्थात् उमरचा विनोद थिल्लर हास्यप्रद नसून गंभीर, हृदयविदारक उपहासाकारक, व शोक पर्यवसानी आहे. त्यानें स्वतः विनोद अलंकाराचें उदाहरण दिलें आहे. त्यांत श्रोत्यास चिडवून, मूर्ख ठरवून, मोहांत पाडलें असें त्यानें दाखविलें आहे. स्वतः एका 'बुद्धिवाना' बरोबर झालेलें संभाषण तो आपल्या मित्रास सांगत आहे:—

पट० ३९३ वदलो " नलगे अता मधुजपारक्त, "
रक्त न पी मी, अन् ते द्राक्षारक्त. "
प्रौढ बुद्धि मज म्हणे " खरें कां मग हें? "
पिणार का नच? वदलो " थट्टा फक्त "

मूळाचें वृत्ततः व शब्दशः भाषांतर असें होतें:—

मी बोलत कीं " पुन्हा न पीत मदा मी "
" द्राक्षासव तें. वधी न जीव कदा मी "
आचार्य वदे " भरी अजाची हामी "
मी बोलत " हा विनोद घे न कदा मी ! ! "

चौथे चरणांत "चूँ न खुरम" हा द्व्यर्थी प्रयोग आहे. याचा एक अर्थ "घेत नाहीं म्हणून" केवळ विनोद केला. दुसरा अर्थ प्रश्नार्थी " कां म्हणून घेणार नाहीं?" उभयपक्षीं बुध्दिमान आचार्यास यानें खिजवून मूर्ख ठरविलें. गुरुकरुणामृतांत भावार्थ असा दिला आहे, एक गोपी आपले सखीस सांगते:—

वदे " मी हरी संग कोठें न जाई । हरी जार, मी जारिणी काय होई ! " ॥
तरी "आण घे" बोलती सासुबाई । वदे मी "घरीं आजि आणूनि घेई" ६०२

याप्रमाणें मर्मभेद व उपाहास करण्यांत उमरला मौज व आनंद वाटत असे. गु०क० १० ची मूळ शब्दशः रुबाई अशी आहे:—

" करीं वसें खंडण–खड्ग माझे, । करी मला दिग्विजयी सदा जें, ॥
जळें रिपू काळिज, होत खाजें. । अरी कपालीं मदिरा विराजे. ॥

याप्रमाणें शब्द खड्गानें परपक्षाचें काळिज चिरलें असतां तो जळफळू लागला म्हणजे ते उमरचें खाद्य, व तो अद्वा तद्वा बकू लागला म्हणजे त्या योगानें उमरला कैफ येत असे, ती उमरची सुरा.

८७ **रस.** उमरचें काव्यांत स्त्रियांचे विलासादि श्रृंगाराचा पूर्ण अभाव आहे. श्रृंगाराचे पर्यवसान तो बभित्सांत करितो. उदाहरण गु.क.६६ यांत विषयासक्त पुरुषांस मातीचे पुरुव्याची उपमा दिली आहे. गु.क. ६३मध्यें 'कांटी बनाची असे पापणी वेणि दिव्यांगनांची.' श्रृंगारादि विषयासंबंधानें त्याचें मत:—

नको इंद्रिया संग धावू विलासी । तुला भूत खातील कीं वाघ लासी ॥
पहा कोण तू? कोठुनी पातलासी? । विचारी कसा वागसी? कोठ जासी ? ६४

**वीररस** विन हत्याराचा शब्दानें खंडणापुरताच आहे. याचे उदाहरण वरील परिच्छेदांत आले आहे. याशिवाय संसाराचे त्यागास प्रवर्तक असा **वीररस:**— 'धरी शौर्य संसार निःशेष सोडी ' (गु.क. ५०० ) व स्वतःचे मानावर सत्ता चालवील तोच वीर.

स्वतःला गणी तुच्छ जो तोचि **धीर** । स्वतःलाचि शिक्षा करी तो **अमीर** ॥
न शोभे पतीता दिला लाथ–मार । पतीतासि तारी हरीनाथ शूर ॥८६८॥
जरी शूर तू, मारिजे देह–बुध्दी । धरी प्रेम, होईल रे चित्त–शुध्दी ॥
अनामा अरुपाचि तू अंति आधीं । अहंता त्यजूनी समाधान साधी ८८९

**करुणरसानें** ईशस्तवन परिपूर्ण आहे. यांत स्वतःचे पापाची क्षमा मागतांना तो प्रभूसी सलगीनें वाद घालण्यास कमी करीत नाहीं.

गुन्हा जो करीना असे कोण ऐसा ? । न केल्या गुन्हा वांचला जीव कैसा ?
चुके मी, जरी देसि खोटाचि पैसा । बुरा मी, प्रभो! काय तू होसि तैसा? ७५७
तपी नाचरे पाप, कीं तू कराली । करी पाप मी, माय कीं तू दयाली ॥
म्हणे तो कराली, वदे मी कृपाली । तुला आवडें नांव, कीं सांग गाली ? ७६२

८८ वरील लक्षणापैकीं शब्दालंकार क्वचित् दुसरे कवींचे रुबाईत सांपडतात, परंतु अर्थालंकारांत **उमरची** खोंच निराळीच आहे. वरील लक्षणापैकीं तीन चार अथवा अधीक लक्षणें **उमरचें** रुबाईत एकत्रित दिसतात. यावरून उपलब्ध संग्रहांत कोणती रुबाई उमरची, कोणती प्रतिमा, व कोणती केवळ प्रक्षिप्त, याचा निर्णय पारखी करूं शकतात.

८९ पूर्वीं कवींच्या अगर संतांच्या संमेलनांत कवनचक्री चालत असे. तेव्हां समस्यापूरणाचा खेळ होत असे. अशा "मुशाईरा" कवनचक्रींचा परिचय ज्यांना नसेल त्यांना शब्दासारखे शब्द, अथवा चरणासारखे चरण, दिसले म्हणजे ही शंका येते कीं, कवनसंख्या फुगविण्याकरितां कोणी तरी प्रक्षिप्त रुबाया घातल्या असतील. वस्तुत: समस्यापूरण हा जाडा अलंकार आहे म्हणून अशा रुबायासंबंधानें प्रक्षिप्त वाद थोतांड आहे. समस्यापूरणाची अशी कांहीं उदाहरणें उमरचे रुबाईत आहेत. गु. क. ५२, ५३ व ५७ यांत श्लोक ५३ चे पहिलें व ५२ चे दुसरे चरणांत दोन पृथक चरणानें श्लोक ५७ होतो. तिन्हीं श्लोकांची प्रमेयें भिन्न आहेत. तसेंच ५०६,५१७,५१९,५२१ व १००० यामध्यें 'कर्जदार व मरीज' **वांकडे ठेव सोडू नको** या अर्थावर समस्या आहेत. परंतु हे पांचही श्लोक पाहिलें म्हणजे दिसून येईल कीं, यांतील प्रमेयें भिन्न आहेत. ५०६ मध्यें परमात्मानें सृष्टी व त्याचा द्रष्टा जीव निर्माण केला त्याला सृष्टीचें निरीक्षण करूं ही कठीण आज्ञा ५१७ मध्यें कर्माची प्रेरणा हरीकडून होते व नैष्कर्म हरीची आज्ञा ५१९ व १००० मध्यें सगुण ध्यान भक्तास सुटत नाहीं. ५२१ मध्यें भक्ताची दक्षता कशी असावी हे सांगतो.

९० **उमरची** सरस्वती स्वत: सिध्द सर्वालंकार युक्त आहे. तिचें चित्र अथवा फोटोग्राफ दुसऱ्या भाषेंत काढलें तर चित्रांतील अलंकार कितपत खऱ्या हिऱ्या मोत्याचे राहणार ? चित्रा गरीबानें ते अलंकार आणावे कोठून ? परंतु लहानपणीं पाटी पूजनास एकाचे आंकडे मांडून सरस्वती काढीत होतो, व भावानें त्यास सरस्वती समजून हळद कुंकू वाहात होतो, तद्वतच गुरुकरुणामृत एका भावार्थाचें सौभाग्यावर **उमरचे** सूक्ति–सरस्वतीचें चित्र आहे.

## ७ रुबायांतील रहस्य.

९१ चरित्र प्रकरणांत परिच्छेद १८ मध्यें **उमरचें** मत त्याचें स्वतःचें वाक्यावरून कर्म, तर्क अथवा परंपरेनें गतानुगतिक पंथाचे नसून सूफी मताप्रमाणें होतें असें व्यक्त झालें आहे. मागील प्रकरणांत कर्मांग बाह्य साधनास अधिक महत्व देणारे मतांचे, व तत्कालीन स्वर्ग, नरक इत्यादि कल्पनांचें, खंडण तो वितर्कानें किंवा प्रतीप्रश्नानें कसे करीत असे याचें विवेचन झालें आहे. विचारी श्रोत्यांना आणि सूफींना ही चतुर पद्धत आवडली. परंतु कर्ममार्गी आणि साधारण श्रोते, यांची पोहोंच **उमरचें** विचारापर्यंत नव्हती. अर्थात् **षरीयत** मताभिमानी त्याचा द्वेष करीत असत. याविषयीं हकीकत परिच्छेद २५ ते ३० मध्यें वर आली आहे. हा द्वेष उमरनंतर ही एक शतकापर्यंत राहिला. याचें उदाहरण **नजमुद्दीन राजी कुबरा दाया.** या पंडितानें सुल्तान कैकुबाद यास नजर म्हणून हि. स. ६२० मध्यें **मिर्सादुल् इबाद्** [ भक्तांचा राजपंथ ] नामक ग्रंथ लिहिला आहे. ( हैद्राबाद स्टेट लायब्ररी लिखित नं. १६०९ ) या ग्रंथांत [ भाग १ प्र. २ मध्यें ] काफिराचे हल्ल्यामुळें स्वतःचा जीव वाचविण्याकरितां दारा पुत्रादिकाचा त्याग व प्रवास, रूम शहरास गमन, नंतर कैकुबादचें दरबारांत जाण्याची स्फूर्ती, नंतर राजास नजर काय द्यावी म्हणून ईश्वरास ( इस्तिखारा ) म्हणजे कौल लावला, इश्वरानें कैकुबाद राजास नजर करण्याकरितां ग्रंथरचनेची आज्ञा रमजान हि. ६१७ मध्यें केली, अशी हकीकत देऊन तिसरे प्रकरणांत ग्रंथ महात्म्य सांगतो; " या ग्रंथाचा वाचक साधन पंथांत उल्हासानें चालूं लागेल; म्हणजे तो जे पाहील त्याप्रमाणें वर्तेल; कारण दृष्टिचें फळ **ईमान** (श्रद्धा) आणि वर्तनाचें फळ **इर्फान** (ज्ञान) आहे. बिचारे फिलसफी [ग्रीक तत्वज्ञ], दहरी [जडवादी], तबाई [स्वभाव वादी]—अल्ला **त्यांना हताश ठेवो***—या दोन्ही मुक्कामापासून पराङ्मुख भांबावून भटकतात. उदाहरणार्थः—विद्या, शास्त्र व चाणाक्षपणांत त्यांना मान्य व विख्यात असा एक पंडित **खय्याम** आश्चर्यचकित होऊन भ्रमाचे **तळापासून** आपलें अंधत्व व्यक्त करितो; जणूंकाय या दोन रुबाईत तो जखडला गेला आहे.:—

---

* ही शापोक्ती आहे.

किती दूर आलो, किती दूर जावें । नसे आदि ना अंत, केवी गणावे? ॥
खरी मात कोणीहि सांगू शकेना । इथें आगमा निर्गमाचा ठिकाणा ॥४९॥
हरी शोभवी प्रकृती राग रंगें । कशाला तिथें लाविसी सांग व्यंगें ? ॥
जरी चांगलें, कासया नेसि भंगें?, । बुरे ही तरी, दोष कोणासि सांगें? ८१

" या प्रसिद्ध अंधास ( तो केवळ नेत्रांनींच अंध नव्हें किंबहुना हृदयशून्य चित्ताचा ही अंध होता*)–हें माहित नाहीं, कीं प्रथम आणि अंतिम सय्यदचें पाठोपाठ चालणारे परमात्माचे असे कांहीं *बंदे आहेत जे अखिल विश्वापारच काय पण परिघ व्यासाचे ही बाहेर गेले आहेत."

पक्षपातरहित श्रोत्यांना उमरला शिव्याशाप देण्यासारखें पाप वरील दोन सुभाषितांत दिसणार नाहीं. पहिल्यांत सृष्टीचे अनंतत्व, व दुसऱ्यांत गुणदोष दृष्टीचा त्याग उमरनें सांगितला आहे. पण टीकाकाराला यात दोष दिसले. याच पद्धतीचें टीकाकार उमरचें वेळेसही होते, व त्यांना उद्देशून तो म्हणतो:–

अहो पंडिताचार्य! ऐका विनंति । धरा मौन सोडा मला ईश हातीं ॥
सुधे चालतो, देखता वक्र दृष्टी । सुधारा स्वनेत्रा, नका होऊ कष्टी ॥९॥

त्याचप्रमाणें गु०क० श्लोक २७०,३४७ पहावेत. उमर फिलसफी (ग्रीक तत्वज्ञान ) चा पाठ देत असे परंतु वास्तवतः त्याचे स्वतःचें मत ग्रीक तत्वज्ञांचें मताप्रमाणें नव्हतें, असें परिच्छेद १८ तील त्याचे वाक्यावरून स्पष्ट झाले आहे. याविषयीं तो स्वतः म्हणत आहे.

अरी बोलती मी असे ज्ञानयोगी । हरी, काय मी होय ऐसी अभागी? ॥
तुझ्या चिंतनें ऊर झालें दुभंगी । सख्या प्राणनाथा! तुझ्या मीच जोगी ६६६

उमर म्हणतो मी शुष्क तत्वज्ञ नव्हें हरीचा प्रेमी आहे.

९२ **जलालुद्दीन अबी अलहसन अली बिनयूसफ अल् किफ्ती** (हिजरी ६४६ ई. १२४८) आपले तारीखुल हुकमा (तत्वज्ञांचा इतिहास ) या अरबी ग्रंथांत लिहितो. " हकीम उमर खय्याम, इमामे खुरासन, स्वकालीन विद्वद्वरिष्ट, ग्रीक विद्याचा अध्यापक, असा उपदेश करी. शरीर संचालनानें शरीर

*उमरच्या उजव्या डोळ्यांत व्यंग असे. त्यास उद्देशून ही शिवी कुराणची आयत देऊन हा पंडित उमरला देत आहे. *बंदे=हेच पंडित.

शुद्धि, आणि अंतकरणाची निर्मलता, यांचे सहाय्यानें सर्वही धर्मांच्या एकमेकाद्वितीय उत्पादकाची प्राप्ती करून घ्यावी जनपदानीं ग्रीक राजनीतीचें अनुकरण करावें असें ही तो सांगे. त्याचें कवितांतील स्पष्टोक्तीचा अर्थ मागचें सूफींनीं उमजून घेतला, आणि आपले पंथांत त्याचा अनुवाद, व सभेंत व रहस्यमंडळांत त्या कवितांची चर्चा करीत. **उमरचें** कवितांतील गूढार्थ सर्व-मान्य परीयत मतास विखारी सर्पाप्रमाणें, आणि साधारण जनास कूट शृंखला प्रमाणें आहेत. तत्कालीन लोकांनीं त्याचें मतावर आक्षेप घेऊन त्याचे गूढार्थ विचारिले तेव्हां मरण भयानें त्यानें मौन धरून लेखन बंद केलें; चुपचाप हज्ज ला गेला. तो बगदादला आला तेव्हां **तरीकत** पंथाचे लोकांनीं त्यास प्राचीन विद्या शिकविण्याची विनंति केली. परंतु त्यानें वैतागी व संत्रस्त मनुष्याप्रमाणें नाकारलें. पुढें आपलें शहरास आल्यानंतर त्यानें अध्यापन, ग्रंथरचना, जन-संसर्ग, या सर्वांचा त्याग करून शेष आयुष्य अहोरात्र ईश चिंतनांत व एकांतांत घालविलें. आणि आपलें हृद्गत प्रगट केलें नाहीं. त्याच्या कविता फार सुंदर व सुश्राव्य आहेत. त्यामध्यें तो आपले भाव व आशय विनोदयुक्त उत्प्रेक्षेनें हंसक्षीरवत् नाजुक रीतीनें दर्शवितो. **अल्** किफ्तीनें उमरच्या दोन अरबी कविता उदाहरणार्थ दिल्या आहेत त्या अशाः—

जधीं तृती धरी मी, अप्रयासें— । मिळें, बाहू बळें जें अट्टहासें ॥१॥
बघे पिंगा जगाचा मी विनोदें । धरीना आस, भीतीनें न लासें ॥२॥
ग्रहांना उच्च नीचीं वक्र मार्गीं । कटाक्षें नाचवी स्वामी विलासें ॥३॥
जिवारे स्वस्थिती तू शांत ठाके । ढळे जै खांब खालीं येति वासे ॥४॥

अल किफ्तीच्या वरील वर्णनावरून **उमर** योगी, संन्यासी होता, आणि त्याचे कविताचा अर्थ सूफीस मान्य, कर्म मार्गी घरास अमान्य, व सर्वसाधारण जनास दुर्गम वाटला असे स्पष्ट होते. **उमरचें** अरबी कवितांचें वेचे त्यानें दिलें त्यांत स्थितप्रज्ञेचें लक्षण सांगितलें आहे. अर्थात अल किफ्तीचें मत उमरविषयीं उत्तमच आहे. संपूर्ण कित्याचे भाषांतर पुढें परिच्छेद ९७ मध्यें पहावे.

१३ **पहरजोरीनें** निजहतुल अरवाह तारीखुल हुकमा नामक ग्रंथांत परिच्छेद ५, ९, १२, १५, १६ व ३० मध्यें निर्दिष्ट हकीकतीसह विस्तृत चरित्र देऊन उमरचें आशयाचा नमुना म्हणून दोन रुबाया दिल्या त्या अशाः—

कुणी सांगती होत पापा तपास । तर्धी श्रीहरी फार देईल त्रास ॥
दयाळू घनानंद नोहे उदास । सुखी ऐस रे, अंति येसी सुखास ३३०
गुरु माउले सांगतो एक मात । असो बोल थोडा, बहू गूज यांत ॥
तुझें आवडीं धूळ होतो पदांत । उठे जैं कृपेचा शिरी देसि हात २७०

पहिलींत पापी जीवास अखंड नरकवास होईल असें परीयतत्रें मताचें खंडण आहे. परमात्मा केवळ दयाघन असल्यामुळें जीवाची उत्तरोत्तर उत्क्रांतीच होईल हा सिद्धांत **उमर** सांगत आहे. दुसरींत परमात्माचे प्रेमाकरितां जीव व्यक्त होतो हा सिद्धांत आहे. हे दोन्ही सिद्धांत उच्च कोटीचे आहेत.

९४ **लुत्फ अली आजर** ( मृ ११९५ हि. ) आपले **आतिष कदा** नामक ग्रंथांत ( हैद्राबाद स्टेट लायब्ररी लिखित नं.४ ) स्वल्प चरित्र देऊन असें लिहीत आहे. " आरंभी उमर पराप्रमाणें आचरण करीत असें. शेवटी त्यानें तो पट फाडून **'मलामत'** पंथाचा आरण्यवासी, झाला व ज्ञान मद्यानें मस्त झाला, आणि व शास्त्रव्यासंग सोडून रुबाई गाऊं लागला. त्याच्या रुबाया सर्वही कालांतील विद्वानास मान्य आहेत. " उदाहरणार्थ ३१ रुबाया दिल्या आहेत. गु. क. ६६ ५१, ५०, २२४, २४६, १०११, ३९४, २९२, ३२०, ३८३, ४४४, ४८०, ४९०, ५२८, ५३६, ५५५, ५३७, ५४१, ६१०, ६९५, ६९३, ७५५, ७५७, ७४६, ७९८, ८२०, ८४३, ३७७, २७६, ९९१, ९९५.

९५ रजाकुली खान **मजमऊलफुसहा** मध्यें लिहितो. " याच्या रुबाया परिपक्व तात्विक विचाराच्या फार उत्तम आहेत पैकीं कांहीं:—गु. क. २४६ ३७७, २७६, ५३६, ६९३, ६९५, ८१८, ९०६.

९६ परिच्छेद ९२ ते ९५ मध्यें कांहीं इस्लामी फार्सी काव्येतिहासकारांची मतें झालीं. आतां उमरविषयीं पाश्चात्यपंडिताचे मतापैकीं फिज्जेरल्डचें मत परिच्छेद ५७ मध्यें दर्शित आहे. फ्रेंच भाषांतरकार निकोलानें अध्यात्मपर अर्थ लाविला. इतरांची मतें येणें प्रमाणें आहेत.

१८१८ ई. **फॉन ह्यामर पुगस्ताल**:—उमर फार्सी कवितेंतील वॉलटैर आहे याची कविता समण्यास सूफींची परिभाषा पूर्णपणें जाणली पाहिजे.

१८२७ **फ्रे० रुकर्ट** " उमरचे कवितेंत इतर कोणतेही फार्सी कवितेपेक्षां अधीक विचार वास्तंत्र्य आहे.

१८६९ **नार्टन** (बास्टन):–"उमरचे ढालेस दोन बाजू आहेत. एक सूफी सुवर्णाची व दुसरी शुद्ध चांदीची. बाह्यांगानें विषयपरता कितीही भासली तरी उमरचे सूक्ष्म व उदात्त विचार त्याचे रुबायांतून स्पष्ट व्यक्त होतात."

१,८७९ई. **मिसेस क्याडेल**:–" फिज्जेरल्डच्या कवितापासून आमचें समाधान होत नाहीं. कारण त्यांत मूळ फार्सीत नसलेलें काहीं विचार आहेत, व मूळांत असलेले बहुत नाहींत."

१८८१ ई. भाषांतरकार **बोडेनस्टेट**:–अभिनव उपमा, अद्भुत शब्द घटणा, कल्पनाचातुर्य, सूक्ष्मविचार सरणी, निर्मल सत्यशोधकदृष्टी, बहुश्रुतबुद्धि, आणि सत्यप्रियता, या गुणांनीं **उमर** अपूर्व कवि आहे."

१८८१ ई. भाषांतरकार **गार्नर**:–" **उमर** नंतर सूफी लोकांस त्याचे मद्यस्तोत्रांत गूढ अध्यात्म अर्थ व्यक्त झाला."

१८९३ ई. **ऑरगॉन पोर्टलंड**:--**ल्यूक्रिषियस** किंवा **हॉरेस** पेक्षां गहन व सत्य तत्वज्ञान **उमर** शिकवितो. याची कविता बाह्य वैषयिक वस्त्राचे आड्न रोमन कवीचे कल्पनेचे, आणि ग्रीक कवीचे शब्दाचे, पल्ल्याबाहेर असणारें अध्यात्म सौन्दर्य दर्शवित आहे.

१९०८ ई. **हेरोन ॲलन**:–"उमरचे काव्यांत फार्सी साहित्यांत सर्वत्र असणारीच प्रतिभा आहे. परंतु दुसरे कावतासारखी उमरची कविता अश्लील नाहीं."

१९२० ई. **विनफील्ड**:–" उमर **षरीअत** मध्यें निष्णात आणि सर्वव्यापी सर्वशक्तिमान एकच जगत्कारण **ईश्वर** मानणारा होता. हाच निश्चय त्याचें रुबाईतून वारंवार व्यक्त होतो. विश्वोपत्तीलयाचे निर्णयांत भौतिकशास्त्रें दुर्बल आहेत असे तो स्पष्ट सांगतो." "जडवादाचा आरोप उमरवर मिथ्या आहे." "जगाचे नश्वरत्व तो नेहमीं चिंतित असे." " जगांतील अरिष्टें दुःखें कोणी **अहरिमन** अगर **सैतान** उत्पन्न करितो असें तो मानीत नसे." " सर्वही जगांतील घडामोडीचा कर्ता एकच सर्व शक्तिमान ईश्वर आहे असे तो मानितो." " **वालटैर, ह्यीन** हे कवि सर्व धर्ममार्गीचे विरुद्ध आहेत. **उमर** अंत:करणांतून धार्मिक होता, तत्कालीन इस्लामी धर्मांतील अतथ्य कल्पना, व दंभ याचें त्यानें खंडण केलें; त्याचे प्रतिपक्षी वास्तवत: अधर्मी होते." "**आज जगू या**" या पद्धतीवर ज्या

त्याच्या रुबाया आहेत त्या हारेस, ल्यूक्रिषयप्रमाणें नास्तिक वादी नाहींत. उमरचे दृष्टीपुढें अज्ञेय ईश इच्छा नेहमीं वागत असे." "त्यानें बहुधा सूफी भाषा वापरली आहे." "शक्य तितकें आधुनिक भाषेंत त्याचे विचार उतरले असतां हें आश्चर्य वाटतें कीं, उमरचें काव्यांत, ज्यांना आम्ही अज्ञानामुळें नवीन शोध समजतो, असें आधुनिक विचार सांपडतात."

९७ जर्मन संशोधक प्रो० रोजेन आपल्या रुबाई संग्रहाचे प्रस्तावनेंत ( परिच्छेद ४४ ग्रंथ अ ), उमरच्या २३ फार्सी रुबाया आणि ५ अरबी पद्यावरून असे समजतात की, " उमर खय्याम सृष्टी–गूढाचे ज्ञानाची निराशा, जनांचे कपटाचरण, ईश्वराचा अन्याय, धर्म गुरूंचे सत्य वस्तूसंबंधीं अज्ञान दाखवून अल्पसे आयुष्य आनंदांत व (मद्यपानांत) घालविण्याविषयीं मनुष्यमात्रांना आमंत्रण देतो. उमरचे या पद्यांत मद्याचा अर्थ सूफी परिभाषेनें कमी प्रमाणांत लागू होतो ( पृ. ४६ ग्रंथ अ ). " उमरचे पद्यांत वैषयिक प्रेमाचें वर्णन फारच कमी आहे. जेव्हां वर्णन येते तेव्हां सूफी मताप्रमाणें परमेश्वराचें प्रेमाविषयीं आहे " ( पृ.५३ ग्रंथ अ ). याशिवाय मागें परिच्छेद १८ मध्यें दिलेल्या उमरविरचित रोजतुल् कुलूब नामक ग्रंथाचा उतारा आपली प्रस्ताव. पृ. ७०–७१ मध्यें देऊन प्रो०रोजेन म्हणतात कीं, "खय्यामनें या चारी पंथापैकीं कोणा एकाचाही अंगिकार केला नव्हता. परंतु त्यापैकीं सूफी पंथास दुसरे पंथापेक्षां तो महत्व देऊन सदाचरण व अंतःकरण शुद्धीनेंच मनुष्यप्राणी लवकर आपले पूर्णतेस पोहोंचेल असे मानीत, असे."

प्रो०रोजेजनें ज्या तेवीस रुबायावरून आपले प्रस्तावनेच्या पृ. ४६वर सदर मत दिले त्या रुबाया व त्याचे आशय गुरुकरुणामृतावरून याप्रमाणें होतात.

खय्यामचें नांव असलेल्या सहाः–गु. क. ६७ परमात्मा पतितपावन आहे; उद्धाराची निराशा नाहीं; गु. क. १५२ पुनर्जन्माचें प्रतिपादन; ५३९ नरदेहाचे सार्थक करून घे; ५६४ गत गोष्टीचा शोक व्यर्थ आहे; ७२६ क्रिया कर्मापेक्षां सत्संग व दया ही विशेष आहेत. ७९९ क्रियेपेक्षां गुरुसेवा श्रेष्ठ आहे.

नजमुद्दीन राजीचे आक्षेपास कारणीभूत दोन रुबायाः–गु. क. ४९ व ८१ याचा आशय परिच्छेद ९१ मध्यें आला आहे.

षहरजोरीनें उमरचें तत्वज्ञानाचें सार समजून दिलेल्या दोन रुबाया गु. क. २७० व ३३० या दोन्हींचाही आशय परिच्छेद ९३ मध्यें निवेदित आहे. कीं, परमेश्वराचे प्रेमातच जीवाचा लय होतो व त्या प्रेमाकरिताच पुन्हां जीवाचा उद्भव झाला आहे, आणि जीवाची उत्तरोत्तर उत्क्रांतीच होईल.

फर्दुसुत्तवारीख मध्यें उमरचें तत्वज्ञानाचें उदाहरणार्थ दिलेल्या दोन रुबाया:-गु. क. १०५८, यांत सांख्य शास्त्रांतील अणुवाद कथित आहे. महाभारतांत जनक सुलभा संवादांत या मताचें निदर्शन आहे. गु.क.१०५९ मध्यें सत्य स्वरूपाचें प्राप्तीकरितां ईश प्रार्थना आहे.

बदर जाजर्मीनें काव्य नवनीतांत उमरचे कवितांचा नमूना समजून दिलेल्या तेरापैकीं दोन वर आल्या आहेत; बाकी अकरा:—गु.क.१०२४जगाची लालसा सोड; ४६४ कर्म प्रमाणें सुख दुःख भोग भिन्न आहे; ५१० प्रातःकालींच जाग; ५२५ अमृत रहस्य कथन; ८२ आजचा पर्वकाल साधून घे; ८२९ आततायपणा व्यर्थ आहे; १०२५ ईश्वर निर्मित सृष्टीत व जीव यःकश्चित् आहे; १०२६ ईश्वरी माया अनिर्वचनीय आहे; ५२९ नश्वर जगांतील लौकिक शिक्षण व्यर्थ आहे; ७५३ जीवंतपणीच ईश्वराची प्राप्ति करून घे; ७४७ प्रेमसुधा पचविण्यास पथ्यानें वागावें, मनोविकार सुधरावे, ज्यानें विठ्ठल मात्रा घ्यावी—त्यानें पथ्य सांभाळावी. वरील २३ रुबायांचे आशयावरून हे स्पष्ट व्यक्त होत आहे कीं, यांत उमरनें मदिरापानास पाचारण केलें नाहीं.

प्रो० रोजेजनें आपले प्रस्तावनेंत उमरच्या ज्या अरबी पांच कविता दिल्या आहेत ( रोजेन टेक्स पृ. ४३ ते ४५ ) त्यामध्यें फार्सी कवितांतील मद्याची परिभाषा नाहीं म्हणून त्यांचे आशयाविषयीं कोणतेच प्रकारचा वाद संभवत नाहींत. या पांचही अरबी पद्यांत उमरचें तात्विक विचार स्पष्ट दिसून येत आहेत, म्हणून त्याचें भाषांतर व स्पष्टीकरण महाराष्ट्र वाचकास निवेदित आहे.

किता १ गण ( यग यग, यग, यग. )

फिरे ब्रम्हांड मी सारे, भुवार्दी सात ही गांवें ॥<br>
सरे मी स्वैर वैकुंठी, जधीं मच्चित हेलावें ॥१॥<br>
व्रतीं मी इंद्रियें बांधी, यमानेमाचियें दावें ॥

व्रतांतीं पारणाकालीं, चिदन्ना पावना खावे ॥२॥
बहू खाती भवीं गोते, तरे तो शेलका भावें ॥
पथीं या रक्षिले ज्याला, दयामेघें गुरूरावें ॥३॥
ऋजू या राजपंथानें, स्वधामा थेट मी धावे, ॥
भवारण्यांत हा सेतू मिटूनी नेत्र चालावे ॥४॥

पहिलें कडव्यांत **सबअतुल्आला** म्हणजे भू भुवादिक सप्त लोकांचे आक्रमण **उफकुलआला** म्हणजे ईश पदापर्यंत, चित्ताचें स्पंदनानें मी करितो, असा स्वानुभव उमर सांगतो. सूज्ञ वाचकांस यांत सप्त व्याहृतीसह प्राणायमाचा ध्वनितार्थ दिसून येईल. दुसरे कडव्यांत स्पष्ट असें सांगतो कीं, बाह्य विषय आणि अंतर्विषय दोन्हीपासून मी व्रतस्थ राहतो आणि केवळ पवित्र चिदन्नावर पारणा करितो. यांत यम व नियम या योगांगाचे विवेचन आहे. तिसरे कडव्यांत ईश्वराचे दयेनें या पंथाची प्राप्ती सांगतो. पातंजल सूत्रः—ईश्वरप्रणिधानाद्वा ॥ चौथें कडव्यांत **कुराणांतील** आद्य मंत्रांतील **सिरातुल् मुस्तकीम** म्हणजे ऋजु राजपंथ त्याचे विवेचन आहे.

### अरबी किता २ ( यग यग य )

जधीं तृप्ती धरी मी, अप्रयासें— । मिळें, बाहूबळें जें अट्टहासें ॥१॥
बघे पिंगा जगाचा मी विनोदें । धरीना आस, भीतीनें न लासे ॥२॥
सुबुद्धी स्थीर मी केंद्रस्थ राही । शिरीं तारांगणांच्या ध्रूव भासे ॥३॥
ग्रहांना उच्च नीचीं वक्रमार्गीं । कटाक्षें नाचवी स्वामी विलासें ॥४॥
जिवा ! सांभाळ तोला, शांत ठाके । ढळे जैं खांब, खाचीं येति वासे ॥५॥
जगाची खंत घेसी कोठपावे ? । त्यजी जो सन्निधा दूरांत नासे ॥६॥
जगापाठीं सुखाला श्वान धावे । स्थित—प्रज्ञा नरांना सौख्य खासें ॥७॥

या कित्यांत देह भोग अनायासें प्राप्त होतो; व भोग्य वस्तूंचें संपादनांत प्रयत्न कष्ट मात्र देतो; स्थित प्रज्ञ राहील तोच सुखी, असें स्पष्ट आहे.

### अरबी किता ३ ( चाल किता १ ची )

वया मी वेंचिले सारे, जगीं या धुंडितां साथी ॥
भलाई मी सदा राखी, जरी ते ताडिती लाथीं ॥१॥

बहूता सख्य मी केलें, अरीसें वागले घातीं. ॥
जगीं बंधूचि बंधूनां जसे कां लांडगे खाती. ॥२॥
जिवा ! घे आण देवाची, सुखाचे सर्व सांगाती, ॥
नव्हे माणूस मी जो पैं मला घेऊ नको हातीं ॥३॥

यांत इष्ट, आप्त, संबधींजन आपमतलबी आहेत, म्हणून उमर सर्वसंग परित्याग सांगतो. शेवटचें कडवें फार मार्मिक आहे. जोपर्यंत माणुसकी नाहीं, तोपर्यंत स्वत:चा ( देहात्म्याचा ) त्याग कर. अशी जीवास ( चिदात्म्यास ), देवाची शपथ उमर घालतो.

अरबी किता ४ ( चाल किता २ ची )

इहामुत्रासि मी सांडीत मार्गे, । विवेकें, धैर्यवीर्यें, वीतरागें. ॥१॥
प्रकाशे बोधभानू मत्स्वरूपीं, । तमाची रात्र भीती सर्व भंगें. ॥२॥
अरी राहू रिघे तेजा गिळाया, । हरी राखी प्रभेला सानुरागे. ॥३॥

यात विवेक, धैर्य, वैराग्य, व विचार याचे सहायानें स्वरूप–प्राप्ती झाली, व आत्मस्वरूप अखंडित स्वयंप्रकाश आहे, ही हरीची दया आहे, असें सूर्य ग्रहणाचे रूपकानें सांगतो.

अरबी किता ५ ( चाल सदरची )

भजे जो श्रीहरीला सर्व भावें । शहाणा तोचि, शांतीसी विसावे ॥
जगाशा,–वाहटूळीसी वळावें. । सुखाशा,–साउली पाठीं पळावें. ॥१॥

यांत जगाची आशा व चिंता सोडून हरीसी संलग्न व्हावें असे सांगतो.

वरील २३ रुबाया प्रमाणें या पांच अरबी पद्यांत ही मद्यपानास पाचारण कोठें दिसत नाहीं.

९८ उमरच्या वेळचें त्याचें रुबायांचें लिखित अद्याप प्रसिद्धीस आलें नाहीं. ज्या रुबाया उपलब्ध आहेत त्या मागाऊनचे टिपणा टाचणावरून अथवा तजकिरा म्हणजे कविचारित्रावरून बहुशः “ दीवानांत ” यमकानुक्रमानें संग्रहीत केलेल्या आहेत, म्हणून जरी उमरनें विषयवार रुबायांची रचना केली असेल तथापि, विषयवार मांडणी यमकानुक्रमी संग्रहांत नाहीं. कांहीं निरनुक्रमी प्रतींत विषयवार वर्गीकरणाचा प्रयत्न होत आल्याचा मागे परिच्छेद ४९ मध्यें

उल्लेख आहे. मोत्याचे सर उकलून मोती मिसळल्यानंतर कैक शतकाच्या काला-वधीनें पुन्हां पूर्ववत् सरांत मोती गुंफणें जसें अशक्य, तसेंच दीवानमधून विषय-वार वर्गीकरण होय. असें प्रयत्न निदान पांचशें वर्षांचे पूर्वीपासून चालू आहेत. हे प्रकरण लिहीत असतांना **यार अदमद हुसेन अर्षीदी** तब्रेजीकृत **तरब-खाना** नांवाचें एक अप्रसिद्ध लिखित या दासास हस्तगत झालें आहे. या रुबाई संग्रहाचें नांव संग्रहकारानें अबजद ( वर्णाक्षर ) पद्धतीनें **तरबखाना** ठेविलें, त्यावरून त्याचा सन हि. ८६८ ( ई. १४६१ ) होतो. लिखित ही ईराणांतले त्याच कालातलें आहे. सदर संपादक प्रस्तावनेंत म्हणतो कीं:—

प्राचीन महाशयांचे सूक्तींचा संग्रह, प्रथकीकरण, व्यवस्था, व परिशीलनाचें कर्तव्य मागील पीढीच्या हिम्मतींवर पूर्वापार चालत आलें आहे. आणि विद्वद्वरिष्ट पंडित-मुकुटमणी, सर्वशास्त्रविशारद व विद्यापारंगत **उमर बिन महमद खय्यामच्या** रुबाया सर्वही संतांचे सभेंत मान्य, व विख्यात आहेत, पण त्या प्रकरणवार ओव-ळेल्या उपलब्ध नाहींत. या रुबाया सूत्रवत् अल्पाक्षरा बहुलार्थी आहेत. व प्रत्येक वाचक आपापले मतीप्रमाणें त्याचा अर्थ समजून तितक्यावरच टेकतो, आणि त्यांतील अलौकिक व अद्भुत रहस्यापर्यंत न पोहोंचता केवळ वरपांगी अर्थातच संतोष मानतो. वस्तुतः **एक एक रुबाईचा विचार जों जों करावा तों तों नवीन नवीन रहस्य दृष्टोत्पत्तीस येतें.** म्हणून हा दास, **यार अहमद बिन हुसेन अर्षीदी तब्रेजी,** आपल्या अल्प प्रज्ञा सामुग्रीनें अर्थानुसंधान व सादृश्य लक्षणानें दहा प्रकरणांत एकत्रित करून सुज्ञ सज्जनास अर्पण करितो माझे अज्ञपणानें जे दोष राहिले असतील त्याची महाशय क्षमा करितील......दहा प्रकरणे याप्रमाणें आहेत.

१ ईश प्रार्थना व अपराध क्षमापान. २ तात्विक विचार, प्रश्न व आक्षेप. ३ नीतिपर व तत्संबंधीं. ४ सद्य स्थितींत समाधान, स्वकर्तव्य, जग व जन. ५ खुमरियात प्रेमपर. ६ ऋतुकाल, रबीयैन, ईदैन [सण] व तत्संबंधीं. ७ अलं-कार, रहस्य, गूढार्थ. ८ नासर खुसरो यास पाठविलेल्या **मौकूफात** नामक रुबाया ९ उन्मत्त आवस्था, व्याजोक्ती, विनोद वगैरे. १० दहा अख्यायिका, चरित्र, चमत्कार व प्रासंगिक रुबाया.

परंतु या ग्रंथांत ही आरंभीं ईशप्रार्थनेच्या कांहीं रुबाया लिहिल्यानंतर प्रकरण वारी सुटली आहे. संग्रहांत ३७४ रुबाया आहेत. हा संग्रह औस्ले लिखिताचे नंतर दुसऱ्याच वर्षातील आहे. परंतु प्रो० **रोजेनचें** प्रतींत हि.७२१चे लिखिताचे चार पानाचा जो फोटो दिला आहे त्यांतील रुबायाचा क्रम **तरबखानाचें** लिखिताशी जुळत आहे त्यावरून असा अंदाज होतो कीं, प्रकरणवार लिखितें हि.७२१चे पूर्वींपासून अथवा **उमरचें** कालापासून ही असणें संभवनीय आहे.

९९ परिच्छेद ५६मध्यें निर्दिष्ट ग्रंथ ( उउ ) मध्यें **व्हिन्फील्ड** साहेबांनीं ३९५ रुबायाचे सात वर्ग कल्पिलें ते असे:–

१ गाऱ्हाणी (८५ रु.); २ संशयी व पाखांडी (४४ रु.); ३ आज सुख घे [७८.रु.]; ४ भक्तिपर व धार्मिक [८८ रु.]; ५ प्रेमपर [२३ रु.]; ६ व्याजोक्ति (२६ रु.); ७ बोध व नीति (५१ रु.).

**व्हिन्फील्ड** साहेबांनीं आपले टेक्स्ट ग्रंथ [उ]मध्यें जो पाठ स्वीकारला, त्याला अनुसरून त्याचे पद्यात्मक भाषांतर इंग्रजी साहित्यांत श्रेष्ठ कोटीचे आहे. परंतु रुबायांतील रहस्य किती दुर्गम, व वर्गीकरण किती कठीण आहे हें व्हिनफील्ड साहेबांचे सदर वर्गीकरण अनुभवास आणित आहे. उदाहरणार्थ:–गाऱ्हाणीं या वर्गांत खाली लिहिलेले श्लोक व्हिनफील्ड साहेब यानें लेखिले आहेत.

व्हि.३ बहू चांगली ही मला वर्ण व्यक्ती । सुवाचा स्मृती धारणा बुद्धि शक्ति ॥
कळेना घटीं मृत्तिकेच्या कशाला । मला चित्रिता वेंचिले कौशलाला २४

यांत अन्योक्तिनें उमर सांगतो कीं प्राणिमात्रास स्वतःचे गुणरूपादिकाचा अभिमान असतो परंतु मृत्युसंन्निध असतांनाही मानव देहाचे साफल्य कशांत आहे त्याचे शोधाकडे लक्ष जात नाहीं.

व्हि.७ पुरुवा बने हाचि पूरुरव्याचा । बहू छंद ज्या सुंदरा अप्सरांचा ॥
दिसे हात जो आजि याचे गळ्याचा । करे या बिलंगी गळा उर्वशीचा ६६

यांत घटान्योक्तीनें विषय सुख नश्वर व तुच्छ आहे, पण मेल्यानंतर ही जीवाचे वासना संपर्कानें त्याच्या देहाच्या मृत्तिकेतून ही ती विषय वासना जात नाहीं. याकरितां विषयांचा व वासनांचा त्याग आवश्य आहे.

दोहा:—" मन मरे न माया मरे मरमर गये शरीर "
" आशा तृष्णा कबहु न मरे कह गय दास कबीर "

व्हि.१७ तुझा देह डेरा, इथें जीव राजा । तया धाम कैवल्य, हे प्राण फौजा ॥
उखाडीत डेरा करी काळ मौजा । रिघे गाव हा जिंकण्या देश ताजा १५२

यांत आत्म्याचे अमरत्व व पुनर्जन्म सूचित आहे.

व्हि.१८ असे सत्य जावे तरी का गमावे । दुराशे गुणे आड रानीं रिघावे ॥
नसे लाग येथें सुखानें बसावें । पथीं चालणें साडुनी कां निजावे? २३६

यांत जाणे सत्य आहे तर **पसबुदन** म्हणजे पीछेहट, गमणें कशाला? साधकानें जगांतील वासनाचें आडरानांत न गुंतता सतत मोक्ष पंथ क्रमीत असावा हा बोध आहे.

व्हि.२२ असे एक स्वर्गू तिथें इंद्र कोटी । असें एक आकाश ते चंद्र कोटी ॥
असें एक भू भूप ते वंश कोटी । गुरू एक तू देखणी **अश** कोटी ११८

रुबाईत बहुधा चौथा चरण मुख्य असतो. मूळांतील चौथा चरण " ताकेऽस्त कॅ सद हजार कसरे दारद. " असा आहे. **ताक** म्हणजे **एक; कसर** म्हणजे **अंश,** या श्लोकांत सर्वजीव प्रभूचे अंश आहेत असें उमर सांगतो.

व्हि.५२ कुलाला घरीं जात मी काल रातीं । हजारो घडे मूक ही बोलताती ॥
वदूं लागले सर्व ही एक सातीं । घडी कोण? दे कोण? घे कोण? माती! ५५५

एकाच मृत्तिकेच्या विकारावर,घडणार,देणार,घेणार, व घट इत्यादि जगांतील व्यवहार प्रतीतीस येतात. ब्रम्ह सत्य, व जगद्रूप मायिक व्यवहार त्यावर भासतो. **वाचारंभणोविकारा नामधेयं मृत्तिकेव सत्यं** हा सिद्धांत या रुबाईत सांगितला आहे.

वरील आकस्मिक रीतीनें उद्धृत उदाहरणावरून हें स्पष्ट आहे कीं त्यांत व्हिनफील्ड साहेब म्हणतात तसे CAMPLAINT गाऱ्हाणें नसून प्रत्येक श्लोकांत भिन्न भिन्न तात्विक रहस्य कथित आहे. जगांतील वस्तूंची इच्छा बाळगून ती अनुकूल होत नसेल तेव्हां, अनुकूल व्हावी म्हणून, जीव कोणा समर्थापाशी फिर्याद, तक्रार, गाऱ्हाणें नेईल. असें गाऱ्हाणें संसारी लालसी देवापाशी अगर राजापाशी नेतात. परंतु **उमर** सर्व जगाचें निःसारत्व ओळखून त्याविषयीं वीतराग व उदासीन आहे.

१०० मागें परिच्छेद ७४ मध्यें परिभाषिसंबंधानें प्रो. **पटवर्धन** यांचा आशय " मद्यास-रमजानांत शुभसमय असतो " याचें निरीक्षण झालें आहे. त्यांनीं उमरचें आशयाचे ४५ वर्ग केलिले, त्यापैकीं पांचवा वर्ग " **कामरूपी तत्व अमर आहे, या दृष्टीनें मानव काय आहे ?** " यामध्यें १७ रुबाया नं. ३५ ते ५१ ठेविल्या आहेत. त्या रुबायांचे गुरुकरुणामृतांतील श्लोकाशी संमेलन खालीं दिलें आहे.

| पट० | गु० क० | पट० | गु० क० | पट० | गु० क० | पट० | गु० क० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | १८३ | ३९ | ८३० | ४३ | ७१२ | ४७ | ६२१ |
| ३६ | २०० | ४० | ८७० | ४४ | ६०१ | ४८ | ६०३ |
| ३७ | ६५६ | ४१ | २९० | ४५ | १५४ | ४९ | १०४० |
| ३८ | २६७ | ४२ | २२५ | ४६ | १३८ | ५० | ५९५ |
| | | | | | | ५१ | ६ |

या सतराचें मूळ फार्सी, व भाषांतरें वाचल्यानंतर ही " कामरूपी तत्व अमर आहे, " असा उमरचा सिद्धांत कोठेंच आढळत नाहीं. एवढेंच नव्हे तर उमरच्या सर्व रुबायांतील या अभिनव " कामरूपी तत्वाचा " उल्लेखसुद्धां नाहीं. उमर स्वतः नैष्ठिक ब्रम्हचारी होता हें चरित्र प्रकरणांत स्पष्ट झालें आहे. विषय सेवनासंबंधानें तो म्हणतो. **पटवर्धन** १८४ गु० क० ६४.

नको इंद्रिया संग धावू विलासीं । तुला भूत खातील कीं वाघ लासी ॥
पहा कोण तूं? कोठुनी पातलासी? । विचारीं कसा वागसी? कोठ जासी? ॥

असो, आतां या " कामरूपी तत्वा "च्या वर्गांत ज्या रुबाया प्रो. पटवर्धन साहेबांनीं ठेवल्या आहेत, त्या काय सांगतात तें पाहूं.

प्रो. **पटवर्धन** ३५ आहे विविधाकार क्षम हा **हाला,**
कधि हो प्राणी, कधि होई तृणपाला,
मानु नको कीं तत्व जाय विलयाला,
गुणातीत तें—पडो गुणावर घाला !

गु.क. असे वस्तु जी जीव भावासि येत । जराषु कधीं स्वेद उद्भीज होत ॥
न रूपी कधीं वस्तुला अंत नेत । जरी गूण, तो गूण तूझाचि घेत १८३

मूळांत प्रथम चरण " ऑन माद्दा कॅ काबिले हयातस्त ब जात " म्हणजे " ती वस्तू जी स्वतः जीव धारण करूं शकते, " असा आहे. पहिल्या दोन चरणांत पराप्रकृतीचें वर्णन आहे. श्रीमद्भगवद्गीता:—

॥ अपरेऽयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि पराम् ॥
॥ जीव भूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ अ.७ श्लो.५

परंतु माद्दा=प्रकृती, याचें ऐवजीं, एका टिंबाच्या कुयोगानें, व्हिनफील्डचा पाठ बादा=मद्य असा, व पुढें पटवर्धनचे भाषांतरांत, हाला झाला. रुबाईचीं चारी चरणें मद्याचें वर्णन करीत नाहींत. आनंदीबाईनें "ध" चा "म" केला अशी आख्यायिका मात्र आहे, पण "मा" चा "बा" आणि पराप्रकृतीचें मद्य कसें बनलें, याची साक्ष प्रत्यक्ष ही रुबाई देते. असो, तिसरें चरण " ना भावो विद्यते सतः" असें आहे. चौथें चरण मौसूफ ब जाते तुस्त गर हस्त सिफात असें आहे. गर हस्त सिफात=जर गुण असतील तर, मौसूफ ब जाते तुस्त=तुझेंच अस्तित्वाचें आधारावर त्यांची ( गुणांची ) गुणविशिष्टता •आहे. सारांश यांत " कामरूपी तत्त्व " दिसत नाही.

प्रो. पटवर्धन ३६ मृत्यूचें भय म्हणजे बुद्धिभ्रम हा
नाशांतूनच रुजे शाश्वतिद्रुम हा
येशूच्छायासें हृदय सचेतन होता
ध्रुव मृत्यु आंचवे जिण्याला मंम हा

गु.क. तुझें वांचणें मृत्यु भीतींत वाया । मृतीचे पथीं पाविजे अमृता या ॥
गुरूचें कृपें होत चैतन्य काया । कुणा कायसें? ना मरूं अंतका या २००

यांत दुसऱ्यास संबोधून उमर सांगतो कीं मृत्युचें भयांत तुझें जगणें फोल आहे. मृत्युचा शोध केला तर अमृतत्व प्राप्त होईल. उमर स्वतःचा हा अनुभव सांगतो कीं सद्गुरु कृपेनें चैतन्यरूप देह मिळाल्यानें आतां मृत्युचें बळ कांहीं चालत नाहीं.

प्रो. पट० ३७ स्वतःस मरतो जों जों तों तों जगतों,
खचतो तों तों जों जों वर वर धकतो,
आणि नवल हें कीं भवमंदिरा पिउनी
मूढच होतो जों जों जाणूं सकतों.

गु क. नसे मी जधीं, तैं वसे मी स्वरूपीं । जसा कां चढे, तेवि ये अंधकूपीं ॥
अहा दाविलें कौतुका माय बापीं । असे मस्त मी तेवढा चित्स्वरूपीं ६५६
तिसरें चरणांत घरावे हस्ती म्हणजे अस्तित्वाचे मद्य अर्थात् स्वस्वरूपाचें मद्य असा आहे, भवमदिरा नाहीं. सारांश सूज्ञ वाचकास या रुबाईंत उन्मनी अवस्थेचें वर्णन अनुभवास येईल. पातंजल सूत्र:—योगश्चित्तवृत्ति निरोधः ॥ तदाद्रष्टुःस्वरूपेऽवस्थानम् ॥ वृत्ति सारूप्य मितरत्र ॥ ज्याप्रमाणें वरील तीन रुबायांत "कामरूपी तत्वाचा" उल्लेख किंवा त्याचें अमरत्वाचें समर्थन नाहीं, त्याचप्रमाणें बाकी चौदामध्येंही नाहीं. मग हें कामरूपीं तत्त्व कोणत्या ब्रम्हदेवानें कल्पिलें ? पट० ३८ गु. क. २६७ मरणाचें भीतींत अर्धमेलें जगणें व्यर्थ आहे. देह श्रीहरिगुरूला समर्पण करवा. पट० ३९ गु.क. ८३० देहाभिमान सांडावा. "देहात्मधीवत्ब्रम्हात्मधीदार्ढ्यें कृतकृत्यता. " पट० ४० गु.क. ८७० जीवास उद्देशून सांगतो, जशी क्रिया आचरशील कीं त्याप्रमाणें पशु, पक्षि, माणूस अथवा देव होशील. पट० ४१ गु.क. २९० सद्गुण व ज्ञान संपादन करावे. पट० ४२ गु.क. २२५ वासना श्वान, कोल्हे, ससे व लांडगे यासारखी आहे. पट० ४३ गु.क. ५१२ सद्गुरू स्मरणानें मुक्त हो. पट० ४४ गु.क. ६०१ जीवाचें अस्तित्व ईश—सत्तेवर आहे. पट० ४५ गु.क. ९५४ तुझा हात श्रीनाथ हातासि बाही. जीवास खेळविणारे चैतन्य ईश सत्ता आहे. पट० ४६ गु.क. १३८ विधिचा लेख मीच आहे. ॥ गुरूचे खुणे मी असे बोध मात्र । असे लेखणी दौत मी मीच पत्र ॥ पट. ४७ गु.क. ६२१ सद्गुरूचे दयेनें मीच विश्वरूप आहे. पट० ४८ गु.क. ६०३ सृष्टीचा अहेव तंतू आत्माच आहे. पट० ४९ गु.क. १०४० " विश्व नाहीं मीच आहे. सखया तूझी आणरे " पट० ५० गु.क. ५९५ एका प्रेमाचें बंधनावर द्वैत भासतें, मूळांत जीवेश ऐक्यच आहे. पट० ५१ गु.क. ६ यांत द्रष्टा व दृश्य याचे ऐक्य फार नाजुक रीतीनें सांगितलें आहे.

१०१ वरील दोन परिच्छेदांत व्हिन्फील्ड साहेब व प्रो. पटवर्धन यांच्या वर्गीकरणाच्या उदाहरणावरून हे स्पष्ट झालें आहे कीं त्यांनीं अनुक्रमें कल्पिलेल्या COMPLAINTS (गान्हाणी) व " कामरूपी तत्व अमर आहे या दृष्टीनें मानव काय आहे ?" या वर्गांत त्यांनींच निवडलेल्या रुबाया प्रमेय

भिन्नत्वामुळें ठीक रीतीनें बसत नाहींत. सदर पंडितांचें दुसरें कल्पित वर्ग व त्यांतील रुबायांचें निरीक्षण केल्यास आणखी ही कांहीं रुबायांचें रहस्य त्यांचे वर्गीकरणासी असंबद्ध दिसून येण्याचा संभव आहे. परंतु या दासाच्या हेतु सदर पंडितांचें वर्गीकरणावर आक्षेप करण्याचा नसून कोणते प्रकारें वर्गीकरण करणें इष्ट होईल याची जिज्ञासा आहे. वेद—मंत्राची देवता तो मंत्र कोणास संबोधून आहे, अथवा कोणत्या पदार्थाचें वर्णन करितो अशा लिंगोक्त रीतीनें निर्णित होते; व मंत्राचा विनियोग देवता आणि मंत्रार्थ यांचे अनुरोधानें होतो. ही अतिप्राचीन व नैसर्गिक पद्धत आहे. उमरच्या त्रुटित सुभाषितांचें वर्गीकरण याच पद्धतीनें करणें अयोग्य नाहीं. प्रथमतः श्लोकाच्या क्रियापदावरून व शब्दरचनेवरून हें निवडावें कीं श्लोक प्राधान्यतः कथनार्थी किंवा प्रश्नार्थी, विध्यर्थी, आज्ञार्थी, किंवा आशार्थी आहे. कथनार्थी किंवा प्रश्नार्थी असल्यास कोणत्या पदार्थाचें प्राधान्यत्वानें कथन आहे; प्रश्नार्थी असल्यास कोणतें प्रमेयासंबंधीं आहे. आज्ञार्थी किंवा आशार्थी असल्यास कोणास संबोधून आहे. विध्यर्थी असल्यास कोणाचे कर्तव्य सूचित आहे. अशा रीतीनें शें दोनशें सुभाषितें तपासून पाहिली म्हणजे हें दिसून येतें कीं:--

१ ज्यांत तृतीय पुरुषाचें निर्देशानें कथन मात्र आहे, त्यामध्यें दृश्य जगांतील द्रव्य, गुण, कर्मादि पदार्थांचें कथन आहे. यामध्यें जगांतील पदार्थांचें विवेचन, व बहुधा जगाविषयीं तिरस्कार व औदासीन्य व्यक्त आहे, म्हणून अशा रुबायांना " **विवेक व वैराग्य** " या सदरांत आपण लेखूं शकतो.

२ ज्यांत प्रथम परपक्ष कथन व नंतर त्याचें उत्तर असतें, त्या **परपक्ष खंडणात्मक** आहेत. तसेंच ज्यामध्यें कोणतेही मत अंगिकारून नंतर प्रतिप्रश्न केला आहे, त्यामध्यें परपक्षावर **आक्षेप** आहे. अर्थात अशा दोन्ही प्रकारच्या रुबाया **वादपर** लेखिल्या जाऊं शकतात. अशा रुबायांचे लक्षण व उदाहरण मागें परिच्छेद ८३ व ८४ मध्यें आलें आहे.

३ ज्यामध्यें कोणास न संबोधिता स्वगत, कथन, अथवा विधि असतो त्या स्वात्मानुभव व आत्मा चिंतनाच्या असतात. यांना आपण **स्वानुभवपर** म्हणूं.

४ ज्या द्वितीय पुरुषास संबोधून आहेत त्यामध्यें दोन प्रकार आढळून

येतात; कनिष्ठास उद्देशून, किंवा श्रेष्ठास. ज्या कनिष्ठास म्हणजे साधक जीवास उद्देशून आज्ञार्थी अथवा विध्यर्थी आहेत, त्यास **नीतिपर** अशी संज्ञा होऊं शकते.

५ ज्या श्रेष्ठास अर्थात् **साकी** म्हणजे गुरु अथवा प्रियकर किंवा ईश्वरास संबोधून आहेत, त्या बहुधा याचनार्थी दिसून येतात. यास आपण **भक्तिप्रेमपर** ही संज्ञा देऊं शकतो. यांतच भक्तिचें लक्षण, व भक्तांचे कर्तव्याच्या समावेश होतो.

६ ज्या ईश्वरास संबोधून आहेत त्या अर्थात् **स्तोत्रें** होत:—
याप्रमाणें उमरच्या रुबायांचें नैसर्गिक रीतीनें सहा वर्ग होतात.

१ जगनिदर्शन **विवेक व वैराग्य.**
२ **मतनिदर्शन—वाद.**
३ **आत्मनिदर्शन, स्वानुभव.**
४ **नीति.**
५ **भक्तिप्रेम.**
६ **ईशस्तवन.**

स्थलकाल संकोचामुळें या दासास समग्र रुबायांचें सदरप्रमाणें वर्गीकरणास अवकाश नाहीं; कारण **गुरुकरुणामृत** यमकानुक्रमी रुबाईचे दिवानवरून तयार झाले आहे, आणि आतां **गजानन दिवाकर** कंपॉझिटरनें या विनंती पत्राचा शंभरावा परिच्छेद कंपोज करून प्रूफ दिले आहे. पुढील भाग लौकर संपविला पाहिजे. करितां गुरुकरुणामृताचे वाचकांस ही विनंति आहे कीं, त्यांनीच सहज सदर पद्धतीनें वाचतांना वर्गीकरण करावे म्हणजे रुबायांचें रहस्य समजण्यास सुलभ होईल. वरील वर्गांपैकीं कांहीं निवडक रुबायांचें रहस्य पुढील परिच्छेदांत निवेदन करूं.

१०२ **वर्ग १. जगन्निदर्शन, विवेक व वैराग्य.** जग व त्यांतील व्यवहाराविषयीं **उमरनें** स्वतः एका फार्सी कित्यांत आपलें मत स्पष्ट दिलें आहे. यांत **उमरच्या** बुद्धिशी संवाद झाला आहे, व **उमरचें** प्रभास बुद्धिनें दृष्टांतरूपानें उत्तर दिलें आहे. तिसरें कडव्यापासून पहिलें चरणांत बुद्धीस केलेला प्रश्न, व त्याचेंच दुसरें चरणांत त्या प्रश्नास बुद्धिचें उत्तर आहे.

किता ( चाल र,र,ज,ल,ग; )

बुद्धि दावीत हीत मी पुसता । देत दृष्टांत शांत बोधरसें ॥१॥
बुद्धि सर्वज्ञ माय तू ललिता । मी पुसे प्रश्न सांग सत्वरसें ॥२॥
"सांग कैसें जिणें जगीं भ्रमतां?" । "कल्पना, स्वप्न, भोंड, चक्करसें" ॥३॥
"काय लाभे जगाचिये ममता?" । "शूळ, हृद्रोग, फेपरें, फुरसें" ॥४॥
"चित्त पावेल हें कधीं शमता?" । "स्वासि जेव्हां निमूट खेटर शें" ॥५॥
"वाद कैसें जगीं अनेक मता?" । "ढोलसे बोल फोल पैं विरसें" ॥६॥
"वीर कैसें रणांत आक्रमतां?" । "श्वान कोल्हे वृके रिसे तरसे" ॥७॥
"उद्यमीं हा धनी कसा श्रमतां?" । "माल हामाल वाहि डोंगरसे" ॥८॥
"सौख्य दाराग्रहीं कसें रमतां?" । "सातरा भोग रोग सत्तर शें" ॥९॥
"दावि दुन्या कसी मनोरमता?" । "लाव ले हाव भाव मोहरसें" १०
"काय खय्याम गात येथ आतां?" । "नीतिचे गीत योग्यता परसें" ११

जगाविषयीं **उमरच्या** रुबायांतील उद्गारांचे संकलीकरण वरील कित्यांत आहे.

---

**"सांग कैसें जिणें जगीं भ्रमतां?" । "कल्पना,स्वप्न,भोंड,स्वप्न चक्करसें" ३**

उदाहरण:—

न शोधी सरंजाम येथें सुखास । अणू रेणुला रावणें हे पचास ॥
पहा जीवितांचें जगाच मुळास । असें स्वप्न आभास संत्रास नास २०५

यांत अणुवादाचा अंगिकार करून **उमर** सांगतो कीं प्रत्येक अणूवर अनेक जीवांचे स्वामित्व उपक्कृत आहे. जग व जीवित स्वप्न, आभास, संत्रास व नास आहे.

असें विश्व हें एक खिडार जीर्ण । दिवारात हे लोळती शामकर्ण ॥
किती रावणा हीच लंका सुवर्ण । हजारो इथें झोपले कुंभकर्ण ॥२०६॥

यांत एकाच कालांत जगत् अनेक जीवांचे भोग व विश्रांतिस्थान, आहे; असें सांगतो.

जगांतील आम्ही स्मरू तेंचि शून्य । वयांतील हातीं धरूं तेंचि शून्य ॥
अम्ही सौख्य दीपू, सरू तेंचि शून्य । अम्ही विश्वरूपू, विरूं तेंचि शून्य २४२

जीवित स्वप्नावभास आहे. तसेंच श्लो. ३५,४९,९६,९०,२६२ इत्यादि पहावेत.

---

" काय लाभे जगाचिये ममता ? " । " शूळ हृद्रोग फेंपरें फुरसें " ॥४॥

मना सारिखें एक ही काम नोहें । वृथा कामना यत्न पोटीं वहावें ॥
कपाळा पिटूनी बसूनी रडावें । उशीरा अलो येथ, पैं शीघ्र जावें २३९
प्रभू जो इथें भूमि आकाश मांडी । उरीं प्रेमळा दुःख इंगूळ सांडी ॥
श्रियाळा करीं चीलया लागि कांडी । बहू सुंदरा जाळितो मृत्यु कुंडी २५०

त्याचप्रमाणें श्लोक १५,४१,९०,२०४,२६६ पहावेत.

---

" चित्त पावेल हें कधीं शमता ?" । "खासि जेव्हां निमूट खेटर शें"॥५॥

ज्या संसारांत ईश्वरानें जीवास घातलें तो संसार उमरला दुःखद वाटला, म्हणून कांहीं पंडित समजतात कीं उमर देवास निर्घृण निर्दय आहे असें मानितो. ( परिच्छेद ६१ ) परंतु वास्तवतः संसारांतील कष्टच जीवास सद्विचार, ज्ञान, समाधान, व उन्नती देतात, असें उमर सांगतो.

बहू घातल्या या जगीं येरझारा । पुरा एकही हेतु नोहें बिचारा ॥
जगीं तापतां पावलो या विचारा । जगाचा नको रे नको येथ वारा ५७

॥ नूनंमे भगवान्तुष्टःसर्व देवमयोहरिः। येन नीतो दशामेतां निर्वेदश्चात्मनः प्लवः ॥
भा.स्कं.११अ.२३

जगाचा कंटाळा व त्यापासून निर्वेद म्हणजे वैराग्य तेंच भवसागरांत तारूं आहे.

आतां या संसारांतून तरून जाण्यास काय करावे हें कळत नाहीं, असें कोणी म्हणेल तर उमर म्हणतोः—

सुबुद्धी गुणें या भवातें तरावे । तुला हाव पैं, नेणसी जे करावे ॥
तुझें चामडें चाबुकानें चिरावें । कळें तैं तुला,—श्रीहरीला स्मरावे ७१०

संसार जेव्हां चाबकाचे तडाखें मारतो, तेव्हां जीव " अरे देवा, अरे देवा " असें म्हणतो, व ईशस्मरण करावे असें त्याला कळतें. श्रीमद्भागवतांत कुंती म्हणतेः—

॥ विपदःसंतुनःशश्वत्तत्र तत्र जगद्गुरो। भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भव दर्शनम् ॥
स्कं.१—अ.८

संसारांतील संकटें साहतील त्यालाच हरीची प्राप्ती होईल.

पट० १३० जो काळाचा कांटा हृदीं न बोचें
सुमवदना तों दूर वसे संकोचें,
पहा कंगवा शतधा होय विदीर्ण
तदाच रमणी बालामीं तो पोचे.

गु. क. ४१८ भावार्थ

करी श्रीहरी कोड गोपांगनाचें । परी साहती फोड आता जनाचें ॥
सहस्रावधी भंग होता फणांचे । अला आसना शेष नारायणाचें ॥

---

" वाद कैसे जनांत लोकमता ? " । " ढोलसे बोल फोल पैं विरसें " ६

उमर म्हणतो वस्तुतः तत्त्वज्ञानाविषयीं भौतिकशास्त्रें व तर्क असमर्थ आहेत.

जयानी सहाचार ही कंठ केलें । जनांचे सभें पैं रवीसें उदेले ॥
परी शून्य राती न बाहेर गेले । कहाणीच सांगून तेथें निदेले २७६
तुझें चिंतनीं ते मुनी मौन झाले । गुरू शब्द झाला, वटू कान झाले ॥
न तर्कें कुणाचें समाधान झालें । कुणी श्वास रोधूनि निष्प्राण झाले ४०३
त्रिकालज्ञ दैवज्ञ सामोर आले । स्वतःचे मतीला मती काय चाले ? ॥
कळेना परी नेणती ना कळालें । अर्धी कुंडली मांडिली, पैं निमाले ३१७

त्याचप्रमाणें जनवार्ता फोल आहे. ज्याला स्वहिताची चाड आहे त्यानें लोकेषणा सोडावी, व निंदा स्तुतीस बहिरे व्हावें.

मऊ मेण होवू , तरी जाळितातीं । जरी दुर्ग होवू , तरी फोडिताती ॥
जरी वक्र होवू , धनुष्या करीती । सुधा तीर होवू , तरी फेंकिताती ६८१
जनाची कथा मात दुर्गंध वात । स्मरे तू , रमानाथ, राही सुखांत ॥
जरी मानिसी बात, होईल घात । तुझें सारिखे फार झाले जगांत ४४१
ध्वनी रासभाचा असे लोक बोल । बहू नाद ढोला परी आंत फोल ॥
झुकायासि यानां न लागे कमाल । करी लौकिका, लौकिका हे हमाल ३१८

कबीर दास म्हणतातः—॥ हाथी चाल चलत गति अपनी ॥
कुतर भुकत वाको भुकवादे ॥ तू जो राम सुमर जग लरवादे ॥

आतां क्षत्रिय वैश्य यांचें व्यासंगाविषयीं उमरला बुद्धि सांगते.

"वीर कैसे रणांत आक्रमता ?" । "श्वान, कोल्हे, वृकें, रिसे तरसें" ॥
"उद्यमी हा धनी कसा भ्रमता ?" । "माल हमाल वाहि डोंगरसें" ७

उमरचें कालीं जे रक्तपात होत असत, ते उमरचें नजरेसमोर होते. राज-रुत्तेच्या प्राप्तीकरितां रक्तपात करणें उमर अमानुष मानित असें, म्हणून अशा लोकांना त्यानें पशूंत गणले आहे. ॥ व्रात्याद्विजा भविष्यंति शूद्रप्रायाजनाधिपाः । प्रजास्ते भक्षयिष्यंति म्लेच्छा राजन्यरूपिणः ॥ श्रीमद्भागवत स्कं.१२ अ. १ त्याचप्रमाणें व्यापारी लोकांच्या वित्तोपासनेविषयीं उमर म्हणतोः—

जुने बोलती लोक व्हावे विरक्त । करा शुद्ध चित्ता तुम्ही व्हाल मुक्त ॥
कली माजि सारें कळीचेचि भक्त । इथें इच्छिती एक वित्तासि फक्त ३५७

॥ वित्तमेव कलौ राजन्जन्माचारगुणोदयः ॥ भा.स्कं. १२ अ.१

१०३ जगाविषयीं उमरचें पूर्ण वैराग्य मागील परिच्छेदांत झालें आहे. मनुष्य जन्मास आल्यानंतर उमरला हा सुखोपाय दिसला.

जगीं आड वापी असे मानवाला । सहावी व्यथा, जीव द्यावा यमाला ॥
वसे शांत जो एक जीवंत मेला । सुखी जो न गर्भातुनी सृष्टि आला ४८८

उमर म्हणतो कीं, जगांत मृतवत् जो जगतो ( जीवन्मुक्त ) अथवा जो जन्मासच येत नाहीं ( विदेह मुक्त ) तो सुखी आहे. मागें परिच्छेद ३५ मधील कहाणींत हें उघड झालें आहे कीं, उमर पुनर्जन्म मानीत असे. साधारण इस्लामी धर्मामत हिन्दू धर्माचे सृष्टि–प्रलयक्रमास मानिते. सहा दिवसांत ईश्वरानें सृष्टि निर्माण केली, नंतर आदम व हव्वा या आद्य मिथुनास मृत्तिकेपासून निर्मिले. ईश्वराची या दोघांना अशी ताकिद होती कीं, बऱ्यावाईटाच्या ज्ञानाचें वृक्षाचें फळ खाऊं नये. परंतु अग्निपुत्र सैतानाचे शिकवणीनें ईशाज्ञा–भंग दोषास्तव हे मानवी मिथुन आणि सैतान स्वर्गवासास मुकले. आदम व हव्वा याचा वंश जगभर पसरला आहे. मरणोत्तर मनुष्यें मरणनिद्रेंत रहातील. नंतर सृष्टि-अंती आकाश फाटेल, चंद्र, सूर्य, तारे लोपतील, देवदूत तुतारी वाजिवितील, तेव्हां सर्व जीव मृत्युनिद्रेंतून जागे होऊन, प्रलय–रात्र लोटल्यानंतर पहाटेस,

उभे रहातील. उभे रहातील म्हणून त्या पहाटेस **कियामत** अशी संज्ञा आहे. नंतर पापा पुण्याच्या तपासांत, जे प्राणि ईश्वर-प्रेषित **मुसा, येशू** इत्यादि अंतिम पैगंबर महमदपर्यंत पैगंबरानीं त्या त्या कालीं नेमलेल्या शास्त्र-प्रमाणें न्याय नीतिनें वागून ईश्वरास भजले असतील, त्यांना अखंड स्वर्गवास, व जे अनीतिनें वागून ईश्वरास विन्मुख असतील त्यांना अखंड नरकवास होईल. प्राचीन क्रिस्तियन चर्चाचेही हेंच मत आहे. आधुनिक यूरोप व अमेरिकेंतील स्पिरिटिस्ट मरणोत्तर जीवात्म्याचे स्थितीचा शोध करीत आहेत. त्यापैकीं कांहीं मरणोत्तर प्रेतलोकांत जीवांची उत्क्रांती होईल असें मानितात; आणि कांहीं जीवाचे पुनर्जन्मास मानितात. आपलेकडे पूर्व मीमांसेमध्यें एक-भविक मताचा स्वीकार केला आहे. मात्र फरक इतकाच कीं, प्रलयकाल पावेतो सर्वच जीवास मरण निद्रेंत रहावे लागत नाहीं. पुण्य-पापाचा तपास लागलीच सुरू होऊन त्याप्रमाणें शिक्षा अगर बक्षिस मिळतें. उदाहरणः-पांडव स्वर्गारोहण पर्वांत दुर्योधनास रणांत मृत्यु आल्यामुळें अल्प स्वर्गवास, आणि नंतर चिरकाल नरक-वास; तसेंच पांडवांस त्यांच्या अल्प पापामुळें किंचित नरकवास, आणि नंतर त्यांचे जनक-तत्वांशीं संमेलन, सांगितलें आहे. इस्लामी मतांतही प्रलय काल-पर्यंत सर्व प्राण्यास निजण्याची आवश्यकता नसून पाप-पुण्याचा तपास लव-करच सुरू होतो, असें मानणारे पुष्कळ आहेत. परिच्छेद, ३४ मध्यें **उमर** व **फर्दूसी** संबंधानें ज्या ज्या अख्यायिका आहेत त्यावरून असें दिसतें कीं, या दोघांना उत्तम गती लागलीच देण्यांत आली. सारांश साधारण पराचे मत पूर्वमीमांसेप्रमाणें आहे. सूफी मतांत मानवी जीवास पुनर्जन्म मानितात तो असा कीं, उद्‌भीज, पशू, मनुष्य आणि देव यांचे अंशानें मानवी जीव बनला आहे. त्यांतील एका अंशाच्या विकासानें, व इतर अंशाच्या संकोचानें, मनुष्यास त्या त्या योनी प्राप्त होतात. **उमरचेंही** मत असेंच असावें. उदाहरणः-गु. क. १८३ याचे विवेचन परिच्छेद १०० मध्यें आलेले आहे.

**अरे** सृष्टिचा तूचि तंतू अहेव। बहू गुप्त ही मात चित्तांत ठेव ॥
**पशू** पक्षि माणूस आणीक देव। जसे दाविसी, तूचि होसी स्वमेव ८७०

जीवाचे स्वभाव व गुण मरणोत्तर नष्ट न होता पुन्हां उद्भवास येतात असे

उमर कैक रुबायांत सांगतो. गु. क. ६६ परिच्छेद ९८ मध्यें वासनेचा क्षय, मरणोत्तरही होत नाहीं हें सांगितलें आहे.

वनीं जासवंदी फुले ज्या फुलाला । असें रक्त जें खेळवी राजयाला ॥
दिसे विष्णूक्रांतू बरा जो भुईला । असे तीळ जो शोभला दिव्य गाला ८७

यांत देह स्वभाव उत्तर जन्मीं रहातो असें उमर सांगतो.

रुते श्वापदा पायिं काटी वनाची । असे पापणी वेणि दिव्यांगनाची ॥
दिसे वीट जी झोपडी वाडियाची । असे खोपडी मंत्रिची राजियाची ६३

येथें उमर सांगतो कीं, ज्या रूपवती स्त्रियांनीं आपल्या सौंदर्यानें मनुष्यास व्यथित केलें, त्यांचा स्वभावच परपीडात्मक असल्यामुळें त्या काट्या बोराट्या होऊन पूर्वजन्मीच्या नरपशूंच्या पायांत रुततात. आणि ज्या राजेप्रधानांनीं पृथ्वी संपादनाकरितां बुद्धिमत्ता खर्चिली त्यांचें पौरुष मृत्तिकारूप बनलें आहे. उमर जीवनमुक्त भक्तांचे व ईश्वराचेही अवतार मानतो. उदाहरणः--गु. क. २६० शब्दशः भषांतर असे आहे.

जरी विश्व जाणोनि कजिल सृष्टी । फिरावे फिरूनी जगाचे रहाटी ॥
बहू भक्त पाताळि आकाश ओटीं । जगीं येत जे ईश्वराचेचि पाटीं ॥

भावार्थः—त्रिकालज्ञ ब्रम्हांड जाणेहि सारा । परी त्या चुकेना इथें येरझारा ॥
गिळूनी चिदाकाश तो पैलपारा । हरी संग खेळे गुरूचाचि प्यारा २६०

आतां जीवाच्या पातकाचे संबंधानें **उमर** गु.क. ९८४ मूळ रुबाईत म्हणतोः—

जळेना कधीं जीव तो रौरवांत । परी होतसे पातकाचा घात ॥
सुरेनें मिया माखिला ह्याचि हात । जळूनी सुरा हात कोरा रहात ॥

भावार्थः—जळेना कधीं जीव तो रौरवांत । परी होतसे पातकाचाचि घात ॥
सुवर्णासि तापूनि आगेसरींत । जळे खेट, सोनेचि तें शुद्ध होत ९८४

रसायनशास्त्राच्या दृष्टांतानें उमर हे दाखवीत आहे कीं, मरणोत्तर यातनेनें जीवाची परिशुद्धि होईल. सारांश मरणोत्तर स्थितीविषयीं आणि पुनर्जन्माविषयीं उमरचें मत आर्य–मताशी जुळतें.

१०४ २ **वादपर रुबाया.** पिंडे पिंडे मतिर्भिन्ना–घर घर चूल्हा शिर शिर अकल–या न्यायानें, जशी आईबापापासून संतती, तसेच एकाच धर्मापासून अनेक

शाखा, प्रतिशाखा वाढत जातात. अशा शाखा वाढत जाणें धार्मिक विचाराचे जागृतीची खूण आहे. इस्लामांतील कांहीं पंथाविषयीं उल्लेख मागें परिच्छेद २१ व २२ मध्यें झाला आहे. उमरचे काळीं इस्लामांत ७२ पंथ होते; त्याविषयीं उमर म्हणतो:—

अनंता तुझें पंथ तेही अनंत । धरीला मिया सद्‌गुरू-प्रेम-पंथ ॥
असो द्वैत–अद्वैत कीं शैव–शाक्त । तुला इच्छिती अच्युता, सत्य मात १००६

सर्वही पंथांत इष्ट ध्येय ईश्वरच आहे. व त्याचीच भक्ती उमरनें स्वीकारिली.

आलोड्य सर्व शास्त्राणि विचार्यैव पुनः पुनः । इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा

सर्व मतांत अंतिम ध्येय एकच असले तरी कांहीं लहान मोठ्या आचार विचारांत वाद रहातातच; कैक प्रसंगीं विषय जितका क्षुल्लक असेल, तितका अधिक निकराचा वाद असतो. उदाहरणार्थ:—गोपीचंदनाचा तिलक पीठयुक्त Y आकृतीचा किंवा नुसताच U आकृतीचा लावावा याविषयीं वडगल व तेंगल या रामानुजी शाखांचा वाद दाराभिंतविर Y व U तिलकांचे आकृतीनें सर्वही दक्षिणेंत विराजमान आहे. देशबांधवांत जेव्हा क्षुल्लक आचाराविषयीं निकराच्या वादानें फूट पडूं लागते, तेव्हां संतांना उगें राहवत नाहीं. उमरनेंही व्याजोक्ती, अन्योक्ति, लापिका स्वीकारून फार चतुर व मार्मिक रीतीनें अशा वादाचें खंडन केलें आहे. अशा खंडनाचे स्वारस्य व महत्व त्या त्या देश कालांतच असतें. देशकालावधीनें वाद शिथिल होतांच खंडन ही रसहीन व दुर्बोध होतें. म्हणूनच अशा लुप्तप्राय वादाविषयीं उमरच्या रुबाया कूट बनून राहिल्या आहेत; आणि त्यांचें रहस्य समजण्यास प्रथम वादाचा विषय जाणावा लागतो.

उदाहरण १ **पृथ्वीच्या आधाराविषयीं वाद**:—जसें पुराणांत पृथ्वी यज्ञ वराहानें दाढेवर उद्धरली, तसेंच इस्लामाचे पूर्वकालीन लिंगार्चक अरब लोक नंदीचें श्रृंगावर पृथ्वी आहे असें मानीत. ही उघड रूपकाची भाषा न जाणून पृथ्वी निराधार अंतरिक्षांत असल्याचा ज्योतिषशास्त्राचा सिद्धांत खोटा म्हणणारांची टवाळी उमरनें रुबाई ७०९ मध्यें केली. मूळ असें आहे:—

नभीं कृत्तिका तेथ नंदी स्वराशीं । दुजा भूतलीं नेत नंदी हरासी ॥
नभा भूतला न्याहळी अंतरासी । गणी नंदीबैलांत पांचा खरासी ॥

यांत पृथ्वीचा आधार स्थूल वृषभ, आणि आकाशांत स्थूल वृषभ राशी, हें यथातथ्य मानणारे पंडितांना **उमर** गाढव म्हणतो. वाद माहित नसला तर रुबाई निरर्थक कूट आहे.

---

उदाहरण २:—मागें परिच्छेद १०३ मध्यें हिब्रू पुराणांतील सृष्टिरचना, आद्य मानव आदमची उत्पत्ति, व स्वर्गांतून पतन सांगितलें. तेंही रूपकच आहे, पण साधारण जन ऐतिहासिक दृष्टीनें शब्दशः यथातथ्य समजतात. **उमरचें** तात्विक दृष्टीस ही कल्पना अतथ्य वाटली, पण स्पष्ट रीतीनें तसें बोलूं शकत नव्हता. त्याचे पूर्वी अहंब्रम्हास्मि ( अनल्हक् ) म्हणणाऱ्या **मनसूरास** मुल्लांनीं ठार मारविले होते. **उमरला**ही हीच भीति होती, म्हणून लापिकेनें **उमर** सांगतो:—

गड्या तुजला सांगतो एक मात, । **खरा मानवाचा** मुळीचा वृत्तांत. ॥
धुळीं लिंपिला, शोक दुःखा वहात, । चरे अल्पसा, आणि झाडीत लात. ६५२

तिसरें व चौथें चरणांत आद्य मानवाचें जें रूपक वर्णन केलें आहे तो आपला पूर्वज होता असें मानणारे जनास ही प्रच्छन्न गाली आहे.

---

उदाहरण ३:—क्रिस्ती धर्मांत एकपत्नीव्रत सर्व पुरुषास सांगितलें आहे, व मद्य निषिद्ध नाहीं. इस्लामी **धरांत** एकपत्नीवृत उत्तम, परंतु ते न साधल्यास, व्यभिचार करण्यापेक्षां, चार स्त्रियापर्यंत विवाह विहित आहे; पण मद्यसेवन निषिद्ध सांगितलें आहे. या दोन्ही मतांतील श्रेष्ठ कनिष्ठत्वाबद्दल निकराची चर्चा **उमरचें** कालीं होत असणें सहाजिक आहे. मुरारेःस्तृतीयःपंथः! गु. क. २८२ चे मूळ फार्सीत **उमर** म्हणतो:—

माध्वी पात्रा भरीन **एकारंगीं** । **दो** पात्रें मी चढेन भाग्याश्रृंगीं ॥
बुद्धि—स्नेहा **त्रिवार** तैं मी भंगीं । द्राक्षाकन्या वरीन ही अर्धांगी ॥

एक, दोन, तीन—ाराचा उल्लेख ध्वनित ठेवून एकाच द्राक्षकन्येबरोबर विवाह स्पष्ट सांगितला. ही लापिका चार विवाह विहित, व मद्य निषिद्ध, असें प्रतिपादन करणारास शल्यवत् आहे. परंतु पात्र जीव, आणि प्रभू अमृत, अशा रूपकानें यांत अध्यात्म अर्थही निघू शकतो. येथें एकीकडे वादखंडण व दुसरीकडे अध्यात्म अर्थ साधला आहे.

उरीं आणिला सांवळा एकरंगा । पुढें घोटिले दोन जीवेश भंगा ॥
त्रिधा सांडिले गूण झालो निसंगा । पुढें चार मुक्तीस भोगी निजांगा २८२

---

उदाहरण ४:—संन्यास धर्मांप्रमाणें कादरी वगैरे कांहीं पंथांत गायन वाद्य इंद्रियरंजक म्हणून वर्ज्य आहेत. चिश्ती पंथांत चित्त विषयापासून परावृत्त व एकाग्र होईल अशा विविक्षित नियमांनीं गायन, वादन, व त्यांचें श्रवण वर्ज्य नाहींत. या वादासंबंधानें मूळ रुबाईत उमर म्हणतो:—

आर्या ॥ मधुपात्र देइ मत्करिं कलरव तू गायि राग हिंडोल ॥
॥ मधु गायनासि वर्जी, तरि कां करिते गुलूगुलू बोल ? ॥

उमर म्हणतो जर मधुनें गायन वर्ज्य केलें असतें, तर ते कुल्कुल् बोलबोल असें न म्हणते. वाद क्षुल्लक व त्याचे खंडण उपहासकारक आहे. भावार्थ:—

जिथें गोपिका श्रीहरी लागि गाती । तिथें सारसे नाचती हंस पंक्ती ॥
जरी गायना वीण होईल भक्ती । तरी सावळा घेत कां वेणु हाती ? ५८९

---

उदाहरण ५:—ईश्वर निर्गुण आहे, सगुणोपासना निर्गुणास पोहोंचत नाहीं, असा कांहीं आग्रह "सूफीये साफी" म्हणजे केवळ निर्गुणोपासकांचा असतो. ते स्वतःचे शरीराभिमानी अंतःकरणांत, अथवा निरालंब कोठे तरी, पण अंतः-करणाचेच वृत्तीनें, ईश्वराचें चिंतन करितात. दुसरा पंथ सगुणोपासकांचा आहे. त्यांत पहिल्यानें फनाफिश्शैख म्हणजे स्वतःचे अस्तित्वाचा लय आत्मनिवेदन भक्तिनें गुरूंत, नंतर फनाफिर्रसूल म्हणजे जगाचें आदिकारण महत्तत्वांत, व नंतर फनाफिल्लाह, म्हणजे अव्यक्त ईश्वरांत करितात. "दोही टिपरी एकचि, नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद" असो. उमर "सूफीये साफी" म्हणजे केवळ निर्गुणोपासकावर आक्षेप घेतो.

अरे उद्धवा! चाहसी निर्गुणाला । तरी सांग, कां उत्तरा दक्षिणाला ? ॥
जरी देखिले, सांग त्याचे खुणाला । नसें खूण, तें साग घेसी कुणाला? ८८२

१०५ वरील पांच उदाहरणें किरकोळ मतभेदांची दिली आहेत, त्यांत असें दिसून येतें कीं, हे सर्वसाधारण वाद नव्हेत. यांतील कांहीं वाद हिंदुधर्मांतही आहेत.

परंतु जे वाद माहीत नाहींत, त्यांचे सदृश इतर वादांचें निदर्शन गुरुकरुणामृतांत केलें आहे. उदाहरण गुरुकरुणामृत ६८९ व ६९० यांतील मूळांत उमरचा महम्मद पैगंबरशी मद्याचे निषेधाविषयीं झालेला संवाद इकडे गुरूच्छिष्ट ग्रहणासंबंधीं जो वाद आहे, त्याचें रूपकांत वर्णन केला आहे.

१०६ **वादपर रुबाया, सर्व सामान्य वाद.** आतां मरणोत्तर स्थिति, जीवाचें कर्म, स्वातंत्र्य–सीमा, पारतंत्र्य, सद्यस्थित देहाचें प्रारब्ध, व संसारांतून जीवाची सुटका, इत्यादि विषयासंबंधानें सर्व ही धर्मात सामान्य वाद असतात. जीव संपादित वासना व गुण–धर्म, अर्थात लिंगदेह, मरणोत्तर नष्ट न होता, त्यांचेसह जीवाचा पुनर्भव मागें परिच्छेद ९९ व १०३ मध्यें सांगितला आहे. दृष्ट जन्मांत जीवाचें कर्मासंबंधानें **उमर** म्हणतो:—

अरे आयु हें चावटीं माजि गेलें। फुका चित्त कीं अन्न हे घाण केलें ॥
न केला गुरू बोल, हें तोंड काळें। अनाज्ञाचि केलें, जिवा घोर झालें ७६६

आयुष्य वृथा बाष्कळ गोष्टींत गेले ती मोठी हानी झाली. त्यावर शास्त्राज्ञा ( गुर्वज्ञा ) भंगानें मोठाच कलंक लागला. तो अर्थात कष्टानें धुवावा लागणार आहे. पण जिथें शास्त्राज्ञा कांहींच नाहीं, असे केवळ जीव कल्पित कर्म घोर परिणामकारक आहे. असें जीव कल्पित कर्म स्वत:संबंधीं नसता, जग व जन यांचे विवेचनेचें असतें. याविषयीं **उमर** मनास म्हणतो **चुप बैस:—**

गड्यारे मना, बैस थोडें उगेलें। फुका चिंतिसी काय दुःखासि भेलें ॥
तनू कांबळें जेथ फाटूनि गेलें। तिथें बोल ते फोल, केलें न केलें॥ ७६५

सारांश जगाची किंवा इतर जनाची उठाठेव न ठेवितां स्वहिताला झटावें.

बरें हेंच कीं, एकलें एक राहूं। जगाचें भलें कीं बुरें तें न चाहूं ॥
अर्धी आपुलें काय होईल पाहूं। तरी आणिकाची कथा मात साहू ॥ ६८४

आतां देह नश्वर आहे, मग वाईट जगण्यांत वाईट ते काय? असें कोणी म्हणेल तर उमर म्हणतो:–

तुझें पानसे वर्ष आयुष्य लेखी। परी तू कहाणीच होशील शेखीं ॥
अशी कीं तशी ती कहाणीच लोकीं। तरी गोड व्हावी,नसावी कलंकी ९६६

पुन्हां **उमर** हेंही सांगतो कीं, केल्या कर्माचें फळ आवश्य भोगावें लागणार आहे.

न केलें भलें, सर्वही दोष केलें । दया याचनेचें पुनः घोष केलें ॥
न होई दया. चाखिजें पेरियेलें । उगें कां नकेलें? नुगें काय केलें? १०३९
सारांश कर्माचा कृतप्रणाश नाहीं, आणि कर्मफलाचा अकृताभिगम नाहीं, हें सनातन वैदिक मत येथें सांगितलें आहे.

प्राण्या भुलू नको, नटू नको, स्वहिता अंतरसी । धृ०
देह पांचाचा पांचाचा, पांचजण नेतील ॥
हिशेब पापाचा पुण्याचा, चित्रगुप्त घेतील ।
केल्या कर्माचें फळ जाणा, आवश्य ते देतील ॥ प्राण्या०

अशा रीतीनें कर्मानंतर भोग, व भोगाकरितां भोग–साधन देह, व देहापासून पुन्हां कर्म, हें रहाटगाडगें सतत फिरत आहे. या परिस्थितिसंबंधानें **उमर** म्हणतोः–

विसाव्यासि कोठेंहि जागाचि नाहीं । नसे अंत या वासनासाधना ही ॥
किती योनिच्या भोगिल्या यातनाही । दिसेना सुखाची परी कल्पना ही ८९६

तर मग जीवाची यातना कधींच संपणार नाहीं, म्हणून परमार्थ शास्त्राची प्रवृत्तीच व्यर्थ आहे, असें कोणी म्हणेल, तर **उमर** म्हणतो कीं, ज्यानें भक्तिपंथ स्वीकारला तोच पुण्यपाप, स्वर्ग, नर्क इत्यादि भोगांतून सुटतो.

दया स्नेह ज्या, तो असे मानवाचा । असो पंथ तो स्मार्त कीं वैष्णवाचा ॥
गुरू दप्तरीं दाखला हो जयाचा । असे नर्क–स्वर्गासि तो मुक्त साचा १२९

॥ सकृन्मनः कृष्णपदारविंदयोर्निवेशितं तद्गुण रागि यैरिह ॥ नतेयमं पाश
भृतश्च तद्भटान्स्वप्नेपि पश्यंति हि चीर्ण निष्कृताः ॥ भा. स्कं. ६ अ. १

म्हणून उमर म्हणतो:—

करू लाडिगोडी तुझ्यासी दयाळे । अम्ही पुण्य कीं पाप तें वाळियेलें ॥
गुरू माउले! आज तुझेचि लीलें । न केलेंहि केलेंचि, केलें न केलें ७९६

सद्गुरुकृपेनें "कर्मण्य कर्मयः पश्येदकमर्णिच कर्मयः । सबुद्धिमान्मनुष्येषु सयुक्तः कृत्स्नकर्मकृत्" अशी सद्गति प्राप्त होते, हा उमरचा अनुभव आहे.

**प्रारब्ध व प्रयत्न.** हा वाद ही सर्व धर्मांत सामान्य आहे. एक म्हणतात कीं, जीव जे सुकृत अथवा दुष्कृत पुढें आचरील, ते आरंभीच ईश्वरानें जाणलें आहे. पुढें म्हणतात कीं ईश्वरानें सृष्टी निर्मिली तेव्हां जीव

जीव-कृत भावी पाप ही त्यानेंच निर्मिलें असावें. पांडव गीतेंत दुर्योधन म्हणतो:—

जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः जानामि पापं न च मे निवृत्तिः ॥
केनापि देवेन हृदिस्थितेन यथा नियुक्तोस्मि तथा करोमि ॥

बलवत्तर दुष्ट वासना पापास प्रवर्तवितात हा ईश्वरी नियम आहे. पण आपले वासनेचा दोष पाखांडी ईश्वरी नियतीवर लादतात. " लोक ज्याला पाप म्हणतात तें जर हातून घडलें तर त्याचा दोष अगतिक मानवावर नसून त्या निर्घृण सर्व शक्तिमान नियतिवरच लादला पाहिजे " असें उमर मानितो, हा कांहीं पंडितांचा अभिप्राय आहे ( पटवर्धन प ९ ). हे वास्तवत: उमरचें मत नसून, उलट अशा पाखांडी मतावर उमरनें प्रतिप्रश्नानें आक्षेप केला आहे:—

विधीनें जधीं भातिला आकृतिलें । घटा बोळक्या भिन्न कामासि केलें ॥
भलें कीं बुरें नेमिलेचि झालें । मला जाळिजे काय कालें करालें ? १९८

प्रथम तीन्हीं चरणात पूर्व-पक्ष सागून, त्यावर चौथें चरणांत आक्षेप आहे. पाप जर ईश्वरानें नेमिलें, तर मग दु:खरूप शिक्षेची अनुपपत्ति येतें. हा आक्षेप राजनीतिपटु दुर्योधनावर ही होऊ शकतो. त्याला चोरास दंडण्याकरितां कायद्याची जरूरत नव्हती. सांराश उमरनें अशा मतावर आक्षेप केला, त्याचें समर्थन केलें नाहीं. याच मतावर दुसरें ठिकाणीं ही उमरनें आक्षेप घेतला. गु. क. २४६ ( परिच्छेद ८४ पहा. )

———

आतां कोणी म्हणेल कीं जीव जें कांहीं पापपुण्य करील तें ईश्वरानें आधींच लिहून ठेविलें आहे. उमर या गुप्तलेख ( लौहे महफूज ) संबंधानें म्हणतो:—

सटी पूजण्या ऊघडीले स्वनेत्र । पुढें देखिलें लेखणी दौत पत्र ॥
गुरूचें खुणें मी असे बोधमात्र । असे लेखणी, दौत मी, मीच पत्र १३८

स्वत:चें पुण्य पापाचा लेख वासना रूपानें जीवाचे अंगभूत रहातो.

उमर पापाविषयीं म्हणतो:—

———

तुला वाटते पाप हा शब्द सोपा । वदेना कधीं शब्द हा संत जो पा ॥
सुजाणा प्रभू काय निर्मील पापा ? । असे भूल ही फूल अज्ञान रोपा २६९

प्रथम चरण त " अरे पाप सहज (देहाबरोबर) निर्माण झालें असें तू म्हणतोस" असें सांगून, त्याचें खंडन करितो की, " दयाळू सर्वज्ञ प्रभू पाप निर्मितो " हें म्हणणें केवळ अज्ञान आहे.

———

सारांश पापपुण्याचा कर्ता ईश्वर नसून जीव आहे. दयाळू ईश्वरानें क्षमा केली, तरी पाप आचरल्याची लाज अखंड राहील, ईशप्रार्थनेंत तो म्हणतो:—

मला वासना ही सदा जिंकिताहे । सदा आपुल्या केलियालाचि साहे ॥
जरी तूं क्षमाशील, तुझी दया हे । तुवां देखिलें पाप, ही लाज राहे ६४१

---

आता दृष्ट जन्मांत जीव स्वतःचें प्रयत्नानें बाह्य सुखाची साधनें संपादन करितो. असें **प्रयत्नवादी** म्हणतात. परंतु धर्म सांगतो कीं, जीवाचें अदृष्टानें सुख दुःखादि भोग विधीनें नेमस्त केला आहे.

**धाता यथापूर्वमकल्पयत् दिवं च पृथिवींचांतरिक्षमतो स्वः ॥**

उमर कैक ठिकाणीं स्पष्ट सांगतो कीं भोगादिकाचें संपादनाकरिता प्रयत्न नको; तो पूर्वींच नेमस्त आहेः—

कणानें कणा खाद्य नेमस्त केलें; । कमी ही न झालें, न आधीक आलें. ॥
गुरू माउली हालवी तेंवि हाले, । दयाळू सखा बैसवी तेथ डोले २५५
तुला नेमिलेल्या न आधीक पावे । दुराशा तरी नाहसी कोठ पावे ? ॥
मनीं एवढें दुःख हावे वहावे, । परी शेवटीं येथ जावें त्यजावें. ४७९
उनाधीक नोहें कधीं आयु अन्न, । न व्हावे भल्या ओखटा प्राप्तिं खिन्न. ॥
जसें कर्म तैसा असे भोग भिन्न, । वळाया स्वहस्तें असे काय मेण ? ४६४
**जधीं तृप्ती धरी मी, अप्रयासें–। मिळे, बाहूबळें जें अट्टहासें** (परिच्छेद९७)

---

**कर्मण्येवाधिकारस्ते मां फलेषु कदाचन् ॥** पुण्यपापादिकर्म जीव–कृत व त्याचे सुख–दुःखादिफल ईशदत्त आहे; कालचक्र इत्यादिकाचा संबंध या बाबतींत नाहीं, असा उल्लेख उमरनें एका रुबाईत आणिला आहे.

बुरें कीं भलें, तें मनाचें विलास; । हरी देतसे सूख दुःखासि खास. ॥
नको काळचक्रा वरी लावु दोष, । असे फार तें दीन तूझे परीस. ६५

सारांश कालचक्र जड आहे, जीव चैतन्यरूप आहे.

---

सुखदुःख भोग **प्रारब्धानें दैवनियमित** आहे, व **प्रयत्नानें** जीवाची उन्नति होते अशा दोन मात्रा शास्त्रानें जीवास दिल्या, परंतु जीव संसारांत **प्रयत्न**

करितो आणि तरणोपायांत दैवावर हवाला देतो. उमरनें या दोन्हीं मंत्रांचा यथायोग्य उपयोग केला व इतरानां ही सांगितला आहे. उमरचें नेहमीं हेंच शिकविणें आहे कीं आलस्य सोड; व ईश्वराची भक्ति कर:—

वदे माउली "जागरे सोड झोप। न येई तमीं सौख्य बीजासि रोप ॥
त्वरें जाग, मृत्यू सर्वे युद्ध जुंप; । निजायासि जागा असे अंधकूप." २०३

१०६ ३ **अनुभवपर.** साधन स्थितीतले अनुभव पायरी पायरीनें भिन्न असतात. आणि भक्ति प्रेमातले अनुभव नित्य नूतन अनिर्वचनीय असतात. ज्या रुबायामध्यें "मा" आम्ही, अशा अनेक वचनांत स्वतःचा उल्लेख असतो तो सर्वही जीवाचा सामान्य अनुभव आहे. या सर्व अनुभवांचें निदर्शन अशक्य आहे. खालीं दिलेल्या काही सुभाषितावरून उमरचें अध्यात्मक विचारांची बैठक दिसून येईल.

---

श्रुती शास्त्र माझी स्तुतीचा पुकारा। मला आण कीं सेविजें प्रेमसारा ॥
जगीं जीव मी देव सर्वासि प्यारा। जगाकार हा देह माझाचि सारा ४०

हें विश्वाचि माझें घर। ऐसी बुद्धि जयाची स्थिर। किंबहुना चराचर आपणचि जाहला ॥ ज्ञानेश्वरी ॥

---

जधीं जागतो सूख दुःखेनि भाजें। जधीं झोंपतो लोपते बुद्धि लाजें ॥
सरें जागणें झोप आली न सेजें। तिथें मी वसे तेंचि चैतन्य माझें ५१

उमर म्हणतो जागृतस्वप्नसुषुप्ती विरहित तुरीय स्वरूप तें मी आत्मा आहे. ज्ञानोबाराय म्हणतात:—जो जागोनि निदेतें देखे। तो देखणें षणातें मुके ॥

नसे मी जधीं तैं वसे मी स्वरूपीं। जसा कां चढे तेवि ये अंधकूपीं ॥
अहा दाविले कौतुका माय बापी। असे मस्त मी तेवढा चित्स्वरूपी ५६

यांत उन्मनीं आवस्थेचें वर्णन आहे. ॥ चिद्दानंद रूपःशिवोहं शिवोहं ॥

---

ज्ञानी पुरुषाचें लक्षण उमर सांगतो:—

असे जो कुणी जाणता राजपंथी। गणी सर्व जीवा शिवाच्या विभूती ॥
दिल्या सर्व वस्तू प्रभुनेचि हाती। क्रिया साहजी सर्व निष्पाप होती ८०

॥ विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म ॥

---

उमर म्हणतो काल, विश्व, स्वर्ग व नरक यास आधार आत्म-स्वरूपच आहे.

महा काल माझें वयाचा क्षणार्ध, । असें विश्व या लोचनीं ईक्षणार्ध ॥
असें नर्क चिंता चितेचें तृणार्ध, । महास्वर्ग माझें सुखाचा कणार्ध. २०२

---

उमर हा अनुभव सांगतो कीं, सनातन ज्ञान स्वरूप आत्माच आहे.

असें ज्ञान प्राचीन मी वेदराया । दिसें तें असें सर्व माझीच माया ॥
त्रिकालीं दिशा व्यापिती माझी काया । असे वस्तु मी, विश्व माझीच छाया ५७२
स्तुती वेद-जिव्हेसि माझीच वाहे । मनोबुद्धिच्या डोळिया मीच पाहे ॥
जगत्कुंडलाकार होवूनि राहे । असें त्यांत चिद्रत्न तें मीच आहे ६०३

**दिक्कालाद्यनविच्छिन्नानंत चिन्मात्र मूर्तये ॥**
**स्वानुभूत्येक मानाय नमः शांताय तेजसे ॥**

---

दृश्य विश्वास आधार आत्म सत्ताच आहे. व त्यांतील द्वंदे ही आत्म-सत्तेवर भासतात.

असें विश्व हें माझिये मृत्तिकेनें । तेहतीस कोटीस चित्तीं रहाणें ॥
स्थिरा जंगमा जीवँ जातासि लेणें । दिले तेज, माझाचि या साउलीनें ९४२
सुखा आणि दुःखा असे खाण मीच । इथें न्याय अन्याय संस्थान मीच ॥
अपूरा पुरा थोर कीं सान मीच । असे आरसा स्वच्छ मी घाण मीच ६८२

---

**सर्व खल्विदं ब्रम्ह नेह नानास्ति किंचन ॥**

रडे बिंदु 'मी सिंधुपासूनि न्यारा' । हसे सिंधु पूर्णासि मी पूर्ण सारा'
इथें व्यापकू व्याप्य तो नाथ प्यारा । परी भक्तिला मांडिला हा पसारा १०४०

---

प्रभू जीव, हा देह ब्रह्मांड गोल । इथें प्राण ते पार्षदांचा समेळ ॥
इथें भौतिका इंद्रिया सोड खोल । असें हेंचि अद्वैत,या वीण फोल ६९२

**आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृह ॥**

---

अन्वय, व्यतिरेक, पंचीकरण, वृत्तिशोधन इत्यादि अनेक प्रक्रियेनें आत्मस्वरूपाचा अनुभव उमरनें ठिकठिकाणीं सूत्रवत् सांगितला आहे. अंतर्निष्ठ अनुभवी सूज्ञास यातील रहस्यानें आनंद उचंबळेल यांत शंका नाहीं. कांहीं उदाहरणें खालीं निवेदित आहेत:—

अता विश्व हें ब्रम्ह—आनंद झालें । जनीं कीं वनी सिद्ध संपूर्ण ठेलें ॥
हलें पान वायूसवें, वेद बोले । कुणी बोलता, गोपिका—गीत बोले ५२

---

मला वाटलें आत्म विद्या शिकावी । गुरूमाउले जाणसी तें वदावी ॥
वदे माउली 'ओ' म्हणे 'मी पुरावी । उरीं एक या अक्षरें तू भरावी' ९५३
दिठी माजि डोळयात डोळा दिसावा, । जगाचा तरी लेश कांहीं नसावा; ॥
दिठीं नाहि तूंतें, कसा तो दिसावा ? । हरी सर्व तो,एक डोळा असावा.९५८
वदे सूज्ञ'तो एक नाना न काहीं.' । गणी अज्ञ नाथा अरी मित्रता ही ॥
डुले सिंधुवीची स्वरूप प्रवाहीं । गमे बुब्दुदा आपुली वाह वाही.१०४३

---

याप्रमाणें उमरचें अद्वैत मत आहे असें दिसतें. परंतु शुष्क वेदांती लोकाप्रमाणें " काकू करूं प्रणाम ? " असा तो निरीश्वरवादी नव्हता. श्रीमच्छकराचार्यांची उक्ती आहे कीं:——

**भावाद्वैतं सदाकुर्यात्, क्रियाद्वैतं न कर्हिचित्, ॥**
**अद्वैतं त्रिषु लोकेषु, नाद्वैतं गुरुणा सह. ॥**

त्याच प्रमाणें भक्तिप्रेम सुखापुरतें द्वैत राखून ज्ञानाची परिपक्व आवस्था पराभक्ति याचाच उमरनें विशेषतः अंगिकार केला आहे:—

अम्ही काय आहोत रे मानवाचे ? । पुराणे गडी केशवाचे जिवाचे. ॥
नव्हे रंग हे आज काला नवाचे, । असे संग, मी तूं नये जेथ वाचे. ६७८
जिवाच्या जिवा ! प्रेय कीं तूंचि प्रेमी । खुळें आंधळें त्वद्गुणा पांगळें मी ॥
दिठी, तूचि या लोचनीं, हें बघे मी । सख्या चित्त चैतन्य तू ,हें बुझे मी १०६७

**अहो ऐक्याचें मुद्दल न ढळें । आणि सांजिरेपणाचा लाभ मिळे । तरी स्वतरंगाचीं मुकुळें । तुरुंबू कां पाणी ॥ अमृतानुभव ॥**

---

१०७ ४ **नीतिपर.** सद्य:स्थितींतून इष्ट ध्येयास पोहोंचण्याकरितां जी वागणूक जीवानें स्वीकारली पाहिजे, तिला आपण नीति म्हणतो. ही नीति, नियमाचें स्वरूपांत पूर्वींचे अनुभवी मनुष्यांनीं पुढील पिढीस सांगितलेली असते. वडिलांनीं कष्टानें संपादन केलेला अनुभव भावी संततीस मार्ग बनतो. आता इष्ट ध्येया प्रमाणें नीतिचे मार्गही भिन्न असणार. नीतिच्या सडका मांडणारांचें मतें त्यांचा मुक्काम त्यांना उत्तमच वाटतो. परंतु चालणारानें आपआपलें इष्ट मुक्कामाप्रमाणें आपआपले सडकेची निवड करून घेतली पाहिजे. उत्तानपाद राजाच्या दोन राण्या होत्या, **सुनीति** व **सुरुचि**. त्यापैकीं **सुरुचि** आवडती, व **सुनीति** अनावडती होती. बहुधा रुचते ते पचत, व पचते ते रुचत नाहीं. **सुरुचिचा** स्वीकार, व **सुनीतिचा** त्याग, साधारणत: सर्वच जीव करितात. पण सर्वही धर्म **सुनीतिचे** अवलंबन करण्यास सांगतात; कारण **सुनीतिचा ध्रुव** बालक **ईश्वर** भजनानें **ध्रुव**पदास पोहोंचला.

**विष्णुशर्मा, ईसाप,** इत्यादि उपदेशकांनीं संधिविग्रह सामदानभेददंडादि सर्वांग सुंदर व्यवहार, व राज–नीति चित्तवेधक रीतिनें पटावी म्हणून पश्चादिकांचे दृष्टांतानें सांगितली; त्यांत हें दाखविलें कीं त्यांची सांगितलेली नीति श्वापदा मानवामध्यें सारखीच आहे. उपनिषदांत ही अशी एक कहाणी आहे.

**अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वी:प्रजा: सृजमानां सरूपाम् ॥**
**अजोह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगा मजोन्य: ॥**

अजा कोठली शेंदरी श्वेत काळी । प्रजा सारखी वीत चाले सुकाळीं ॥
अजू संग–कामी तिचे ये विटाळीं । अजू येर ती गाभणी दूर टाळी ॥

**कहाणी:**—एक आहे शेळी. कधीं कुठें जन्मली कुणाला माहित नाहीं. तिला **अजा** म्हणतात. लाल, शुभ्र काळीं,–राजस, सात्विक, जहाल,–अशी फार गुणाची आहे. संततीपण किती वीते ! क्षणोक्षणीं वीते, व गाभणी होते. हिची संतती इच्याच गुणासारखी जगभर पसरली आहे. एक बस्त ईचें मागें भेमे करीत जातो, व पुन्हा पुन्हां तिचे विटाळांत व गर्भांत येतो, अहो पशू सुद्धां गर्भिणीला स्पर्श करीत नाहींत; पण या बस्तानें तिचें मोहांत

स्वधर्म सोडला. दुसरा अज मात्र स्वस्थ राहून स्वधर्मानें वागतो. ही भुक्तभोगा गर्भिणी आहे असें जाणून दुरूनच जातो, **रामराम** करितो.

---

कहाणी सांगणें झालें, पण कहाणी तर सारखी होतच राहिली आहे ! ही अजा सज्जनांचे ओळखीचीच आहे ॥ **भूमिरापोऽनलोवायुःखं मनोबुद्धिरेवच ॥ अहंकार इतीयंमे भिन्नाप्रकृतिरष्टधा ॥** या वचनानें भगवंतानीं तिची ओळख करून दिली आहे.

**॥ अपरेऽयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ॥**
**॥ जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥**

असेंही तिचें लक्षण, जेव्हां चैतन्यजीव तीमध्यें प्रविष्ट होऊन तिला सगर्भ करून चेष्टवितो तेव्हांचे, सांगितलें आहे. चैतन्यानें तिला सकाम दृष्टिनें पाहिलें कीं, ही सतत गाभ होते,व सतत वीत जाते. आपले प्रियकरास नित्य नूतन प्रकारें रुचावें म्हणून पूर्वीचे जीर्ण देह टाकून, ही सती नवीन देह घेते. या तिच्या व्यापाराला "**जीवन कलह**" अशी संज्ञा कोणी पंडित देतात. हिचा व्यापार व व्याप्ती सूक्ष्म अणुजंतु ( **प्रोटोप्लाज्म** ) पासून आकाशगंगा ( **निव्यूली** ) पर्यंत आहे. तिचें पटुत्व व कौशल्याचें चिंतन व ध्यान करणारे पंडितांना असें वाटतें कीं ( **सर्व्हैव्हल ऑफ दि फिटेस्ट** ) पटुत्वांत अग्रेसर तोंच जगतो. वस्तुतः ही कधीं तगत अथवा जगत नाहीं. पण तिच्या सतत ध्यासानें अशा विद्वानास वाटतें कीं जीवन कलहांत प्राविण्य व पटुत्व संपादन केलें तरच आपण जगूं. जसें ध्येय, तसेंच पुढें नीतिशास्त्र बनतें. अनेक कला व शास्त्रें यानें जगांतील सर्व दृश्य पदार्थांवर व अन्य जीवावर सत्ता स्थापन करून, ( **मास्टर मॅन** ) सामर्थ्यवान मनुष्य होणें, हेंच हे **भोगैश्वर्यवादी** आपलें कर्तव्य समजतात. अशा मनुष्याचे कर्म श्रीज्ञानोबाराय सांगतातः—

**॥ आशापाशशतैर्बद्धाःकामक्रोधपरायणाः ॥**
**॥ ईहंते कामभोगार्थं मन्यायेनार्थ संचयान् ॥** (गीता १३)

आणि पसरिला अभिलाष ॥ अपूर्ण होय तोचि द्वेष ॥ एवं कामक्रोधाहूनि अधिक ॥ पुरुषार्थ नाही ॥३९॥ तेवेंचि जिवींचिया हांवा ॥ विषयवासनेचा

मेळावा ॥ केला परि तो भोगावा ॥ अर्थें कीं ना ? ॥४२॥ म्हणोनि भोगा-वया जोगा ॥ पुरता अर्थ पैं गा ॥ आणावया जगा । झोंबती सैरा ॥४३॥ एकातें साधूनि मारिती । एकाची सर्वस्वें हरिती ॥ एका लागी उभारिती । अपाय यंत्रें ॥४४॥ पाशिकें पोतीं वागुरा । सुणीं ससाणे चिकाटी खोंचारा ॥ घेऊनि निघती डोंगरा । पारधी जैसे ॥४५॥

॥ इदमद्यमयालब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ॥
॥ इदमस्तीदमपिमे भविष्यतिपुनः धनम् ॥

हें जेतुलें असें जोडले ॥ तयाचेंनि भांडवलें लाभ। घेईन उरलें । चराचर हें ॥

---

या कामक्रोधलोभ-प्रधान नीतिला आसुरी नीति हें प्राचीन नांव आहे; कारण त्या नीतिचे आद्य प्रवर्तक कश्यपपुत्र हिरण्याक्ष हिरण्यकशिपू हे असुर होते. सच्चिदानंद दयाघन श्रीनारायणाकडें त्याचे सनकादि सनातन भक्तांना, जाण्यास प्रतिबंध केल्यामुळें या जय विजय द्वारपाळांना आसुरी योनि प्राप्त झाली. त्यांची वासना भोगेश्वर्याचा जय विजय करण्याची होती, म्हणून हें त्यांचें नांव पडले. यांपैकीं हिरण्याक्षानें समग्र पृथ्वीचा लोभ धरून तिला बगलेंत घेतले, आपण रसातळांत बुडाला, व तिलाही बुडविले. पुढें यज्ञरूपी वराहानें पृथ्वीचा उद्धार केला—ते असो. दुसरा जो हिरण्य—कशिपू त्यानें नवयौवना करितां वानरांचीं गलांडें आपलें कानसुल्यांत ठेविलीं नाहींत; किंवा दुसरा काया—कल्प केला नाहीं; केवळ तपोबलानें देवा मानवांत अजरामर होऊन स्वर्गलोक ही जिंकिला. हे दोघेही गेले. पण यांचे अनुयायी प्रच्छन्न-रूपानें सर्व मानवांत राहिले. पुढें रावण, बाण, त्रिपुर, कालनेमी इत्यादि या मतांचेच अनुयायांनीं तप, विद्या व उपासनेच्या बलानें पृथ्वी, आप, तेज, वायू विद्युत्, मेघ यावर आपली सत्ता पृथ्वीपासून स्वर्गापर्यंत गाजविली. पण चैतन्य-घन ईश्वरापुढें, व अपरिहार्य कालापुढें, या भोगैश्वर्य संपादक जडवाद्यांचा टिकाव झाला नाहीं.

वदे रावणू लाथ मारीन बुक्का । चुरूनी जगा पिंड पाडीन पक्का ॥
तयाचें शिरीं काळसा कावळा कां । वदे कां? कुणा कोण? कां कोण काका? ५०

हुडा रावणाचा अकाशात जाय । जिथें देवही होत गोगूलगाय ॥
तिथें पारवा बैसुनी एक गाय । करूं काय, कैं काय, कैं काय काय? ७४५

---

पुढेंही युगानुयुगीं सर्व देशकालांत यांचेच अनुयायी होत आले. जर्मनीमध्यें (मास्टर मॅन) ऐश्वर्यवान मानव होण्याचें नीतिचा प्रचार झाल्यानंतर युरोपांतील महायुद्ध जुंपलें. त्याचा परिणाम सर्व जग भोगीत आहे. परस्परांचा पाडाव केवल युद्धानेंच न करितां परस्परांचें जीवन व अन्न-साधनें हस्तगत करण्यासाठी नूतन शास्त्रें, व कला निर्माण होत आहेत. या नीतिचें प्राबल्यानें टार्पिडो, ड्रेडनॉट, मिशिनगन्, बांब, विषारीग्यास, इत्यादि जीवघातक पदार्थ तयार करण्यांत, व गुप्त रीतिनें इतरांचें उपजीविकेचीं समधनें हरण करण्यांच्या कला शिकण्यांत, लक्षावधी मनुष्यांचे आयुष्याचा अपव्यय होत आहे.

---

सारांश जीवन-कलहांत इतरांचा घात, व स्वतःहाचा टिकाव, हा प्रकृतीचा जो सामान्य धर्म आहे तोच या भोगेश्वर्यवादी जनांचें नीतिचा पाया आहे. त्याचे मतांत आत्म-चिंतन झूट आहे. ईश्वर भजनानें मनुष्य निर्बल होतो,ईश्वर-भक्ति करणारे संत सज्जन देशाचे वैरी होत. हिरण्यकशिपूसही प्रल्हाद वैरी भासला. या भोगैश्वर्य पाटवाचें अतिरेकानें मानव माजूं लागतात, तेव्हां ॥ **परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ॥ धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥** या भगवदुक्तीप्रमाणें, युगानुयुगीं सर्व देशकालांत देव भक्तांचे अवतार होतात. तेव्हां संत सज्जन आक्रोशपूर्वक सांगतात कीं, जगाचें आदि कारण प्रकृती नसून चैतन्य परमात्मा आहे; जीवाचें कर्तव्य प्रकृतीचें भोगैश्वर्य संपादन नसून ईश्वर-पद-प्राप्ती आहे; अहिंसा, सत्य, दया, दान, इंद्रिय दमन, दास्य, दीनत्व आणि धर्माज्ञेचें परिपालन हेंच ईश्वराचें कृपेला पात्र होण्याचें साधन आहें.

जसा हिरण्यकशिपूचें वेळीं प्रल्हादानें, तसाच आपले युद्धत्रस्त देशकालांत उमरनें, भागवत-धर्माचा बोध, ऐकणार कोणी नव्हते म्हणून, मनासच केला.

मनारे जरी झाडिसी देह धूळ । तरी निर्मळा पावसी आदि--मूळ ॥
चिदाकाश वस्ती तुझी, सांड खूळ । कसा कर्दमीं खात होसी गढूळ ? ८३०

जगाविषयीं परिच्छेद १०२ मधील कित्यांत तो म्हणतो

॥ "दावि दुन्याकसी मनोरमता?" । लाव लेहाव भाव मोहरसें ॥

जगाची नटी नेसली शालु भारी । जनाचें मनाला असें फार प्यारी ॥
बहू चांगली शोभते ही बिचारी । परी ही जना मोहवी आणि मारी ७९
जगाची नटी ही बहू येत जाते । सुखीं ऐस तू , देखसी कां तियेतें? ॥
जरी ही नटी कां कुणा साथ देते । तरी कां तुझें सन्मुखीं आजि येते? ९३

सारांश, उमरचें अंतिमध्येय ईश्वर प्राप्तीचें असल्यामुळें वरील रजतम–प्रधान आसुरी नीतिचा त्यानें पदोपदीं निषेध करून दैवी संपत्ती,अध्यात्म ज्ञान, आणि ईश्वराची कृपा याला साधन भूत अशा नीतिचा उपदेश केला आहे.

**अमानित्वमदंभित्वम्**

जगीं चाल ऐसे, कुणी ना नमावें । जनीं वाग जेणें जनानीं निवावें ॥
जरी कीर्तनीं जासि, ऐसेचि जावे । न कोणी उठोनी तुला बैसवावे २१४
सुखी तो जया गर्व नाहीं उरांत । क्रिया ज्ञान योगीं न काढी वरात ॥
चरे हंस तो मानसाचे सरांत । करी नीच सेवा गुरूचें घरांत ३९१
न येरा पुढें शब्द काढीन हाय । तुझें दु:ख कोणासि सांगीन काय? ॥
तुझेवीण तो शब्द कोणासि जाय । तरी तोचि माझे जिवासी अपाय ६६३

**अहिंसा क्षांतिरार्जवम्**

असे शक्य तो पैं दुखावी न कोणा । स्वताचें विकोपें न घे अन्य प्राणा
अनंता सुखा वांछिसी जैं सुजाणा । झुरे तू मनीं, पैं दुखावी न आना ३०५
अती नम्रतें पाविजे भाविकाला । पदा सेवुनी लाहिजे चित्सुखाला ॥
तुकेना गयाकोटि एका मनाला । गया कासया? तोषवी सज्जनाला ३०

**आचार्योपासनंशौचं**

बने तोवरी संत पादाचि सेवी । क्रिया कर्म तें सर्व गुंडूनी ठेवी ॥
गुरू प्रेम मात्राचि पोटांत घ्यावी । दयाभूत कोणां न गारींत लावी ७२६
वयातील लेखासि जावे पुसून । प्रियाचे सुरीनेंच जावे मरून ॥
सुखी मी, गुरूमाउली सुप्रसन्न । उरातील रक्तोंचि आम्हासि अन्न ३३३

### स्थैर्यमात्मविनिग्रहः

मिया होइजे शूर गंभीर वीर । वहावा तुझा दर्द आपादशीर ॥
सदा प्रेम अभ्यासिजे रंगधीर । मुझें या बिर्दी माजि व्हावे अबीर ४०५

नको पाहु मागें, नको धावु आगें । बसें आपणीं आप, प्रेमांत जागें ॥
सवें शून्य सांडी, विकल्पासि त्यागे । तरी होसि अद्वैत-सिंधू निजांगें १००५

करी बंद दृष्टीं, पडें चित्त दृष्टीं । तया दिव्य दृष्टीं दिसें अन्य सृष्टी ॥
जरी सृष्टिला देखसी दिव्य-दृष्टीं । तरी सर्वदा तूज लाभेल तुष्टी ४४६

मनोवृत्ति गेली, न तीते स्मरावें । न आली पुढें, तीगुणें नाझुरावे ॥
अरे भूत भव्यासि ऐसे तरावे । सुखें साइजीं ब्रम्हरूपा वरावे ७२८

मिळे ज्या गती आपुले डोळियाची । कळे त्या स्थिती राजया योगियाची ॥
स्वयें शोधकू, सिंधु, मुक्त स्वयेची । अरे शोध अर्थी, बहु खोलि याची ४५५

तुवा अंतरी राहिजे सावधान । जगा भीतरी सर्वदा साधि मौन ॥
सुखी राखिजे जीभ कीं नेत्र कान । गुरू पायिं नेऊन ठेवी गहाण २७३

### इंद्रियार्थेषुवैराग्यम्

विरुद्धा जगाचें न दुःखा वहावें । गुरू माउलीचें सुधासार खावें ॥
अरे मात्र योनीतुनी येथ यावे । तरी पत्नि योनी मधें कां रिघावे ७७९

### अनंहंकार एवच

बुधा येथ तूं बुद्धिचा घेइ थारा । असे नेक साथी, नको दुष्ट वारा ॥
जरी इच्छिसी होइजे येथ प्यारा । सुखी ऐस, सांडी अहंकार सारा ३१५

### जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषानुदर्शनं

अरे देह हा व्यर्थ कीं चर्म खोळ, । वृथा गोपुरे पीठ प्राकार पौळ, ॥
जिवा मृत्युचे ओढताणींत सोल । असे श्वास, हा खातसे तोहि झोल १९०

### असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु

धरी शौर्य, संसार निःशेष झोडी । स्त्रिया पुत्रका सर्व संबंध तोडी ॥
जरी घेसि काडी, बने ती पहाडी । कसें बंधनीं चालसी, बंध तोडी ५००

**नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु**

जगाची रहाटी जयाना कळाली । तया पासुनी शोक दुःखें पळाली ॥
भली कीं बुरी येथ अंतीं गळाली । असो रोग कीं दिव्य मात्रा मिळाली ७२७
असे प्रीतिचा पंथ ऐसा सुरेख । जगाचें विखाही गणीजे पियूख ॥
सुकाळीं कुणीही गणीतील सूख । अपत्ती मधें जो सुखी तो विशेख ८७१

**मयिचानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी**

याचे विवेचन भक्तिपर रुबायाचे परिच्छेदांत पहा.

**विविक्तदेशित्वमरतिर्जनसंसदि**

पुरे कोपरा, भाकरी दोन कोरी । झुगारू धना वैभवा दूर दूरी ॥
जिवा वेचुनी घेतली कीं फकीरी । फकीरी मधें साधिली ही अमीरी १०३६
जनाची कथा मात दुर्गंध वात । स्मरे तू रमानाथ, राही सुखांत ॥
जरी मानसी बात, होईल घात । तुझे सारिखे फार झाले जगांत ४४१

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम्**

क्रमी पंथ ऐसा नुरे जेथ द्वैत । असें द्वैत तेंही क्रमानेंच जात ॥
न होसी हरी तू, परी साध हेत । तुझा तूपणा सर्व जावा लयांत ४२०

उमरचें नीतिशास्त्र कोणतें प्रकारचें आहे हें वरील चांचणी वरून सूज्ञास कळेल. या शुद्ध सात्विक पंथ नें चालणारास स्थूल सृष्टीतील विविध पदार्थ अथवा पंच महाभूतांचा जय करण्याच्या ऐवजीं मनबुद्धि अहंकाराचे जयाची आवश्यकता आहे. बाहेर कोणी शत्रु नाहींच. त्याचे अंतिमध्येय ईश्वरास आवडता होण्याचे असते.

**अद्वेष्टा सर्व भूतानां मैत्र करुण एवच**

अरी मित्र दोघा करी हीत प्रीती । कधीं प्रेमळाची न वाईट रीती ॥
अरीचें करी हीत, देईल साथी । करी द्वेष मित्रांसि, ताडील लाथी ? १५०

भगवभ्दक्तांची समग्र लक्षणें **भक्तिपर** रुबायांचें वर्णनांत पुढें येतील.

---

१०८ ३ भक्तिप्रेमपर. परिच्छेद १०६ मध्यें उमरचा अनुभव सर्वं खल्विदंब्रह्म नेह नानास्ति किंचन असल्याचा दिसून आला. परंतु एवढ्यानेंच त्याला जन्माचें साफल्य वाटलें नाहीं.

गुरू माउले सांगतो एक मात, । असो बोल थोडा, बहू गूज यांत; ॥
तुझें आवडीं धूळ होतो पदांत, । उठे जैं कृपेचा शिरीं देखि हात. २७०

प्रेमानेंच ईश्वर चरणीं जीव लीन होतो, व त्याचें पुनरुत्थापन ही प्रेमाकरिताच त्याचे दयेनें होते.

रचीशील ब्रह्मांड, ती काय थोरी ? । जिवा एक ही तोषवी, तेंचि भारी ॥
गुरू मुक्त, तो बांधिजे प्रेम दोरीं । असे सृष्टि आधींच ही मुक्त सारी ८७४

योगबलानें प्रतिसृष्टी करण्यापेक्षां कुणाचें हृदय प्रेमांत बांधून ठेवणें, आणि अध्यात्म ज्ञानाची प्रौढी मिरविण्यापेक्षा दास्यत्वांत राहून संत—सद्गुरूची प्रीति संपादन करणें, अधिक श्रेयस्कर तो समज. आमचे गुरु माउलीचे एका पोरीनें आपला पुरुषार्थ सांगितला:—

( पद चालः—उद्धवा शांतवन करि जा. )

पुरुषार्थ काय ते चारी ? । कुणितरी मला सांगावे. ॥ धृ० ॥
पुरुष तो एक कंसारी । प्रियपतीच कीं गिरिधारी, ॥
त्यावीण जेथ मी देखे । मज गमती अवघ्या नारी; ॥
पतिवीण कुणा मी गावें? । कुणि तरी मला सांगावे. ॥ १ ॥
कुणि म्हणती धर्मक्रियेला, । पुरुषार्थ एक तो पहिला, ॥
हरि म्हणे सर्व धर्माला । त्याग लाग मज एकाला. ॥
कशि हुडकु दुजाचीं गावें? । कुणि तरी मला सांगावे. ॥ २ ॥
संपदा नटुनिया आली, । दागिने शवासी घाली; ॥
परि द्यूत कलह मद केली । ऐशिया अनर्था व्याली, ॥
अर्थ केवि तिज मानावे ? । कुणितरी मला सांगावे. ॥ ३ ॥
कामिनी एक मज सांगे, । 'भोगिजे काम अनुरागें ॥
सार्थता तरिच देहागे'; । संशयो मनीं हा वागे— ॥
पतिवीण कुणा भोगावें? । कुणितरी मला सांगावे. ॥ ४ ॥

मोकाट जोगडी कुठली !, । येउनी मला बिलगटली, ॥
कथि 'अर्थ मीच शेवटली, । मज सर्वे होय तू सुटली;' ॥
मोकाट कसें हिंडावे ? । कुणितरी मला सांगावे. ॥ ५ ॥
धर्मार्थकाम देहासी । प्राक्तनें येति उदयासी, ॥
मानिली मुक्ति आभासीं;' । मी तया वेगळी खासी; ॥
काय यांत उजवें डावें ? । कुणितरी मला सांगावे. ॥ ६ ॥
धर्माची श्रीहरि मूर्ती, । पापपुण्य त्याचे हार्ती, ॥
तोचि अर्थ सकला अर्थी, । करितसे कामना पूर्ती; ॥
काय मी कुणा मागावे ? । कुणितरी मला सांगावे. ॥ ७ ॥
श्रीहरीसि मी भुलवावे, । मजसंगें त्या झुलवावे, ॥
प्रेमांबु मधें बुडवावे, । गहिवरें तया रडवावे, ॥
पुरुषार्थ हेंचि शिकवावे. । कुणि तरी मला सांगावे. ॥ ८ ॥
लक्ष्मीसि दूर हरि सारी, । मज सदा येइ शेजारीं. ॥
साधील तीच मज प्यारी; । जाईन तिला बलहारी. ॥
बाळुताइ विनवी भावें । कुणितरी मला सांगावे ॥ ९ ॥

---

जी या बाळुताइची, तीच उपरची हौस हरीस आवडते होण्याची होती.

तपीया जपाचा तपाचा तपास, । वसे ध्यान—योगी तुझे आसपास; ॥
कळेना सख्या तोपसी तू कुणास, । इथें बोलती सर्व "माझाचि खास." ९८१

हो! प्रभूचें एक वाक्य सांपडलें, 'यो मद्भक्तः स मे प्रियः:' पण भक्ति कांहीं तपोयोगादि क्रियांच्या, अथवा विवेक विचारादि प्रक्रियांच्या, बाजारांत मिळणारी चीज नाहीं.

असे गूज एकैक सर्वांचि हेतीं । हिता हीत पैं नेणवे येथ चित्तीं ॥
क्रिया योग मार्गीं बहू संग साथी । परी एकलें चालिजें प्रेम पंथी १७३

प्रीतिकि रीति कछू नहिं राखत, जाति न पाँति नहीं कुल गारो. ॥
प्रेमकु नेम कहू नहिं दीसत, लाज न, कान लग्यो सब खारो. ॥

लीन भयो हरिसू अभिअंतर, आठहु याम रहै मतवारो ॥
सुंदर कौतुक जानिसकै यह, गोकुळ गाँवको पैडो हि न्यारो ॥ सुंदरविलास

भक्तिशिवाय हरिप्रिय होऊं शकत नाहीं व भक्ती ही त्याचे दयेशिवाय मिळू शकत नाहीं. असें आहे हें सुदर्शन चक्र ! सर्व ही संत या भक्तीचीच याचना करितात. भक्ताग्रणी प्रल्हाद म्हणतो.

याप्रीतिरविवेकानां विषयेष्वनपायिनी, त्वामनुस्मरतः सामे हृदयान्मापसर्पतु ॥१॥

सदरप्रमाणें उमरच्या बहुत रुबाया साकीला संबोधून प्रेमाच्या मागण्या आहेत. त्याचा साकी कोणी " शुंडा आपान गंजा पिट्ठा गुत्ता " या संस्थातील स्त्रीपुरुष नसून, संतसद्गुरुरूपी ईश्वरच होता असें त्याचे कैक रुबायांतून स्पष्ट दिसतें.

गुरू प्रेम दे. विश्व हा अंधकार, । तुझें रूप तें येथ पीयूष सार. ॥
जगज्जीवनू तूं जगाचा आधार, । नमो चिंतितार्था तुला वारबार. ९३
विधी निर्मितो स्वर्ग तुझेचि तोषें, । यमें दंडिजें जीव तुझेचि रोषें; ॥
असे स्वर्ग दाटी, मला ती न सोसे: । मला श्रीगुरू दे तुझीं पायपोसें. ५
तुझेवीण माते गुरू नाहि न्यारा, । मना लोचना जीविता तूचि सारा; ॥
नसे कोणि जीवाहुनी येथ प्यारा, । तयाहूनि कोटी गुणें तू उदारा. ७

तरबखाना नामक लिखितात (परिच्छेद ९८ पहा) ही अख्यायिका आहे कीं, " उमर बुखारा शहरांत आपला गुरू इमाम मुवफ्फक हजरत रूहुल्ला रूह याचे समाधीपाशी गेला, तेव्हां प्रेमोद्रेकानें देहभान विसरून बारा दिवस व रात्र खालील रुबाई पुन्हां पुन्हां म्हणत उन्मत्तवत् भटकत राहिला.

तुझे दास्ययोगांत नाही निमालो, । तुझें दारिं लोटांगणी नाहि आलो; ॥
दयेला तुझ्या पैं न विन्मूख झालो, । असे एक ते दोन नाही म्हणालो." ५२८

वरील अख्यायिका ही साक्ष देते कीं ज्ञान–दाता गुरू व ईश्वर यामध्यें उमरनें द्वैत कल्पिलें नाहीं. साकीस उद्देशून असलेल्या सर्वही उमरच्या रुबाया शब्द पटाचे आडून सगुणसद्गुरु अगर निर्गुण ईश्वराचें नावानें हाका आहेत.

---

भक्ति शास्त्रावर प्राचीन दोन सूत्र ग्रंथ उपलब्ध आहेत. एक शांडिल्याची मीमांसा, ॥ **अथातो भक्ति जिज्ञासा** ॥; आणि दुसरी नारदीय व्याख्या, **अथातो भक्तिं व्याख्यास्यामः**. जैमिनीची पूर्व मीमांसा कर्मपर, आणि व्यासाची उत्तर मीमांसा ज्ञानपर, या दोन्ही ग्रंथांनीं आणि महाभारतादि इतिहास पुराणांनीं, व्यासाचें समाधान झालें नाहीं; तेव्हां नारदांनीं भक्तीचें व्याख्यान करून व्यासाला श्रीमद्भागवत रचण्याची आज्ञा केली. आपण त्या नारदीय भक्तिसूत्राशी उमरच्या रुबायाचें साम्य पाहू. नवीन वाद्यास आपलेच सुरावर लावून भजन म्हणावें लागतें.

———

**अथातो भक्तिं व्याख्यास्यामः ( ना. १ )**

**अतो** ज्याअर्थीं पूर्व मीमांसोक्त **कर्म**, आणि उत्तर मीमांसोक्त **ज्ञान**, या दोहीं मार्गांचे पूर्ण अनुष्ठान करून ही समाधान होत नाहीं, म्हणून भक्तिचें व्याख्यानास नारद आरंभ करितात.

मला वस्ति आहे कृतघ्ना जगींच । बहू शोधनीं साधनी डाव पेंच ॥.
"गुरू गोड तू", बोलिलो गोड हेच । "गुरू सत्य तू", बोलिलो सत्य तेंच १८२

सर्वांना ही संसारांत आप्त, इष्ट, मातापितर, स्त्री पुत्रादिकांचें ठिकाणीं स्नेहरूपी चित्तोद्रेक माहित आहे. त्यालाच कुणी प्रेम समजतात. खऱ्या ईश्वरी प्रेमाची छाया ही वैष्णवी माया आहे, व सृष्टीचें पालन करिते, परंतु यांत जीवाचें कल्याण नाहीं.

इथें जीव आले पितापुत्र झाले । पतीपत्नीं बंधू अरी मित्र केले ॥
मनोराज्य भोगूनि धाले निमाले । घरें पोटिं एकाच शेजें रिघाले २६२

कुणी म्हणतात " पुत्रकलत्रादि भगवंताची रूपें आहेत, व त्यांचेंविषयीं प्रेम आम्हास शिकायला नको; तें आमचें आंगवळणी आहे. " **मुलें लेकरें घर दार हींचि माझें पंढरपूर** !" तुकोबाच्या अवाचे हें भक्तिज्ञान आहे.

सहेतूक प्रेमा नसे वर्ण कांती । वमूनी विषा सेविता होय वांती ॥
खरे प्रेमळा दीस राती युगांती । न भुक्ती न मुक्ती न शांती न मुक्ती ३०९

म्हणून दुसरें सूत्रांत नारद भक्तीचें लक्षण सांगतात.:–

**सा तु अस्मिन् परमप्रेमरूपा ( ना. २ )**

**सा** ती भक्ती, **तु** केवल, **अस्मिन्** परमात्माचे ठिकाणीं, **परम** पराकष्टेची, **प्रेमरूपा** प्रेमरूप आहे.

या सूत्रांत हा आशय व्यक्त आहे कीं भक्ती एका ईश्वराला घेते, व अन्या पासून फिरते. कर्म आणि ज्ञान यांचें साधनांचा ऊहापोह करींत नाहीं. कारण ती स्वतः सिद्ध वस्तु आहे, आणि सतत अखंड कायीक वाचीक मानसिक प्रवाहानें वहती गंगा आहे.

जरी भक्त तू बैस अक्षीं झुरोनी । वियोगीं सदा बैस नाथा स्मरोनी ॥
हरीला उरीं देख डोळे भरूनी । जिवाला त्यजी, राहि नाथा धरोनी १००४

ही भक्ती सर्व त्रिविध तापाचा नाश करणारी वस्तु आहे.

**अमृत स्वरूपा च ( ना. ३ )**

**अमृत स्वरूपा च** म्हणजे मरण निवारक ही भक्ती व आहे. **अमृत** हें ईश्वराचें ही नांव आहे. ॥ अमृतः शाश्वतः स्थाणुर्वरारोहो महातपः ॥ व ईश्वर स्वतः प्रेमस्वरूप आहे.

अरे याज्ञिका! तें तुझें याग जाळी, । पुरे तार्तिका! बैसली कानठाळी, ॥
धरी प्रेम, वस्तू असे कां निराळी? । किती संकटा एक तें प्रेम टाळी ५७९

भक्तीचें प्रयोजन आणि याच सूत्राचें स्पष्टीकरण पुढील सूत्रत्रयीनें केलें आहे.

**यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति, अमृतो भवति, तृप्तो भवति ॥ (ना.४)**

**यत्** जी भक्ति, **लब्ध्वा** लाभली असता, **पुमान्** जीव, **सिद्धो, अमृतो, तृप्तो,** सिद्ध, अमृत, तृप्त **भवति** होतो. जेथें ज्ञातव्य व कर्तव्य असें साध्य राहिलें नाहीं, अशा स्वयंसिद्धपदास भक्ती पोहोंचविते. **कौंतेय प्रतिजानिहि नमे भक्तः प्रणश्यति ॥** भक्ति स्वतः अमृत स्वरूपा आहे. ज्याला लाभली तो अमृत होतो. आतां ती तृप्ती काय सांगावी ?

करू लाडिगोडी तुझ्याशी दयाळे, । अम्ही पुण्य कीं पाप तें वाळियेलें; ॥
गुरु माउले! आजि तुझेचि लीलें, । न केलेंहि केलेंचि, केलें न केलें. ७९६

**यत् प्राप्य न किंचित् वांछति न शोचाति नद्वेष्टि न रमते नोत्साही भवाति॥ ( ना. ५ )**

जी भक्ति प्राप्त झाली असता कोणतेही वस्तूची इच्छा, अथवा नष्टाचा शोक, किंवा उपलब्ध परिस्थितीचा द्वेष, आसक्ति, किंवा उत्साह भक्त धरीत नाहीं.

तपोशास्त्र यशें मठीं मंदिरांत। भिउनी यमा स्वर्ग तो धुंडितात ॥
गुरू गूज तें दाटलें ज्या उरांत। तया आस भीती तगेना मनांत १८६

**यत् ज्ञात्वा मत्तो भवाति स्तब्धो भवाति आत्मारामो भवाति ( ना. ६ )**

जी भक्ति जाणली असतां भक्त मत्त, स्तब्ध, व आत्माराम होतो.

गुरूचा पिसा काय त्या देहधाम ?। तया वेडिया कोणता धर्मनेम ? ॥
उरीं फाटला औषधा काय काम?। मनीं पेटला त्यासि कैंचा अराम ? २३०
तुझा लाडका तो सदा मस्त राहो। पिसा तामसा लोक निंदा हि साहो ॥
हुशारींत चिंता नवा हो नवाहो। तुझें धुंदि माझारिं होणार होवो २०

---

येथें कोणास हें वाटण्याची संभूती आहे कीं, भक्ती म्हणजे एक कामनाच असेल. त्याचें उत्तर सांगतात.

**सा न कामयमाना निरोध रूपत्वात् ( ना. ७ )**

ती भक्ति निरोधरूप आहे म्हणून आपमतलबी कामना नव्हें. **योगःचित्तवृत्ति निरोधः** ॥ योग चित्तवृत्ति निरोधरूप आहे. त्यांत पातंजलानीं पांच प्रकारची वृत्ति सांगितली; (१) प्रत्यक्ष अनुमान आगम रूपी **प्रमाण** वृत्ति; (२) मिथ्या ज्ञानरूप **विपर्यय**; (३) वस्तु–शून्य केवळ शब्दमात्र **विकल्प**; (४) अभाव प्रत्ययालंबन **निद्रा**; (५) शब्द स्पर्श रूप रस गंधादि अनुभूत विषयांचें चिंतन **स्मृति**. या वृत्त्या जीवास इह-पर-लोकीं फिरवितात. त्यांचा निरोध भक्तींत होतो. **ईश्वरप्राणिधानाद्वा। सएषपूर्वेषामपिगुरुः कालेनानवच्छेदात्** ईश्वराचें भक्तीनें वृत्ति निरोध होतो. तो ईश्वर गुरूच आहे.

जरी मेनका देत आलिंगनाला,। भरी अमृतानें मला इंद्र पेला, ॥
करी नारदू गीत, हेरंब चेला। मला नावडे तें तुझा मी भुकेला १५६

आतां निरोधाचें सामान्य लक्षण सांगतात.

**निरोधस्तु लोक वेद व्यापार न्यासः ( ना. ८ )**

तो निरोध लौकिक भोजनादिक, आणि वैदिक यज्ञ दानादिक, कर्मांचा न्यास म्हणजे ईश्वराचें ठिकाणीं समर्पण आहे. **यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासियत् । यत्तपस्यासि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥**

गुरू माउलीवीण नेणोंचि आन । तनु प्राण हा जीव नामीं गहाण ॥
नसे भोग मोक्षादिकाची तहान । असे मुक्त तेजाप--भू--वायुहून ३७

लौकिक व वैदिक व्यापाराचा **न्यास** म्हणजे ईश्वराचे ठिकाणीं समर्पण, आणि दृष्टानुश्रविक विषयाबद्दल वैराग्य, असें भक्तीचें एक अंग सांगितलें. आतां दुसरें अंग हरिविषयीं **अनुराग** सांगतात.

**तस्मिन् अनन्यता तद्विरोधिषु उदासीनता च ॥ ( ना. ९ )**

तस्मिन् ईश्वरांविषयीं **अनन्यता** एकलौतेपण, आणि **तद्विरोधिषु** त्याचें विरुद्धाविषयीं **उदासीनता** दुर्लक्ष ठेवणें, हें भक्तीचें लक्षण आहे.

जिथें मूर्ति तूझी तिला मी पुजीन । जरी वीष देसी तरी मी पियीन ॥
तुझें प्रीतिनें जाहलो सर्व हीन । बरी हीनता ती महा शक्तिहून ४८३
दशांगीं, नवा भक्ति, अष्टांग डौलें । सदा भूमिका सात, षटशास्त्र बोलें, ॥
असू पंच, चारी अवस्था, त्रिकालें, । शिवे दोन, एका गुरूपायिं आले १६९
गुरू माय तूं आगळी विश्वरूपा । मरे जो पथीं आगळा स्वर्गभूपा ॥
तुझी पायधूळी सुखा दे अमूपा । रवी कोटि एका रजीं जात लोपा १७०

पुन्हां अनन्यतेचें स्पष्टीकरण करितात.

**अन्याश्रयाणां त्यागो अनन्यता ॥ ( ना. १० )**

इतर कोणतेही आश्रयाचे अवलंबन न करितां, त्यांचा त्याग, तीच अनन्यता.

मज नाहीं कोणी मला माझा भगवान । शेवटाला न्यावा देवा माझा अभिमान ॥

**सत्यभामेनें** जन्मोजन्मीं श्रीकृष्णच पती मिळावा, **नादत्त मुपतिष्ठति**, म्हणून दानाचा आश्रय केला; पण तिची फजीती झाली ती सर्वांना माहित आहे.

दिलें दान, तू सांडिला नाथ भामे; । तुकीं साधिला रुक्मिणीनेंचि प्रेमें. ॥
बनें काम प्रेमें, न कीं नेमधर्में, । विना प्रेम धर्मार्थकामें हमामे. ५२४

भगवदाज्ञा ही आहे:-**सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥**

समूळीं जळें शास्त्र आणीक कर्म, । गुरूपायिं जाण्या मिळें तेथ वर्म. ॥
अधर्मीं दिसे धर्म, धर्मीं अधर्म, । तयालाचि पावे इथे आत्मधर्म. ३८०
गुरू दारिं मी कर्म संभार नेलें, । शिखा सूत्र माळा टिळे सांवरिले; ॥
गुरू सेवकें तेथ माझें विटाळें । गवाळें दुरीं फेकिलें, सारवीलें. १००

नवव्या सूत्रांतील उदासीनतेचे स्पष्टीकरण करितात.

**लोकवेदेषु तदनुकूलाचरणं तद्विरोधिषूदासीनता ॥ ( ना. ११ )**

लौकीक व वैदिक कर्मांतही ईश्वरास आवडील तींच कर्में करावीत, पण तद्व्यतिरिक्ताविषयीं चर्चाही नसावी.

नसे जेथ प्रेमीं गुरूश्रीशिवाचा, । नसे नाच जेथें तुकाग्यानबाचा, ॥
त्वरें तेथुनी तूं पळे रे सुखाचा, । असे बोध हा, क्रोध कांरे फुकाचा. २३१
सुखाचेनि ताटीं प्रसादाचि वाटी, । बहू गोड साहित्य संगीत गोष्टी; ॥
जया कर्मठा नाम आलें न ओठीं, । बरा दूर तो योजने लक्ष कोटी. २३२

कदाचित् इथें ही शंका येईल कीं, अंत:करण शुद्धीकरितां भक्तीस अनुकूल शास्त्राचें आचरण आवश्य आहे. परंतु भक्ती प्राप्त झाल्यानंतर त्याची आवश्यकता नाही, म्हणून शास्त्र पालन कुणी करील त्याला भक्ती नसेल. याचें उत्तर:—

**भवतु निश्चय दार्ढ्यादूर्ध्वं शास्त्र रक्षणम् ॥ ( ना. १२ )**

हरिचरणीं निश्चय दृढ झाल्यानंतरही शास्त्र रक्षण होऊं शकते. कां तर:-

**अन्यथा पातित्य शंकया ॥ ( ना. १३ )**

शास्त्र रक्षण न केल्यास पतन पावेल.

तुम्हा आवडे सेवणे प्रीति-सारा । मनाला सुधारा, न घ्यावे विकारा; ॥
पचें प्रेम, जैं सर्व वृत्तीसि मारा, । न कीजेल पिडा, कुणा वेडचारा. ७४७

**लोकोऽपि तावदेव भोजनादि व्यापारस्त्वाशरीर धारणावधि ॥ (ना. १४)**

लौकिक भोजनादि व्यापार शरीर निर्वाहा पुरतांच असावा. नीति परिच्छेदांत याचें विवेचन आलें आहे. सारांश लौकीक मर्यादा व शास्त्र रक्षण फक्त भक्तीस अनुकूल असेल तेंव्हांच विहित आहे. भक्तीस प्रतिकूल होईल तेंव्हां हीं गुंडाळून ठेवावीं. ॥ प्रल्हादें जनक, बिभीषणें बंधू । राजमाता निंदू । भरतें केली. ॥

**तल्लक्षणानि वाच्यंते नाना मतभेदात् ॥ ( ना. १५ )**

भक्तीची लक्षणें नाना मतभेदांनीं सांगितली. **श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं अर्चनं वंदनं दास्यं सख्य मात्मनिवेदनं** ॥ याप्रमाणें नवविधा लक्षणें सांगितली आहेत. भिन्न आचार्यांचें मतें विविक्षित प्रकारामध्यें अनुरक्ती भक्ति आहे.

**पूजादिष्वनुराग इति पाराशर्यः ॥ ( ना. १६ )**

व्यासांचें मतें अर्चनादिकांत आसक्ती भक्ति होय. अर्चनापासून पुढें प्रभूसी सान्निध्य व निकट संबंध असतो. ॥ देव पूजूनि पहावा ॥

**कथादिष्विति गर्गः ॥ ( ना. १७ )**

गर्गाचार्यांचें मतें श्रवणकीर्तनादिकांत आसक्ती भक्ती होय.

अणा साजणीणा गुरूचें पहाटें, । गुरू माउली आठवे गोड वाटे, ॥
मला या जगीं तीन आनंद साठे, । गुरू, प्रेम, मस्ती, इथें सर्व आटें. २४४
मुखें राम गा, तेंचि रे रामराज; । ध्वनी आइके, तेंचि संगीत बीज; ॥
नको आठवू जन्म, मृत्यूसि लाज; । सुखी ऐस रे, कीं सुखासींच काज. २०१

**आत्मरत्यविरोधेनेति शांडिल्यः ॥ ( ना. १८ )**

शांडिल्याचार्यांचे मतें पूजार्चा किंवा कथाकीर्तनादिकांत, आत्मचिंतनास विरोध न येतां, जी आसक्ती ती भक्ती होय.

कुणी गुंतती गायनाचें विलापीं, । कुणी कुंथती योग कीं मंत्र कल्पीं; ॥
तरेना कुणी, वाहती सर्व आपीं; । गुरू जागतो, येर ते अधवापीं. ३००
तुझा कृष्ण राधे कुणा मागतेसी? । तुझा दर्द त्याला दवा तूचि खासी. ॥
झुरे एकली बैसुनी तू मनासी, । तुझा प्राणनाथू तुझ्या तो उशाशी. ५४५

या सर्व मतांचा विचार करून नारद आपलें मत देतातः—

**नारदस्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परमव्याकुलतेति ॥ ना. १९**

**कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ॥**
**करोतियद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥**

याप्रमाणें सर्व कर्मे हरीस अर्पण करीत असतांना, एकादे वेळीं विस्मरण झालें तर अत्यंत व्याकुलता, हें भक्तीचें लक्षण नारद सांगतात.

गुरू जीव हा जाय तुझे सुरीनें, । बढू दाह हें प्रेम माझें उरीं ने; ॥
कुणी दाह तो वर्णितीं वैखरीनें । तयाहून मी दग्ध तुझें दुरीनें. १९५

**॥ त्रिभुवन विभव हेतवेऽप्यकुंठस्मृतिरजितात्मसुरादिभिर्विमृग्यात् ॥**
**॥ न चलति भगवत् पदारविंदाल्लव निमिषार्धमपि यः सवैष्णवाग्र्यः ॥**

भाषा.-त्रिभुवनिची जरि येत बादशाही । स्मरणा खंडित जो क्षणार्ध नाही, ॥
जडला सुरवरवंद्यनाथ पायीं, । न सुटे तो निमिषार्ध भक्त भाई. ॥

या भक्ति लक्षणासंबंधानें चंद्रकलेचा व राधेचा संवाद असा ऐकण्यांत आला. पूजा गायनादिकांचे रंगांत गुंतलेली चंद्रकला राधेस सांगते:—

॥ बोले चंद्रकला, धरूनि हरिला मीं मंदरीं राखिला, ॥
॥ सौरभ्यें उटिला, फुलें विनटिला, कस्तूरिनें रेखिला. ॥
॥ नाना गान कलाप चातुरि कला पूजूनि मी देखिला; ॥
॥ राधे! लाभ कमाविला बहु मिया. तू कोणता चाखिला? ॥ १ ॥

राधा उत्तर देते:—

॥ बाई! धन्य तुझी, परी मम घरीं येई न जाई हरी, ॥
॥ कुंजीं एकसरी धरी मज करीं, नेणूं निशीं वासरीं, ॥
॥ नेणे मी कुसरीकला, कशितरी मी आहिरी पामरी; ॥
॥ जें जें नाथ करी कधीं न विसरी, दासी तयांची खरी. ॥२॥

वरील कहाणीप्रमाणें नारद म्हणतात.

**अस्त्येवमेवम् ॥ ( ना. २० )**

अशीं वेगवेगळीं भक्तांचीं अनेक उदाहरणें आहेत.

**यथा व्रज-गोपिकानाम् ॥ ( ना. २१ )**

उदाहरणार्थ गोकुलांतील गोपींनी आपलीं सर्व कम श्रीहरीस अर्पण करून तो किंचितही त्यांचेपासून दूर गेला असता व्याकुळ झाल्या.

आतां कोणास अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, देवाचें स्वरूपांत भक्त समरसतो तेव्हां देवाचें मोठेपण विसरून आपलें सारखाच कुणी एक त्यास लेखिल, व मग भक्तिशास्त्राची हानी होईल. या शंकेचें निरसन:—

**तत्रापि न माहात्म्य-ज्ञान-विस्मृत्यपवादः ॥ ( ना. २२ )**

सामरस्यांत भक्त देवाचे माहात्य कधीं विसरत नाहीं, गोपीगीत:—

**॥ नखलु गोपिकानंदनो भवानखिल देहिनामंतरात्मदृक् ॥**

**॥ विखनसार्थितो विश्वगुप्तय सख उदेयिवान्सात्वतांकुले ॥**

भाषां.-नंदनंदना! नव्हसि चीमणा, । अखिल जीविं तू साक्षि देखणा, ॥

विधि तुला स्तवी विश्वपाळणा, । यदुकुलीं सख्या येसि पाळणा. ॥

हरी सावळ्या वीण तें ब्रम्ह नाहीं । असी सत्य वाचा, कळेना जनाही ॥

अरे मोहनाशी हरीनाम घेई । हरी रूप होतील रे देश दाही ४१५

**तद्विहीनं जारणामिव ॥ ( ना. २३ )**

जर माहात्म्याची विस्मृती होईल, तर ती भक्ती नसून जाराचे ठिकाणीं आसक्तीप्रमाणें होय. पण गोपींची तशी आसक्ती नव्हती. एक गोपी म्हणते:—

अहो भाउजी! मी हरी कां न सोडी? । हरीसी रतूनी स्वधर्मासि जोडी; ॥

क्रिया वंचकें त्यागिजे काम खोडी; । जरी पाप प्रेमीं, शिरीं याचि फोडी. ७१७

**नास्ति तेषां तत्सुखि सुखत्वम् ॥ ना. २४**

जारांचे ठिकाणीं जी आसक्ती असते तींत जाराचें सुखाकरितां स्वतःचें हानीचा संतोष नसतो; उलट स्वतःचे कामनापुर्तीची इच्छा असते. भक्तीमध्यें हरीचें संतोषाकरितां स्वतःचा लोप असतो.

नसो फूल आम्हा, पुरे येथ कांटा; । नसो लाभ आम्हा, पुरे येथ तोटा; ॥

मठा मंदिराचा नको थाट मोठा, । पुरे हा तुझें दारिं लंगोट सोटा. ॥

रासोत्सवास कुंजवनीं गोपी आल्या. ' गोकुळास परत जा ' असे भगवंतानीं सांगितलें. गोपी म्हणतात:—भा. १०।२९

**मैवं विभोर्हति भवान्गदितुं नृशंसं संत्यज्य सर्व विषयान्स्तव पादमूलम्॥**
**भक्ता भजस्व दुरवग्रहमात्यजास्मा न्देवो यथादिपुरुषो भजते मुमुक्षून्॥**

या तीख बोलिं चिरिसी हरि कां उराला? । टाकूनि भोग जडलो तव पांपराला; ॥

आम्हा न सांडि, भज. येसि न कां कराला? । श्रीविष्णु देख भजतो निज किंकराला. ॥

श्रुती शास्त्र बोलें जयाचा पवाडा, । तपी योगि ही घालिती पैज होडा; ॥

मना उन्मना देत आनंद मोडा, । अगे सर्व सोडा, हरी प्रेम जोडा. ५४९

---

'एष पंथा एतत्कर्मैतत् ब्रह्मैतत्सत्यम्' ही ऐतरेयारण्यक श्रुती वेदोक्त कर्मानें सत्य स्वरूपाची प्राप्ती सांगते. परंतु 'आमयो यश्च भूतानां जायते येन सुव्रत तदेव ह्यामयं द्रव्यं न पुनाति चिकित्सितम्'।। ज्या कर्म सेवनानें संसार रोग झाला पुन्हां त्याचेंच सेवनानें त्या रोगाचा नाश होणार नाहीं. 'ज्ञानादेवतुकैवल्यम्' मुक्ति ज्ञानानेच होते, म्हणून बाह्य कर्मांचा त्याग करून ज्ञानी आत्म-तत्वाचा विचार करितो. विचाराचे योगानें आत्मस्वरूपावर जें आवरण असतें त्याचा नाश होतो, व आत्मस्वरूपाची झलक दिसतें. परंतु आत्मस्वरूपास चित्ताची जी उपाधी आहे त्याचा नाश अभ्यास व वैराग्य या दोन अंगाच्या योगावाचून होत नाहीं. भगवंत म्हणतातः—

॥ तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योप्यधिकोमतः ॥
॥ कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥

याप्रमाणें पायरी पायरीनें अधिकारपरत्वें साधक कर्म, ज्ञान, योगाचें अनुष्ठान करितात. पण नारद म्हणतातः—

**सा तु कर्मज्ञानयोगेभ्यो प्याधिकतरा ॥ ना. २५**

या तिन्ही कर्म ज्ञान योग मार्गापेक्षां भक्तीच अधिक आहे. श्रीभगवान म्हणतात

॥ बहूनां जन्मनामंते ज्ञानवान् मां प्रपद्यते ॥
॥ वासुदेवः सर्वमिति समहात्मा सुदुर्लभः ॥

आणि योगासंबंधानें म्हणतात ॥ योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना । श्रद्धावान्भजते यो मां स योगी परमो मतः ॥ कर्म, तप, ज्ञान, व योगासंबंधानें उमर म्हणतो.

तुझें मंदिरी भक्त गर्जोत साचे, । जळो सोवळें ओवळें याज्ञिकाचें, ॥
क्रिया गोदडी बोचकें भिधुकाचें । पदासी पडू दे तुझें पायिकाचे. ४१७
तुझें पायिं या तापसांचे न चाले, । स्वता ताप तापूनि बेजार झाले, ॥
तनू-बुद्धि सिद्धीमध्यें बद्ध झाले, । नरा प्रेमळा देखुनी क्रुद्ध झाले. ४६७
हटीं कीं मठीं येक ते वायकाट, । घटीं कीं पटीं येर ते नायनाट; ॥
वदे गोपिका एक तेथें अचाटः—'न भेटे सखा ती असे काय वाट?' ६९९

या कर्म तप, ज्ञान, योगाचें पर्यवसान जर भक्तींत न झाले तर ते निरर्थक आहेत. भक्तीचे तसे नाहीं.

**फलरूपत्वात् ॥ ना. २६**

कारण भक्ति फलरूप आहे.

धरी भक्ति, कामा कृती ये न युक्ती, । दया श्रीहरीची, मिळे जेथ प्रीती. ॥
अरे केर ते जे न प्रेमा वरीती, । घरीं आणि घाटीं खराची फजीती. ५७७
मला रोग तूझा जळे हाड संधी, । न सेवू तुला तैं स्वहत्याचि साधी, ॥
तुझेवीण सारे कुपथ्येंचि बाधी, । दवा, पथ्य तू, वैद्य तूं, तूचि व्याधी.४०७
जयें प्रेम चित्तांतरीं शोधियेलें, । तयाचें घरीं ब्रम्ह धुंडीत आलें; ॥
क्रिया योग विद्या बहू पंथ झाले, । परी सद्गुरू धाम हें सिद्ध ठेलें. ९४५

या तप, कर्म, ज्ञान व योगावर टेक ठेवून स्वसामर्थ्यानें उद्धरून जावू म्हणेल तो अभिमानांत गुरफटून प्रभुला उलटा अंतरतो.

**ईश्वरस्याभिमान-द्वेषित्वात् दैन्य-प्रियत्वाच्च ॥ ना. २७**

हरी अभिमान्याचा तिरस्कार व भक्ताचा स्वीकार करतो. भक्त त्याचे दये वरच भिस्त ठेवतो,-" जैसा गर्भ गोळा उद्यमाते कोणाही नेणें,"–म्हणून दीन दयाळ नाथ त्याचा अंगिकार करितो.

मुनी मानवी येथ जे विश्वसार; । जितप्राण जाती नभा पैलपार, ॥
तुला नेणती खा परी ते गव्हार, । भ्रमीं पेलिती निम्नदृष्टीच शीर. ४०४
मना वायुचा अश्व तथें न वाही, । मला मोहिलें नावरें चित्त कांहीं;॥
परी देखणा दृष्टिलें येत नाहीं, । हरी नेत्र तो, कोण नेत्रासि पाही? ५७६
नको एक ही वासना थोरिवेची, । तुला थोरवी खास पाडील खाची, ॥
असे नम्रता रत्नखाणी सुखाची, । कुणाला सरी नम्रतेच्या नखाची ? ८७५
ऋषींनीं बहू येथ केला विचार, । तुझे द्वारवीना नसे पंथ येर; ॥
असे एक दीनत्व येथें अधार । क्रिया-जात ते व्यर्थ धोके असार ९६२

---

पुन्हां भक्ति व ज्ञान यांचे साध्य साधनाचा विचार करितात:—

**तस्या ज्ञानमेवसाधन मित्येके ॥ ना० २८**

बहूनां जन्मनामंते ज्ञानवान् मांप्रपद्यते ॥ बहुत जन्मा नंतर ज्ञानी भजू लागतो असे भगवद्वाक्य आहे. मग ज्ञान हें भक्तीचें साधन आहे असें

कोणी म्हणतील. भगवंताचा आशय इथें हा असावा कीं 'अहंब्रम्हास्मि' चें शृंगावर पोंहचल्यानंतर पुन: 'वासुदेव: सर्वमिति' या सपाटीवर उतरणें अवघड होते. घसरला तर 'विषयच' ब्रम्ह आहे या खड्यांतही पडतो. म्हणून तो या भक्तीस पोंहोचत नाहीं. त्याला वाटते "काकू करूं प्रणाम?". मग हरिरूप गुरू सन्मुखचाही दिसत नाहीं.

हरी सन्मुखीं, नोळखे मी तयाला; । मला भेटला, घेतलें मी भयाला; ॥
रिघे मी पुन: त्यासि धुंडावयाला । पडे तोचि कीं फेर आकाबयाला ६९६

दुसरे असें म्हणतात कीं भक्ति व ज्ञान हे अन्योन्याश्रयी आहेत.

**अन्योन्याश्रयत्वमित्येके ॥ ना. २९**

**यस्य देवे पराभक्ति र्यथा देवे तथागुरौ ॥**
**तस्यैते कथितान्यर्थान्प्रकाश्यंते महात्मनाम् ॥**

भक्तीचे योगानें हरिची ओळख होतें हें तर खरेंच आहे.

तुला ओळखी प्रेम, तूझी दया ही. । अजाणा! नरा पाप भूताड खाई. ॥
तुला नोळखे तो कामासि येई; । तुला ओळखे तोचि माणूस होई. ९४

पण ज्ञानानें भक्ति प्राप्त होईल या म्हणण्याचें निरसन मागेंच झालें आहे. नारद म्हणतात:—

**स्वयं फलं-रूपेति ब्रम्हकुमार: ॥ ना. ३०**

भक्तीच फलरूप आहे, कारण भगवान म्हणतात:—

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चापितत्वत: ॥**
**ततोमांतत्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥**

भक्तीचे योगानेंच मला ओळखतो व पुन्हां भक्तीचें योगानेच मत्स्वरूपांत समरसतो.

युगारंभि, आतां, पुढें ही युगांतीं, । कुणी ही पहा, सार ही वस्तु प्रीती. ॥
कुणी प्रीतिला साधना पैं विकीती, । परी याहुनी श्रेष्ठ ते काय घेती? ३८३

याविषयीं नारद एक व्यावहारिक दृष्टांत देतात.

**राजगृहे भोजनादिषु तथैव दृष्टत्वात् ॥ ना. ३१**

कहाणी:—राजाचें भोजनाची वेळ, नौबत सुरूं झाली. प्रधान, मांडलिक स्वत:स राजासमान (अहंब्रम्हासि) समजणारांना चौबेदारांनीं 'चले जाव'चा

इषारा दिला. राजानें त्यांना भोजनास विचारिले नाहीं. त्यांना परान्न वर्ज व नक्त असे. राजा भोजनगृहांत आला. आमात्य, कारभारी, पात्रासादन वाढण्या मांडण्याचें कर्मांत गुंग होते. राजेसाहेब येऊन पाटावर बसले तरी यांचा गलगा संपेना. तेव्हां **'कदम मुलाहिजा निगाह रौषन' 'चरणाच ध्यान करा, दिव्य दृष्टीनें पहा.'** असे चोबदार ओरडले, तरी यांचा गलबला चालूं होता. मोदीखाना, जामदारखाना, कोठी, येथील अधिकारी सर्व आपआपले अधिकार **योगांत** राहून, आसनावरून हालले सुद्धां नाहींत. राजाचें पात्र मांडलें; भोजनास बसणार, इतक्यांत अतिथीची आरोळी आली:–

"ठाकलोसे द्वारीं । उभा याचक भिकारी ॥१॥ मज भीक कांहीं देवा । प्रेम भातुकें पाठवा ॥२॥ याचकाचा भार । घेऊं नये येर झार ॥३॥ तुका म्हणे दान । सेवा घेतल्यावाचून" ॥४॥

अतिथि भगवंताची मूर्ती असे राजा जाणत होता, व **भुज्यंते तेत्वघं पापा येपच्यंत्यात्मकारणात्** या उक्तीप्रमाणें एकटें जेवणें ही त्याला आवडत नसे. सारांश त्या अतिथीस पंक्तीला घेऊन राजानें संतोषयुक्त भोजन केलें.

**नतेन राज परितोषः क्षुत्शांतिर्वा ॥ ना. ३२**

आतां राजाचे समान स्वतःस समजणारे प्रधान, आपलें कर्मांत गुंतल्यामुळें कारभारी, व कोठीचे अधिकारी योगी, भोजनास आले नाहींत म्हणून राजाला संतोषही झाला नाहीं व त्यांनाही उपासीच रहावे लागले.

**तस्मात्सैव ग्राह्यामुमुक्षुभिः ना० ३३** म्हणून भक्तीच मुमूक्षूनी स्वीकारावी

नको काळजी जाणिवे नेणिवेची, । गुरू पाउलीं सर्व जीवत्व वेची, ॥
वसे आत्मनिष्ठा सतांचे सवे ची । रुची मुक्त होउनि घे राणिवेची ५४४

---

मागें सांगितलें कीं, कर्म, ज्ञान, व योग यांची आवश्यकता नसून भक्ति फलरूप आहे. ते फळ हातीं यावें कसें ? ज्याला भक्ति नाहीं त्याला ती कशी प्राप्त होणार? भक्तिपंथ निराशावादी नाहीं. उलट सर्वांस ही येथें आशाच आशा आहे.

फिरे मागुता ऐस कीं तू कसाही, । जरी पातकी घोर माघार घेई, ॥
कुणाही निराशा गुरूदारिं नाहीं । अनंतापराधी तरी लाग पायीं. १९

**तस्या साधनानि गायन्त्याचार्याः ॥ ना. ३४**

भक्तीची साधनें आचार्य असें गातात:—

वेशीं लावियेला टीळा । अमंत्रण दिधलें सकळा ॥१॥
आपण जेउनि वाढी लोका । संतर्पण करितो तुका ॥२॥
यारे यारे लहानथोर । याति होका भलते नर ॥३॥

याप्रमाणें ज्यांना भक्ति लाभली, ते आपले अनुभवाचा इतरानाही लाभ देण्याकरितां पाचारण करितात. जेवणाचें आमंत्रण आलें म्हणजे स्नान करून सोवळ्यानें जाण्याची जुनी चाल आहे. काळा कोट, पांढरा फ्रंटदार शर्ट असेल तरच डिनर हॉलमध्यें प्रवेश होऊं शकतो. संताचें घरीं भक्तिचें भोजनास आमंत्रण आलें म्हणजे काय रिवाज आहे ? नारद सांगतात:—

**तत्तु विषय-त्यागात्संग-त्यागाच्च ॥ ना. ३५**

बाह्य विषयांचा इंद्रियाशी, व चिंतनरूपानें अंत:करणाशी, संग घडतो. त्या दोहीच्या त्यागानें अंतर्बाह्य निर्मळ होऊन संतांचें घरीं जावे लागते. नाहीं तर व्यर्थ आहे. ॥ ज्यानें विठ्ठल मात्रा घ्यावी । त्यानें पथ्य सांभाळावी ॥ याविषयीं नीति प्रकरणांत उमरची सुभाषितें आलीं आहेत. पण विषय आणि त्यांचें चिंतन याचा त्याग कसा होईल, आणि भक्ति फल हातीं येण्याकरितां पेरणी कोणती करावी, याचें उत्तर नारद सांगतात:—

**अव्यावृत भजनात् ॥ ना. ३६**

विषय व त्यांचें चिंतनाचा विसर अखंड भजनानें होतो. तसेंच भक्तिफल येण्याचें बीज हा भजनच आहे.

गुरू गायिरे, शोक जायी, कृपा हे । इहामुत्र भोगा मनीं ही न साहे, ॥
गुरू प्रेम अग्नी मधें शीतता हे । तुझे धूळ—वातें जगीं प्रेम वाहें. ३१९
गुरूनें मला रंगवीलें स्वभावें, । तनू माजि श्री माउली घोष पावें ॥
सदा नाम हें गाइलें तेंचि गावें, । मुखीं नाम, नामांत चित्तें असावें. ३

आणि **लोकेऽपि भगवद्गुण-श्रवण-कीर्तनात् ॥ ना. ३७**

लोकांत ही भगवंताचे गुणानुवाद व त्याचें श्रवणानें भक्तिची पेरणी होते. याविषयीं रुक्मिणी देवी स्वानुभव सांगतें. ॥ भागवत स्क. १० अ. ५२

**श्रुत्वा गुणान्भुवन-सुंदर शृण्वतांते निर्विश्य कर्णविवरै हरतोंऽग तापम् ॥**
**रूपं दृशां दृशिमता मखिलार्थलाभं त्वैय्यचयुता विशति चित्तमपत्रपं मे ॥**

कानीं शिरूनि भिनली मम अंतरंगा। कान्हा तुझी गुण-सुधा भव-ताप-भंगा ॥
त्वद्रूप नेत नयना अखिलार्थ तुंगा । निःशंक चित्त विघुरे तव पादगंगा ॥ १॥

गुरू गायिरे नाहि छोटी न मोठी, । न येतील बाहत्तरा खोडि पोटीं ॥
पदें ही न लोटीं सुधासार वाटी, । अरे लेश घोटी विरे क्लेश कोटी. ३२०
तुझें मंदिरीं दीन होवोनि राहू । पतंगापरी त्वतत्स्वरूपांत नाहू ॥
तुझें प्रेम गंगेंत हे नाथ पोहू । समाधीसुखा देखता तूज लाहू ६३९

भक्ति-सुधा भरण्यास पात्र शुद्ध पाहिजे, करितां वरील साधनें संपादनीय आहेत. परंतु तेवढ्यानें भागत नाहीं, म्हणून पुढें नारद सांगतातः—

**मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्-कृपालेशाद्वा ॥ ( ना. ३८ )**

हृदयाला चेतविणारी वत्ती संतसद्रू-रूप हरीचे हातांत आहे, म्हणून तिची याचना व मार्ग-प्रतिक्षा करीत रहावे.

गुरू माउले देख, दावी स्वरूप, । तुझे राशिचा एक दाणा अमूप; ॥
तुला सर्व ठावे, असू आम्हि चूप, । तुझी दृष्टि दावी अम्हा विश्वरूप. ९८
तुझ्या त्या दयेची असी एकवेळ, । जिथे देखिजे तो सुखाचा सुकाळ; ॥
दिठी दिव्य देई जलाची झळाळ, । सुधासार वर्षे तुझी पायधूळ. २८७

असो. भक्ति प्राप्त होण्यास संतसद्गुरूची कृपा, व ती कृपेची वेळ येई तोपर्यंत त्यांची संगत झाली पाहिजे. याविषयीं सांगतातः—

**महत्संगस्तुदुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥ ( ना. ३९ )**

सत्संग दुर्मिल आहे, कारण आपलेच विकल्प त्याला प्रतिबंधक होतात व संतापासून आपणांस दूर फेकतात.

फिरस्ता अला संशयी मोह मांग, । मलीं रौरवीं माखिला सर्व अंग; ॥
न नारी नरू, भंगि मत्प्रेमरंग; । धिगैश्वर्य विद्याबला ! सत्र सोंग १०४१
गुरूचे दयेवीण बुद्धीच वाया, । सरे बुद्धि ही आड रानीं रिघाया. ।
कृपेनें तुझ्या माउले बांधि पाया, । स्वभावासि शुद्धीसि तू एक ठाया. ९६०

सत्संगाचें महात्म्य वर्णावयास अशक्य आहे. सत्संग रामबाण आहे.

अवज्ञू नको प्रेमळा सिद्ध शुद्धा। विकल्पासि मारूनि घे सिद्धपादा ॥
नरा दांभिका मारुनी टाक वादा। अव्हेरू नको प्रेमळाच्या प्रसादा ५२०

दुर्लभ सत्संग सुद्धां त्याचेच दयेनें मिळतो.

**लभ्यतेऽपितत्कृपयैव ॥ ( ना. ४० )**

आत्मज्ञान नित है, जीव मीलन गुरु हाथ।
भक्तन कू संत मिले, जद कृपा करे रघुनाथ ॥

नये मानवी देह हा बार बार,। न लाभेल सत्संग हा प्रेमसार, ॥
दिला श्वास हा, नाथजीचा अभार,। परी भीति, हा श्वास जाई न पार. ६४५

गुरूची कृपा आमुचे काय हाती?। उठाठेव कीं यत्न सारी फजीति, ॥
बसूनी सदा वाटते हीच खंती,। त्वरेनें न आलो परी शीघ्र नेती. २६५

आतां ईश्वराचीच कृपा मुख्य आहे तर त्याचेंच चिंतन, श्रवण, कीर्तन पुरें आहे. याचें उत्तरांत नारद म्हणतात कीं सत्संगावाचून इश्वराचें दर्शन होणार नाहीं.

**तस्मिन्स्तज्जने भेदाभावात् ॥ ( ना. ४१ )**

ईश्वरांत आणि संतांत भेद नाहीं. **'संत तेचि भगवंत.'**

अनाद्यंत गूजासि मी तू न जाणू। कसें प्रेमबीजासि उच्चारि आणू ॥
पटा आड मी तू, कहाणी पुराणू,। पटा सारिता मी न तू, कोण नेणू. ९१

अंतर्पट सारून संता भगवंताचे लग्न लागलें आहे. संताची अवकृपा असेल तर देव सुद्धा कृपा करणार नाहीं. म्हणून—

**तदेव साध्यताम् तदेव साध्यताम ॥ ( ना. ४२ )**

सत्संगच साधावा, भक्तीच साधावी.॥संतदर्शनीं हा लाभ। पद्मनाथ जोडला॥

सुखी ऐस रे एक दो तीन सांस,। गुरू सावळ्याच्या वसे आसपास ॥
जितावी अखेरी, असी तूज आस,। तरी होय तू पूर्ण, कीं पूर्णदास ५५६

---

मागें नवव्या सूत्रांत ईश्वरासी अनन्यत्व व त्याचें विरुद्धासी उदासीनत्व सांगितले. येथें वर सत्संग साधण्यास आदर पूर्वक सांगितले. मग दुःसंग असेल तेथें उदासीन पणानेंच राहावें, असी शंका येईल म्हणून सांगतात.

**दुःसंगः सर्वथैव वर्जनीयः ॥ ( ना. ४३ )**

सहवास, संभाषण,व चिंतन या योगानें कायिक वाचीक मानसिक संग होतो. तो वाईटासी सर्वथा सर्व काळीं त्यागावा.

मनारे नको संग संसारीयांचा, । नको घेउ वारा हरी वैरियांचा, ॥
धरी उंबरा संत गोसावीयांचा । प्रियू होसि तूं गा हरीचे प्रियांचा ॥४३०॥

आपला निश्चय दृढ आहे तर थोडीसी मौज पाहण्यात काय बिघडलें?असे कोणी म्हणतील त्यावर उत्तर—

**काम क्रोध मोह स्मृतिभ्रंश बुद्धिनाश सर्व नाश कारणत्वात् ॥ ना. ४**
**संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते । क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृति विभ्रमः॥ स्मृति भ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति॥**

पहिले दर्शन, संभाषण संगत, नंतर काम, मग क्रोध, पुढें संमोह, लगेच स्मृति-भ्रंश, झाला बुद्धिनाश, तोंच अंध तम.याप्रमाणें नरकांस वाहविणाऱ्या ( अंडर-ग्राऊंड ड्रेनेज)पाताळ मोरीमध्यें(सिटी—इम्प्रूव्हमेंट बोर्ड,)नगर सुधारक मंडळानें वैतर्णीचा कालवा आणून सोडल्यामुळें झटकन मैला अंतिम गर्गेत पोहोंचून पुन्हां मागून येणारास मोकळा मार्ग रहातो. **उमर** म्हणतो:—

मला जाच राहो इथें सज्जनांचा, । सुखें नीच मी दास होई तयांचा; ॥
जरी देखिजें नर्क प्रत्यक्ष साचा, । तरी रौरवू गौरवू दुर्जनांचा. २५६
नसो नीच मूढासि प्रीति प्रसंग, । जरी ठेविसी होतसे चित्तभंग,॥
वितंडे, रडे, ओरडे, होत दंग, । खळीला चढे, नासतो प्रेमरंग. ४७८

साधकानें वरील विकारापासून चित्त झाडून निर्मळ ठेवलें पाहिजे. पण एक दिवस झाडण्यानें भागत नाहीं. मळ बाहेरचा नाहीं आंतून त्याचा पाझर आहे. सतत आपले वृत्तीवर खराटा फिरत रहावा. कारण:—

**तरंगाइता अपीऽमे संगात्समुद्रायांति ॥ ( ना. ४५ )**

वृत्तीचे तरंगांतून ज्या लहरी निघतात त्या खुद्द एकेक समुद्र बनतात. हेकेलचा एक अणुजंतु ( प्रोटोप्लाज्ज ) त्याला अनुकूल अशा ( **सीरमांत** ) सडलेल्या द्रवांत राहिला असता एका दिवसांत आपले सारखे हजारो अणुजंतु वीतो. हें त्या उपनिषदाचे शेळीचें अति निकृष्ट जडरूप आहे. पण वृत्ति—रूपी तिचे सुंदर व चंचल स्वरूपांत अचाट शक्ती आहे. तिला अनुकूल असे **सीरम**

म्हणजे सडक्या वार्तोचा रस पुरे, एका क्षणांत बिंदुची ती सिंधु होते.

गुरू सांगिजे वृत्तिचा काय फंदू? । "मुला वृत्तिची काहणी लांब छंदू. ॥
असे वृत्ति चित्सागरीं एक बिंदू, । तळीं बिंदुच्या दाटला पूर्ण सिंधू." ५२७

---

मी (अहं) म्हणून एक वृत्तिचा बुडबुडा उठला कीं लगेच बिंदूचा सिंधू, व त्यांत ममच्या बुडकुळ्या सुरू होतात. आई सांगते (अध्याय ७) येथ एक नवलावो। जो जो कीजे तरणोपावो । तो तो अपावो। होय ते ऐक॥ ८२॥ एक स्वयंबुद्धीच्याबाहीं। रिगाले तयांची शुद्धीचि नाहीं । एक जाणिवेच्या डोहीं। गर्वेचि गिळिले॥ ८३॥ एकीं वेदत्रयाचि या सांगडी । घेतल्या अहंभावाचिया धोंडी । ते मदमीनाच्या तोंडी । सगळेचि या गेले॥ ८४॥ एकीं वयसेचें जाड बांधलें । मग मन्मथाचे कासे लागले । ते विषय मगरीं सांडिलें । चघळूनियां॥ ८५॥ एकीं यजन क्रियेची पेटं बांधोनि घेतली पोटीं। ते स्वर्ग सुखाचें कुपाटीं । शिरकोनि ठेले ॥ ८९॥ एक मोक्षी लागावयाच्या आशा । केला कर्म बाह्यांचा भरंवसा । परी ते पडले बळसां। विधि निषेधांचिया ॥ ९०॥ म्हणून हा प्रश्न उभ्दवलाः—

**कः स्तरति क स्तरति मायां? यः सगंत्यजति, योमहानुभावं सेवते योनिर्ममोभवति ॥ ना. ४६**

आई सागते ॥ मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ येथ एक चिलीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तया ऐलीच थडी सरले । मायाजळ ९६ जया सद्गुरू तारूफुडें । जे अनुभवाचें कासे गाढे। जया आत्म निवेदन तराडें। आकळले ॥ ९८ ॥ जे अहंभावाचे वोझें सांडुनी ॥ विकल्पचिया झुळुका चुकाउनी । अनुरागाचा निरुता होउनी। पाणिढाळ ॥५॥ मनाचाही संग सोडून जो सद्गुरूस शरण जाऊन निरहंकार झाला तो तरतो.

कुणासी नको सख्य तू अगिकारू । जनाची गडी ती भली दूरदूरू ॥
मनाचा तुला फार विश्वास थोरू । असे चोरटें वाटमारू लुटारू ५६
त्यजी सर्व मी, माउलीला त्यजीना । मला वर्ज सारे, गुरू वर्जवेना ॥
म्हणीं लौकिका होय कां मी शहाणा । हरी केंवि सोडू जिवाचा खजीना? १११

पुढें सांगतातः—

**यो विविक्तस्थानं सेवते**

अता कोठ पैं येथ जन्मू मरू रे? । पुरे उंबरा एक तुझा धरू रे ॥
शिराणी तुझे उंबऱ्याची करू रे । दिवाळी मला ती गुरूरे गुरूरे ८१०

**यो लोकबंधमुन्मूलयति**

जगाचा उरीं कोठपैं घेउ धोंडा? । स्वताचें स्थितीला नसें बूड शेंडा ॥
गुरू प्रेम दीजे, नको सांड मांडा । मनीं मात जी, पातली तीच तोंडा७१८
बरें हेंच कीं, एकलें एक राहूं । जगाचें भलें कीं बुरें तें न चाहूं ॥
अर्थी आपुलें काय होईल पाहूं । तरी आणिकाची कथा मात साहू ६८४

**यो निस्त्रैगुण्यो भवति यो योगक्षेमं त्यजति ॥ ना. ४७**

असो कीं नसो दाळ दाणा घरांत । बुडो दु:ख कीं सूख तें सागरांत ॥
गुरू सेविजे मस्त प्रीती भरांत । गतश्वास येवो न येवो उरांत ॥७९८॥

**यो कर्मफलं त्यजति**

मला काय ? मत्कर्म तूतें पटावे, । तुला मी झटावे, न गर्वें नटावे, ॥
भलें कीं बुरें जें मना होत ठावे । हटावे पुढोनी, मला तू लुटावे ॥७२१॥

**कर्माणि संन्यसति**

अरे सांडरे सोवळ्या ओवळ्यासी । उरीं आवळी कोवळ्या गोवळ्यासी ॥
तुझा चारिती पिंड पै कावळ्यासी । तरी पिंड आताच्चि दे सावळ्यासी ७९१

**ततो निर्द्वंदो भवति ॥ ना० ४८**

हरी राधिका नांदता एक देहीं । जनीं कीं वनीं प्रेम देहीं विदेहीं ॥
गुरू शिष्य ज्या नांदती चित्त गेहीं । सळेनाचि हें ही तया,आणि तेंही८१७

**योवेदानपि संन्यसति केवलमविच्छिन्नानुरागं लभते ॥ ना० ४९**

सहा चार ते काय कीजे गुरू रे? । अम्ही कासया आयकीजे गुरू रे? ॥
अता बोल फोला त्यजीजे गुरू रे । अमोला तुझे माजि जीजे गुरू रे ८१४

**सतरति सतरति लोकांस्तारयति ॥ ५० ॥** ज्यानें याप्रमाणें पथ्य संभाळून भक्ति केली, आणि ज्याला या पंथांत ईश्वरानें स्वत: खेंचून घेतले, तो तरतो आणि लोकासही उद्धरतो. **उमर** चा अनुभव:—

मला पेटवीले तुवा प्रेमजोतीं । सखे सौंगडे शेकती हे सभोतीं ॥
जरी स्नेह घालूनी फुंकीन प्रीती । तरी सौंगडे पूर्ण ते पेट घेती ४६३

---

भक्तिचें सामान्य लक्षण व ती प्राप्त होण्याचीं साधनें पथ्यासह मागें सांगितलीं आतां प्रेम स्वरूप कसें असेल त्याविषयीं सांगतात.

**अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम्** ॥ ना० ५१ ॥

देवा भक्तातलें प्रेम शब्दानें सांगणें अशक्य आहे. श्रीसमर्थ रामदास सद्गुरूचें वर्णन करण्यास आरंभ करून म्हणतात "आतां सद्गुरू वर्णवेना," जणू काय हेंच वर्णन.

कसें काय कोणासि हें गुज सांगू? । कदाणी वळाया कसा काय लागू? ॥
वदाया स्थिती ही कुणा शब्द मागू? । असे गुन जें तें स्वतासीच भोगू ७४१

प्रियकराचें संयोगांत शब्दाचे द्वैत नाहीं, तेव्हां सांगणें कोणाला? विरहांत कष्ट, पण त्या कष्टांतली ही गोडी सांगणें कठीण आहे ॥ यतोवाचोनिवर्तते अप्राप्य मनसा सह ॥

तुझें ऐक्य तें साधण्या शक्ति नाही । वियोगा तुझे जीव हाही न साही ॥
कधे मागण्याला स्थिती ती कुणाही । अहा कष्ट प्रेमीं,किती गोड पाही? ९२५

म्हणूनच ॥"पाणियांत मासा । पोहतो कसा । जावे त्याचे वंशा । तेव्हा कळें ॥" मीराबाई गातात ॥ ज्या तन लागे सो मनजाने अनजानतकी हासी ॥ अखियाँ प्रभु दर्शनकी प्यासी ॥

**मूकास्वादनवत्** ॥ ना. ५२ ॥

कोणी एकाने गूळ खाल्ला. बोलू सकत होता म्हणून गुळा सारखे साखर मध यांचे दृष्टांतानें दुसऱ्यास सांगितले. साखर मध त्या ऐकणारास माहीत होते, आणि सांगणारालाही शब्द होते, म्हणून हा सांगण्या ऐकण्याचा व्यवहार घडू शकला. ईश्वरी प्रेमा सारखा दुसरा पदार्थ नाहीं, व ज्याला तें मिळालें त्याला सांगण्याची वाचा राहत नाहीं.

जया चारिला ज्या नरा बोध गोळा । तुझेवीण कोणा न जाणेचि भोळा ॥
जया देसि बोला, न येतेसि डोळा । जया येसि डोळा, न देतेसि बोला ४५४

येथें विचक्षण म्हणतील कीं प्रेम जर अनिर्वचनीय,व कोणी कोणास सांगूच सकत नाहीं, तर मग सत्संग सद्गुरू सेवा हे सर्व थोतांड असेल. यावर सांगतातः—

**प्रकाश्यते क्वापिपात्रे ॥ ना० ५३**

जर कुठें [illegible] सूत्र युक्त पात्र असेल तर क्वचित् दयाघन सद्गुरू त्याला कृपा दृष्टीनें चेतवितातः—

अर्धी [illegible] बोधांजनें प्रेम डोळा । तरी डोळियाला मिळे दिव्य डोळा ॥
गुरू दृष्टिचें अमृता त्याचि वेळा । सख्या पीउनी बैस कर्मा निराळा ९०५

त्याचें कारण हेंच आहे कीं साधक भक्ताचे आर्धी गुरु–स्वरूपी ईश्वर प्रेमानें प्रदीप्त असतो. जीवाला वाटते आम्ही प्रेम करितो, हरिगुरूचें प्रेमापुढें तें अणुमात्र नाहीं.

जळे चित्तदीपू प्रियाचेनि रंगीं, । विझे ही तरी येत त्याचेचि संगीं, ॥
असे सान्निध्य गूंण दीपीं पतंगीं, । परी जाणतो जो जळाला निजांगीं. २५८

वाटपाहे उभा भेटीची आवडी ॥ कृपाळू तातडी उतावीळ ॥ तुकाराम

सद्गुरूच्या [illegible] शक्तिपातानें प्राय: संतांचीं अंतःकरणें चेतल्याची उदाहरणें आहेत.

॥ सत्य गुरू राये कृपा मज केली ॥ परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥ तुकाराम ॥
॥ देख सुरत टक लागि नयनसो नयन भेद कर दिया ॥
॥ गुरूनें जोगन मुझको किया ॥ देवनाथ ॥

**गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानं सूक्ष्मतरमनुभवरूपं ॥ना ५४**

तें प्रेम विषयव्यासंग, कर्म, आणि आलस्य या तीनीं सत्व रज तम गुणानीं रहित, व इष्ट वस्तु मिळाल्यामुळें इतर कोणतेच वस्तुची इच्छा न धरणारे—वाहता झरा भगवंताकडे जीवास नेणारा ओघ आहे, पण या ओघांत विशेष हें कीं त्याचा वेग ग्रहांच्या गती प्रमाणें जसजसा भक्त हरी जवळ येतो तस तसा वाढत्या प्रमाणांत राहतो.

जिवाचें जरी सर्व स्वारस्य घ्यावे । निमेषार्ध तैं स्वस्थ चित्तें बसावे ॥
गुरू प्रीति वीना कधीं ही नसावे । घडी नें घडी गोडि माजीं वसावे ८५७

**तत्प्राप्य तदेवावलोकयति तदेवश्रुणुते तदेवाचिंतयाति ॥ ना. ५५**
ती भक्ति प्राप्त झाली म्हणजे भक्त आपले प्रेष्टतम प्रभूलाच पाहतो. त्याच्याच कथा श्रवण करितो व त्याचेंच चिंतन करतो.

मिळे ज्या गती आपुले डोळियाची । कळे त्या स्थिती राजया योगियाची
स्वयें शोधकू, सिंधु, मुक्त स्वयेंची । अरे शोध अर्थी, बहु खोलि याची ४५५
प्रभो देह प्राणाचिया तूंचि सारा । मला जीवकीं तूंचि सारा पसारा ॥
मला तूंचि अस्तित्व, माझा सहारा । तुझें पायिं मीं लोपता तूंचि सारा ७५९
मनारे हरीचें पदीं रातलासी । तिथें गुंतुनी तू मला त्रासलासी ॥
हरी-दत्त तो घोट जैं घेतलासी । सुखाचेचि सेजे मधें मातलासी ८१७

याप्रमाणें इतर कोणतेंच वस्तुची इच्छा न धरिता केवळ भक्ती, असें प्रेमाचें गुण रहित व कामना रहित स्वरूप सांगितलें. पण भक्तीचा आरंभ प्रथमतः कामने पासूनच दृष्टोत्पत्तीस येतो. व नंतर तोच भक्तीचा ओघ निष्काम वाहू लागतो. म्हणून सकाम अथवा गौणी भक्तीचें लक्षण सांगतातः—

**गौणी त्रिधा गुणभेदादार्त्तादिभेदाद्वा । ना० ५६**
भक्तांचे सात्विक, राजस, तामस या गुण भेदानें, अथवा आर्ति, जिज्ञासा, अर्थ याचना या त्यांच्या हेतु—परत्वें, गौणी भक्ती तीन तीन प्रकारची सांगितली.

**चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोर्जुन**
**आर्तो जिज्ञासु रर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ ॥ गीता ७**

किंवा भागवत ११।२ सर्व भूतेषुयः पश्येद्भगवद्भावमात्मनः ॥ भूतानि भगवत्यात्मन्येष भागवत्तोत्तमः ॥१॥ ईश्वरे तदधीनेषु बालिशेषुद्विषत्सुच ॥ प्रेममैत्री कृतोपेक्षा यः करोति समध्यमः ॥२॥ अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धयेहते ॥ न तद्भक्तेषुचान्येषु सभक्तः प्राकृतः स्मृतः ॥३॥

**उत्तरस्मादुत्तरस्मात् पूर्वपूर्वा श्रेयाय भवति ना० ५७**
तामसापेक्षा राजस, त्यापेक्षा सात्विक, अर्थार्थीपेक्षा जिज्ञासू, त्यापेक्षा आर्त भक्ति श्रेयस्कर आहे. तामस भक्तीचे पर्यवसान राजसींत, आणि राजसीचे सात्विकींत; तसेच अर्थार्थी सकाम भक्तीचे जिज्ञासेंत, व जिज्ञासेचे पर्यवसान हरिचे भेटीचे आर्तींत होतें. ध्रुव वैतागानेच आरण्यांत गेला पण पुढें तमोरजो गुण दोनी लोपून सात्विक भक्तींत त्याचें पर्यवासन झालें.

मला शून्य सेजेतुनी जागविलें । गुरू मंडळीं प्रेम तें पेय दीले ॥
प्रसादासि मी मागतो काय केले । मना मारुनी सुप्रसादा ठिवीले ४४७

---

भगवंत्प्राप्तीतकरितां ज्ञानी लोकांचा विहंगम मार्ग, योगी लोकांचा कपिमार्ग, असे कैक सांगितले आहेत, त्यांवर सूत्रः—

**अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ ॥ ना० ५८**

दुसऱ्या मार्गापेक्षा भक्तिनें ईशप्राप्ती सुलभ आहें. अर्जुनाचा प्रश्न ॥ एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ॥ये चाप्यक्षर मव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ? ॥१॥ आणि भगवंताचें उत्तर ॥ मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ॥ श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥२॥ अव्यक्त अक्षाराचे उपासक ही भगवत्पदाला पोंहचतात, परंतु देव म्हणतात ॥ क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसां ॥ त्यांना कष्टच अधिक आहेत. एका श्रद्धेच्या आधारावर भक्तिमार्ग सोपा, आणि तिचेंच अभावामुळें इतर मार्ग कष्टप्रद झाले. त्याचे कारणही उघड आहे. भाविकांची श्रद्धा संतावर असते, तेच मायबाप कृपावंत भाविक गर्भ श्रीमंत लेकराना आपले कमाईचे धनी करितात, व ‘ वासुदेवः सर्वमिति ’ हा अनुभव येण्यास ज्ञान्याला कैक जन्म घालावे लागतात तो अनुभव हे मायबाप संत नुसते कृपा दृष्टीनें देतात.

अहोरात्र तू धुंडिसी श्रीवराला । परी आंधळ्या, पाहसी कां निराळा ? ॥
हरी तूजसी नादतो सर्वकाळा । उभा देख प्रत्यक्ष आपाद–डोळा ८८३

झणीं कोण राहे हरीला स्मरूनी ? । हरी बोलता, आयके कोण कानीं ? ॥
झुरे सावळा, दावि रासा करोनी । बघे धन्य तो कोण डोळे भरोनी ? १००२

काय सांगावें? हा कर्म ज्ञान योग तपाचा अभिमान कोणेवेळीं खड्यांत घालील, आणि घरी चालून आलेल्या देवास पिटाळून लावील, याचा नेम नाहीं.

कहाणीः—सार्वभौम राजाराम सैन्या सहित शिकारीस निघाले. झाली सैन्याची व त्यांची चुकामूक. एकटेच हिंडता हिंडता रात्र झाली. एका मांडलिकाचे नगर आलें. मांडलिकाचे हवेलींत ती रात्र काढावी म्हणून आशेनें सरसावले. मांडलिक ही आपले संस्थानचा राजाच होता, नाहीं कसें म्हणावे ? “मी राजा”

"मी राजा"हा जप त्याचें आचरणांत स्पष्ट दिसें.राजेपणाची सनद कोणी दिली हें तो कधीं स्मरत नसें. तेव्हां प्रत्यक्षच प्रभूनीं "रघुपति राघव राजाराम" अशी वर्दी दिली. मांडलीक "मी राजा" "मी राजा" या मंत्राचे जपांत धुंद होता. त्याचें आज्ञेनें द्वारपाळांनी 'अर्धचंद्रेण राघवः' हें कलम चालविलें. खिन्न, संतप्त, व संत्रस्त, रामराजे रात्रीच जंगलांत निघाले. जंगलांतील जागल्यानें त्याचें मनगटाला धरून म्हणाला,"बेट्या! तुझ्या बापानें तुला घराबाहेर घातले म्हणून अपरात्रीं वाघाच्या खाईत जीव द्यायला जातोस होय! तुझ्या जीवाचे माणूस भेटल्या शिवाय मी सोडणार नाहीं" असे म्हणून आपले झोंपडीत नेऊन घोंगड्यावर बसविले, भाजीभाकर फार आदर आग्रहानें खाऊ घातली.राजाला इतके पोटभर भोजन कधींच मिळालें नव्हतें. सकाळीं जंगलांत हुडकीत सैन्य राजापासीं आलें. व राजा नगरास परतला. मांडलिकास सोन्याच्या बेड्या घालून-आणि जागल्यास पालखींत बसवून,दरबारांत आणले.मांडलिकास अंधार कोठडीची जन्मठेप, व जागल्यास जाहगीर मिळाली. जागल्या राजारदम करीत राहिला.

॥ येतां राव घरीं, मदांध धनिकें नेणोनि धिक्कारिले. ॥
॥ रंके आसन शाक भाकर जलें नेणोनिया पूजिले. ॥
॥ रंका राज्य दिलें, मदांध धनिका रायें तिथें दंडिले ॥
॥ "नेणोनी घडला प्रमाद" रडणें हें फोलसें राहिलें ॥

मांडालिक कायदे कानून मधे जाडा विद्वान होता. जागीर गेली, व अंधार कोठडीची जन्मठेप आली, तरी मी "राजा आहे" हें त्याचे आचरणांत मूर्तिमंत दिसत होतें. तो न्याय सभेंस म्हणाला "फिर्यादी साक्षीदार व न्यायाधीश एकच आहे, तेथें न्यायाची काय आशा? परंतु सुमंत, वशिष्ट इत्यादि ब्रह्मनिष्टांचे मत मी मागतो. महाराजास न ओळखून जो प्रमाद माझे, व माझे नौकरा, कडून घडला,त्याला राजद्रोहाचे कलम लागू होत नाहीं."यावर सुमंत वशिष्टांनी एकमतानी सांगितले. "कीं राजाला तू ओळखले नाहींस म्हणूनच तुला जन्मठेप."

॥ राया नेणत मांडलीक तरि तो मोठा गुन्हाः तत्वता ॥

मग मांडलीकानें प्रश्न केला कीं 'जागल्यानें ही जाणले नाहीं, त्याला कां जागीर?' पुन्हां सुमंत, वशिष्ट म्हणतातः—

॥ राया नेणत मांडलीक तरि तो मोठा गुन्हा तत्वता, ॥
॥ पैं त्या हूनि गुन्हा गणी प्रभु कुणा दीनासि धि:करिता. ॥
॥ नेणोनी भजला कुणी तरि तया दे नाथ सायुज्यता, ॥
॥ प्रज्ञायी सहजा वदे "नमत जा हो जाणता नेणता." ॥

सारांश हरिभक्तिला प्रमाणांतराची अपेक्षा नाहीं.

**प्रमाणांतरस्यानपेक्षत्वात्स्वयंप्रमाणत्वात्** ॥ ना. ५९

गुरू ब्रम्हणे तूंचि प्रत्यक्ष ब्रम्ह । त्रिलोकीं तुझा व्यापिला दासधर्म ॥
तुझें पाउलाचें मिळें ज्यासि वर्म । तया जन्म मृत्यूंत फासी न कर्म ९६२

अशी भक्ति शांति व परमानंद रूप आहे.

**शांतिरूपात्परमानंदरूपाच्च** ॥ ना. ६० ॥

भक्तिच शांति स्वरूप व आनंद स्वरूप आहे म्हणून ही तिच्या इतके सुलभ साधन नाहीं ॥ नलगति सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण. ॥

अम्ही प्रेमळा मंडळीं भक्त सारे । सदा दु:ख संसार हे त्यक्त सारे ॥
गुरू माउली माजि आसक्त सारे । सदा मस्त विश्रांत कीं मुक्त सारे ७६४
मिळे शांति प्रेमें, न नेमें गुरू रे । भरी आमुचें चित्त प्रेमें गुरू रे ॥
अम्ही व्यर्थ चिंता तरी कां करू रे । त्यजू दोन, एकासि हातीं धरू रे ८०८

---

याप्रमाणें भक्त स्वतं:स व जगास विसरून ईश्वरांतच जागतो, मग जनांत कसा वागतो याविषयीं सूत्र:—

**लोक-हानौ चिंता न कार्या निवेदितात्म-लोक-वेदत्वात्** ॥ ना. ६१

भक्तानें लौकिकाची चिंता करू नये कारण आत्मनिवेदना सहित लौकिकाचार व वैदिक क्रिया ईश्वरार्पण केलेल्या असतात. ॥वाळो मज जन म्हणोत सिंदळी ॥ परि हा वनमाळी न विसंबे ॥१॥ सांडूनी लौकिक झालिये उदास ॥ नाहीं भय आस जीवित्वाची॥नाइके वचन बोलता या लोका॥म्हणे झालो तुका हरिरता ॥३॥

बुडो विश्व सिंधूत, होकां तुफान; । न लेखीन मी मस्त राई समान. ॥
मला नंदगेहीं ठिवीलें गहाण, । वदे सांवळा 'तारणा फार छान!'१०४२

मग स्नान भोजनादि लौकिक व्यवहार सांडावा, अशा वितर्कास उत्तर:—

**नत त्सिद्धौ लोक-व्यवहारो हेयः किंतु फलत्यागः तत्साधनंच कार्यमेव॥ ना. ६२**

भक्तिचें साधनांत लोक-व्यवहार त्याज्य नाहीं. मात्र त्याचें फलाचा त्याग आवश्य आहे. भक्तीला साधनी भूत होऊन उपयोगी होईल तोच व्यवहार करावा. याविषयीं मागें सूत्र १४ मधे उल्लेख आला आहे.

तुम्हा आवडे सेवणे प्रीति-सारा। मनाला सुधारा, न घ्यावे विकारा ॥
पचे प्रेम, जैं सर्व वृत्तीसि मारा। न कीजेल पीडा, कुणा वेडचारा ७४८

प्रभु या लौकिक व्यवहारांत पुनः पथ्य सांगतातः—

**स्त्रीधन नास्तिकचरित्रं नश्रवणीयम्॥ ना. ६४**

मागे सूत्र ३५ मधे विषयत्याग व संगत्याग सांगितला. सूत्र ४३ मधें पुन दुः-संगाचा त्याग सांगितला. येथें लौकिक व्यवहारांत उकळणाऱ्या स्त्री, धन, व नास्तिक चरित्रें न ऐकण्याची ताकीद आहे. यातील स्त्री उपनिषदाची शैली आपल्या ओळखीची आहे. तिची चरित्रें अनेक शास्त्रा कलांत गाइली आहेत. पण त्याशिवाय नाटकें, कादंबऱ्या, दोन आणे माला, एक आणा माला, फुकट माला, हेही स्त्री-चरित्रांतच दाखल आहेत. नास्तिकांच्या चरित्रांत बहुतेक देशांची धूळधाण झालेली दिसून येईल. असे ग्रथ पाहू सांगू नयेत, पण तिऱ्हाइताप्रमाणें ऐकूही नयेत. ॥ हरिबोला हरिबोला। नाहीं तरी अबोला। व्यर्थ गलबला करू नका. ॥

चव्हाट्यांत मी काय जी नीत जावे। फटिंगा सवें काय बाता बकावे ॥
प्रभु अंतरीची स्थिती तूज ठावे। करी स ह्य राजा,तुलाचि स्तवावे ६३३-

**अभिमान दंभादिकं त्याज्यम्॥ ना. ६४**

दंभ अभिमानाचा हरीस तिटकारा आहे हें सूत्र० २७ मधें सांगितलें आहे.

स्वतां प्रेम खड्गें चिरीशील मान। प्रभूला तधीं होसि जीवा समान ॥
तुला पाहिजे प्रेम आणीक मान। दुराशाचि ही, पूर्ण नोहेल जाण ४६१

वरील ताकीदी वरून जान जवानास हें वाटेल कीं हा भक्तिमार्ग फार रुक्ष आहे. ही असली जखडबंदी काय कामाची? हें काम क्रोधादिक विकार टाकावे तरी कसें ! या होतकरू मंडळी करिता नारद सांगतातः—

तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिनादिकं तस्मिन्नेव कर...
सावता माळ्याला विचारलें "तुम्ही साधन काय करिता" त्यांनी ... की मी माळी इकडचे पाणी तिकडे वळवितो. " कांदा मुळा भाजी ... विठाबाई माझी. " वृत्तीचा प्रवाह विषयाकडे असतो तोंच हरीकडे वळवावा, म्हणजे विकार न करितांना श्रेयस्कर होतो. ॥ हांसो रुसो आतां वाढवूं आवडी॥ अंतरीची गोडी अवीट ते ॥१॥ सेवा सुखें करू विनोदवचन ॥ आम्ही नारायण एकाएकीं ॥२॥ मीरा माउली गातें:—

मेरे गिरिधर गोपाल दुसरो न कोई । ज्याके सीर मोरमुकुट मेरा पति ... ॥
तात मात भ्रात बंधु दुसरो न कोई । मीरा प्रभु लगन लगी होनि होसो ... ॥

या प्रमाणें संताचे हरीसी विनोद वचनांत जो रस भरलेला आहे, पुढें सांसारिक वार्ता अथवा कादंबऱ्या नाटके ती काय!

युगांती जधीं फाटतो विश्व पर्दा । रवी लोपती होय अंधार गर्दा ॥
तुझें पल्लवा मी धरी तेथ मर्दा । मला त्वा दिलें हें पहा कोण दर्दा १४२
मला वाटले ती तुझी भाक ठीक । जसे बोलसी वागसी तू सटीक ॥
अरे लोचना मी न जाणे बटीक । जगाचे परी भाक तूझी लटीक १६०
तुला वाटतें यांत कौतुक मोठें । उरीं रोविसी आमुच्या थोर कांटें ॥
मतीला तुझ्या जाहलें ऊफराटें । अम्हांविण तूंतें असें स्थान कोठें ९१२
हरी चेटकी नांटकी कोण? तू, मी? इथें गाय वाघा वळी कोण? तू? मी?
तुझा मी,न तें त्वद्विना बोलका मी । जरी तूंच मी,बोलता तूच कां मी? ७४०

**त्रिभंगपूर्वकं नित्यदास्य नित्यकांता भजनात्मकं प्रेम कार्यं प्रेमैव कार्यम् ॥ ना ६६**

मागें सूत्र ५४ मधें त्रिधा गौणी भक्ती सांगितली, तिला ओलांडून अंकित दास किंवा अंकित कामिनीचें प्रमाणें प्रेमच वाढवावें.

नित्यदास्यभक्तीसंबंधाने ज्ञानोबाराय म्हणतात:—

पाइका मोल नाहीं देशील ते काई । पाईक न मागे कांहीं भोग्य जात ॥१॥
देशील तें काई न देशील तें काई । पाईक न मागे कांहीं तुज वाचोनी ॥२॥
बाप रखुमा देविवर विठ्ठलाच्या पायीं । पाइका मोल नाहीं तैसें झालें ॥३॥

नित्यकांताभक्तीचे उदाहरणः—

आम्ही सती नारी पुरुष एकला हरी । निकट सोयरा तोचि इतर दुरी ॥१॥
पतिसेवा हेचि आमुचें सौभाग्य सुख । आमुच आनंद तयाचें मुख ॥धृ॥
हितगुज आम्ही तया लागीं सांगू ॥२॥ आवडेसें भावळेणें तयासी मागू ॥३॥
पचपक्वानें हीं तया वाढू जेवू । उष्टावळी त्याची आवडीनें सेवू ॥४॥
काया अंथरूनी मन पांघरवू देवा । पहुडल्या करू त्याची चरण-सेवा ॥५॥
सवतीमत्सर नाहीं आम्हां त्रिकाळीं । पुरवी मनोरथ सर्वांचे वनमाळी ॥६॥
सारिखा सर्वांसी वागवितो आम्हासी । माधवकन्या ही आहे तयाची दासी ॥७॥

रते मी हरिसी, रते सद्विचारी । हरीसी रती फार सोपी प्रचारीं ॥
मला तो रती-दान मागे मुरारी । न मी रातल्या तो नव्हे ब्रम्हचारी १०११

---

पुढील सप्तसूत्रांत भक्तांची लक्षणें सांगतात.

**भक्ताः एकांतिनोमुख्याः ॥ ना. ६७**

सर्वही मुमुक्षु भगवंताचे भजन करितात. त्यांत '**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतो मुखम्**' असें भिन्न प्रकार आहेत. मुख्य भक्त तेच की ज्यांचे इष्ट ध्येय एकच हरि आहे. ॥ आणिक दुसरें मज नाहि आतां । नेमियेल्या चित्ता पासू-नियां ॥१॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जाग्रति स्वप्नी पांडुरंग ॥२॥ पडलें वळण इंद्रिया सकळा । भाव तो निराळा नाहीं दूजा ॥३॥ तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ हें ध्यान विठेवरी ॥४॥

गुरू माउली वीण नेणोचि आन । तनु प्राण हा जीव नामीं गहाण ॥
नसे भोग मोक्षादिकाची तहान । असे मुक्त तेजाप-भू-वायुहून ३७

अशा भक्तमंडळाचें वर्णन नारद करितात.

**कंठावरोधरोमाश्रुभिः परस्परं लपमानाः पावयंति कुलानि पृथिवींच ॥ ना. ६८ ॥ तीर्थीकुर्वंति तीर्थानि सुकर्मी कुर्वंति कर्माणि सच्छास्त्री कुर्वंति शास्त्राणि ॥ ना. ६९**

श्रीभगवान् म्हणतातः—

'मच्चित्ता मग्दतप्राणाबोधयंतः परस्परं।कथयतश्चमांनित्यं तुष्यंतिचरमंतिच'

ज्ञा० ॥ चित्तें मीचि जाहालें । मियेचि प्राणें घाले । मग जीवो मरो विसरले । बोधाचिया सुखीं ॥१॥ जैसीं जवळिकेचीं सरोवरें । उचंबळलियां कालवती परस्परें । मग तरंगासी धवळारें । तरंगचि होती ॥२॥ तैसीं येरयेरांचिये मिळणी । पडत आनंद कल्लोळाची वेणी ॥

याप्रमाणें त्यांचा परस्पर संवाद असतो आणि तेथें सर्व विश्व पावन होतें.

ज्ञा० ॥ तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चिताचे । जे नामचि नाहीं पापाचे । ऐसे केलें ॥१॥ यम म्हणे काय यमावे । दम म्हणे काय दमावे । तीर्थे म्हणती काय खावें । दोष औषधासी नाहीं ॥२॥ कही एकादेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें । ऐसे नामघोषगौरवें । धवळले विश्व ॥३॥

हरीचे सखे आरसे एकमेका । स्वताचे विषीं त्या नसे भीति शंका ॥
बने आरसा सांडिसी जैं कलंका । न पाहे कुणा, होसि आदर्श लोका ॥७८

याचें कारण हेंच आहे कीः—

**तन्मयाः ॥ ना. ७०**

भक्त हरिमय झाले असतात.

॥ गोविंद गोविंद । मना लागो हाचि छंद ॥१॥
॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥२॥
॥ तुका म्हणे अळी । झाली भिंगोरी सगळी ॥३॥

तुझे संगतीचा मना येत वारा । मला सोडुनी ध्यातसें तूज सारा ॥
अतां तें स्मरेना कधीं मद्विकारा । तुला चिंतुनी येंत तुझें अकारा २१२
शिरें प्रेम अंगीं, फिरें रोमरोमीं । मला सांडुनी तें भरीं सर्व रामीं ॥
गुरू व्यापिला अंतरीं देह धामीं । मला मात्र नामू, परी सर्व ब्रह्मीं ४३८

**मोदंते पितरो नृत्यांति देवताः सनाथा चेयंभूर्भवाति ॥ ना. ७१**

[illegible]नीं विश्वच वैकुंठ केलें असतें. या भक्ति मार्गात सर्वांना अधिकार आहे, कारण सर्व अभिमान सांडून तळ भूमीवर जीव आला म्हणजेच भक्ति घडते.

**[illegible]स्तितेषां जाति विद्यारूप कुलधन क्रियादि भेदः ॥ ना.७२ ॥ यतस्त[illegible]याः ॥ ना. ७३**

भक्त देवाचीं लाडकीं लेकरें आहेत,म्हणून त्यांच्यांत जाति विद्या रूप कुल धन

क्रिया इत्यादि तारतम्याचे भेद नाहींत"व्याधस्याचरणं ध्रुवस्यच वयो विद्या गजेंद्रस्य का?" धर्म व्याधाचा आचार, ध्रुवाचें वय, गजेंद्राची विद्या, सुदाम्याचें धन, प्रल्हादाचें कुल, विदुराची जाती, गोपींचें तप, कुब्जेचें रूप, कांहींच नसतांना एका भक्तीमुळें प्रभूनें त्यांचा अंगिकार केला. देवानें या विशिष्ट गुणांची आवश्यकता ठेविली नाहीं. मग त्याचे लाडके तन्मय भक्त कां ठेवतील!

गुरू ऐस तू शूद्र, क्षत्रीय, वैश, । अरे ऐस तू ब्रम्ह, कीं ब्रम्हखैस, ॥
चितेचे धुर्णी सांगसी 'येथ बैस' । वसे मी, सख्या लोचनीं तूंचि ऐस. १०३

———

ज्या अर्थीं जाति विद्याकुल क्रियादि भेद भक्तींत नाहीं, व दुसरे कोणतेही शास्त्रांची आवश्यकता नाहीं तिथें, वादाचें कोणतेंच कारण राहत नाहीं म्हणून सूत्र:—

**वादो नावलंब्यः ॥ ना. ७४ बाहुल्यावकाशात् अनियतत्वाच्च॥ ना. ७५**

वादाचे कारणच नाहीं. आतां कोणी म्हणेल कीं ईश्वराचें गुणाविषयींच वाद कां करूं नये? त्या विषयीं सांगतात तो अनंत आहे, आणि वादही संपणार नाहीं, आणि वादानें कांहीं निश्चित होणार नाहीं.

खरें तत्व येई न वादास ठाया । मिळेना जरी द्रव्य देसी लुटाया ॥
अरे जन्म हा, आठवी नाथ पाया । तरी देखसी स्वानुभूती उपाया ५८१

उपनिषत म्हणते, "नाययात्माप्रवचनेनलभ्यो" इ.

गुरूरे तुला धुंडिता धुंद सारे । तुला वर्णिता मूक हे छंद सारे ॥
सदा बोधिसी कान हे बंद सारे । सदा तू समोरी परी अंध सारे ४८४

**भक्तिशास्त्राणि मननीयनि तद्बोधकर्माणि करणीयानि॥ ना. ७६**

भक्ति शास्त्राचेंच मनन व त्याचीं बोधक कर्में करावीत.

मिळें प्रीतिनें सौख्य आणी धिटाई । लगे पुस्तकीं गांठ गुंताड चाई ॥
गुरू सेविता रंग वाढे नवाई । निगूरा कळाहीन लाजूनि जाई ४०६

गुरूमाय–वाणी सुचिद्रत्न खाणी । पदीं अर्थि मुक्ताफळाचेचि पाणी ॥
गुरूवाक्य जो प्रत्यया हाति आणी । तरी तो सदाचाजि जीवंत प्राणी १३०

**सुख दुःखेच्छा लाभादि त्यक्ते काले प्रतीक्षमाणे क्षणार्धमपि व्यर्थं न नेयम् ॥ ना. ७७**

सुख दुःख इच्छा इत्यादिक सर्वांचें चिंतन सोडून मृत्युकालाची मार्ग-प्रतिक्षा करीत क्षणही हरिचिंतनावीण व्यर्थ जाऊं देऊं नये. उमर नेहमीं मृत्युला सन्मुख ठेवून हेंच सांगतो. " घे उफणुनि जों वरि वारा । हरिनाम भरीं जग सारा. " उफणून सार घ्यावयाचें, व फोल सांडावयाचें, एवढें लक्षांत ठेविलें, आणि उमर जगास निःसार समजतो हे पाहिलें, म्हणजे त्याचे विषयीं गैरसमज फोलासारखा उडून जातो.

हरीवीण मी या निमेषा न भंगी । आतां रात्र ही रासरात्रीच रंगी ॥
हरी रूप ओठी हरी नाम अंगीं । धरीले न सोडीन कल्प-प्रसंगीं ५९९

जयाचें मनीं लेश वागे मतीचा । न वेची कधीं वेळ हा किंमतीचा ॥
गुरूचें सुखा पै झटे हिंमतीचा । सदा साधितो लाभ सत्संगतीचा २१७

**अहिंसा सत्य शौच दयास्तिक्यादि चारित्र्याणिपरिपालनीयानी ॥ ना. ७८**

अहिंसा, सत्य, शौच, दया आस्तिक्य इत्यादि वर्तनांत ठेवावे. याविषयीं विवेचन मागील परिच्छेदांत आलें आहे.

**सर्वदा सर्व भावेन निश्चितै भगवानेव भजनीयः ॥ ना. ७९**

हरीसी तिरीं बैस, सांडी खळाळ, । दुखाचें ऋणा फेड, वाजीव टाळ; ॥
मरूं तैं दहारोज राहे विटाळ, । जगूं तोंचि कीजे सुखाचा सुकाळ. ४२५

उद्यां कालचें शोक दुःखा करीन । अता प्रेम संपत्ति भाग्या वरीन ॥
हरी सावळा धैर्य देतो धुरीण, । अता ना धरू हात, केव्हां धरीन ? ४१४

तुझें आयुषा माजि एके क्षणाला । जरी वेचिसी, दे गुरू दक्षणाला; ॥
सुखाचें स्वराज्याचिया रक्षणाला । असें आयु, वाया न सांडी कणाला. ३९४

---

याप्रमाणें सतत भजन करून हाक मारिली असतां प्रभू लवकर सन्मुख होऊन भक्तांना आपला प्रत्यक्ष अनुभव देतो.

**स कीर्त्यमानः शीघ्रमेवाविर्भवाति अनुभावयाति भक्तानाम् ॥ ना. ८०**
ज्ञा०॥ जो जेथ जैसें पाहो बसे । तया तेथ तैसेंचि असें । हें उजियेडें कां दिसें । अखंडे जेणें ॥ ऐसा हा सहज माझा । प्रकाश जो कपिध्वजा । तो भक्ति या बोजा । बोलिजे गा ॥ याप्रमाणें भक्तास हरी प्रगट होतो. " हांके सरसी उडी । घालुनिया स्तंभ फोडी ॥"

सखे देखुनी शुद्ध सात्वीक भाव । मला बोलिला नाथ वैकुंठ राव ॥
'सखे भेट दे, ओठ ओठासि लाव' । 'नको' मी वदे, तैं धरू जाय पाव ७११
तुला बाहतो, देह ओ तूं अम्हास, । तुझा शब्द झेलू अम्ही दासदास; ॥
हरी साहसी आमुचा फार त्रास, । तुझे साउलीं खेळतो आसपास. ६७४

म्हणून ॥ **त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसी भक्तिरेव गरीयसी ॥ ना. ८१**
युगें मन्वंतरें बदलतील, जीवाची रूपें नवी नवीं होतील, सृष्टीचे कायदे धर्म नवीन राहतील, परंतु जसा ईश्वर अखंड तसेच त्याचे जीवाचें चित्तांत आविर्भाव होणारें रूप म्हणजे प्रेम अखंड व सर्वांत श्रेष्ठ आहे.

---

**गुणमाहात्म्यासक्ति रूपासक्ति स्मरणासक्ति दास्यासक्ति सख्यासक्ति वात्सल्यसक्ति कांतासक्ति आत्मनिवेदनासक्ति तन्मयासक्ति परमविरहासक्ति रूपैकधाप्येकादशधा भवति ॥ ना. ८२**

जरी भक्तिप्रेम एकच आहे, तरी नारदमुनी अकरा रूपें सांगतात, हीं गुरूकरुणामृतांत सांपडतात.

**१ गुणासक्ति**

मायी राजाचे गुणा कोण जाणे! । शंकाग्रस्ता कैं समाधान बाणे ॥
माझें वेडा केवि येती शहाणे! । माझें अर्था श्रीगुरू मस्त जाणे. २४७

**२ माहात्म्यासक्ति**

सुगंधे तुझें गंध ये कापुराला, । स्वरूपें तुझें रूप ये अप्सराला, ॥
तुवा मानिता मान्यता श्रीवराला, । तुवा पूजिता पूज्यता शंकराला. ३४८

**३ रूपासक्ति**

मुखेंदू तुझा जीव सर्वा जनांचा, । मला मोहवी मोहन् मोहनांचा, ॥
घटीं बिंबला भानु सर्वा तनांचा, । निधी तू मला तेवि विश्वा धनाचा. १५८

४ स्मरणासक्ति

मूर्खी नाथ गावा, विसावा नसावा, । सदा कानिं पावा रवानें बसावा, ॥
कुलाला घडा जैं तनूचा घडावा, । हरी-पादगंगे तुडुंबी भरावा. ६०७

५ दास्यासक्ति

तुझें प्रीतिनें संकटें येत मोठीं, । परी सोडिता होय जन्मासि खोटी, ॥
जरी काळ घालील आयुष्य पोटीं, । तुझा जाच सोसीन मी कल्प-कोटी. ६०४

६ सख्यासक्ति

सखी खेळिजे कान्हया सग होरी, । अम्ही गात नाचू तयाचें समोरीं, ॥
तया कोमलांगा करू शीरजोरी; । धरूं आवळोनी उरीं या कठोरीं. ६४८

७ वात्सल्यसक्ति

तुझे प्रीतिनें गर्व निःशेष जाई, । तुझें चिंतनें बंध पावे खुलाई, ॥
कली सेविता जैं तुझी ही मिठाई, । तरी लागता मानवाचेचि पायीं, ६३७

८ कांतासक्ति

असे जारिणी मी पराच्या घरासी, । रते मी हरी सग वेश्या मिरासी, ॥
तुम्हा कल्पना येर शेजारियासी, । अशी कीं तसी, मी हरीचीच खासी. ६४९

९ आत्मनिवेदनासक्ति

सखी आस त्या सांवळ्याची कशाला? । तयाची स्मृती जीव आणी घशाला, ॥
तनूच्या जधीं पेठवू या मशाला, । तधीं नाथ येऊन बैसे उशाला. ८७९

१० तन्मयासक्ति

धरीले तुवा, केंवि जावू सुटोनी! । कसे बोलुरे! बोल गेला अटोनी, ॥
निघे जीव या अश्रुवाटे तुटोनी, । उरीं राखिते तूज नेत्रा मिटोनी. ६६२

११ परमविरहासक्ति

कशी सावळयावीण जीवंत राहू! । अतां देह-भारासि मी केंवि साहू? ॥
अशी ती कधीं वेळ येईल पाहू । वदे नाथ 'घे घे' वदे मीच हूंहूं' ६१०

हे त्रोटक भक्तिविलास आहेत, परंतु देवा भक्तांचे प्रेमाविलास अनिर्वचनिय आहेत. सर्व रुबाया मननीय आहेत. शेवटीं नारद सांगतात:—

**इत्येवं वदंति जनजल्प–निर्भया एकमताः कुमार व्यास शुक शांडिल्य गर्ग विष्णुकौंडिल्य शेषोद्धवारुणि बलि हनुमत् बिभीषणादयो भक्त्याचार्याः ॥ ना. ८३**

याप्रमाणें सनत्कुमार व्यास शुक इत्यादि भक्तिशास्त्राचे आचार्य एकमतानें लोक काय बोलतात याचें भय न वाळगतां, सांगतात. सारांश नारदांनीं सदर आचार्यांचे सारभूत असें हें भक्तिसूत्र सांगितलें. **उमरनें** ही या भक्तिशास्त्राचा अनुवाद आपलें रुबायांत जनापवादास न भीता केला आहे.

असे घोर प्रीती, कृपा श्रीवराची । हरीच्या कृपें काय निंदा नराची ! ॥
बुरी कीं भली ती क्रिया ईश्वराची । जिवाला क्षिती कां यमा पामराची? ८५

**य इदं नारद प्रोक्तं शिवानुशाशानं विश्वसाति श्रद्धत्ते स भक्तिमान्भवाति स प्रेष्ठं लभते स प्रेष्ठं लभत इति ॥ ना. ८४**

याप्रमाणें या नारद प्रोक्त कल्याणप्रद बोधावर जो विश्वास धरून श्रद्धेनें त्याचें आचरण करितो, त्याला भक्ति प्राप्त होते, व प्रेष्ठतम हरी लाभतो.

---

१०९ ६ **ईशस्तवनः**—मागील परिच्छेदांत हें दिसलें कीं उमर ईश्वरास उद्देशून **साकी** अगर गुरूशी बोलतो. अर्थात **साकीस** संबोधून ज्या रुबाया आहेत त्याही ईशस्तवनें होत. खालीं दिलेल्या अंकांचे श्लोक पाहिलें म्हणजे उमरनें गुरू ईश्वराची ऐक्यत्वानें प्रार्थना कशी केली, हें सूज्ञ वाचकांचें लक्षांत येईल.

५,७,८ ११, २२, २४, ३४, ३८, ३५, ७० ९३, ९४, ९५ ९८,१०२ ते १०५, ११०, ११२ ते ११५, १३४ १५४ ते १६१, १६५ ते १७२, १७५ ते १८२ इत्यादि.

साकी अगर गुरूचे नांवाचा उल्लेख नसून यारब हे ईश्वरा अशा संबोधनानें केवल ईश्वरासी संभाषणाच्या कांहीं रुबायांचा येथें विचार करू. रब चा अर्थ स्वामी, प्रभू असल्यामुळें गुरूकरुणामृतांत क्वचित् **गुरू** असाही शब्द योजला आहे.

---

पडेना तुझें रूप बुद्धीस ठाया । पदा वंदितो, अन्य नेणे उपाया ॥
कसी जाणिजे गारुड्या तूझि माया? । तुला जाणता तूचि भीनाथराया ४८

तुझें चिंतनीं ते मुनी मौन झाले, । गुरू शब्द झाला, बहू कान झाले;॥
न तर्कें कुणाचें समाधान झालें, । कुणी श्वास रोधूनि निष्प्राण झाले.
४०३

गुरूरे तुला धुंडिता धुंद सारे, । तुला वर्णिता मूक हे छंद सारे, ॥
सदा बोधिसी, कान हे बंद सारे, । सदा तू समोरी परी अंध सारे.४८४

रिघेना विधी–बुद्धि त्वत्पादुकाला, । नसें पुण्य पापें क्षिती मालकाला;
जरी धुंद पापीं, जपे मी भयाला, । हरी आठवीतो तुला जी दयाला.
८२२

अनंता तुझे पंथ तेही अनंत, । धरीला मिया सद्गुरू–प्रेम–पंथ, ॥
असो द्वैत-अद्वैत कीं शैव-शाक्त, । तुला इच्छिती अच्युता. सत्य मात.
१००६

क्रिया तप योग ज्ञान इत्यादि अन्य उपायानें ईश्वराचे पाय दुर्मिळ आहेत, म्हणून त्याचे दयेचे आधारावर भक्तिप्रेमाचा मार्ग उमरनें स्वीकारला. या मार्गानें जात असतांना आपले कष्ट कुणाला सांगावें? देवालाच तो निवेदन करितो, कारण भक्ति मार्गांत देवा भक्ताशिवाय तिसरा पदार्थ नाहीं.

अधीं सुप्त होतो चिदानंद डोहीं, । मला आणिलें तूं जगाचें प्रवाहीं, ॥
अतर्क्या तुझी येथ आज्ञा मला ही । खुलें नेत्र ठेवी दिसें तें न पाही.
५०६

अधीं प्रेरिसी रे मला तूचि कामा, । पुनः बोलसी काय केलें गुलामा?
नडे मी धरी सोडिच्या या लगामा । जळीं कुंभ ठेवू कसा मी रिकामा?
५१७

तनू कोवळी चंद्रिका ही दयेची, । मना मोहितो सावळा हा स्वयेची,
पुनः सांगतो देह पाहू नयेची, । नसे जोड ही सांगण्याची क्रियेची.
५१९

अरे सुंदरा कोमला शामलांगा । हजारो तुझ्या खोडिया आणि दंगा ॥
न पाहो कसें तूझिया रूपरंगा? । तुवा दृष्टि माझारिं केलीस जागा ॥
१०००

पळे शूक डोयीं जळाची पराती । भया दाविती शस्त्रधारी वराती, ॥
"पडे थेंब भूमी गदा ये शिरा ती" । तुझ्या प्रेम पंथीं मला हीच भीती
५२१

स्वतः मांडिसी पाश दाहीं दिशाला, । पुनः बोलसी 'देख मारीन टोला'
तुझा पाश, त्या माजिं पाऊल गेला । वधूनि मला, बोलसी, 'पापि मेला.'
९१४

प्रभू रे तुवा तिंबिली माझि माती । गुणाचा पिळा तूं वळीलासि चाती॥
भलें कीं बुरें होतसे दीस राती । तुवा नेमिलें, माझिये काय हाती? ॥
५९४

कहाणीः-सुलतान महमूदला त्याचा दास अयाज फार प्रिय असे. इतर दरबारी त्याचा द्वेष करीत व म्हणत कीं "तूंच कोण एकटा ? आम्ही राजा करितां जीव बळी देऊ." महमूदला ही गोष्ट समजली. एके दिवशीं राजानें सुंदर कांचेचे पेले आपले कोठ्यांतून आणवून प्रत्येक दरबारी ग्रहस्थास एक एक देऊन विचारिले "पेले कसें आहेत?" प्रत्येकांनीं पेल्याचें स्तोत्र गाइलें. हा दरबारी खेळ झाल्या नंतर राजा म्हणाला. "बस पुरे हें फुटाळ कांचेचें स्तोत्र. तीन अंक मोजणें झाल्यासरसे लगेच जमिनीवर आपआपले पेले टाका. एक-दोन-तीन ! " तीन म्हणताच सर्वांचे पेले जमिनीवर चूर झाले. सुलतान क्रोधानें म्हणाला " हे सरकारी अमूल्य पेले कां फोडले ? आतां तुम्हा सर्वांना देहांत शिक्षा केली पाहिजे. जल्लाद ! सर्वांच्या माना काप". खड्ग घेऊन यम-रूपी जल्लाद राज्याचे दक्षिणेस उभाच होता, तो सरसावला. सर्व सरदार एक वाक्यानें ओरडून विनवितात. " पेले जमिनीवर टाकण्याचा सरकारी हुकुम आम्ही अमलांत आणला. आम्ही निर्दोष आहोत ! " राजास अधिकच क्रोध आला. अयाज राजाचें चरणावर मस्तक ठेऊन म्हणाला, " प्रभो ! मी खचीत गुन्हेगार आहे. सरकारी पेला जमिनीवर सरकारचे चरणापाशीं ठेवण्याची आज्ञा होती, पेला फोडण्याची नव्हती. पेला सरकारी आहे हें मी विसरलो म्हणून तो फोडला. खरोखर मी देहांत शिक्षेस पात्र आहे." अयाजचे मस्तकावर हात ठेवून राजानें उठविले व सरदारास म्हणाला " जा या एका करिता तुम्हास माफ. " पेला सरकारी आहे हें आजन्म विसरतां कामा नये.

आम्ही धावलो कल्पना पैं सवार, । परी चोरवाडीत केलें बिढार, ॥
तुला केवि देखो? दिसेनाचि दार, । हरे नाथ! तूं प्रेमळाचा उदार ५९३

तुझें प्रीतिनें संकटें येत मोठी, । परी सोडिता होय जन्मासि खोटी;॥
जरी काळ घालील आयुष्य पोटीं । तुझा जाच सोसीन मी कल्प-कोटी.
६०४

चव्हाट्यांत मी काय जी नीत जावे? । फटिंगासवें काय बाता बकावें?॥
प्रभु अंतरीची स्थिती तूज ठावे, । करी साहच राजा, तुलाचि स्तवावे.
६३६

मला वासना ही सदा जिंकिताहे। सदा आपल्या केलियालाचि साहे ॥
जरी तूं क्षमीशील, तूझी दया हे। तुवा देखिलें पाप, ही लाज राहे ६४१

जगीं छानिली खाक, राखेंत गेलें। अरी मित्र केलें, परी सर्व मेले ॥
तुझें मार्जिला मी कसें कां न बोले। जसे ठेविलें, राहिलो आणि झाले ॥
१९१

तुवा मोहिलें येथ सर्वा मनाला। तुवा वेधिलें सर्व ही लोचनाला ॥
अरे सावळ्या चाहसी ना कुणाला। तुझी आवडी येथ सर्वा जनाला
२२६

गुरू माउले सांगतो एक मात। असो बोल थोडा, बहू गूज यांत ॥
तुझे आवडीं धूळ होतो पदांत। उठे जैं कृपेचा शिरीं देसि हात २७०

तुझी वक्र दृष्टी दिसे ज्या गुणानीं। बळीचेहि यज्ञावरी जाय पाणी ॥
ध्रुवा झाकिले तू कृपेच्या परानीं। बसे तो ऋषी मंडळाचे शिराणी ॥
४४३

तुला नोळखे तो करी यज्ञयाग। न पावे तुझा प्रेमळावीण माग ॥
मला सांगसी 'सोसणे नर्क भाग'। तुला नोळखे त्यासि ही मात सांग ॥
९८७

जिथें मूर्ति तूझी तिला मी पुजीन। जरी वीष देसी तरी मी पियीन ॥
तुझें प्रीतिनें जाहलो सर्व हीन। बरी हीनता ती महा शक्तिहून ॥
४८३

तुला सोडु ऐसा नसे मी उदार। असो दर्द तूझा, नको ऊपचार ॥
तुझे दारिचीं धूळ इंद्रासि पार। त्रिलोकीं तुझा एकही बाल सार ॥
६६४

युगांतीं जधीं फाटतो विश्व पर्दा। रवी लोपती होय अंधार गर्दा ॥
तुझें पल्लवा मी थरी तेथ मर्दा। मला त्या दिलें हें पहा कोण दर्दा
१४२

वियोगें बहू सेविलें वीष दुःख,। तुझी चंद्रिका या चकोरासि सूख, ॥
उरीं संचले शुद्ध प्रीती पियूख,। प्रभूरे नको कालवू त्यात वीख. ६३५

न येरा पुढें शब्द काढीन हाय,। तुझे दुःख कोणासि सांगीन काय ?
तुझेवीण तो शब्द कोणासि जाय,। तरीं तोचि माझे जिवासी अपाय.
६६३

तुझें सन्निधीं दुःखही सौख्य झालें। वियोगें सराटे मनीं पेरियेले ॥
जगाचें कडू तें तुवा गोड केलें। तुझेवीण कैवल्य ही व्यर्थ गेलें २८

तुझे संगतीचा मना येत वारा। मला सोडुनी ध्यातसें तूज सारा ॥
अतां तें स्मरेना कधीं मद्विकारा। तुला चिंतुनी येत तूझें अकारा ॥ २१२

तुला बाहतो देइ ओ तूं अम्हास। तुझा शब्द झेलू अम्ही दासदास ॥
हरी साहसी आमुचा फार त्रास। तुझें साउली खेळतो आसपास ६७४

दुरूनी अले, तू मला अंगिकारी। मला तूचि हो शीतला छत्रधारी ॥
टळेना तुझें दैव कोणें विचारीं। तुवा दैव केलें, मला तू सुधारी ॥ ६७९

गुरू खोल दारासि, तू खोलवीता। पथा दाखवी, पंथ तू चालवीता ॥
न येराचिया मी धरी माय हाता। अरे नश्वरू येर, तू एक त्राता ॥ ८५०

धरीले तुवा, कोवि जावू सुटोनी?। कसे बोलुरे? बोल गेला अटोनी. ॥
निघे जीव या आश्रुवाटे तुटोनी,। उरीं राखिते तूज नेत्रा मिटोनी. ॥ ६६२

---

असे मी अहेवी तुझे आसण्यानें। तुझ्या आसण्यावीण माते न होणें ॥
अधीं अंतिं आताहि तूझें रहाणें। उरे मी कुठें सांगरे तूजवीणें? ९७०

हरी चेटकी नाटकी कोण? तू, मी?। इथें गाय वाघा वळी कोण? तू, मी?
तुझा मी, न तैं त्वद्विना बोलका मी। जरी मूंच मी, बोलता तूच कां मी? ७४०

स्वता मी जरी कां कधींही रहातो। तरी घोर पंकांत मी कां नहातो?॥
असे कीं नसें मी प्रभूचेचि हेतो। स्वता मी कुठें, कोण, कैं, काय, होतो? ६०१

प्रभो देह प्राणाचिया तूचि सारा। मला जीव कीं तूचि सारा पसारा
मला तूचि अस्तित्व माझा सहारा। तुझे पायिं मी लोपता तूचि सारा ७५९

असे मा तुवा निर्मिला वांझलेक,। स्मरे मी तुझे ऊपकारा अनेक. ॥
मला दैवदग्धा नसें दोष एक,। तुझे पायिची धूळ मद्भाळिं नेक. ॥ १०६७

असे मूढ मी, तें तुझें ज्ञान कोठें?। असे पातकी, तें समाधान कोठें? ॥
सुखा देसि जैं पाहुनी पुण्य मोठें,। तरी ती मजूरी, कृपादान कोठें? २२०

---

प्रभू तू दयाळू दया तीच क्षांती । पतीतासि कां देत नाहींस शांती? ॥
भल्यालीच देता तुझी कां महंती? । पतीता क्षमावे, तुझी रे दया ती २०८
तुला काम सारे जिवंता-मृताचें । तुवा विश्व शृंगारिलें सर्व साचें ॥
असें पातकी पोर मी केशवाचें । कुणा दोष? हें विश्व तुझें स्वताचें ८२३
प्रभूरे जरी मी बहू पाप केलें । तरी मत्तनू जीविता ताप केलें ॥
तुझें या दयेचें न मी माप केलें । म्हणूनी पुनः पाप आपाप केलें ६२८
प्रभू मी तुझे शक्तिचा एक मोड । तुझे प्रीतिचा वाहतो फोड कोड ॥
तुझ्यासी मिया जुंपिली येथ होड । कृपा वाढ, कीं पाप माझेंचि वाढ? ७५०
दयेसी तुझे पातका काय थोरी? । अम्हा पांथिकाची हरी तूं शिदोरी ॥
दयेनें तुझ्या होत मी स्वच्छ गोरी । न भीईन जाण्या यमाचे समोरीं ६४७
तपी नाचरे पाप, कीं तूं कराली । करी पाप मी, माय कीं तूं दयाली ॥
म्हणे तो कराली, वदे मी कृपाली । तुला आवडे नांव, कीं सांग गाली? ७६२
गुन्हा जो करीना असे कोण ऐसा? । न केल्या गुन्हा वाचला जीव कैसा? ॥
चुके मी, जरी देसि खोटाचि पैसा । बुरा मी,प्रभो काय तूं होसि तैसा?
७५७

---

तुझे दास्ययोगांत नाहीं निमालों । तुझे दारिं लोटांगणीं नाहिं आलों ॥
दयेला तुझ्या पैं न विन्मूख झालों । असे एक ते दोन नाहीं म्हणालों ५२८
असो नेक ते एक, हीं कोट पाप । तुला अर्पिलें श्रीगुरू सर्व आप ॥
फळाचें कशाला अतां घेउ माप? । तुझे पायिंची धूळ मी चूपचाप ५५४
प्रभू. विश्वकर्ता दयासिंधु भर्ता । दयेचा दुकाळू नसे त्या समर्था ॥
अहंकार मी वाहता पापकर्ता । क्षमापील जै होत मी नउवार्ता ५९१
मिया पातकें लिंपिली सर्व भूमी । दया मेघ तूं सर्व धूशील स्वामी ॥
जरी दीन होतांचि घेतोसि हामी । अतां दीन याहून होऊं कसा मी? ५९२
उरीं दुःख हें, अंबिके तूं निवारी । हरी तो हरी चित्त, तूं माय तारी ॥
वनीं जात मी, संकटा तूं निवारी । करीं सांपडो सावळा तो मुरारी ६९५
गुरूरे, मला ठेवि संसार सोपा । असें पाप तें नेइ निर्मूल लोपा ॥
सुखी आजि राखी, पुढे ने स्वरूपा । करी तुज साजेलसी स्वानुकंपा ७२०
प्रभू तूं मला पाठवी पाव रोटी । पडावी अयाचीत येवोनि ताटीं ॥
मला प्रेम देवूनि तूं बैस पाठीं । न चिंता अहंता पडावीच गाठीं ८४९

मला काय? मत्कर्म तूतें पटावें। तुला मी झटावें, न गर्वें नटावें ॥
भलें कीं बुरें जें मना होत ठावें। हटावें पुढोनी, मला तूं लुटावें ७२१
प्रभू भार तूं आवडी सावडीला। सदा पावसी संकटाचे घडलि ॥
वदूं काय मी या मनाचे नडीला?। तुझा ठाव पैला परेचे थडीला ८५९
प्रभू जाणसी अंतरंगा समस्ता। सदा हीन दीना धरीतोसि हाता ॥
अनूताप देई, क्षमापूर्ण ताता। दया सिंधु तूं बुद्धिचा एक दाता ५३३
गुरुमाय आम्हा चुकींतूनि गाळी। अगामी भयांतूनि निश्चित पाळी ॥
न ठावे अम्हा तोंचि संत्रास टाळी। कृपेची करी नित्य ताजी दिवाळी८६०
उरीं तप्त त्यांची दवा माउली तूं। पुरे भाजले त्यांस ही साउली तूं ॥
अतां सांगतों तूजला गुप्तमातू। न बोलों तरी जाणसी लक्ष हेतू ८६२
तुला माउले सर्वही ताप ठावे। दिनाचें दुखा वारण्या तूं झटावें ॥
तुला साहण्या आधिं तूं येथ यावे। तुला सांगण्या आधिं लाडा करावे
८६१
धरीसी करें माउले बालकाला। कृपेनें सदा झांकिसी पातकाला ॥
दया तूं करी दीन या याचकाला। तुझेवीण नेणेच मी आणिकाला ८६६
सुदाम्या दिली जी, पुरी सोनियाची। ध्रुवाला दिली जी, गती योगियाची
प्रभो काय वेचेल देता फुकाची। झुळूकी मला आपुले वारियाची ८६७
दयेनें दिली द्वारका त्या पृथूका। अघांचे निधी वारिले एक हाका ॥
प्रभूची दया होतसे ज्या नरा कां। करी मुक्त दृष्टीसवें तीन लोका ९६४
वियोगें मला भास्मिजे कीं समूळीं। सुयोगें पदीं ठेवि कीं पायधूळी ॥
कळेना विनंती तुला जे करावी। हितज्ञा तुला आवडे तोवि ठेवी २३
उरीं पोळला भाजला राख झाला। स्वता पेटसी कुंभिपाकांत ज्वाळा ॥
कराया दया सांगसी तूं दयाळा। असा कोण पंतोजि तूंरे धसाळा?॥
१००८

११० शके १८३७ मध्यें उमरचे रुबायांचें गुरुकरुणामृत मराठींत करण्याची, व आतां तें पुन: छापण्याची, आज्ञा ही गुरु माउलीची दया आहे. पुढें कृ. नरहरशास्त्री खरसीकर यांनीं प्रस्तावनेची आवश्यकता सांगितल्यावरून उमरसंबंधीं बरेच ग्रंथ चाळावे लागले. त्यांचा नामनिर्देश ठिकठिकाणीं वरील परिच्छेदांत आला आहे. त्या सर्वही ग्रंथकारांचे जगावर व या दासावर उपकार आहेत. त्यांपैकीं केक छापील पुस्तकें व हस्त लिखितें येथील सरकारी पुस्तकालयाचे मोहतमीम सय्यद अब्बास हुसेन साहेब यांनीं फार सवलतीनें पाहूं दिली याबद्दल, त्यांचे आभार आहेत. हें पुस्तक हैदराबादीं बहुत परिश्रमानें छापवून दिलें त्याबद्दल दक्कन लॉ-रिपोर्ट प्रेसचे मालक श्रीयुत. रा. रा. विनायकराव कोरटकर यांची धन्यता आहे. लिहिणारा, भाषा, आणि छपाई ही त्रिपुटी बालेघाटी आहे, म्हणून शुद्धिपत्राचे सनदी शिवाय या भोळ्या भाबड्या कृतीला बाहेर निघण्याचें धाडस नव्हतें; पण येथील उस्मानिया कॉलेजचे प्रो. कृ. रा. रा. चिंतामण नीलकंठ जोशी एम.ए. यांनीं उदार अंतःकरणानें या कृतीस धैर्य व उल्हासानें एका प्रतीस शुद्धिपत्र दिलें, त्याचे आधारावर या कृतीच्या प्रती सज्जनांचें दर्शनास येतील. तरी पण त्या लज्जायमान होत आहेत. या लाजेचें कारण आजकाल सर्व वर्णांनां आपआपले चिन्हांचा व अलंकारांचा त्याग इष्ट वाटल्यापासून त्याच बहुमान्य मताचा प्रसार छापखान्यांतही फार झपाट्यानें झाला आहे. त्यामुळें मूळ मुद्रितांत स्वत: सिद्ध असलेली काना, वेलांटी, रेफ, अनुस्वार इत्यादि शिखासूत्रतिलकादि अलंकार पुढील प्रतींत वर्णांनीं व्यक्तिस्वातंत्र्यानें सोडले आहेत. सर्वप्रती छापून झाल्यानंतर त्यांपैकीं एकीचेंच शुद्धिपत्र प्रो. जोशी साहेबानीं दिलें; प्रत्येकीचें वेगवेगळें शुद्धिपत्र देणें दुरापास्त आहे. आतां वर्णांच्या या व्यक्तिस्वातंत्र्यामुळें वाचणें कठीण झालें आहे. म्हणून सुज्ञ वाचकांचे दारीं दर्शनास आलेली ही प्रत हा जोगवा मागते कीं हिला पानोपानीं आपणच स्वहस्तें यथोचित शुद्धीचें सौभाग्य लेणें लेववावें.

गुरुकरुणामृताचीं मुद्रितें तपासीत असतांना या दासास असें वाटलें कीं कांहीं मूळ रुबायांचे संस्कृत सुभाषितांशी फार साम्य आहे, म्हणून प्रो. जोशी साहेबांस विनंति केल्यावरून त्यानीं बरीचशी मराठी व संस्कृत सुभाषितें शुद्धी·

पत्राची तयारी करीत असतांना दिली, त्यांपैकीं भर्तृहरीचे नीति व वैराग्य शतकांतील उदाहरणें खालीं देत आहे.

१ गु. क. ६१७ भ. नी. १२

॥ भोगा न भुक्ता वयमेव भुक्तास्तपो न तप्तं वयमेव तप्ताः ॥

॥ कालो न यातो वयमेव यातास्तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णाः ॥

२ गु. क. ९७२ भ. नी. १४

॥ यद्धात्रा निजभालपट्टलिखितं तत्प्रोज्झितुं कः क्षमः ॥

॥ तद्धीरो भव वित्तवत्सु कृपणां वृत्तिं वृथा मा कृथाः ॥

३ गु. ५४१ भ. नी. ९३

॥ सृजति तावदशेष गुणाकरं पुरुष-रत्नमलंकरणं भुवः ॥

॥ तदपि तत्क्षणभंगि करोति चेदहह कष्टमपंडितता विधेः ॥

४ गु. क. ७४५ भ. वै. ३५

॥ सा रम्या नगरी महान्स नृपति० इ० ॥

५ गु. क. ४४२ भ. वै. ९८

॥ जीर्णा कंथा ततः किं सितममलपटः पट्टवस्त्रं ततः किम् इ० ॥

६ गु. क. ४२ भ. वै. १२६

॥ परिभ्रमसि किं वृथा क्वच न चित्त विश्रम्यताम् ॥

॥ स्वयं भवति यद्यथा भवति तत्तथा नान्यथा ॥

॥ अतीतमपि न स्मरन्नपिच भाव्यसंभावयन् ॥

॥ अतर्कितगमागमाननुभवस्व भोगानिह ॥

उमरच्या कैक रुबायांचें साम्य भर्तृहरीच्यां नीतिवैराग्य शतकें आणि हितोपदेश यांतील सुभाषितांशीं होत असल्याचें या दासास आढळलें. विस्तार भयास्तव कांहींचाच उल्लेख येथें करीत आहे:—

७. गु.क. २२८ हि. विग्रह ९६

परोपि हितवान्बंधुर्बंधुरप्यहितं परः। अहितो देहजो व्याधि र्हितमारण्यमेषजं

८. गु. क. ६८ हि. मि. ५

अनिष्टादिष्ट लाभेऽपि नगतिर्जायते शुभा। यत्रास्ति विषसंसर्गोऽमृतं तदपि मृत्यवे

९. गु.क. ८७१ हि. मि. १२७.

नाप्राप्यमभिवांछंति नष्टं नेच्छंति शोचितुम् ।
आपत्स्वपि न मुह्यंति नराः पंडितबुद्धया : ।

१०. गु.क. १४३ हि. मि. १४३

यदभावि न तद्भावि भावि चेन्न तदन्यथा ।
इति चिंता विषघ्नोऽयमगदः किं न पीयते ।

११. गु.क. ३८१ हि. मि. १३९

वृत्त्यर्थं नातिचेष्टेत साहिधात्रैव निर्मिता । गर्भान्निपतिते जन्तौ मातुः प्रस्रवतःस्तनौ

१२. गु.क. ८७० सुहृद्भेद ४७

यस्य यस्य हि यो भावस्तेन तेन हि तं नरम् ।अनुप्रविश्य मेधावी क्षिप्रमात्मवशं नयेत्

१३. गु.क. ७५१ भतृ. नी. ८६

पातितोऽपि कराघातैरुत्पतत्येव कंदुकः । प्रायेण साधुवृत्तानामस्थायिन्यो विपत्तयः

१४. गु.क. २०३ भतृ. नी. ८७

॥ आलस्यंहि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ॥

१५. गु.क. १२८ भतृ. नी. पूर्वार्ध.

॥ यां चिंतमामि सततं मयि साविरक्ता ॥ इत्यादि.

१६. गु.क. ५४८ भतृ. वै. ९

॥ निवृत्ता भोगेच्छा पुरुषबहुमानो विगलितः ॥
॥ समानाः स्वर्याताः सपदि सुहृदो जीवितसमाः ॥
॥ शनैर्यष्ट्युत्थानं घनतिमिररुद्धे च नयने ॥
॥ अहो धृष्टः कायस्तदपि मरणापायचकितः ॥

१७. गु.क. १७५ भतृ. वै. १४

॥ वलिभि मुंखमाक्रांतं पलितैरंकितः शिरः ॥
॥ गात्राणि शिथिलायंति तृष्णैका तरुणायते ॥

१८. गु.क. १४९ भ. वै. ३७

॥ यत्रानेकः क्वचिदपि गृहे तत्र तिष्ठत्यथैको ॥
॥ यत्राप्येकस्तदनु बहवस्तत्र नैकोपि चांते ॥

|| इत्थं चेमौ रजनि दिवसौ दोलयन्द्वाविवाक्षौ ||
|| कालः काल्या भुवनफलके क्रिडति प्राणिशारैः ||

१९. गु.क. १५६ भ. वै. ६७

|| अग्रे गीतं सरसकवयः पार्श्वतो दाक्षिणात्याः ||
|| पृष्टे लीलावलयरणितं चामर-ग्राहिणीनाम् ||
|| यद्यस्त्येवं कुरुभवरसास्वादने लंपटत्वम् ||
|| नोचेच्चेतः प्रविश सहसा निर्विकल्पे समाधौ ||

२०. गु.क. ३०० भ. वै. ७५

|| किं वेदैःस्मृतिभिः पुराणपठणैः शास्त्रैर्महाविस्तरैः ||
|| स्वर्गग्रामकुटीनिवासफलदैः कर्मक्रियाविभ्रमैः ||
|| मुक्त्वैकं भवबंधदुःखरचनाविध्वंसकालानलं ||
|| स्वात्मानंदपदप्रवेशकलनं शेषा वणिग्वृत्तयः ||

२१. गु.क. १०४२ भ. वै. ७७

|| ब्रम्हांडमंडलीमात्रं न लोभाय मनस्विनः ||

२२. गु.क. २८० भ. नी. ८

|| यदा किंचिज्ज्ञोहं द्विप इव मदांधः समभवम् ||
|| तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ||
|| यदा किंचिचित्किंद् बुधजनसकाशादवगतम् ||
|| तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ||

वरील सुभाषितांचे विचार उमरचे रुबायाशीं मिळतात. कोठें कोठें तर चरणशः आहे, ईराण-सम्राट नौषीरवानचे कालापासून संस्कृत पंचतत्रादि ग्रंथांचीं भाषांतरें पेहलवीमध्यें झालीं होतींच.व पुढें अब्बासी खलीफांचे कालांत फार्सी व अरबीमध्येंही संस्कृत अध्यात्म नैतिक,ज्योतिष,वैद्यक,इत्यादि शास्त्रांची भाषांतरें झालीं होतीं. म्हणून उमरचे रूबायांचें संस्कृत सुभाषितांशीं साम्य होणें कांहीं अद्भुत नाहीं.उमरच्या रुबायांचे आशय फिज्जेरल्ड सारखे कांहीं पाश्चात्याचे लक्षांत न येण्याचें मुख्य कारण त्यांचें लक्ष शब्दपटाचे आड असलेल्या आंतील सुंदर विचारांकडे गेलें नाहीं. आणि मुख्यतः आर्यावर्तांतून जे तात्विक विचार ईराणा-

तच नव्हे, तर ग्रीस पर्यंत पोहचले होते त्यांचें संमेलन उमरच्या रुबायाशीं झालें नाहीं. उमरच्या रुबायासंबंधीं ज्या खुळसट कल्पना पसरल्या आहेत त्या सदर उदारहराणावरून निर्विवाद ठरत आहेत. पुढें आणखी संशोधनांत उमरच्या लुप्तप्राय रुबायांचा संग्रह आणि त्यांचा यथार्थ आशय हीं समजणें शक्य आहे. पण या महत्कार्यास सज्जनांचें सहाय्य पाहिजे. त्याविषयीं विनंति करावी ती "कोणास?" असें म्हणण्याचें दुर्भाग्य निदान या दासास नाहीं. आपले पवित्र महाराष्ट्रांत संस्कृत भाषाभिज्ञ संशोधक बहुत आहेत. सर्वांचे चरणीं ही विनंति आहे कीं, गुरुकरुणामृताचे श्लोकांचें सादृश्य ज्या सुभाषितांशीं असेल, त्यांचा उल्लेख ग्रंथांचे नांवासह या दासास कळवावा. म्हणजे त्या ग्रंथांचे अनुरोधानें उमरचे रुबायांचे संशोधनास पुढें विशेष मदत होईल.

उत्तम विचारांवर व नैतिक तत्वांवर कोणतेही जाति धर्माचा कायमचा वारसा नाहीं. कोणतेही धर्माचे भक्त असोत. ते जसजसें प्रभूचे जवळ येतात तसतसें त्यांचे विचारही सारखे होतात. गुरू माउलीचें सांगणें अक्षरशः खरें आहे कीं:—

" प्रभू एक व त्याचे दरबारांतील संत सरदार त्यांतलेच ते एक."

कळावें लोभ असावा हे विनंति.

चैत्र शु० १ शके १८५५<br>श्रीमुखनाम<br>२७ मार्च १९३३ इ०

सज्जनांचा पदरज<br>व्यंकटेश माधव दातार.

## शुद्धिपत्र—नंबर १ ( विनंति पत्राचें )

| पान | परिच्छेद | आळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | मध्यस्थी | मध्यस्थ |
| २ | ४ | २ | अकुळीं | अंकुळी |
| ,, | ,, | ३ | होतें | होता. |
| ,, | ,, | ६ | धंद्याचें | धंद्याचें नांव त्यास पडतें. |
| ४ | ११ | २ | त्यांची | तिची |
| ५ | १४ | २ | सवलत | सवड |
| ,, | १५ | २ | परिमाभु | परमाणु |
| ६ | १८ | १५ | आवश्य | अवश्य |
| ७ | ,, | ५ | दिलें आहे | दिलें गेलें आहे. |
| ,, | ,, | ६ | सुखसंपत्तीचे | सुखसंपत्तीबद्दल |
| ,, | १९ | ४ | स्वरूपऽव | स्वरूपेऽव |
| ९ | २३ | २ | वितृष्यस्य | वितृष्णस्य, |
| ,, | ,, | २ | चरित्रास | चारित्राकडे |
| १० | २४ | २ | केलेल्याचें | केल्याचें |
| ,, | २५ | ५ | प्रगटी करण्यांत | प्रगटी करणांत |
| ११ | २७ | २ | नसे | नसल्यामुळें |
| ,, | ,, | ,, | विद्वत्तेमुळें | विद्वत्तेमुळें त्यास |
| ,, | ,, | ७ | पूर्वेची | चे पूर्वीची |
| १२ | ३१ | ६ | वृक्षे | वृक्ष |
| १४ | ३५ | १ | वाडें | वाडे व विद्यालयें हीं |
| ,, | ,, | २ | झालां | झाली |
| ,, | ,, | ५ | मृतप्राय. | मृतप्राय झालें |
| ,, | ,, | ५ | उद्देशून | उद्देशून तो |
| १७ | ३७ | ५ | आर्द्द | आर्द्र |

| पान | परि-च्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १८ | ३९ | ४ | स्वताः | स्वतः |
| १८ | ३९ | ४ | मुर्के | मुका |
| ,, | ,, | ६ | रुबाईसारख | रुबाईसारखें |
| ,, | ४० | १ | निंवडून | निवडतां |
| ,, | ,, | ,, | आक्सलफोर्ड | ऑक्सफोर्ड |
| १९ | ,, | ७ | व्हर्सेस | व्हर्सेसमध्यें |
| ,, | ४१ | २ | त्यांत | त्याचा |
| ,, | ,, | १५ | रुबयाचें | रुबयांचा |
| २० | ४२ | १२ | बषापूर्वी | वर्षापूर्वी |
|  | ,, | २१ | Disapisfied | Dis-satisfied |
| ,, | ,, | २३ | Countani | Contain |
| २४ | ४६ | ४ | कुठपत | कितपत |
| ,, | ४७ | ११ | २१६ | २१८ |
| ,, | ,, | १२ | ५६७ | ५३९ |
| २५ | ४८ | ८ | कावे | काव्य |
| २६ | ४९ | शेवटची | शतकाषर्यंत | शतकापर्यंत |
| २७ | ,, | १ | कल्पनाकोटी | कल्पना |
| २८ | ,, | १९ | प्रतीच्या | प्रती |
| ३० | ५१ | ७ | हस्त..,एकच | एकाच हस्तलिखितांत |
| ३१ | ५२ | ४ | नतर | नंतर |
| ,, | ५३ | ४ | प्रथक | पृथक |
| ३२ | ५४ | १ | निर्देशित | निर्दिष्ट केलेली |
| ३३ | ५५ | ९ | लखन | लेखन |
| ,, | ,, | ११ | दासोपंताचे | दासोपंतांची |
| ३५ | ५७ | २ | प्रथक | पृथक |
| ३६ | ६१ | १३ | पटवर्धनचें | पटवर्धनांचें |

| पान | परि-च्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- | --- |
| ३७ | ६२ | ६ | स्पष्टी | स्पष्ट |
| ,, | ६४ | १ | परमात्माचें | परमात्म्याचें |
| ३८ | ६५ | ७ | मधुमेतां | मधुमेतुमां |
| ३९ | ६६ | १ | अवाश्य | अवश्य |
| ,, | ,, | ५ | स्वात्मानां | स्वात्मानं |
| ,, | ,, | ६ | लोकिक | लौकिक |
| ,, | ,, | ११ | परलाऽपि | परलोकेऽपि. |
| ४१ | ७० | ४ | पीण्यास | पिण्यास |
| ,, | ७८ | ६ | तिरस्कारी | तिरस्कारदर्शक |
| ४३ | ७१ | ११ | सुखावसानीं | सुखपरायण |
| ,, | ,, | १२ | दिलेला | केलेला |
| ,, | ,, | १६ | वैराग्यप्रद | वैराग्यपर. |
| ४४ | ,, | २५ | निरंकारत्व | निरहंकारत्व |
| ४६ | ७२ | ३ | ग्रीकहून | ग्राकमधून |
| ,, | ,, | ११ | पावत | शकत |
| ४७ | ७३ | १० | अनमोल | अमोल |
| ,, | ,, | ११ | उचलून | उकलून |
| ४७ | ७३ | २६ | निवेदित | निवेदिली |
| ४८ | ७४ | ३ | रज्यु | रज्जु |
| ४९ | ,, | ११ | गतभर्तका | गतभर्तृका |
| ५० | ,, | २१ | वर्णाञ्छठाः | वर्णच्छटान् |
| ५१ | ,, | १७ | असंसरीं | अवसरीं |
| ५२ | ७५ | ९ | हेत्वर्थे | ध्वन्यर्थ |
| ,, | ,, | २१ | तेथें | जेथें |
| ,, | ,, | २ | केल्या | म्हणून गेल्या |

| पान व ओळ | अशुद्ध | शुद्ध | पान व ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|
| ९१। १८ | देखणेंषषातें | देखणेंपणातें | १०७। ९ | इष्ट्रानु.: | इष्टानु |
| ,,। १९ | अंधकुर्पी | अंधकूर्पी | १११। ४ | गुप्तय | गुप्तये |
| ९२। २२ | ग्रह | गृहम् | ११२। १ | बम्ह | ब्रम्ह |
| ९३। १ | वृति | वृत्ति | ,,। १४ | प्यधिकतरा | प्यौधिकतरा |
| ९४। १४ | पश्चादि. | पश्चादि. | ,,। १८ | मद्गुतैरांतरत्ग | मद्गतैरांतरात्म |
| ९५। ११ | गाभ | सगर्भे | ,, ।२७ | क्षान | ज्ञान |
| ९५। २० | मास्टर मॅन | सूपर मॅन. | ११४।११ | कशितान्या | कथिताह्यर्था: |
| ,, । ८ | ग्राचीन | प्राचीन | ,, ।१९ | यश्चपि | यश्चापि |
| ,, । १५ | जा | जो | ११५।१९ | मुमुक्षुनि: | मुमुक्षिभि: |
| ,, । २२ | इश्वरा | ईश्वरा. | ११६।२६ | भनवंताचे | भगवंताचें |
| ,,। २३ | झाला | लागला | ११८।१७ | अंतर्पट | अंत:पट |
| ९७। ९ | स्मधनें | साधनें | ११९।१३ | गर्गेत | गर्तेत |
| ,,। ११ | स्वत:हाचा | स्वत:चा | १२२।२३ | साखरा | सारखा |
| १००। ६ | माथि | मयि | १३०।२६ | कथमतश्च | कथयंतश्च |
| ,, । ७ | भक्तिरष्य. | भक्तिरव्य. | १३४।१७ | वात्सल्यसाक्ति | वात्सल्यासक्ति |
| ,, । ८ | रेशित्वं- | देशसेवित्वं | १३४।१८ | विरहासस | विरहासक्ति |
| ,, ।२० | मैत्र | मैत्र: | १३४।२७ | रूपाससक्ति | रूपासक्ति |
| १०२।२१ | यावय | वाक्य | १३५। ७ | वात्सल्यसक्ति | वात्सल्यासक्ति |
| १०३। ८ | सस्था | संस्था | १३५।९ | निवेदनसासक्ति | निवेदनासक्ति |
| १०४। ३ | अथतो | अथातो | ,,। ९ | शिवानुशाशानं | शिवानुशासनं |
| ,, । ,, | व्यांख्यास्यंम | व्याख्यास्याम | | | |

## शुद्धिपत्र नंबर २ श्लोकांचें

अनुस्वार पुष्कळ ठिकाणीं कमी अधिक पडले आहेत. बरेचसे अर्थानुरोधानें समजण्यासारखें आहेत. विशेषस्थळी शुद्ध केले आहेत. अनेकदां येणारे अशुद्ध एकदांच शुद्ध केलें आहे. × फुली असलेले अशुद्ध टाईप उडून गेल्यामुळें आहे.

| | श्लोक | अशुद्ध | शुद्ध | | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६ | तू | तूं ( सर्वत्र ) | × | १३५ | धंदा | धंदा |
| | ८ | घरीजें | घरीजे | × | १३८ | उघडीले | ऊघडीले |
| × | १० | चडी | चंडी | × | १४१ | रिघाव | रिघावें |
| | १३ | वस्तींसि | वस्तीसि | × | १६५ | भगा | भंगा |
| | १९ | गुरूदारि | गुरुद्वारिं | | १७३ | एकल | एकलें |
| | २३ | भस्मिजें | भस्मिजे | × | १८० | प्रीताच | प्रीतीच |
| | ३१ | रामनामामासि | रामनामासि | × | २३२ | गाष्टी | गोष्टी |
| | ४० | दा देह | हा देह | | २२० | समाधान | तुझेंज्ञान |
| | ४१ | निष्टूर | निष्टूर | × | २४७ | बाप | बापे |
| | ५५ | पुलिंदा | मिलिंदा | × | २५८ | जळ | जळे |
| × | ५८ | येणियाचा | येणियाची | × | २६० | सग | संग |
| × | ७९ | गुडे | गुंडे | × | २६७ | माझ | माझे |
| | ८७ | विष्णूक्रांतू | विष्णुक्रातू | × | २७३ | जभि | जीभ |
| × | ९६ | यदच्छे | यदृच्छें | × | ३०६ | गाप | गोप |
| | १०० | ठिळें | ठिळे | × | ३०८ | भागा | भांगा |
| × | ११० | हाता | होतो | | ३१० | ध्यातसा | ध्यातसें |
| | ११३ | दुःखाखि | दुःखासि | | ३६५ | कुमोद | कुमूदा |
| | ११८ | अखें | असें | × | ३७६ | अत | अंत |
| | १२५ | थाठ | थाट | | ३७७ | मौती | मोतिं |
| × | १२९ | स्मात | स्मार्त | | ३८० | अधर्मि | अधर्मी |
| | १३० | श्रेष्ट | श्रेष्ठ | × | ९३ | सावळी | सावळा |

| | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| × | ४०३ | कुणाच | कुणाचें |
| × | ४१४ | धैय | धैर्य |
| | ४४० च.४ | धरी | धीर |
| × | ४६२ | काप | कापे |
| × | ४८५ ,, ३ | दतसी | देतसी |
| | ४८३ ,, १ | विषा | विषा |
| | ५०२ | दुश्चित | दुश्चित्त |
| × | ५०३ ,, ४ | थाट | थाटें |
| × | ५११ | खाल | खोल |
| × | ५३७ | कैसा | कसा |
| | ५५० | श्रृष्टी | सृष्टि |
| × | ५६० | सता | संता |
| × | ६२२ | दिस | दिसे |
| × | ६७९ | अगिका | गिकारी |
| | ६८९ | टाथि | ठायिं |
| × | ७०१ | धम | धर्म |
| × | ७२० | ससार | संसार |
| | ७४४ | घरीला | धरीला |
| | ७६३ | टेवी | ठेवी |
| | ७७४ | घाठा | घाटासि |
| | ७७५ | भी | मी |
| × | ८०२ | बांधु | बांधुनी |
| | ८२१ | जये | जयें |
| | ८५५ | शहात | राहात |
| | ८६३ | अणू माझि | अणू माजि |
| | ८६५ | निकृष्ठा | निकृष्टा |
| | ८७३ | धामतू | धाम तूं |
| | ८७८ | वृजीं | व्रजीं |
| | ८७९ | पेठवू | पेटवू |
| × | ८७९ | इच्छिताथासि | इच्छितार्थासि |
| | ९११ | सव | सर्व |
| | ९१८ | शेविरे | सेवि रे |
| | ९१९ | गोकुळाचि | गोकुळाचाचि |
| × | ९२८ | उठा | उठी |
| × | ९२९ | अस | असें |
| × | ९३१ | अस | असें |
| | ९३२ | ब्रम्हणे | माउले |
| × | ९४१ | प्रम | प्रेम |
| × | ९५२ | ठल | ठेलें |
| × | ८५६ | कवि | केंवि |
| × | ८५८ | सव | सर्व |
| | ९५९ | चिरंजीवतेचा | चिरंजीवितेचा |
| × | ९७४ | विधमा | विधर्मी |
| | १००७ | वायुसगा | वायुसंगा |
| × | १०२६ | भवाद्धी | भवाब्धी |
| × | १०२६ | अनिवाच्य | अनिर्वाच्य |

# निवेदन

तुझें तूजला अर्पिता साव झालो ।
तुझें पाउलीं रंक मी राव झालो ।
गुरू माउले तूज पासाव झालो ।
परी मचि माझेपणीं वाव झालो ॥ १ ॥

इथें मागती अर्पणाचेनि नावें ।
तरी मागण्याला कमी कां करावे ? ।
अम्हाला तुवा नीज-सर्वस्व द्यावे ।
तुझेवीण आम्हासि कांही नसावे ॥ २ ॥

|| श्रीगुरुमाऊली प्रसन्न ||

# || श्रीगुरुकरुणामृत ||

प्रभातीं वदे माय आकाशवाणी । अरे वेडिया घोरसी दैन्यवाणी ॥
त्वरें ऊठ घे घोट नामामृताचा । पुढें घेतसे घोट मृत्यू गळ्याचा १

न पीसी सुरा, बोलसी वक्र गोष्टी । गुरू पाउला दूर नेलीस दृष्टी ॥
न पीसी सुरा, वाहसी गर्व पोटीं । सुरेहूनि जाडें तुझें कृत्य कोटी २

गुरूनें मला रंगवीलें स्वभावें । तनू माजि श्री माउली घोष पावे ॥
सदा नाम हें गाइलें तेंचि गावें । मुखीं नाम नामांत चित्तें असावें ३

उद्याची स्थिती आपुली ना परावी । मना उन्मनी आजि येथें करावी ॥
गुरू पूर्णिमा रागरंगें भरावी । पुढें वासना कोणतीही नुरावी ४

विधी निर्मितो स्वर्ग तुझेचि तोषें । यमें दंडिजे जीव तुझेचि रोषें ॥
असे स्वर्गि दाटी मला ती न सोसे । मला श्रीगुरू दे तुझी पायपोसे ५

वदे माय बाळा कळालें तुला कां । मुखा माझिया पाहसी तू मुला कां ॥
मुखीं शोभतो माझिया तोचि देव । तुझें लोचनीं देखतो जो सदैव ६

तुझेवीण माते गुरू नाहि न्यारा । मना लोचना जीविता तूचि सारा ॥
नसे कोणि जीवाहुनी येथ प्यारा । तयाहूनि कोटी गुणें तू उदारा ७

मला श्रीगुरू तू बरा ओळलासी । बहू गुप्त तू आजि येसी प्रकाशीं ॥
धरीजे तुला शक्ति आहे कुणासी । तुझी ही दया मी तुझी अल्प दासी ८

अहो पंडिताचार्य ऐका विनंती । धरा मौन सोडा मला ईश हातीं ॥
सुधे चालतो देखता वक्र दृष्टी । सुधारा स्वनेत्रा नका होउ कष्टी ९

मधू शब्द खड्गें वितंडासि खंडी । सदा स्वात्म राज्यासि भोगूं अखंडी ॥
सहा शत्रुची तोडिली आम्हि मुंडी । अम्ही भैरव श्रीगुरू माय चंडी १०

मला सोडुनी तू जसा दूर गेला । युगें लोटलीं राहिलो मी भुकेला ॥
तुवा हा कधी शोध नाहीच केला । कसा वाचतो दास कीं काय मेला ११

मला माय पादामृतें प्राण देही । गुज ज्ञान दावूनि ठेवी विदेहीं ॥
न वांछीत मी स्वर्ग मोक्षासि कांहीं । कुरोंडीन थेंबावरी सर्व पाहीं १२

जगीं मी बहू काळ वस्तींसि आलो । दुखा संकटावीण कांही न धालो ॥
अरेरे न मी सद्गुरू पायिं गेलो । मनीं कामना कोटि घेऊनि मेलो १३

जला मातिचा देह केला सपाट । भवाग्नीमधें भाजिला पाउपोट ॥
सुखाचा मिळाला नसें एक घोट । रिता हात कर्मीं रिकामेंचि पोट १४

पुरी कामना एक ही नाहिं झाली । हरीची कथा नाहिं कानासि आली ॥
खरी प्रीत संतासि नाहीं मिळाली । बुरी प्रीत तीही भिऊनी पळाली १५

न माणूस तो शापिती जीव ज्याला ॥ चिरी मान या भीतिनें मान त्याला ॥
दयेनें दिला ग्रास जो याचकाला ॥ त्वरें कल्पवृक्षापरी दे फळाला १६

अशा घोर लोकीं शहाणा कशाशीं ॥ धना दौलतीची मजा देत फासी ॥
निजे घेउनी जो तिजोरी उशासीं ॥ तयाचीं हडें पुत्र फेकी विदेशीं १७

असे मान्य प्रामाण्य हा वेद बोल । परी त्यांतही शोधिती सार फोल ॥
गुरू शब्द एकैक ऐसा अमोल । सदा सार अर्थं घनानंद खोल १८

फिरे मागुता ऐस कीं तू कसाही । जरी पातकी घोर माघार घेई ॥
कुणाही निराशा गुरूदारिं नाहीं । अनंतापराधी तरी लाग पायीं १९

तुझा लाडका तो सदा मस्त राहो । पिसा तामसा लोक निंदाहि साहो ॥
हुशारींत चिंता नवा हो न वाहो । तुझें धुंदि माझारिं होणार होवो २०

बऱ्या वाइटाचा धनी राम प्यारा। कृपा साउली देत दासा सहारा ॥
धरू प्रेम ना जी विटू कर्म भारा। नसे काज पुण्यासवें त्या उदारा २१

गुरू माउले एकदा देख दीना। हरी ताप या हीन संतप्त मीना ॥
घनानंद तू अमृताचा खजीना। मला भेटरे मी मरे तूजवीना २२

वियोगें मला भस्मिजें कीं समूळीं। सुयोगें पदीं ठेवि कीं पायधूळीं ॥
कळेना विनंती तुला जे करावी। हितज्ञा तुला आवडे तेवि ठेवी २३

बहू चांगली ही मला वर्ग व्यक्ती। सुखाचा स्मृती धारणा बुद्धि शक्ती
कळेना घटीं मृत्तिकेच्या कशाला। मला चित्रिता वेंचिलें कौशलाला २४

न जाई तिथें धूम केल्या तपाचा। नसे लाभ ही तेथ या संचिताचा ॥
विकारी मला ठेविलें नाम जेणें। मुळीं लेशही तो विकारासि नेणें २५

गुरू माउले जीव ब्रह्मासि जोडी। स्वरूपीं तुझें चित्त ग्रंथीसि सोडी ॥
त्वरें पाजि माते घडा अमृताचा। घडा जो घडीती न या मृत्तिकेचा २६

शवा माझिये स्नापिजे पादगंगा। गुरू पादरेणूंत चर्चा मदंगा ॥
मला भेटण्या जे तुम्ही इच्छितासा। गुरुद्वार धूळींत माते तपासा २७

तुझें सान्निधीं दुःखही सौख्य झालें। वियोगें सराटे मनीं पेरियेले ॥
जगाचें कडू तें तुवा गोड केलें। तुझेवीण कैवल्य ही व्यर्थ गेलें २८

चुकेना कुणा हा कळी काळ खाया। तनाची धनाची दुराशाचि वाया ॥
उपाया गुणें वाढवीसी अपाया। अपायाचि सोसी न धुंडी उपाया २९

अती नम्रतें पाविजे भाविकाला। पदा सेवुनी लाहिजे चित्सुखाला ॥
तुकेना गयाकोटि एका मनाला। गया कासया तोषवी सज्जनाला ३०

घडी ही तुझी रामनामामासि प्यावें । गतायू मिळेना, स्वरूपीं मिळावें ॥
जगाची गती ही स्मशानांत जावे । अहोरात्र तू ही स्मशानीं रहावे ३१

तुझें प्रेम चित्तांत जेव्हां उफाळे । मदें जीव आनंद दोंदांत लोळे ॥
उभ्या रिद्धि सिद्धी क्षणाचेनि वेळे । तुझें रूप नेत्रांत साक्षात खेळे ३२

शिवा दे मला येवढ्या प्रेमरंगा । शवा जाळिता जे न सोडी मदंगा ॥
चिता भस्म तें चर्चुनी तू निजांगा । मदें नृत्य गीतें करावास दंगा ३३

बहूदा तुला प्रार्थिलें मुक्तराजा । निजा शोध तू शोध घेऊनी माझा ॥
अहोरात्र ही घोर निद्रेंत जाई । मला तू तुला मी न स्वप्नींहि पाही ३४

बका बोलिला एक संतप्त मासा । फिरे जैं नदी होय कीं सिंधु खासा ॥
वदे येरु, जैं रांधिले जाउ मी तू । तरी विश्वसिंधू मृगांबूहि होतू ३५

पुरे हा मला श्रीगुरूमाय संग । तनू भाव टाकूनि झाले निसंग ॥
क्रिया सद्गुरू सागरीचे तरंग । गुरू मन्मनीं मी गुरू अंतरंग ३६

गुरू माउली वीण नेणोचि आन । तनु प्राण हा जीव नामीं गहाण ॥
नसे भोग मोक्षादिकाची तहान । असे मुक्त तेजाप-भू-वायुहून* ३७

तुझे पाय चुंबू सुखें सौख्य दीपा । न चुंबू मुखीं अप्सरांच्या कलापा ॥
सदा कास तूझी धरीली करें पा । तुझें पाउलीं घालिती पाय खेपा ३८

शिरा वाहिलें माउलीचे सुबोला । प्रसन्नामुखीं लोण केलें जिवाला ॥
स्वयें माउली चाखवी प्रेम प्याला । मला देखुनी दूभते कीं सुखाला ३९

श्रुती शास्त्र माझे स्तुतीचा पुकारा । मला आण कीं सेविजें प्रेमसारा ॥
जगीं जीव मी देव सर्वांसि प्यारा । जगाकार दा देह माझाचि सारा ४०

---

टीप:– * तेज–आप–पृथ्वी–वायु.

अरे क्रूर काला विनाशासि मूला । मूळींचाचि निष्ठूर अन्याय शीला ॥
अगे भूमिके तू बहू नाश केला । धुळी सूदिले संतरत्ना अमोला ४१

दिनें एक दो जात आयुष्य वेचीं । जसी जंगली वाहद्रूळी हवेची ॥
चिंता करी मी कधीं दो दिसाची । दिना ना अल्याची दिना गेलियाची ॥ ४२

ठीं आजि तूं चिद्विलासासि पाही । मृती शोधिता लाहसी अमृताही ॥
से डोळसा देखिलें आजि कांहीं । उद्या पाहणें झांकतां नेत्र नाहीं ४३

मला नेम पीणें गुरु-प्रेम प्याला । क्रियातीत हा पंथ माझा निराळा ॥
पुसे "नेमसी काय जी नंदलाला"। वदे "तूझिया सुप्रसन्ना मनाला" ४४

सख्या काळ माते तुला जिंकू पाहे । नसें विश्व माझी तुझी बैठका हें ॥
तुझें माझिये माजि जें प्रेम वाहें । तुझें माझिये हातिं हें सत्य आहे ४५

नसे मी मठा देउळा योग्य साचा । गुरू जाणतो जाहलो मी कशाचा ॥
भिकारी भुकेला गुरू पादुकाचा । न मी लौकिकाचा न पारत्रिकाचा ४६

बरी वेळ ही माझिये यौवनाची । गुरू सेवनें पूर्णता कामनाची ॥
कडू फार प्रीती, परी गोड साची । कडू ही रुची माझिये जीविताची ४७

पडेना तुझें रूप बुद्धीस ठाया । पदा वंदितो, अन्य नेणे उपाया ॥
कसी जाणिजे गारुड्या तूझि माया । तुला जाणता तूचि श्रीनाथराया ४८

किती दूर आलो, किती दूर जावें । नसे आदि ना अंत कोवि गणावें ॥
खरी मात कोणीहि सांगूं सकेना । इथें *आगमा निर्गमाचा ठिकाणा ४९

वदे रावणू लाथ मारीन बुक्का । चुरूनी जगा पिंड पाडीन पक्का ॥
तयाचें शिरी काळसा कावळा का । वदे कां कुणा कोण कां कोण काका ५०

---

*येण्याजाण्याचा पत्ता.

जधीं जागतो सूख दुःखोनि भाजें । जधीं झोंपतो लोपते बुद्धि लाजें ॥
सरें जागणें झोप आली न सेजें । तिथें मी वसे तेंचि चैतन्य माझें ५१

जगीं हिंडता हिंडता आयु गेलें । मना सारिखें एकही नाहि झालें ॥
न वांछीत जें चिंतनें हातिं आलें । तरी व्यर्थ जें अन्यही सर्व केलें ५२

बहू हिंडलो मी सुसंगें निसंगें । असी गस्त चौफेरिली जागजागे ॥
पथीं भेटला तो कुणीही न सांगे । पथीं गेलिया कोणिही येत मागें ५४

तुझ्या या रहस्यांत कोणी सिरेना । कसा जीव झाला कुणाला स्मरेना ॥
दुखा संकटावीण कांहीं उरेना । अरेरे कधीं ही कहाणी सरेना ५५

वनी मालिका शोभवीते पुलिंदा । असे गोपिही आवडीची मुकुंदा ॥
कुठेंही वसो तूळसी तीस वंदा । मुकुंद प्रिया सुंदरा हीच वृंदा ५५

कुणासी नको सख्य तू अंगिकारू । जनाची गडी ती भली दूरदूरू ॥
मनाचा तुला फार विश्वास थोरू । असे चोरटे वाटमारू लुटारू ५६

बहू घातल्या या जगीं घेरझारा । पुरा एकही हेतु नोहे बिचारा ॥
जगीं तापतां पावलो या विचारा । जगाचा नको रे नको येथ वारा ५७

अरे चिद्घना व्यर्थ कां त्रास घेसी । कशाला कथा चार पांचा सहाची ॥
धरी प्रेम, नेगो दिशा येणियाची । सुखी येस, वार्ता नसे जाणियाची ५८

जरी मी दुराचार झाली फजीती । न येरा परी वाहतो स्वर्ग खंती ॥
मला वासना, मी मरे जेथ मस्ती । गुरू प्रेम द्या, स्वर्ग की नर्क वस्ती ५९

तूझी प्रीत लौकीक शास्त्रा विरुध्दू । मला आवडे, मी तूझें पायिं बध्दू ॥
मला गोड मायी कडू कीं निषिध्दू । तूझें कारणी ते, निषिध्दूचि शुध्दू ६०

---

श्लोक–५१ जधीं=जेव्हां. ५२ वांछीत=चिंतित वस्तु. अन्यही=अन्य साधन.
५५ पुलिंद=नदीतीर.

जगीं एक थारा गुरूचें पदांचा । जरी साहणें संघ कीं आपदांचा ॥
नसो जी मला ठाव पारत्रिकाचा । पुरे जांच सन्मान ही त्या यमाचा ६१

भजे सद्गुरू नित्य नैमित्तिकासी । कुणे ही दिसीं तू न राही उदासी ॥
गुरू सेवनीं तीथ नाही अम्हासी । भजे श्रीगुरूला न वारा उपासी ६२

रुते श्वापदा पायिं कांटी वनाची । असे पापणी वेणि दिव्यांगनांची ॥
दिसे वीट जी झोपडी बाडियाची । असे खोपडी मंत्रिची राजियाची ६३

नको इंद्रिया संग धावू विलासीं । तुला भूत खातील कीं वाघ लासी ॥
पहा कोण तू, कोठुनी पातलासी । विचारी कसा वागसी, कोठ जासी ६४

बुरें कीं भलें तें मनाचें विलास । हरी देतसे सूख दुःखासि खास ॥
नको काळचक्रा वरी लावु दोष । असे फार तें दीन तूझे परीस ६५

पुरूवा बने हाचि पूरूरव्याचा । बहू छंद ज्या सुंदरा अप्सरांचा ॥
दिसे हात जो आजि याचे गळ्याचा । करे या विलंगी गळा उर्वशीचा ६६

मना कायसा खेद या पालकाचा । नदे लाभ हा खेद न्यूनाधिकाचा ॥
नसे पाप त्याला कृपालाभ कैचा । कृपा पापियाशीच, राही सुखाचा ६७

कली हा बहू घोर राही हुशार । नको गाफिली, तीख याची कटार ॥
जरी काम हा वाढिला ये समोर । न सेवी तया, त्यांत आहे विखार ६८

मला हा नसें जिश्चियाचा विचार । असें चांगलें नर्क कीं स्वर्ग फार ॥
गुरू प्रेम तंबूरि गंगा किनार । मला नगद हे, स्वर्ग तूला उधार ६९

मला प्रेम दे जें जगाला प्रकाशी । सुखाची कळी प्रेम इंदू विकासी ॥
त्वरें माउले, सत्व जाई लयासी । तनू संपदा जेवि स्वप्नावभासीं ७०

---

६१. पारत्रिकाचा–परलोकाचा, स्वर्गाचा. संघ–समुदाय. ६२ दिसी–दिवस-वार. तीथ=तिथी. ६३ वीट–वीटकर, खोपडी=डोक्याची करटी. मंत्रिची–प्रधानाची. ६४ संग–संगतीनें. भूत–भूतें, पंचमहाभूतें. लासी–पिशाच. कोठ–कोठे. ६५ परीस=तुझेयेक्षां. ६६ पुरूवा–चंबू मातीचा. पूरूरवा–त्रेतायुगांतील राजर्षी. हात=चंबूची तोटी. ६७ यांत कर्त्याचें नांव आहे. ६८ गाफिली–असावधपणा.

गुरू नाम घे, आत्मया सूखकारी । विसावी तुझा प्राण, हृद्रोग वारी ॥
तुला दुःख सिंधूंत तूफान भारी । करी आसरा नांव, कीं नाव तारी ७१

न मी गातसें इंद्रिया रंजवाया । न वित्तार्जना, धर्म नीती बुडवाया ॥
क्षणैका भरी हा अहंकार जाया । नटें, गात मी, घुंगरू बांधि पाया ७२

नसे विश्व तूझी मठी कीं मिरासी । इथे मस्त जागे, शहाणा उदासी ॥
भवाग्नी मधें जैं न प्रेमीं नहासी । मुठीं वायु घेऊनि मातींत जासी ७३

न मी इच्छिलें येथ आरंभि यावें । तरी कामना घेउनी काय जावें ॥
गुरू माउले प्रेम आम्हासि द्यावें । मनाचे मळा प्रेम गंगें धुवावें ७४

मला सांगती स्वर्गिचें सूख फार । तुझें प्रेम माते असें गोड सार ॥
बरें नग्द हें, काय कीजें उधार । बरा ढोल जो वाजतो दूरदूर ७५

गुरू बीज कानांतुनी ये मुखास । मनीं लोचनीं हा फळें गोड घास ॥
वदे स्वर्ग हा शब्द जैं, नीच खास । शुनाहूनि मी नावडो हे कुग्रास ७६

गुरू नाम पी अमृताचे रसारे । स्वभावें भरें भाव लावण्यवारें ॥
गुरू फूलला, संत हे मस्त सारे । सुखी ऐस, ही जीवनाची कलारे ७७

विरानी मना जासिरे जासि दीना । निमेषीं तुझा पालटे रंग नाना ॥
कशाला तनू माझि आलासि प्राणा । पुढें तूचि बाहेर होसी रवाना ७८

अचंबा जरी लोक आम्हा न भांडे । अचंबा शिरी फेकिती जै न गुंडे ॥
विके जो हरीनाम घेउनी कोंडे । अचंबा जरी पीक आले न धेडे ७९

असे जो कुणी जाणता राजपंथी । गणी सर्व जीवा शिवाच्या विभूती ॥
दिल्या सर्व वस्तू प्रभूनेचि हाती । क्रिया साहजी सर्व निष्पाप होती ८०

---

तीख–तीक्ष्ण. वादिला–वाहून म्हणजे सामग्रीसहित. ६९ किनार–तीर.

७१ नांव–गुरुनाम. नाव–नौका. ७२ क्षणैका–क्षण एकभर. नटे–नाच नटतों. ७३ जागे–जागतो. मुठीं०–मुठींत वारा घेऊन, रिकामी मूठ घेऊन. ७५ जसा ढोल तसे स्वर्ग दूरच बरें. ७६ बीज–अक्षर. नाम. " रम्य राज ब्रह्म-बीज " वदे०–स्वर्ग हें नाव जरी उच्चारीन तर कुत्र्यापेक्षांही नीच.

हरी शोभवी प्रकृती राग रंगें। कशाला तिथें लाविसी सांग व्यंगें ॥
जरी चांगलें कासया नेसि भंगे। बुरे ही तरी दोष कोणासि सांगे ८१

नवा पाडवा सर्वदा उच्च पर्वा । धरी निश्चये प्रेम होई निगर्वा ॥
पुजावा गुरू कोमला आजि दूर्वा। तुझे माति माजीं रुजेजेल पर्वा ८२

मळा शोभतो वाहते शुद्ध गंगा। गुरू मालिनी देत रोमांच अंगा ॥
कथा प्रेमळा आणिजे या प्रसंगा। शिवे नर्क ना स्वर्ग या अंतरंगा ८३

गुरू शब्द हा प्रेम पेटीत ठेवा। करी येत संपूर्ण तो गुप्त ठेवा ॥
उरीं साठवे दिव्य तो प्रेम मेवा। परी जीव वेंचूनि तो शब्द घ्यावा ८४

असे घोर प्रीती, कृपा श्रीवराची ॥ हरीच्या कृपे काय निंदा नराची ॥
बुरी कीं भली ती क्रिया ईश्वराची। जिवाला क्षिती कां यमा पामराची ८५

वसे ओस हें विश्व•मत्प्रेम गानें ॥ वरू ब्रह्महत्या मला जन्म घेणें ॥
न पापी तरी काय कीजें कृपेनें ॥ कृपा शोभली माझिये पातकानें ८६

वनीं जासवंदी फुले ज्या फुलाला ॥ असें रक्त जें खेळवी राजयाला ॥
दिसे विष्णूकांतू बरा जो भुईला। असे तीळ जो शोभला दिव्य गाला ८७

तुझे मित्र माते न घेवोच लक्षीं ॥ तयाचेनि मी जाहलोसे विपक्षी ॥
तुझा सूर्य येताचि माझे गवाक्षीं ॥ अणूरेणुही देति तूझीच साक्षी ८८

अरी मित्र कीं अप्सरा खैस जाई ॥ खुशी दुःख कीं जातसे रोग राई ॥
मिळे आजि त्याचें समा सूख घेई ॥ जसें पातलें जातसें तेंवि हें ही ८९

फिरे विश्व कां? नाहि कार्य प्रमाण। दुखावीण याचें कधीं नाहि भान ॥
स्वताची जधीं घेतली खूण खाण। जसाचे तसा, जाण ना मी अजाण ९०

---

८२ पर्वा=पर्वकाळांत. रुजजेल=उगवेल. पर्वा=परवाचे दिवसी. ८३ शिवे=स्पर्शकरतें. ८४ ठेवा=ठिवावा. ठेवा=धन. उरीं=हृदयांत. ८५ कृपे=कृपेला. ८६ वसें—वसले आहे. ओस=ओसाड. वरू०—ब्रम्ह हत्या वरीन कारण मला जीव होणे आहे. ८७ विष्णूक्रांतू—फूल विशेष. ८८ विपक्षी—पक्षहीन, दीन. गवाक्षीं—झरोक्यांत. ८९ अरी—छत्रु. अप्सरा—असरा. खैस—राक्षस.

कधींची फिरे गस्त रात्रंदिसाची ॥ तुझा घात माझा मनीं काळ सोची ॥
हळू चाल पायें भुईला न खोंची ॥ तिथें देखणी बाहुली डोळसाची ९१

सतांचे सभे पावतो भाव मान ॥ गुरू ब्रह्म ही बोलतो वेद खूण ॥
कुणी अज्ञ लेखी जरी भाव न्यून । न मानीन. प्रत्यक्ष तूंचि प्रमाण ९२

गुरू प्रेम दे. विश्व हा अंधकार । तुझें रूप तें येथ पीयूष सार ॥
जगज्जीवनू तूं जगाचा अधार । नमो चिंतितार्था तुला बारबार ९३

तुला ओळखी प्रेम. तूझी दया ही । अजाणा ! नरा पाप भूताड खाई ॥
तुला नोळखे तो न कामासि येई । तुला ओळखे तोचि माणूस होई ९४

दया सागरीं विश्व आलें तरंगा । बिर्दीं लोळती संत जीवंत गंगा ॥
मिळूं संतगंगा तरी भाग्य तुंगा । मरूं गांगपंथी तरी मी अभंगा ९५

नभो मंडलू चंद्रतारा वरूनी । कधींचें फिरें, राहि फेरा धरूनी ॥
इथें एकदाचें यदृच्छें करूनी । अम्ही पातलों, आणि जावू फिरूनी ९६

असें गोपिकाचंदनू गोपिकांचा । हरी कारणें झीजला देह ज्यांचा ॥
पदा भूमिं जैं ठेविसी जाण साचा । तिथें हात एका कृपा पूरुषाचा ९७

गुरू माउले देख, दावी स्वरूप । तुझे राशिचा एक दाणा अमूप ॥
तुला सर्व ठावें, अतूं आम्हि चूप । तुझी दृष्टि दावी अम्हा विश्वरूप ९८

गुरू प्रीतिचा हा मिळो एक घास । नको चार मुक्ती नको स्वर्गवास ॥
"हरी" शब्द जो येत राधे मुखास । बरा कोटि दांभीक यज्ञा परीस ९९

गुरू दारिं मी कर्म संभार नेलें । शिखा सूत्र माळा ठिळे सांवरीले ॥
गुरू सेवकें तेथ माझें विटाळें । गवाळें दुरी फेकिले, सारवीले १००

---

९१ सोची–चिंतितो. ९२ प्रत्यक्ष–तू प्रत्यक्ष ब्रम्हानंद आहेस. ९३ पीयूप=अमृत. चिंतितार्थी–चिंतिताचा अर्थ. बारबार=वारंवार. ९४ अजाणा=ओळखत नाहीं. नोळखे=अज्ञ. ९५ बिर्दीं–तुझे गल्लींत. मिळू–जर मी मिळेन. मरूं=जर मी मरेन. तुंगा–शिखरास. गांग०–गंगेचे वाटेत. ९६ नभो मंडलू–आकाश. ९७ गोपिका०–गोपीचंदन. कृपापूरुषाचा=सत्पुरुषाचा. ९८ देख–पहा (मजकडे)

मशीदी मधें देऊळें ही लवाया। नमाजा पुजा दीनता सीकवाया ॥
अजां शंख घंटा कृपा आळवाया। लघूताचि दावी गुरूमाय पाया १

गुरू रूप तुझें मनां आंत खेळें। कटाक्षीं तुझें लागले सर्व डोळे ॥
प्रसादासि आरंभ तुझेचि लाळें। ऋषी संघ या सुप्रसादांत लोळे २

गुरू प्रेमदे. विश्व हें एक श्वासीं। सुखी एक श्वासू पुरें कीं अम्हासी ॥
पुढें वाढिलें सेविजें तें सुखासीं। न होई कधीं आवडें जें कुणासी ३

जळें चित्त माझें तुझें प्रेम भावें। गुरू माउले, त्वां उपाया करावें ॥
मला आस तुझें पदीं मी मरावे। असे आस ही जीव जो काल पावे ४

गुरू कासया वांछिजे स्वर्ग सूख तिथें नृत्य संगीत नाही अणीक ॥
इथें सर्व साहित्य संगीत देख। परी प्रेमळा तूचि येथें अधीक ५

तनू मातिची जें घडीली कुलालें। मला प्रेम मस्ती कपाळीं लिहीलें ॥
तुझें दर्शनीं हेतु संपूर्ण झाले। मरो जा कुणी स्वर्ग हाता न आले ६

गुरूभक्ति रत्ना बहू दूर खाण। खरे प्रीतिची वेगळी सर्व खूण ॥
असें कीं तसें व्यर्थ सारा गुमान। कथा प्रीतिची तेथ भाषाचि आन ७

मना काळ बैसे तुझें दुःखमूला। इथें स्वच्छ जावे त्यजूनी तनूला ॥
वनीं कांहिसा घे हरीचे सुखाला। तुझे मातिचा होत की झाडपाला ८

परागा परी घे गुरू रूप पोटीं। गुरू संगती पावसी शांति मोठी ॥
सुखानें मुखीं सद्गुरु नाम घोटीं। पुढें काळ हा नीच गारीत लोटी ९

तुझें सन्मुखीं मी हनूमंत होतो। तधी देह हाता बिचारा पडू तो ॥
जरेनें अतां प्राण व्याकूळ होतो। हळू सुस्त येतो हळू सुस्त जातो ११०

---

दाणा=कण. अमूप–पुष्कळ. ९९ घास–ग्रास. १०० सांवरीले–नीट नेटके केलें. गवाळे=सामान. सारवीले–गुरुघर सारवीलें.

१०१ लवाया–नम्र होण्याकरता. अजां–नमाजापूर्वीचे पाचारण. १०२ लाळें–मुखाचे लाळेंत. संघ=समुदाय. १०३ श्वासू–श्वास. सुखासी=आनंदानें. १०४जळें–दग्ध होतें. पावे–पावेतो. म्हणजे आहे जीव तोपर्यंत आशा आहे.

कली सर्पिणीनें जगा डंख केला । सडें सूमनू वाहिलें ना हरीला ॥
नको तू भुलू यौवनाच्या मळ्याला । धूळीं सूदितो काळ ताज्या कळ्याला

गुरू प्रेम दे बोध दीपू विझाला । तुझें प्रेम अग्नींत तेजासि आला ॥
अहा काय कैवल्य हा नाम प्याला । मुखीं लाविला, ओठिचा नाहि गेला

गुरू सुखदुःखांवि मी भिन्न नेणे । नसें थोर प्रेमाहुनी ईश देणें ॥
तुझी नाम संजीवनी तीच पीणें । प्रभावीं हिचा एक श्रीकृष्ण जाणे १३

गुरू पौर्णिमा, उन्मनीचा प्रकाश । इथें प्रेम दे, शून्य झालें अकाश ॥
पडे वीज काळावरी, होय नाश । तनू बीज संचीत गेले लयास १४

गुरू जीव हा जाय तुझे सुरीनें । बहू दाह हें प्रेम माझें उरी ने ॥
कुणी दाह तो वर्णिती वैखरीनें । तयाहून मी दग्ध हुझें दुरीनें १५

नसे चांदि सोनें बुधांचा खजीना । परी त्या विना बागु हा बंदिखाना ॥
रिकामें करें घास नासे गरीना । परागा धनें फूल हासें परीना १६

सतांचे सभें प्रेम सर्दार आहें । श्रुती कीं स्मृती प्रेम ओंकार आहे ॥
जरी नेणसी प्रेम शोधूनि पाहे । सदा जीवनीं प्रेम हें सार आहें १७

असें एक स्वर्गू तिथें इंद्र कोटी । असें एक आकाश ते चंद्र कोटी ॥
असें एक भू भूप ते वंश कोटी । गुरू एक तू देखसी अंश कोटी १८

मला माउले येथ तूझीच आस । न मागें पुढें पाहतो कांहि वास ॥
न ये जाग्रती झोप माझ मनास । इहामुत्र लेखीत मी एक श्वास १९

न सत्तेविना शाक्तिला शक्ति कांहीं । प्रभू शक्तिचे वीण सत्ताचि नाहीं
असें कांहि हें त्याहुनी थोर नाहीं । असें हें तरी तांहि निस्सार नाहीं १२०

---

१०६ कुलालें—कुंभारानें=ब्रम्हदेवानें. १०७ खाण—खाणी. गुमाना—कल्पना. अ'न—अन्य, वेगळी. १०९ परागा—पुष्पांतलि परागाप्रमाणें. हनूमंत—मारुती-प्रमाणें. प्रटू—प्रशक्त. १११ सूमनू—फूल, मन. सूदितो—मिसळतो. ११३ श्री-कृष्ण०—श्रीकृष्णानें गुरुपुत्र याच संजीवनीनें आणून दिला. ११४ वीज—विजली. बीज—बी. ११५ ने—नेते. दुरीनें—विरहानें. ११६ बुधांचा—शहाण्यांचा.

स्वता आवडें दोष पाडे म्हणावें । परी नावडें दोष लोकें गणावें ॥
अशा या जगाला बघूनी स्वभावें । मला आवडे या जगा दूर जावे २१

जरी उंच तूं लोटिती तूज नीच । जरी स्वामि तूं सेवकू होसि साच ॥
मना सोड बंधू त्यजी पेंच पांच । दुखावू नको देखसी तू सुखाच २२

खरा निश्चयो नाहि हातासि आला । परी संशयीं भांडता जन्म गेला ॥
नको हातिचा ठेवु हा नाम पेला । अजाणा सुजाणाहि मूर्छेत मेला २३

गुरू माय गंगा किनारा अम्हाला । बहू चांगलें स्वर्ग राहो तुम्हाला ॥
कुणाची कथा ती कानांत घाला । न नर्कीं रिघाला, न स्वर्गोंनि आला २४

नसो फूल अम्हा, पुरे येथ कांटा । नसो लाभ आम्हा, पुरे येथ तोटा ॥
मठा मंदिराचा नको थाठ मोठा । पुरे हा तुझें दारिं लंगोट सोटा २५

असें जें इथें सर्व वायूंत जाई । असें तें तरी लाभ हानी न देई ॥
जगीं जें दिसे सर्वथा जाण नाहीं । जगीं जें नसें तेंचि राहें सदाहि २६

उद्याची घडी आज नाही जमेला । उद्याची क्षिती वाहता व्यर्थ मेला ॥
फुका वेंचिता श्वास जासी भुकेला । न ये आयु बाकींत काढावयाला

गुरूचा मला रोग, नाही विराम । गुरू वैद्य रोगे वदे राम राम ॥
कसा होय तो येथ माते अराम । बहू रोगि माझहुनी तो हकीम २८

दया स्नेह ज्या तो असे मानवाचा । असो पंथ तो स्मात की वैष्णवाचा ॥
गुरू दप्तरीं दाखला हो जयाचा । असे नर्क स्वर्गासि तो मुक्त साचा २९

अम्ही भ्रष्ट प्रेमीं असो श्रेष्ठ येर । अम्ही हीन दीनू गुरूदारिं केर ॥
मुखीं जर्द आहो मनीं चूरचूर । नसे येथ कस्बी कलांचा बजार ३०

---

बंदिखाना—कैदखाना. घास—गवत. गरीना—गंजीला. परीना—सुंदरीना. परागा—पुष्पांतील पराग. ११७ सतांचे—सज्जनाचे. ११८ भू—पृथ्वी. ११९ वास—इच्छा, वाट. इहामुत्र—इहपर. १२२ दुखावू=दुखवू नको. १२३ नाम—गुरुनाम. अजाणा—अज्ञानी. सुजाणा—ज्ञानी. १२४ नर्कीं—नरक वाइट तिथे कुणी गेला नाहीं. स्वर्गोंनि—स्वर्ग चांगले मग परत कशाला येईल. १२७ घडी=घटका.

कधीं तत्व सांगूं नको पामरातें । न दावी कधीं गूज अज्ञा नरांतें ॥
पहा काय तें होत येरा जिवांतें । वघाया कुणा नू घडी नेत्र पातें ३१

असे गुप्त जे आमुचे दप्तरांत । जरी बोलतो लाठि लागे शिरांत ॥
नसें ऐकण्या योग्य कोणी जनांत । नये बोलता आमुचें जें मनांत ३२

असे भादवा मास की श्रावणाचा । कुणें पित्र कीं देवता तर्पणाचा ॥
मला मास तो नाहि नेमस्त साचा । गुरूनामिं मी मस्त राहे सदाचा ३६

गुरू माउले पाजणी दे पयाची । सरे एक घोटें व्यथा ही भयाची ॥
असें विश्व हे एक छाया लयाची । करावी त्वरा रेल जाते वयाची ३४

तुझें चित्त जै होय चिंतेसि वंदा । जधीं काळजी नासिते सर्व धंदा ॥
पुसे आणिकाचे मनाचोनि छंदा । तरी लाहसी तूचि आनंदकंदा ३५

शहाण्या नरा वांकडे नीट काय । गुरूचे सुता नर्क वैकुंठ काय ॥
अम्हा पाइका कांबळे चीट काय । शिरा प्रेमळाच्या उसी वीट काय ३६

तुझे ओठ शुक्ती तुझे शब्द मोती । तुझे नेत्र इंदू, दिठी जीव ज्योती ॥
दिठी माझिं प्रेमासि आली भरोती । द्रवे आश्रु तेथें कृपा गुप्त होती ३७

सटी पूजण्या उघडिले स्वनेत्र । पुढें देखिलें लेखणी दौत पत्र ॥
गुरूचें खुणें मी असे बोधमात्र । असे लेखणी दौत भी, मीच पत्र ३८

मला प्रेम दे. मी बहू तप्त साचा । करा ये न आयू रवा पारियाचा ॥
असे वित्त संदूक हा वारियाचा । असे यौवनाग्नी झरा पाणियाचा ३९

न संसार अश्वत्थ बारासि आला । नसे वाट जाण्या तयाच्या मुळाला ॥
निराधार हे लोंबती डाळियाला । जयें तोडिला तोचि चाखे फळाला १४०

---

नये—येत नाहीं. बाकींत—आयुष्याची बाकी काढावयास येत नाहीं. १३०कस्बी= कसबीण कळवंताचा. बजार—बाजार. १३१ न दावी—दाखवू नको. नू घडी—उघडू नको. १३३ पाइका—चाकरास. १३७ शुक्ती=शिप. दिठी—दृष्टी. भरोती—भरती. १३८ सटी—पाचवीला पूजतात ती देवी. १३९ रवा—कण. १४० बारासि—फळास.

असा संभ्रमू शोक कां संपदाचा । कुणी ही जगेना इथें तो सदाचा ॥
भिकेची तनू, श्वास तोही भिकेचा । भिकेनेंचि पाळा गुरू पायिं वेचा ४१

युगांतीं जधीं फाटलो विश्व पर्दा । रवी लोपती होय अंधार गर्दा ॥
तुझें पल्लवा मी धरी तेथ मर्दा । मला त्वा दिलें हें पहा कोण दर्दा ४२

भलें जाहलें तें न तूझें विचारे । शिरा कापिती तो न तूझा गुन्हारे ॥
समाधान शांती सुखानें रहा रे । बुरें नेक नाहें तुझें कारभारें ४३

तुला एकदा भाग आहें मरावे । मरे एकदा. काय कष्टा करावें ॥
हडा लेवुनी चामडें पांघरावें । कशाला सदा दुःख कष्टा स्मरावें ४४

उद्याची कथा ती वुधा व्यर्थ आशा । घमेंडी जगीं व्यर्थ सारी दुराशा ॥
बुधाला इथें निश्चयाचा भरोसा । उदो अस्त विश्वा असे एक श्वासा ४५

मनें रोविला शब्द पांडित्य डेरा । तुझें दारिं तें वेंचिलें सर्व केरा ॥
तुवा कापिले वासना मेख दोरा । दिलें सर्व गावाळ तें शून्य चोरा ४६

जगानें इथें धाडिलें पत्र कोरें । तया वाचिता शीणले लोक सारे ।
जगेना क्षणू एक मृत्यू विनारे । जगोनी जगीं लाभ तो कोणतारे ४७

कळों लागले जैं मला हात पाय । मला बांधिती बंधनी. कोण न्याय ॥
परी मांडिती खर्च तो हाय हाय । तया आयुषा जें गुरूवीण जाय ४८

घरानें घरें चार ऐंसी बसावें । कुणा मारिजे मारिता ही मरावें ॥
रिघाव पुनः पोट नर्की निजावें । शिवें फेंकिला पाश तैसेचि जावें ४९

अरी मित्र दोघा करी हीत प्रीती । कधी प्रेमळाची न वाईट रीती ॥
अरीचें करी हीत, देईल साथी । करी द्वेष मित्रांसि, ताडील लाथीं? ५०

---

१४२ पर्दा—पडदा. पल्लवा=पदराला. दर्द—दुःख. १४३ गुन्हा—अपराध. बुरें--वाईट. नेक--चांगले. १४५ बुधा=अरे शहाण्या. उदो—उदय अस्त. १४६ गावाळ—डेरा दांडा अका रणी वस्तु.१४७क्षणू—क्षण. १४९ चार ऐंसी—८४. रिघावे—प्रवाशावे. शिवें—शिवपार्वती जीवाचे सोंगट्यानें खेळतात. पाश=फांसा.

मिया जोडिला नाहिं खोटा रुपाया । घरा झाडिले सत्य प्रेमें सफाया
गुरू सांगतो प्रेम सेवा रुपा या । निजों आम्हि कल्पांत सद्गुरु पाया ५१

तुझां देह डेरा, इथे जीव राजा । तया धाम कैवल्य, हे प्राण फौजा ॥
उखाडीत डेरा करी काळ मौजा । रिघे राव हा जिंकण्या देश ताजा ५२

पदीं घुंगरू या करी एकतारा । मधूर ध्वनीं आळवू सौख्य सारा ॥
गुरू घेत अंकीं करी घाली वारा । अहा काय सौख्यासि या पारवारा ५३

गुरू पेरिलें प्रेम बीजा मनांत । कृपेनें तुझें राहिजें तें युगांत ॥
नको दूर झाडू नको दावु घात । तुझें पल्लवा मी धरीलें करांत ५४

गुरू दारिचा मी न जाईच दूर । शिरा कापिसी लाभ मानीन थोर ॥
तुझें दारवंठ्यांत राहील शीर । सुखें त्यावरी तू करी येरझार ५५

जरी मेनका देत आलिंगनाला । भरी अमृतानें मला इंद्र पेला ॥
करी नारदू गीत हेरंब चेला । मला नावडे तें तुझा मी भुकेला ५६

तुझें ओठिंच्या अमृता शब्द लाहे । उरी ठेवितो जोंवरी जीव आहे ॥
गुरू धीट मी नैन वेधूनि पाहे । अमर्याद प्रेमें दिली धीटता हे ५७

मुखेंदु तुझा जीव सर्वा जनांचा । मला मोहवी मोहनू मोहनांचा ॥
घटीं बिंबला भानु सर्वा तनांचा । निधि तू मला तेवि विश्वा धनाचा ५८

तुझें प्रेमि निंदा शिवेना मदंगा । अजाणासि मी मात नाणीं प्रसंगा ॥
असें प्रेम हें खाद्य वीरा निसंगा । न पावे कधीं भ्याड या प्रेमरंगा ५९

मला वाटले ती तुझी भाक ठीक । जसे बोलसी वागसी तू सटीक ॥
अरे लोचना मी न जाणे बटीक । जगाचे परी भाक तूझी लटीक १६०

---

१५१ सफाया=साफ. रुपा या–रूपास या. १५२ धाम=मुकाम. उखाढीत–उपडतो. १५५ दारवंठ्यात–उंबऱ्यांत. १५६ मेनका–अप्सरा. नारदू–नारद. हेरंब–गणपती. १५७ लाहे–पावतो. तुझे ओटांतून निघाल्यामुळें शब्द अमर आहे. उरी=हृदयांत. नैन–नेत्र. वेधिली–नेत्रास नेत्र लावून. १५८ तनांचा=देहांचा. १५९ नाणी–आणीत नाहीं. १६० भाक–वचन. लोचना=प्रियकरा, नेत्रा.

गुरू "या मनें मांडिला थोर कल्प"। 'मुला कल्प झाला तरी सोड जल्प' ॥
गुरू 'चाखितो त्वत्फळासीच स्वल्प'। 'मुला कल्पवृक्षीं फळेना विकल्प' ६१

मला निंदिती मस्त नर्कांत लोळे। न ऐकेचि मी घालि कानांत बोळे ॥
जरी प्रेममत्ता कधी नर्क आले। उद्या देखसी स्वर्ग ते ओस झाले ६२

मला बोलती भ्रष्टली लोक सारे। तसी मी नसे. दोषही कोणता रे? ॥
न मीं तोडिला अन्य तो कायदा रे। हरिसी रते, मस्त नाचे सदा रे ६३

इहामुत्र सर्वस्व हा प्रेम प्याला। जगाचा पिता सूर्य प्रेमीं उदेला ॥
असें गुप्त जो अर्थ विश्वांत ठेला। गुरूचें दिठीं प्रेम भावांत व्याला६४

तुझें अंतरीं हेतु येती तरंगा। झणीं नेसि संसार आताचि भगा।
भ्रुवें आड आतां धरी नेत्र जागा। मला दृष्टि खोंचूनि लावील मार्गा ६५

गुरू माउले प्रेम गुजें उफाळें। अमर्याद धुंदीत नाचोनि डोलें ॥
तुझें कोंवळें रूप पाहूनि डोळे। मला रोम रोमांत आनंद खेळें ६६

गुरू रे नसे आयुषाचा उपाय। जरे मार्जि नामाविना नाहि सोय ॥
दमा लागला तूंचि श्वासांत होय। तुझेवीण धन्वंतरी श्रेष्ठ काय ६७

कृपा दृष्टि पाहे, असे मी अनन्य। न ते लांडगे वाघ की येथ वन्य ॥
तुला सेविती नित्य ते येर धन्य। अता पाळि माझी, कृपा काय शून्य ६८

दशांगीं नवा भक्ति अष्टांग डौलें। सदा भूमिका सात षटशास्त्र बोलें ॥
असू पंच चारी अवस्था त्रिकालें। शिवे दान एका गुरूपायिं आले ६९

गुरू माय तूं आगळी विश्वरूपा। मरे जो पथीं आगळा स्वर्गभूपा ॥
तुझी पायधूळी सूखा दे अमूपा। रवी कोटि एका रजीं जात लोपा १७०

---

१६१ गुरूशिष्य सवाद. कल्प—प्रलय. जल्प—बडबड. १६२ प्रेमळासह नरकवास स्वर्गस्थ देव इच्छितात. १६४ इहामुत्र०—इहपरलोकी प्रेमच सार. १६५ भ्रुवें—भ्रूकुटीचे आड. १६७ जरे—म्हातारेपणांत. श्वासांत—श्वासोश्वासांत. धन्वंतरी=देवांचा आदि वैद्य. १६८ लांडगे०—षड्रिपु. १६९ डौलें—थाट. अष्टांग—योग. भूमिका—सप्त भूमिका. असूं=प्राण. शिवे—शिवशक्ति.

तुझे नाम संजीवनी जीव मात्रा । मना सौख्य दे सत्वसंपत्ति गात्रा ॥
तुझा वेध नाही नरा ज्या कुपात्रा । बुडाला, जरी सारिली योग यात्रा
७१

गुरू प्रीति दे, तीच माझी सुनीती । जिवा अंतरी सार माधूर्य ने ती ॥
तुम्हा योगियानां कुणासी न प्रीती । हरीसी रतू, आमुची तीच रीती
७२

असे गूज एकैक सर्वांचि हेती । हिता हीत पै नेणवे येथ चित्ती ॥
क्रिया योग मार्गी बहू संग साथी । परी एकल चालिजे प्रेम पंथी ७३

वदे फूल मद्रूप सौगंध सारे । कसे कुस्करीले मला गंधकारे ॥
दुखे भोंवरी देत गुंजारवा " रे । हसे एकदा तो रडे जन्म सारे " ७४

अकीर्ती मला ही चव्हाट्यांत झाली । जवानी निशा जात पाहाट आली
नसे सूख पैं तीच सैराट चाली । तुझें दारिं फेरे परीपाठ घाली ७५

मृताहूनि ही आगळे चित्त मेलें । परी त्या मृताचे सुखा नाहिं आलें ॥
बहू पल्लवा नेत्र रक्तें धुईले । परी पल्लवा पैस ते नेत्र ओले ॥ ७६

उतावीळ मी हारपे ताळ भान । कसा धीर राहील, जातोचि प्राण ॥
जिवाचे जिवा तूज वाचूनि आन । नसे रे मनीं, आण तूझीच आण ७७

जरी चित्त माझें उरातूनी फाटें । समुद्रापरी ते स्वरूपींच आटें ॥
नरा अल्पपात्रा अहंकार दाटें । तुझें एक घोटें पडे उफराटे ७८

बहारासि हे मंजुळा फूल आले । गुरू राजया हार गुंफोनि केलें ॥
गळा घालुदे, पाहसी अल्पकालें । सुके मंजुळा, फूल ते धूळ झाले ७९

जुनी प्रीति माझी बहूकाळ साथी । गुरूचे रतीवीण नोहेचि शांति ॥
जनीं बोलती प्रीतिला नाहि रीती । करूं प्रीति संगासि, प्रीताच नीती
१८०

---

१७० स्वर्गभूप—इंद्र. अमुप—अपार. १७३ घर घर चूला सर सर अकल हेती—ध्येयांत. परी=भक्तिसुख ज्याचे त्याला. १७४ गंधकार—गांधी अत्तर काढणारा. भोंवरी=भ्रमरी. १७५ निशा=रात्र. परिपाठ—येरझार. १७६ मृताहूनिही-मेल्यापेक्षां अधिक. १७८ अल्पपात्र—अनाधिकारी. पडे उफराटे—विपरीत भावना

वियोगें तुझें चित्त हें आजि मेलें । कुठें जासि रे पाउला माग केलें ॥
हजारो मना तू पदीं मारियलें । सख्या ये तुला लोण जीवेंचि केलें ८१

मला वस्ति आहे कृतघ्ना जगींच । बहू शोधनीं साधनीं डाव पेंच ॥
"गुरु गोड तू" बोलिलो गोड हेंच । "गुरु सत्य तू" बोलिलो सत्य तेंच ८२

असे वस्तु जी जीव भावासि येत । जरायू कधीं स्वेद उद्भीज होत ॥
न कल्पी कधीं वस्तुला अंत नेत । जरी गूण तो गूण तूझाचि घेत ८३

जसा जन्मलो गाइली प्रेम कीर्ती । सदा साधने पावण्या प्रेम मूर्ती ॥
तुला तापसा बुद्धि जै बोध दाती । सुखी ऐस, मी देत बुद्धीस स्फूर्ती ८४

रवीवार हा सेविजे नाम सारा । कशाला विणा हा पुरे एकतारा ॥
दिनीं सेविसी तू जरी एक वारा । दुबाराचि घे वार हा आदिवारा ८५

तपोशास्त्र यज्ञें मठीं मंदिरांत । भिऊनी यमा स्वर्ग तो धुंडितात ॥
गुरु गूज तें दाटलें ज्या उरांत । तया आस भीती तगेना मनांत ८६

प्रकृत्या तुझे अंतरीचा खळाळ । तुला मारितो हा मनाचा विटाळ ॥
सुसंगीं सदा बैस, मी तूं समूळ । असे धूळ इंगूळ वाटूळ चूळ ८७

हरी कीर्तनीं संत लावण्य खाणी । झरा वाहतो शुद्ध चैतन्य पाणी ॥
न सेवी कधीं वासना नर्क घाणी । नसे स्वर्ग संताहुनी अन्य कोणी ८८

मता दाविले देखिले सर्व फोल । कथा बोलिल्या ऐकल्या सर्व ढोल ॥
वृथा शोधिला पिंड ब्रह्मांड गोल । मनीं वासना व्यर्थ तो नर्क खोल ८९

अरे देह हा व्यर्थ कीं चर्म खोळ । वृथा गोपुरे पीठ प्राकार पौळ ॥
जिवा मृत्युचे ओढताणींत सोल । असे श्वास हा खातसे तोहि झोल १९०

---

१८१ माग—पत्ता. १८२ शोधनीं=तत्वशोधन. साधनीं—कर्म साधन. १८७ धूळ इंगूळ वाटूळ चूळ=पृथ्वी, अग्नि, वायू, जल. १९० पौळ—तट. जिवा मृत्युचे जन्म मरणाचे. सोल=दोरी. झोल=झोका.

जगीं छानिली खाक, राखेंत गेलें । अरी मित्र केलें, परी सर्व मेले॥
तुझे मर्जिला मी कसें कां न बोले । जसे ठेविलें, राहिलो आणि झाले
९१
मुखा नाम घेरे, तुझी सेज माती । अरी मित्र नाही तिथें संग साथी ॥
नको दाखवू ही कुणा गुप्त युक्ती । फुलें सूकली काय तीं वास देती ९२

तुला सेविता बोलती हे समस्त । गुरू सेवनें कर्म संसार घात ॥
खरा शत्रु तू, बाणली सत्य मात । गिळूनी तुला ठेविलें मी उरात ९३

गुरूवीण हा व्यर्थ संसार फेरा । गुरू गाइजे साधनें अन्य केरा ॥
बहू शोधिला मी इथें विश्व डेरा । सुखीं राहिजें ना तरी तीन तेरा ९४

रडें अभ्र हे सांगताहे वनाला । विना भक्तिच्या जाचणी रे जनाला ॥
वना देखुनी तोष झाला मनाला । पुढें मद्रनीं तोष होई कुणाला ९५

तुटी होय जीवा तुझी देह प्राणा । पटा आड तू लीन होसी दिवाना ॥
गुरू गाइरे, नेणसी मूळ स्थाना । सुखी ऐस रे, तोचि तूझा ठिकाणा
९६
गुलावा मुखीं नाम हें सार साठें । मना अंगणी प्रेम सौगंध फाटे ॥
कथा कालची गोड काना न वाटे । सुखीं ऐस रे आजचे पूर्ण थाटें ९७

विधीनें जधीं मातिला आकृतीलें । घटा बोळक्या भिन्न कामासि केलें ॥
भलें कीं बुरें नेमिलेसेचि झालें । मला जाळिजे कांय कालें करालें ९८

ठसा अंतरीचा न जाईल बाधी । तिथें अक्षरें मुक्त निर्द्वंद साधी ॥
असे भाग जो तो मिळालाचि आधीं । तरी काळजी यत्न वाया उपाधी
९९
तुझें वाचणें मृत्यु भीतीत वाया । मृतीचे पथीं पाविजे अमृता या ।
गुरूचें कृपें होत चैतन्य काया । कुणा कायसे, ना मरूं अंतका या २००

---

१९४ अन्य केरा—अन्यपदार्थ, कचऱ्याची साधने. १९५ मद्रनीं—माझेवर उगवलेल्या वनांत. १९७ कथाकालची—गतकथा. १९८ नेमिलेसेचि—पूर्व संकेताप्रमाण. करालें—क्रूर. मृतीचे—मृत्यूचे. पथीं—रस्त्यांत. अंतका—यमाच्या हातानेंसुद्धां मरणार नाहीं.

मुखें राम गा, तेंचि रे रामराज । ध्वनी आइके, तेंचि संगीत बीज ॥
नको आठवू जन्म मृत्यूसि लाज । सुखी ऐस रे, कीं सुखासींच काज १

महा काल माझे वयाचा क्षणार्ध । असें विश्व या लोचनीं ईक्षणार्ध ॥
असे नर्क चिंता चितेचे तृणार्ध । महास्वर्ग माझें सुखाचा कणार्ध २

वदे माउली जागरे सोड झोप । न येई तमीं सौख्य बीजासि रोप ॥
त्वरें जाग मृत्यू सवें युद्ध जुंप । निजायासि जागा असे अंधकूप ३

कुणा आवडेसे फिरेना रहाट । गणा स्वर्ग ते सात कीं होत आठ ॥
मृताचे सवारीत मोठाचि थाट । वृकें कीटकें भक्षिता एक वाट ४

न शोधी सरंजाम येथें सुखास । अणु रेणुला रावणें हे पचास ॥
पहा जीवितावें जगाचें मुळास । असे स्वप्न आभास संत्रास नास ५

असे विश्व हे एक खिंडार जीर्ण । दिवारात हे लोळती शामकर्ण ॥
किती रावणा हीच लंका सुवर्ण । हजारो इथें झोपले कुंभकर्ण ६

मुखीं बांसरी घेतली कोकिळानें । गुरूगा हरी सुस्वरें मंजुळानें ॥
पुढें बोलती लोक सारे दिवाने । तुवा सोडिलें येथ ठाणें ठिकाणें ७

प्रभू तू दयाळू दया तीच क्षांती । पतीतासि कां देत नाहीस शांती ॥
भल्यासीच देता तुझी कां महंती । पतीता क्षमावे, तुझी रे दया ती ८

तुझा भाग्य भानू गुरूराज आला । पदा सेवि जा, काम लावी कराला ॥
लुटारू असे काळ हा मांग काळा । पुनः यापरी नाहि येणार वेळा ९

तुझा बोध इंदू गुरूराज आला । पदांगुष्ट चोखी रजा लावि भाळा ॥
सुखी ऐस नेई मना उन्मनाला । शशी कोटिचे तेज लेसी कपाळा २१०

---

१०१ रामराज=रामराज्य. २०२ वयाचा—आयुषाच्या. ईक्षणार्ध—निमिष. २०३ तमी—अंधारात. अंधकूप=अज्ञान. २०४ आवडेसे—मनाजोगे. रहाट=कालचक्र. वृकें=लांडग्याने. वाट=गती. २०५ सरंजाम—साहित्य. पचास—५०. नासमोह स्वरूपविस्मृती. २०६ दिवारात=रात्र आणि दिवस. शामकर्ण—गाढव. २०९ भाग्य—भाग्याचा सूर्य.

तुझे आधि होते बहू इंद्र रंभा । जयाचें गुणें पावलें विश्व शोभा ॥
गुरूपायिं हो धूळ आता अरंभा । तनू स्तंभ हा जीव कोटि स्वयंभा ११

तुझे संगतीचा मना येत वारा । मला सोडुनी ध्यातसें तूज सारा ॥
अतां तें स्मरेना कधीं मद्विकारा । तुला चिंतुनी येत तुझें अकारा १२

जिथें खेळले श्रीहरीचे कुमार । अशी द्वारका नक्र मीना बिढार ॥
तया यादवांचे गडी वीर शूर । क्षणा भीतरीं जाहले चूरचूर १३

ईशाझेला, एक शांती उपाय । लोकीं दंभा, देखिवेचिच सोय ॥
आम्ही सारे, झाडतो हातपाय । पैं तो मृत्यू नेत आम्हासि हाय १४

अजामीळ तारावया नाहि वेळ । गुरूरे दयेचा नसे कीं दुकाळ ॥
कसा सांडु मी आपुला पोरखेळ । असे भक्तिला तो भयाचा विटाळ
१५

तुझें बोध मेघें जगा स्वच्छ केलें । तुवा येथिलें दुःख निःशेष नेलें ॥
गुरूराजया भेटरें मी भुकेले । अरे आंत बाहेर तुझेचि झाले १६

जयाचें मनीं लेश वागे मतीचा । न वेची कधीं वेळ हा किंमतीचा ॥
गुरूचें सुखा पैं झटे हिंमतीचा । सदा साधितो लाभ सत्संगतीचा १७

किर्ती गुड संसार डोहीं ठिवावे । नसे वासना कीं चढावे पडावे ॥
गुरू रामजी देह हा तूंचि व्हावे । तरी कायसे ते तरावे बुडावे १८

गुरू मोहनाचें जया वेड नाही । अरे व्यर्थ रे ज्या उरीं फोड नाही ॥
जया दुर्दिनीं माउली गोड नाहीं । तया दुर्दिनाची कधीं तोड नाहीं १९

असे मूढ मी, तें समाधान कोठें । असे पातकी, तें समाधान कोठें ॥
सुखा देसि जैं पाहुनी पुण्य मोठें । तरी ती मजूरी, कृपादान कोठें २२०

---

२११ अरंभा–प्रथम. स्तंभ=आधार. स्वयंभा=स्वतंत्र. तुझा देह हा कोट्यावधी स्वतंत्र जीवांचा आधार आहे. २१२ तुझे–राजागुरूचे. मना–मनाला. तें–ते मन. मद्विकारा=माझेविकार. अकारा–आकारास. २१३ कुमार–मुले. बिढारा–घर.

किती नेम कर्मी किती धूम होमा । किती पुण्य पापीं हुतूतू हमामा ॥
गुरू सावळा देखरे पूर्णकामा । विना घेतल्या देत आधीच आम्हा २१

जयाचें मना एकलें राहवेना । उपाधींत गुंतें, परी साहवेना ॥
मनीं मोकळा तो सुखाचा ठिकाणा । इथें येर तें दुःख साहित्य नाना २२

सभें पंडितांचे सुखाचें न अंग । न वीणा मृदंग सदा चित्त भंग ॥
कशाला अफू मद्य धत्तूर भांग । इथें आपुलालेनि गर्वाचि दंग २३

गुरूचें कृपें वाचलो मी जरासा । वयाचा इथें जाहला बेभरोसा ॥
तनू संचिता भोग खोटा खरासा । असे आयुषा काळ थोडा पुरासा २४

अरे वासना श्वान राखे घराला । उगें भुंकुनी मांडि कापट्य कोल्हा ॥
सशाचें मनोराज्य झाकीत डोळा । वृकाचे परी शीघ्र घालीत घाला २५

तुवा मोहिलें येथ सर्वां मनाला । तुवा वेधिलें सर्व ही लोचनाला ॥
अरे सावळ्या चाहसी ना कुणाला । तुझी आवडी येथ सर्वां जनाला २६

नसे प्रीति कोणाहि, दाक्षिण्य सारे । मला हीत दावी असा कोणता रे ॥
तुला सोडुनी मी धरावे कुणा रे । कुणाचें गुणें कोणता फायदा रे २७

परावा हितेच्छू असे मायबाप । जरी त्रास दे सोयरा तोचि ताप ॥
विषें तारिजे तेंचि पीयूष आप । तुला अंतरें पुण्य जें तेचि पाप २८

जनाचेनि तोंडा नसे बूड शेंडा । कुटीजेल कोंडा तरी काय मांडा ॥
मनीं वाहसी कासया दुःख धोंडा । मृगांबू मधें कायसा पूर लोंढा २९

गुरूचा पिसा काय त्या देहधाम । तया वेडिया कोणता धर्मनेम ॥
उरीं फाटला औषधा काय काम । मनीं पेटला त्यासि कैंचा अराम २३०

२२१ हुतूतू, हमामा—पोराचे खेळ. २२२ येर=इतर. २२३ धत्तूर—धोतरा विष. २२४ बेभरोसा—अविश्वास. २२५ उगे—व्यर्थ. वृकाचे—लांडग्याप्रमाणें. २२६ चाहसी=चाहत नाहीस, प्रेम करीत नाहीस. २२८ परावा—परका. हितेच्छु=हितचिंतक. पीयूष—अमृत. आप—स्वतः. २२९ मृगांबू=मृगजळामध्यें.

नसे जेथ प्रेमी गुरूश्रीशिवाचा । नसे नाच जेथें तुकाग्यानबाचा ॥
त्वरें तेथुनी तूं पळे रे सुखाचा । असे बोध हा, क्रोध कांरे फुकाचा ३१

सुखाचेनि ताटीं प्रसादाचि वाटी । बहू गोड साहित्य संगीत गाष्टी ॥
जया कर्मठा नाम आलें न ओठी । बरा दूर तो योजने लक्ष कोटी ३२

जयें देखिला देह हा प्रेम पेला । तया नावडे तो वृथा भंगलेला ॥
दये माउलीच्या शुभाकार झाला । भये साउलीच्या न भंगूं तयाला ३३

असी पत्र आरण्य इंगूळ कांटे । सदा अंग भाजें सदा ऊर फाटे॥
गुरू सावळा भेटता याचि वाटे । मला कष्ट संपूर्ण तो गोड वाटे ३४

दुरूनी पती येत एका दिसाला । घरीं लौकिकाचार, एकादशीला ॥
उपासी निजे, नाहि एकांत झाला । प्रभाती सखा दूर गेलाचि गेला ३५

असे सत्य जावे तरी का गमावे । दुराशे गुणे आड रानीं रिघावे ॥
नसे लाग येथें सुखानें बसावें । पथीं चालणें सांडुनी कां निजावे ३६

यमाचेनि बाणा असे ढाल कोठे । हिऱ्या माणकाचे तरी व्यर्थ कोठे ॥
जगीं देखिले शेट कीं साव मोठे ॥ भले ते भले, येर ते सर्व खोटे ३७

गुरू मंडळा सज्जनू एक आला । प्रसन्ना मुखीं देखिलें निर्मळाला ॥
मनीं सद्गुरू माउली घोष झाला । इथें पावरे पावरे पावलाला ३८

मना सारखें एक ही काम नोहे । वृथा कामना यत्न पोटीं वहावें ॥
कपाळा पिटूनी बसूनी रडावें । उशीरा अलो येथ पैं शीघ्र जावें ३९

वया नेत्रपाती, तनू मूठ माती । पिळूनी किती दुःख सिंधू भरीती ॥
दुराशा नको ती, धरी चित्तिं प्रीती । कुबेरा धनें फार झाली फजीती
२४०

---

२३५ एकादिसाला—एकाच दिवसाची सवड करून आला होता. लौकिकाचार-दाक्षिण्य. गेलाचि गेला—पुनः आला नाहीं. लौकिकानें परमार्थ कसा अंतरतो त्याचे उदाहरण आहे. २३६ पथीं=क्रम. २४० वया—आयुष्य मान. मूठ—मूठभर.

नको काळजी या निकाम्या जनाची नको आस आल्या न आल्या धनाची
सुखी जेव, तृप्ती करी याचकाची। रुचे काय नेसील कौडीहि साची
४१
जगातील मी जें स्मरू तेंचि शून्य। वयातील हाती धरू तेंचि शून्य॥
अम्ही सौख्य दीपू सरू तेंचि शून्य। अम्ही विश्वरूपू विरू तेंचि शून्य ४२

गुरू सुप्रसादा नको मान मोडी। गुरू पायधूळी शिरानेचि झाडी॥
अहंकार तोडी गुरूपाय जोडी। मना पीळ सोडी तरी तीच गोडी ४३

अणा साजवीणा गुरूचें पहाटें। गुरू माउली आठवे गोड वाटें॥
मला या जगीं तीन आनंद साठे। गुरू प्रेम मस्ती इथें सर्व आटें ४४

मुखानें तुझें सूर्य इंदू प्रकाशे। तुझें हास्य त्या मन्मथाला विकाशें॥
तुवा माउले श्रीहरीला कटाक्षें। दिले सत्य चैतन्य सौख्या उमासे ४५

कडू गोड कीं आयु जाते लयास। तनू सांडण्या देश हो कीं विदेश॥
गुरू गायिजे दर्श कीं पौर्णमास। अमासे पुनीवा पुनीवें अमास ४६

माझी राजाचे गुणा कोण जाणे। शंकाग्रस्ता कैं समाधान बाण॥
माझें वेडा कोवि येती शहाणे। माझें अर्था श्रीगुरू मस्त जाणे ४७

ब्रम्हे केलें या मला कोण लाभा। मारी शंभू, काय वाढेल शोभा॥
आलो येथें माउलीचेनि लोभा॥ जाणे ती हो यारजा अर्थ गाभा ४८

फुलाची द्दली कंटकीनें दुणावे। रतीची रुची मस्करीनें दुणावे॥
तुझी ती दया या सुरीनें दुणावे। तुझी प्रीति राजा दुरीनें दुणावे ४९

प्रभू जो इथें भूमि आकाश मांडी। उरीं प्रेमळा दुःख इंगूळ सांडी॥
श्रियाळा करी चीलया लागि कांडी। बहू सुंदरा जाळिते मृत्यु कुंडी
२५०

---

२४४ साठे=खजानें. २४५ उमासे—ढेंकरा- सत् चित आनंद ही लक्षणें तुझें कृपेनें हरीला मिळाली हा भावार्थ. २४६ अमासें—अमावास्या. पुनीवा—पूर्णिमा एकानंतर एक आहेतच. २४९ सुरी—शस्त्र. दुरी—विरहानें. कंटकी=काट्यानें. २५० प्रेमळा—प्रेमळाच्या. श्रियाळा—राजा. चीलया—श्रीयाळाचा मुलगा.

उदेला चिदाकाशिं हा बोध भानू । सुखी वाहतो या उरा माजिं प्राणू ॥
गुरू माउले घेइ हातात वेणू । तुझें गूज गातात हें पक्षि नेणूं ५१

धरावे प्रिया माउलीचे कराला । मला रोकण्या शक्ति आहे कुणाला ॥
तपीं शुष्क ते, मीच पापांत ओला । शिवेना कधीं पावकू सागराला ५२

गुरू नाम घी, लोपवी रे उपाधी । उरग्रंथि सोडी, समाधान साधी ॥
तुझें नाम लोपें जगीं तोच आधीं । पुढें लोणचें घालिती रे समाधीं ५३

प्रिया पुण्य कीजे तुला काय थोरी । बहू पातकी मी तुझें काय चोरी ॥
उगी सावळ्या, जाणते मी भिकारी । त्वरें तूं दयेला, विकोपा उधारी ५४

कणानें कणा खाद्य जेमस्त देले । कमी ही न झालें न आधीक आले ॥
गुरू माउली हालवी तेंवि हाले । दयाळू सखा बैसवी, तेथ डोले ५५

मला जाच राहो इथें सज्जनांचा । सुखें नीच मी दास होई तयांचा ॥
जरी देखिजें नर्क प्रत्यक्ष साचा । तरी रौरवू गौरवू दुर्जनांचा ५६

पुराने नवे बैसले एक पंक्ती । जयांची शिदोरी तयांचेचि हातीं ॥
असी नीच वस्ती, न देतेचि साथी । इथें येती जाती पुनः येति जाती ॥ ५७

जळ चित्तदीपू प्रियाचेनि रंगीं । दिझे ही तरी येत त्याचेचि संगीं ॥
असे सारिखा गूण दीपीं पतंगीं । परी जाणतो जो जळाला निजांगीं ५८

असे घोर प्रीती कुणीं दैं करावी । कुणासी किती आणि कैसी धरावी ॥
इथे सार गोष्टी विचारें स्मरावी । बुधानें गुरू माउली ते वरावी ५९

त्रिकालज्ञ ब्रम्हांड जाणेहि सारा । परी त्या चुकेना इथें येरझारा ॥
मिळूनी चिदाकाश तो पैलपारा । हरी संग खेळे गुरूचाचि प्यारा २६०

---

२५२ पावकू–अग्नि. २५३ उरग्रंथी=हृदयग्रंथी. लोणचें, समाधीं=समाधींत मीठ भरून लोणचे घालीत असतात. विकोपा–क्रोधास. उधारी–उधार ते उधारच. २५६ रौरवू–रौरव नरक. गौरवू–सन्मान, गौरवं रौरवं यथा. २५७ पुराने–जुने. शिदोरी–भोग्य. साथी–मित्रता, संगत. २५८ प्रियाचेनि– प्रियकराचे.

घडी वार वर्ष वयाचेनि पंक्ती । झरें आयु जैसी घड्याळांत रेती ॥
उद्याची इथें वाहिजे काय खंती । गुरू प्रेम दे कीं सरे देख राती २६१

इथें जीव आले पितापुत्र झाले । पतीपत्नी बंधू अरी मित्र केले ॥
मनोराज्य भोगूनि धाले निमाले । धरें पोटिं एकाच शेजें रिघाले २६२

तुला पाहता प्रेमळा आश्रु येती । द्रवे रे दयाळा, वृथा हीच रीती ॥
लुटी तूं मला हे तुला लूटिताती । तुला भोगिती गोपिका संतपंक्ती २६३

कळा चातुरी सद्गुरू काय नेणे । तुझा रोमरोमीं मना रंग जाणे ॥
बहू या जगीं भोंदिले तू शहाणे । गुरू एक एकूण जाणे उखाणे २६४

गुरूची कृपा आमुचे काय हाती ! उठाठेव कीं यत्न सारी फजीती ॥
बसूनी सदा वाटले हीच खंती । त्वरेनें न आलो परी शीघ्र नेती २६५

जगाची कृती येथ नाही सवासी । मना पीळ घालूनि गुंत्यांत फासी ॥
जरी घाव आहे उरा पैं कुणासी । वरी डाव देऊनि या मीठ घासी २६६

मला भीति नाहीं कसें री मरावें । मरावें पुरें, काय अर्धें जगावें ॥
नसें जीव कीं प्राण माझा परावे । गुरू माउलीचे पदा पैं धरावें २६७

वरी सांग सारे धरी वासनाला । खरी एकही रीत नाही मनाला ॥
इथें फाटके शब्द सांगे जनाला । विटंबी खळू अल्पशा सज्जनाला २६८

तुला वाटते पाप हा शब्द सोपा । वदेना कधीं शब्द हा संत जो पा ॥
सुजाणा प्रभू काय निर्मील पापा! । असे भूल ही फूल अज्ञान रोपा २६९

गुरू माउले सांगतो एक मात । असो बोल थोडा, बहू गूज यांत ॥
तुझें आवडीं धूळ होतो पदांत । उठे जैं कृपेचा शिरीं देसि हात २७०

---

२६१ रेती—वाळू. २६२ धाले—तृप्त झाले. २६३ द्रवे—कळवळ, रड. २६४ एकूण—एकंदर. २६६ सवासी—सुलटी. डाव=पोळविणे. २६७ पुरें=पुरते. २६९ पा—पहा. २७० मात=गोष्ट.

न घेई शहाणा व्यथा या शवाची । सदा ध्यात मूर्ती गुरू केशवाची ॥
गुरू संन्निधी ज्यास चिंता भवाची । तया मानवा दुर्गती रौरवाची ७१

नको वासना, सेवि तू येक गोडी । बऱ्या वाइटा नामसंबंध तोडी ॥
सुखी ऐस, काळाचिया देख खोडी । स्वयें ही तुटे मांडिले तेहि मोडी
७२

तुवा अंतरी राहिजे सावधान । जगा भीतरीं सर्वदा साधि मौन ॥
सुखी राखिजे जीभ कीं नेत्र कान । गुरू पायिं नेऊन ठेवी गहाण ७३
७३

कुलालाचिया देख राजा हटाला । किती यत्न कौशल्य एका घटाला ॥
अशा लाथ बुक्या असा ताप टोला । मला माउले कां न देसी खटाला
७४

तुझें नाम सांधीत ओठासि ओठीं । वदे ओठ ओठासि ही गूज गोष्टी ॥
मुक्यानें सुखा रोमरोमांत घोटी । न मालें तरी जा फिरे योनि कोटी
७५

जयानीं सहाचार ही कंठ केलें । जनांचे सभे पैं रवीसें उदेले ॥
परी शून्य राती न बाहेर गेले । कहाणीच सांगून तेथें निदेले ७६

कुणी तारतम्यांत ज्ञानांत गुंते । आहे नाहिचे कांडणा माजिं कुंथे ॥
धरी वाट तू रे गुरूपाद पंथें । अहंताचि तू जाण वैतर्णि येथें ७७

पिके केश पैं बुद्धि आली न पाडा । अरे कां न तू सेविलें प्रेम चाडा ॥
लवे खांब ही खिंड झाली कवाडा । तनू जीर्ण वाडा पडे हा धडाडा
७८

गुरू राजपंथेचि चाले स्वभावें । असा बूध बोधी मना शुद्धभावें ॥
क्षणें संतसंगांत येथें निवावे । मळामूत्र पंकीं कृमी काय व्हावे ७९

मला वाटले सेविला प्रेम बिंदू । मला भासले लाधला बोध सिंधू ॥
तुवा दाविले माउले दीनबंधू । मला प्रेम बोधामधें नाहि गंधू २८०

---

२७१ शवाची—प्रेतरूपी कायेची. भवाची—संसाराची. रौरवाची=नरकाची. २७२ गोडी—प्रेम. २७३ जीभ कान नेत्र सुरक्षित ठेवणें असल्यास ते नाहीत असे वाग. २७४ कुलाल—कुंभार. २७५ मुक्यानें—मुकाट्यानें, चुंबनानें. २७६ कंठ—कंठपाठ. २७९ बूध—शहाणा. २८० गंधू—लेश.

हरी जागरीं जागला नाहि राती । क्षणीं ही न सांडी अहंता जरा ती ॥
जसा कावळा बैसला हंस पंक्ती । असा वेषधारी विटंबूचि संती ८१

उरीं आणिला सांवळा एकरंगा । पुढें घोटिले दोन जीवेश भंगा ॥
त्रिधा सांडिले गूण झालों निसंगा । पुढें चार मुक्तीस भोगी निजांगा ॥
८२

किती वेळ मी गुंतलो रंगरूपीं । जळालो बऱ्या वाइटाचेनि तापीं
विषाचें तळें कीं सुधासार वापी । गुरूपाद धूळींत गेलेचि लोपीं ८३

तुझी धन्यता ही विधीरे कुलाला । घटीं ठेविसी आपुले कौशलाला ॥
अखंडीत तो सिंचितो या जगाला । घडा पालथा कल्पने पैं भरीला ८४

अणुरेणुला कोटि हें जीवजंतू । बहू शोधिता नाहि कोणासि अंतू ॥
नको सोडुरे तू गुरूगूज तंतू । फिरे शीर पिंगा जरी कां महंतू ८५

विकासूनि नेत्रांबुजा बोध केला । मिटूनी स्वनेत्रा अतां क्रोध केला ॥
अर्धी हांसुनी येसि आतां कळीला । कळी ती भली सावरी पाकळीला
८६

तुझ्या त्या दयेची असी एकवेळ । जिथे देखिजे तो सुखाचा सुकाळ ॥
दिठी दिव्य देई जलाची झळाळ । सुधासार वर्षे तुझी पायधूळ ८७

जरी देसि माते मला पाव रोटी । बसाया मिळे जै तुझे दारि ओटी ॥
जरी पाणि पीण्यासी देसी नरोटी । कशाला कुणा मी तरी लाळ घोटी
८८

जरी काळ हा एक पुष्पा विकासी । पुनः मोडुनी मेळवी मृत्तिकेसी ॥
धरेतूनि आपा जरी अभ्र शोषी । हजारो जिवाचेनि रक्तेचि पोसी ८९

इथें बैसले विश्व हें पंगतीला । परी वाढिती जेवित्याचे स्थितीला ॥
धरी सन्मती, श्रीगुरू संगतीला । मतीचे परी पावसी तू गतीला २९०

---

२८२ उरीं—हृदयांत. जीवेश—जीव ईश. २८४ विधी—ब्रम्हदेव. कुलाल—कुंभार. पालथा घडा 'परांचि खानिव्य तृणत्स्वयंभूःतस्मात्पराङ्पश्यति नान्तरात्मन्'चक्षु इत्यादि इंद्रिये जगास वृत्तिरूप जलानें सिंचन करितात. परंतु त्या घड्यांत आत्मज्ञान नाही तो पालथा आहे, पण कल्पनेने भरला आहे. २८५ गुरूगूज—गुरूपदेश शब्द. शीर पिंगा०—क्रियावान येथें पिंगा घालितात, हा एक मुद्राभ्यास आहे.

दरोडा इथें काळ घालील तूर्ण । तया आधिं तू होइ रे कामपूर्ण ॥
अरे पामरा तू नव्हेसी सुवर्ण । भुई ठेवुनी तूज काढील कोण ९१

शवा माझिया मूठ माती करीती । मला निंदिती सर्वही लोकरीती ॥
तुझें पादगंगे तधीं कुस्करीती । तुझें पायिची वीट होई तरी ती ९२

कुणी शास्त्र विद्ये मधें चूरचूर । कुणी गानताना मधें पूरपूर ॥
सभे जेधवा पावसी तू हुजूर । तुझें बीदि पैं राहिले दूरदूर ९३

गुरू दे मला सावत्याची हतोटी । विठूला लपावून ठेवीत पोटीं ॥
उरातूनि या कामना दूर लोटी । पुरीतात भूमीमधे काम कोटी ९४

मुखीं नाम गावे मनाते धुवावे । उरीं दुःख रोपासि कां वाढवावे ॥
सदा वित्त वेचूनि चित्तीं निवावे । अरे जेथिले तेथ लागे ठिवावे ९५

न कंटाळतो जो मनीं ना चळाला । तुझे नाम पीतो उरी जो जळाला ॥
इथे सत्वरी तो भिउनी पळाला । न साहेचि जो कां क्रियेचे मळाला ९६

उदेला गुरू भानु बोध प्रभाती । तनू चित्तवित्तासि घे अर्घ्य हातीं ॥
इथे सत्य लागे कडू, हीच ख्याती । प्रहा, सत्य वस्तू असे एक प्रीती ९७

जरी रातिच्या चिंतनें नाहि मस्ती । दिसा ओरडू, राहवेनाचि वस्ती ॥
मरे काळ जैं चिंतनाचेनि कुस्ती । मरू बापडा, काय मी खाउ खस्ती ९८

जये काळिं आकाश पाताळ झालें । गुरूदास्य माझें कपाळासि आलें
रडे मी अतां माउलचेनि तालें । असे भाग हा, आमुचे काय चाले ९९

कुणी गुंतती गायनाचें विलापी । कुणी कुंथती योग की मंत्र कल्पीं ॥
तरेना कुणी वाहती सर्व आपीं । गुरू जागतो येर ते अंधवापीं ३००

---

२८६ कळीला=तंस्याला. कळी—फुलाची कळी आधीच तोंड मिटून हासत नाही. २९० जेवित्याचे जेवणाराचे. २९१ तूर्ण—लवकर. २९३ बीदि—गल्ली. २९६ हुजूर=सरकार प्रत्यक्ष. २९४ सावत्याची—सावता माळ्याची. हतोटी—कृती, कौशल्य. विठूला—प्रभूला. २९७ उदेला—उगवला. भानु—सूर्य. ख्याती=प्रसिद्धी. २९८ रातिच्या—रात्रिच्या. ३०० कल्प—क्रिया. अंधवापी—अंधंतमनरक.

बहू बाग हे शोभले देह देहीं । फुला पल्लवा पाहता तृप्ति नाहीं ॥
तुझा बाग देई, गुरू आम्र घेई । तया चाखिता शीघ्र होसी विदेही १

निशी माजि टाहो चिदाकाशि नेला । रडे मी जधीं सिंधुला पूर आला
प्रभातीं तुवा भेटण्या प्रेम केला । उद्या मी असे काय जीवंत मेला २

गुरू दारि सन्मित्र आले प्रभाती । सखे सौंगडे एकमेका पहाती ॥
गुरू माउली माळ घेताचि हाती । आशिर्वाद दे, आठवीते मला ती ३

गुरू वासरी शील कीं नाहि ऊन । चिदभ्रें तनू स्वच्छ केली धुऊन ॥
गुरूसी वदे एक तेथें लवून । अरे प्रेम दे, आम्हि राहू तरूण ४

असे शक्य तो पैं दुखावी न कोणा । स्वताचें विकोपें न घे अन्य प्राणा
अनंता सुखा वांछिसी जैं सुजाणा । झुरे तू मनीं पै दुखावी न आना ५

जधीं वाटिसी कान्हया गोडकाला । तुवा देइजे गाप कीं गोपिकाला ॥
बसे स्वर्गताळा तथा देइ काळा । मला दे तुझ्या पायिच्या पाइकाला ६

अहंकार श्रृंगारिजे काय काजा । अहे नाहिच्या इंगळी कोण भाजा ॥
अरे आयु पाठीं बहू दुःख फौजा । बऱ्या मूढ प्रेमा मधें मस्त मौजा ७

गुरू गायि, जाथी अहंता समूळ । गुरू पायिं होसील तू पायधूळ ॥
अरे त्याग भागा भरीसील चूळ । मिळे योगिया केवि हा गोड गूळ ८

सहेतूक प्रेमा नसे वर्ण कांती । वमूनी विषा सेविता होय वांती ॥
खरे प्रेमळा दीस राती युगांती । न भुक्ती न सुप्ती न शांती न मुक्ती ९

हरी ध्याउनी पावती गोप थोरी । तुला माउले ध्यातसा काय चोरी ॥
कुणी योगिये भोंदिती पोर नारी । न ते गाढवी कीं न तो ब्रह्मचारी
३१०

---

आपीं—पाण्यांत. अंधवापी—अंधतमांत, खड्ड्यांत. ३०१ आम्र=अंबा, बाग देऊन फळ घ्यावे लागते हा भाव. ३०२ निशी—रात्रीत अज्ञानांत. प्रभातीं—बोध पहाटेस. ३०३ सन्मित्र—संतमित्र. ३०६ पाइकाला—सेवकाला. ३०७ अहेनाहि—अस्ति नास्ति हा शास्त्रकज्जा. इंगळी—विस्तवांत. मूढ—अंधभक्ति. ३०९ भुक्ती=भोग भोजन. सुप्ती=झोप.

सुखाला तुझे राहिले एक नाम । अरी मित्र नाहीं, कुणा भेद साम ॥
कशाला उरीं छद्म, नाहीं छदाम । गुरू लाडसे आमुचा तूचि काम ११

बुधा बुद्धिचे आश्रया एक जीव । अरे एक तूं, विश्व ही एकजीव ॥
गुणाकार हा एकमेकांत ठेव । गुरूचे पदीं राहसी एकजीव १२

कुणी बैसले मान्यतेच्या सराला । पुढें दीन गेले रिकामे घराला ॥
निवेदीत ते दीन काला कराला । सजे मान्यता एकल्या श्रीवराला १३

जगीं चाल ऐसे, कुणी ना नमावें । जनीं वाग जेणे जनानीं निवावे ॥
जरी कीर्तनीं जासि ऐसेचि जावे । न कोणी उठोनी तुला बैसवावे १४

बुधा येथ तूं बुद्धिचा घेइ थारा । असे नेक साथी, नको दुष्ट वारा ॥
जरी इच्छिसी होइजे येथ प्यारा । सुखी ऐस, सांडी अहंकार सारा १५

गुरू गूज तू इच्छिसी घेउ हातीं । कुणा दुःख देण्या हलावी न पाती ॥
न मृत्यूसि भीणें, न अन्नासि चिंती । अरे बापुडे हे अपोआप येती १६

त्रिकालज्ञ दैवज्ञ सामोर आले । स्वताचे गतीला मती काय चाले ॥
कळेना परी नेणती ना कळाले । अर्धी कुंडली मांडिली पैं निमाले १७

ध्वनी रासभाचा असे लोक बोल । बँहू नाद ढोला परी आंत फोल ॥
झुकायासि यानां न लागे कमाल । करी लौकिका, लौकिका हे हमाल
१८

गुरू गायिरे, शोक जायी, कृपा हे । इहामुत्र भोगा मनींही न साहे ॥
गुरू प्रेम अग्नी मधें शीतता हे । तुझे धूळ-वाते जगीं प्रेम वाहे १९

गुरू गायिरे नाहि छोटी न मोठी । न येतील वाहत्तरा खोडि पोटी ॥
पदें ही न लोटी सुधासार वाटी । अरे लेश घोटी विरे क्लेश कोटी ३२०

---

३१२ गुणाकार–गुण आकार. एकजीव–एकरूप. ३१३ सराला–आळ्याला. रिकामे–शून्य. कराला–विक्राल. सजे–शोभते. ३१५ नेक–चांगला. ३१६ पाती= पापणी. ३१७ कुंडली=जन्मलग्नकुंडली. ३१८ रासभ=गाढव. ३२० छोटी मोठी–तूळाजा मूळाजा स्थूळमाया मूळमाया. वाहत्तर खोडि=७२ पंथ.

उडे हंस जै आपुले सुस्थळाला । कळा सर्व जाती निजाचे मुळाला ॥
करा काय त्या रेशमी पातळाला । असे देह हा सर्व आधीं जळाला २१

इथें बोलती सर्व ही नीतिमंत । मरावे जसे तोवि व्हावे जिवंत ॥
मरे मी जधीं ठेविजे तेथ भक्त, । गुरू माउली, प्रेम, आणीक संत २२

मला पथ्य पाणी गुरूचेंनि उष्टें । गुरूपाद रेणूचि वारील कुष्टे ॥
गुरूपादतोयेंचि स्नापुनि स्पष्टे । मला जाळिजें तूळसी बिल्वकाष्टें २३

जधीं पाप माझें स्मरें काळजाला । उरीं आग वाहे, असूं लोचनाला ॥
परी एकदा कां अनूताप केला । करीना दया नाथ पापा पुढीला २४

गुरू एक प्रेमा नये योग कोटी । गुरू एक नामा नये भोग कोटी ॥
असे कोण श्रीमाउलीहून मोठी । मरू कोट वेळा इचे येउ पोटी २५

अधीं ओंनमः सिद्ध पाटीं लिहिलें । पुनः तेंचि चित्तामधें घोकवीले ॥
गुरूसिद्ध मातेचिया प्रेमलीले । अनंता गुजांचे निधी ऊघडीले २६

उपासा गुरूचेचि उच्छिष्ट खावे । जरी भ्रष्टलो काय श्रेष्ठांत जावे ॥
अकीर्ती बहू जीव तेणें सुखावें । असें फाटलें कीं न लागें शिवावें २७

कुणी सांगती फेकुनी वाक्य जाळा । तनू लिंग याहूनि आत्मा निराळा
गुरू पादुका लिंग लेईन माळा । जरी कर्वती कापिती या कपाळा २८

गुरू पाडवा हा उभारील गूढी । अम्हा माउली प्रेम चित्तांत वाढी ॥
क्रिया श्रृंखळा कल्पना थोर बेडी । स्वयें तोडुनी मोकळे आजि सोडी २९

कुणी सांगती होत पापा तपास । तधीं श्रीहरी फार देईल त्रास ॥
दयाळू घनानंद नोहे उदास । सुखी ऐस रे, अंति यसी सुखास ३३०

---

३२१ साज–भूषण. ३२२ असे मृत्युपत्र लिहिले. ३२३ सदरप्रमाणें हेही मृत्युपत्र. ३२४ प्रभू अत्यंत दयाळू आहे हा भाव. ३२५ नामा=नामाची. नेम=नेमधर्म. नये–सर पावत नाहीत. ३२६ निधी=खजाने. ३२८ गुरुपादुका हाच माझा आत्मा आहे त्याला माझे देहासी एक करीन. गुरूपादुकाचा टिळा लावीन.

हरी घे करी, ना तरी काम घेरी । जगा देखसी तैं तुला येत घेरी ॥
दिठीसी दिठी सांवळा वेधि पोरी । भुई लोळसी फूगडी येसि जेरी ३१

कुणाची गुताशुंत जीवासि दावें ॥ गळा फांसिलें कोवि बाहेर जावे ॥
बटू पासूनी तो दशग्रंथि पावे ॥ जपीं दोर ग्रंथीसि हाती धरावे ३२

वयातील लेखासि जावे पुसून ॥ प्रियाचे सुरीनेंच जावे मरून ॥
सुखी मी, गुरूमाउली सुप्रसन्न ॥ उरातील रक्तोंचि आम्हासि अन्न ३३

झुरे जो तया नाम हे जीव गाभा ॥ तुझें रूप ध्याता मुखा येत शोभा ॥
क्रियेच्या उपासांत आलो न लाभा । तरी पारण्या जेविजे पद्मनाभा ३४

न जाणे तया सांगणे काय नीती । तुवा अमृता पाजिता ही न पीती ॥
सुधें बोलण्याची नसें येथ रीती । परी नित्य लाखोलि तूझी फजीती ३५

बुरें इच्छितो पावतो तोचि त्रास । करी एक पैं पावतो शंभरास ॥
तुझा मी हितेच्छू, तुझी दुष्ट आस । न घे दुःख मी, तूं न येसी सुखास ३६

जधीं चांगल्यानां तुम्ही द्याल वाटा । विठोजी मला देइजे लेश पोटा ॥
जरी नेक मी देइजे भाग मोठा । बुरा मी तरी चांगल्या पायिं लोटा ३७

जरी जाणसी शास्त्र सारे बकावे । तरी काय बैला खराला हकावे ॥
बरें या जगीं मूर्ख वेषें शिकावे । न विद्या म्हणूनींच मद्या विकावे ३८

मला वेधिलें जैं उपासें जपानें । मला वाटलें काम झालें तपानें ॥
फिटें सोवळें तेथ एका अपानें । सुटें तो निराहार एकाचि पानें ३९

जरी तूजला भाग्य देईल साथी । जरी लाधली तूज युक्ति प्रयुक्ति ॥
तरी भेटती काय हे संत पंक्ती । परी काय येईल हे आयु हाती ३४०

---

३३१ घेरी–धरील. घेरी=भोंड. फुगडी–हरीचा हात बळकट धर व त्याचेवरं दृष्टि रोखून ठेव. जगाकडे पाहसील तर हरि हातचा सुटेल व तुला घेरी येऊन भुईवर लोळसील. ३३२ दावें=जानवें, बटू=मुंज्या मुलगा. दशग्रंथी=विद्वान पूर्ण पंडित. ३३८ बकावे–बोलावे. ३३९ अपानें–अपान वायूनें. आता कर्म यथासांग कसे होईल.

भुई टाकिते माउली जेथ चूळ । मला वाटतें होइजे तेथ धूळ ॥
तुला कायरे भासते यात लाळ । सुधेनेंचि या दुःख नासे समूळ ४१

नये वासना बांधिता पैलवाना । नसे तृप्तिला येथ कोठें ठिकाणा ॥
मला दर्द देणे, तुझा मी दिवाना । सुखाचा तरी लेश नाहीच कोणा ४२

तुझें मुख जैं माउले रोड झालें । परी सुंदरत्वा तिथें मोड आले ॥
तुला आमुचेनी उरीं फोड झालें । तुझ्या त्या दयेचें जिवा कोड झालें
४३

वियोगें तुझ्या फाटलें ऊर पाहे । अरे लोचनीं आश्रु कीं रक्त वाहे ॥
नसे त्यांत कांहीच आश्चर्यता हे । तुझे पायिं दुःखीं मला सूख आहे ४४

पथीं प्रीतिच्या जाण तेची अजाण । गुरू राजया थोर तेची लहान ॥
'उद्या' नूगवे 'आज' राही अजून । 'उद्या' इच्छितो तोचि जाई कुजून
४५

लिहीना विधी माझिये संमतीनें । भलें कीं बुरें काय माझें वतीनें ॥
नसे काल कीं आज माझें गतीनें । मला हांगती सांग कोणे नितीनें ४६

अरी तो मला सर्वदा देत शाप । परी काय कीजे अहो माय बाप ॥
मनोदर्पणीं देखतो रूप आप । स्वताचे गुणांचे वदे तो प्रताप ४७

सुगंधे तुझें गंध ये कापुराला । स्वरूपें तुझें रूप ये अप्सराला ॥
तुवा मानिता मान्यता श्रीवराला । तुवा पूजिता पूज्यता शंकराला ४८

पुढें बांधिती लोक माझी समाधी । तनू सर्व माझी तिथें जाय वाधीं ॥
समाधी विसर्जी, मला देख आधीं । गुरू राजया हाणि माझी उपाधी
४९

अम्ही चाललो, जाहला शोक काला । अपूऱ्या रहातील चिद्रत्न माळा ॥
न मी वर्णिले योग्यसे मोहनाला । मुकें राहिलो या जनांचे गुणाला
३५०

---

३४१ सुधेनें–अमृतानें. ३४३ कोड–कौतुक. ३४५ जाण–ज्ञानी. अजाण–अज्ञ. आजचा दिवस आहे. दिक्कालादिरहित स्वरूप सिद्ध आहे. उद्या म्हणजे भावी काल नुगवे नाहीच. ३४६ विधी–ब्रम्हदेव. हांगती–गांजितात. ३४८ श्रीवराला –विष्णूला. ३५० अपूऱ्या–अपूर्ण. माळा=हार.

कुणी जाहले गोदडीचे उदास। करा पात्रिं भिक्षा तरूमूलिं वास॥
स्वयें सांगती संत आम्हीच खास। परी पोट जाळावया हा विलास ५१

पहाडासि देसी जरी प्रेम नाचे। असे नष्ट जो निंदितो प्रेम वाचे॥
मला सांगती प्रेम नाहीं सुखाचें। अरे बोध आत्मा असें प्रेम साचें ५२

तुझ्या या घरीं बैसलें संत पंक्ती। परी कोणि गेले तुरी देत हाती॥
तुझी वाढ आहे, तया झालि तृप्ती। मला वाढिजे ते जरी अंचवीती ५३

जगूं मी तरी माउले प्रेम दीजे। जगातील लाभा सुखें हानि कीजे॥
जगज्जीवना मी तुझे पायिं साजे। मला काय माहीत आणीक राजे ५४

गुरू माउले सांडिजे योग निद्रा। बहू घोरसी तूं सुखाचे समुद्रा॥
विकासी स्वनेत्रा अरे सौख्यभद्रा। मला ठेविजे तूं सदा दीनमुद्रा ५६

मला मोहवी एक तुझा वहाना। तुझे वेडियाला पुरे एकताना॥
मला मारण्या वक्र दृष्टी न हाणा। पुरे मारण्या एक तूझी वहाणा ५६

जुने बोलती लोक व्हावे विरक्त। करा शुद्ध चित्ता तुम्ही व्हाल मुक्त
कली माजिं सारे कळीचेचि भक्त। इथें इच्छिती एक वित्तासि फक्त ५७

अतां हेंचि गुंडाळुनी नेम सारे। जराग्रस्त मी ध्याल तूतें मुरारें॥
तुला भोगिजे हेचि कुब्जेसि वारे। न भोगूं अतां सांग भोगूं कदा रे ५८

मला भूक ही तू नयेसीस हाता। तुझे पाठलागे मला ये न जाता॥
अरे सावळया सुंदरा चित्तचित्ता। पळालासि कां रे पहाता पहाता ५९

वृथा काळजीनें करी काय आलें। जना वासना पाशिं बांधूनि नेलें॥
गुरू तारका नाम दे याचि वेळें। सुखें सेवितो नाम होणार झालें ३६०

---

३५५ विकासी–उघड, सौख्यभद्रा–सुखाचे कल्याणा. ३५६ वहाणा–चप्पल. ३५७ कळीचे–कलहाचे. ३५८ जराग्रस्त–म्हातारी. कदा=केव्हां. ३५८ व ३५९ कुब्जेचे कृष्णास बोलणें.

वयाचा तरू जेथ नासे समूळ । तनूची अणूरेणु होईल धूळ ॥
मुखीं कानिं माझें भरी एक चूळ । तुला सेवण्या मीच होईन गूळ ६१

वरी माळमुद्रा बहू योग पिंगा । उरीं गर्व कापट्य घालीत धिंगा ॥
महंतीचिया आड साधूनि रंगा । विकी ब्रह्म पै, नीच तो धेड मांगा ६२

गुरू सेविता सूख हातात येतें । तनू सर्वही गुप्त राखेत होते ॥
अरे जविजे प्रेम खावे न चिंते । स्वता सर्व विश्वासि चिंताचि खाते ६३

गुरू प्रेमळा दाविसी गुप्त ठेवा । तुझा दीन तो सेवितो प्रेम मेवा ॥
मनीं माझिया अर्थ जो तूज ठावा । प्रियू जाणतो प्रेमळाचें स्वभावा ६४

गुरू सौख्यकंदा अनंता मुकुंदा । मुखेंदु तुझा मोदवी या कुमोद ॥
हरी अच्युता दावि पादारविंदा । स्तवीती श्रुती आपुलालेनि छंदा ६५

तनू पिंजरा जंगला तंग सारा । मला आवडे मोकळा गार वारा ॥
गुरू नासिजे नामरूपा विकारा । नमो निर्विकारा नमोजी अपारा ६६

वयाचेनि अता जरी कोणि चिंती । कशाला करी माडिया आणि भिंती
नहूषा मिया देखिले कालरातीं । विमानीं उडे तो सडे आजि माती ६७

कुणी श्राद्ध जेऊनि माळील पिंडा । जरी विप्र शार्दूल होईल रंडा ॥
सदा दग्ध हस्तेंचि वासील तोंडा । बने मत्सरी कंजुषी ग्रामगुंडा ६८

जगीं दोन कीं तीन धर्माधिकारी । स्वता दीड हे, अर्ध पृथ्वी बिचारी ॥
उगें बैस, यांचे परीं जो चुकारी । नसे, वाळिती त्यासि लेखूनि वैरी ६९

कुणी निंदितो काय त्याचें आम्हाला । बुरें एक नाहीं, गणी शंभराला ॥
गुरूनें मला आरसा स्वच्छ केला । बघे जो मला देखतो तो स्वताला ३७०

---

३६३ चिंते–चिंतेला. ३६५ मुखेंदु–मुखकमल. कुमोद–कमळास. ३६६ जंगला अपभ्रंश, गंजला. ३६७ कालरात्री नहुष स्वर्गात विमानामधें उडत होता तो आज अजगर झालेला मी पाहिला. ३६८ विप्रशार्दूल–विप्रवाघ. ३६९ दीड= दीड शहाणे. चुकारी–चुकणारा.

कुणी मृत्युच्या येथ निद्रेसि जात । न बोले न ऐके जरी हो युगांत ॥
अरे कायरे फार आश्चर्य यांत । न जाणे तरी जाणवी काय मात ७१

तनूची सुखी ऐस पेटेल होळी । करी जीव शंखध्वनी अंतराळीं ॥
अरे लाविजे भस्म आताचि भाळी । तुझी रुंडमाळा गळा लेत काळी ७२

तुझें एक बोलासि ब्रह्मांड मोल । तया वारिजे लक्षचौऱ्यांसि फोल ॥
मुखीं ज्या तुझें नाम आलें अमोल । वसे त्यांत सद्गुण सौगंध ओल ७३

नको प्रेम सोडू जरी ते अयास । तेहेतीस कोटी करी विघ्न यास ॥
अरे संत हे फूललें आसपास । अशा वेळिं कां होतसी तू उदास ७४

जरी कृष्ण येऊन बैसेल माडीं ॥ पडे स्वर्ग पाया तरी लाथ झाडी ॥
कुणी बोलती कुब्जके सोड खोडी ॥ करू काय हा कृष्ण माते न सोडी ७५

गुरूचें मनाचा कळे काय अंत ॥ जगच्चालकाचा कळे काय हेत ॥
इथें सांगती आपुलालीच मात ॥ गुणा अच्युताचे कहाणी अनंत ७६

पदीं अर्थ जो तो पदार्थांत भासे ॥ कळेना कसा गुप्त आला विलासे ॥
निघे मौति जैं शिंप गेली विनासे ॥ प्रभूचे मुगूटासि जाऊनि बैसे ७७

तुला वर्णिता जाहला वेद मूका । तुला विश्व सारें उभारीं पताका ॥
तुला देखता चंद्र तो घेत बाका । म्हणूनीच तो येथ पावे कलंका ७८

जगाची नटी नेसली शालु भारी । जनाचें मनाला असें फार प्यारी ॥
बहू चांगली शोभते ही विचारी । परी ही जगा मोहवी आणि मारी ७९

समूळीं जळें शास्त्र आणीक कर्म । गुरूपायिं जाण्या मिळें तेथ वर्म ॥
अधर्मीं दिसे धर्म धर्मीं अधर्म । तयालाचि पावे इथे आत्म धर्म ३८०

---

३७२ काळी–भद्रकाळी. ३७३ ओल–ओलावा, प्रेम. ३७४ कोटी–कोटीदेव. ३७५ कुब्जेचे वाक्य. सोड सोडी–खोड सोड. ३७७ शब्द नासतो पण वस्तुचे पर्यंत नेतो हा भाव. ३७८ बाका–वाकडेपणा स्पर्धा. तुझी बरोबरी करूं इच्छितो तो कलंक पावतो हा भाव. ३७९ प्यारी–आवडती.

असे जोवरी येथ आकाश भूमी। पशू पक्षिया बांधितो वास्ति स्वामी॥
न अन्नाविना येथ जागा रिकामी। प्रभू पाळिताहे परी अंध आम्ही॥ ८१

गुरू गोजिरा देखुनी चित्त हासें। गुरू पादुका हातिं माझें प्रकाशे॥
सुखी रोम ते आपुलालें विकासे। अता या स्थिती देह जाऊ विनासे ८२

युगारंभि आतां पुढें ही युगांतीं। कुणी ही पहा सार ही वस्तु प्रीती॥
कुणी प्रीतिला साधना पैं विकीती। परी याहुनी श्रेष्ठ ते काय घेती ८३

पुरें हेंच आम्ही नसों विश्व राहे। न आम्हासि हें नाम कीं रूप साहें॥
न होतो तधीं आडलें काय पाहे। पुढें ही नसूं तेथ आहेचि आहे ८४

कुणी दावि जो शक्ति आणि महंती। सहा शत्रुच्या तो सुरी देत हाती
चढे तो पडे, बोलिजे येथ संतीं। कृपाळे मला नेउनी ठेवि मातीं ८५

कुणी बोलती ज्ञान येताचि हाती। तरी सांडिजे सर्वही मूढ भक्ती॥
असे नाम सेवीन ज्याचेनि मस्ती। जरी ज्ञान ये जाय, राहे न खंती ८६

सख्यानों बढाया नका मारु थापा। जळे मी तुम्ही पादगंगेचि सिंपा॥
मला कालवा कर्दमाचे कलापा। गुरू मंदिरातील छिद्रासि लिंपा ८७

कुणी चालता झीजवीले भुईला। तुला धुंडिता मापिले अंतराळा॥
परी चोजवेना कधी त्या नराला। स्थिती माउली देत जी लेकराला ८८

ठसे पाडिती माझिये प्रकृतीचे। करीतील चित्रा विचित्रा कृतीचे॥
असें प्रेम हें सार या आकृतीचें। तुझा दास होणें बहू सुकृतीचे ८९

बहू दाटली या उरी वाहटूळ। न साहे मला येथिला हा चिखूल॥
मला वाटते देह सांडू समूळ। परी कर्म हें ओढवें दुःखमूळ ३९०

---

३८१ वस्ति—रहाण्यास स्थळ. ३८५ माती—मातीत ठेव म्हणजे पडण्याची भीति नाहीं. ३८७ बढाया—सिद्धीची घमेंड. छिद्र=रिद्धि सिद्धि हेच भक्तिमार्गांत संकट स्थळ आहे. ३८८ अंतराळा—आकाशाला. ३८९ कृतीचें—क्रियेचे. आकृतीचे=देहाचे. सुकृतीचे—पुण्याचे.

सुखी तो जया गर्व नाही उरांत । क्रिया ज्ञान योगीं न काढी वरात ॥
चरे हंस तो मानसाचे सरांत । करी नीच सेवा गुरूचें घरांत ९१

अरे हायरे वेचिले मुद्दलाला । कसा काळ हा भोसकीतो उराला ॥
फिरोनी फिरस्ता न कोणीच आला । पुसीजेल तेथील वार्ता जयाला ९२

जधीं आति बांधाल माझें गवाळें । शवा लागि फुंकाल एकाचि जाळें
खबर्दार तेथें मृदंगें कहाळें । गुरू सावळी आळवीजे रसाळें ९३

तुझें आयुषा माजि एके क्षणाला । जरी वेचिसी दे गुरू दक्षणाला ॥
सुखाचें स्वराज्याचिया रक्षणाला । असे आयु, वाया न सांडी कणाला ९४

दुराशें पदीं सांडिलें आयु तोय । सुखाची कधीं चाखिली नाहि कोय ॥
कुणाचें पुढें दाद फिर्याद होय । यमाला पुसावें तरी नाहि सोय ९५

वितर्कें सदा हात पायासि ताणी । रडे बोंबले मी कपाळासि हाणी ॥
न येसी उरी तूं सुखाची शिराणी । न ये पालथें घागरी माजि पाणी ९६

चिरायू बने देह ऐसा घमंडा । दुराशा गुणें काळ घालील गंडा ॥
पदीं ठेवि पिंडा, त्यजी ब्रम्ह अंडा ! फुटें जेथ हंडा बने तेथ कुंडा ९७

गुरू पाडवा सांडिजे गर्व जल्प । बहू सूख हें कष्ट ही फार अल्प ॥
मनो इंदुची जाहली कोर स्वल्प । विकल्पा त्यजीता बने काय कल्प ९८

पुरानी धरित्री न होते नवा ही । मिळेना किनारा गुणाचें प्रवाहीं ॥
जरी वाटिसी गूज बाजार भायी । तरी हात मोडे, परी लाभ नाहीं ९९

मला विश्व नाही कधीं साहय देत । सदा मोडिते प्रीतिचे सर्व हेत ॥
गुरू पूजनाचा करीताचि बेत । तया बैठकीं काक ते लक्ष येत ४००

---

३९१ वरात=मिरवणूक. सरांत–सरोवरांत. ३९७ गंडा घालणे–धोका देणे. देहास चिरायुत्व रसायन अथवा योग साधनानें संपादूं इच्छिणारास उद्देशून हा उपदेश आहे. ३९८ जल्प=बडबड. इंदुची–मनरुपी चंद्राची. कल्प–काया पलट. ४०० काक–अशुचि विकल्प.

विचारी तनू झीजली या प्रवासी । तया सूख कैचें फिरे जो विदेशीं ॥
वया वेचिले काळजी ही उरासी । मरू तेथ जावू कुणें मी घरासी १

मला तातडीं आणिताती फुकाचा । जगोनी दिसे वाढवा कौतुकाचा ॥
पुढें लोटिती सर्व एकाचि खाचा । करा न्याय या आवकाजावकाचा ॥ २

तुझें चिंतनीं ते मुनी मौन झाले । गुरू शब्द झाला, बटू कान झाले ॥
न तर्कें कुणाच समाधान झालें । कुणी श्वास रोधूनि निष्प्राण झाले ३

मुनी मानवी येथ जे विश्वसार । जितप्राण जाती नभा पैलपार ॥
तुला नेणती खा परी ते गव्हार । भ्रमीं पेलिती निम्नदृष्टीच शीर ४

मिया होइजे शूर गंभीर वीर । वहावा तुझा दर्द आपादशीर ॥
सदा प्रेम अभ्यासिजे रंगधीर । तुझें या विर्दी माजि व्हावे अबीर ५

मिळें प्रीतिनें सौख्य आणी धिटाई । लगे पुस्तकीं गांठ गुंताड चाई ॥
गुरू सेविता रंग वाढें नवाई । निगूरा कळाहीन लाजूनि जाई ६

मला रोग तूझा जळे हाड सांधी । न सेवू तुला तैं स्वहत्याचि साधी
तुझेवीण सारे कुपथ्योचि बाधी । दवा पथ्य तू वैद्य तूं तूंचि व्याधी ७

मनोद्यान गंगा गुरूमाय देवी । सुखीं साहजीं मी चिदानंद जेवी ॥
जगे वाचलो आणि वाचेन तेवी । तुला सेवितो सेविले आणि सेवी ८

धरा शालुका ही सदाचीच नीट । शिवा चंद्रतारांगणांचा किरीट ॥
बने माझिया मातिची जेथ वीट । खडे ब्रम्ह राहील वैकुंठ पीठ ९

जनाला पुन्हां हें क्रिया भान झालें । पदीं बुद्धिच्या श्रृंखळा जाड हाले
कटाक्षें जना गुंगवी हो दयाळे । तरी भक्तिनें नाम गातील टाळें ४१०

---

४०२ खाच–खळगा. आवक जावक–येणे जाणे. ४०३ बटू–शिष्य. ४०४ जित-प्राण–प्राण जय केलेले. नभ–चिदाकाश. खा परी=आकाशासारखा. चौथे चरणांत मुद्रा प्रकार सांगितले आहेत. ४०५ आपादशिर–नखशिखांत. अबीर–बुका. ४०६ निगूरा–बिन गुरूचा. ४०७ स्वहत्या–आत्महत्या. ४०८ मनोद्यान–मनाचा बाग. ४०९ शालुका=महादेवाची. खडे=उभे. ४१० क्रिया संपून चित्तशुद्धि

गुरू गीत हें हाय रे संपवीलें । अहा प्रेम लावण्य हें लोपवीलें ॥
कुठें हंस तें पांखरू रे उडाले । कधीं येथ आलें कुठें काय झालें ११

तुझें प्रीतिचें सांब ही होत नंगा । रडे रुद्र तैं या जगीं होत दंगा ॥
तुझें प्रेम तें झाकिजे अंतरंगा । महा शोकसर्पासि नेईल भंगा १२

जगातील सर्वा सुखाची नवाई । फटिंगासी दावी गुरूराज माई ॥
कुणी एक सोडूनिया जोड होई । सुखा दुःख सिंधूत टाकूनि देई १३

उद्या कालचें शोक दुःखा करीन । अता प्रेम संपत्ति भाग्या वरीन ॥
हरी सावळा धैर्य देतो धुरीण । अता ना धरू हात केव्हां धरीन १४

हरी सावळ्या वीण तें ब्रह्म नाहीं । असी सत्य वाचा, कळेना जनाही
अरे मोहनाशी हरीनाम घेई । हरी रूप होतील रे देश दाही १५

जगीं येथ जाणीव येते न कामा । तुझे नेणत्यामाय देतेस आमा ॥
अहंता त्यजूनि असो मी रिकामा । न कोणी इथें लोक देखोत आम्हा
१६

तुझें मंदिरी भक्त गर्जोत साचे । जळो सोवळें ओवळें याज्ञिकाचें ॥
क्रिया गोदडी बोचकें भिक्षुकाचें । पदासीं पडू दे तुझे पाथिकाचें १७

करी श्रीहरी कोड गोपांगनाचें । परी साहती फोड आत्ता जनाचें ॥
सहस्रावधी भंग होता फणांचें । अला आसना शेष नारायणाचें १८

मला आवडे कूबडीला कन्हाई । रमे मी तयासी मला हेंच बाई ॥
तुम्ही सांगता की अनूताप येई । न देई हरी ताप, मी ही न घेई १९

क्रमी पंथ ऐसा नुरे जेथ द्वैत । असें द्वैत तेंही क्रमानेच जात ॥
न होसी हरी तू, परी साध हेत । तुझा तूपणा सर्व जावा लयांत ४२०

---

झाली. आता पुन्हां क्रिया अभिमान वाढवील करितां प्रभो भक्ति दे. ४१२ प्रेम हृदयांत गुप्त ठेवले तर शोक नाशक, प्रगट झाले तर जगांत क्रांतिकारक आहे. ४१६ आमा—स्तनपान. ४१७ पाथिक—दास. ४१८ कोड=कौतुक. ४१९ अनूताप येई—पश्चाताप होईल.

मला मार्ग लागो गुरू पद्धतीचा। मिळो प्रीतिचा पंथ तो सद्गतीचा ॥
नको गर्व तो सर्व बुद्धी मतीचा। पुरे लेश येथें दयेचे कृतीचा ४२१

जुन्या धर्मशाळेंत आले नवीन। तया आस ही कीं न जावे इथून ॥
परी तेथ पाटीं ठिवीलें लिहून। " उतारू जनानो त्वरें जा निघून" २२

जिवानें नभाची मठी बांधियेली। श्रुती नेत्र दारें तिथें सांधियेली ॥
परी फेनसें चित्सुधेचें कपालीं। हजारो जिवा शांभवी पीत काली २३

जिवाला असें दुःख हे लांब भारी। शिवा तूजला ठेविले सौख्य पारी
परी अन्नपूर्णे घरीं तू भिकारी। गुरू माउली खेळवी सूत्रधारी २४

हरीसी तिरी बैस, सांडी खळाळ। दुखाचे ऋणा फेड, वाजीव टाळ ॥
मरूं तै दहारोज राहे विटाळ। जगूं तोंचि कीजें सुखाचा सुकाळ २५

करी वैद्य मात्रा, परी जात आहे। धरी शेत वाड्या, जगे काय पाहे ॥
जरी मी कुणाचीं स्थिती पूसता हे। वदे 'तोहि मेला, चिरंजीव राहे' २६

रमे सार गंधू फुलाचोनि ओठीं। हरी वाजवी बासरी वाळवंटी ॥
असें बूध तो जो हरीचेचि ताटीं। सुधा जेवितो, क्लेश वाहे न पोटीं २७

जगाच्या चव्हाट्यांत मौजेसि आलो। तिथें चावटी ऐकूनी तृप्त झालो
गुरू जान्हवी माजें सौख्यें नहालो। यमासीं लढाया समोरीं रिघालो २८

मला आणिती एक, ते अन्य नेती। परी आपुला अंत कोणी न देती ॥
मला दे हरी अल्पसी हीच शक्ती। तुझा आठवा ठेवु तूझेचि हाती २९

मनारे नको संग संसारीयांचा। नको घेउ वारा हरी वैरियांचा ॥
धरी उंबरा संत गोसावीयांचा। प्रियू होसि तूं गा हरीचे प्रियांचा ४३०

---

४२२ पाटीं–तख्ता, बोर्ड. ४२३ मठी=घर, डेरा, तंबू. सांधियेली–लावली अथवा बंद केली. फेनसे–बुडबुड्यासारखे, जीव व जीवकृत नभ आहेत. कपाल–नरकपाल पानपात्र. शांभवी–देवी, पक्षी योगमुद्रा. काली=लयकर्त्रीदेवी ४२४ लांब=जन्मोजन्मीचे. भिकारी=ज्ञानवैराग्याची भिक्षा शंकर नित्य मागतो. ४२९ तुझी–प्रभूरायाची. आठवा–मापटे, तुला सांठवण्याचे पात्र, आठवण.

त्वरें आग ही गीत गंगेंत लोटी । मना भाजणी फार लांबेल मोठी ॥
क्षणू एक चोरूनि सौख्यासी घोटी । जिवा चोरितो काळ कोट्यानुकोटी ३१

भल्यासीं बुरें तें कधीं नाकरावे । भुता राक्षसाच्या वनीं ना शिरावें ॥
न तू काळजी डाकिणीला वरावे । अहंकार मांगा न हातीं धरावे ३२

गुरू मंदिरी बैसलें तप्त कांहीं । सुखी एकमेकांसि भेटूनि बाहीं ॥
तिथें माउली गातसे नाचताही । असी वेळ आणीक येणार नाहीं ३३

पुनर्जन्म ज्ञानामधें जे प्रवीण । तुझे गूण चिन्हासि सारे बघून ॥
मला सांगती आण वाहूनि खूण । "गुरू माउली ती परब्रम्ह पूर्ण" ३४

अधीं कां मला तूं दया लाड केले । किती सूख शांती किती कोड केलें
अतां वक्र दृष्टीं उरा फोड आले । गुन्हा कोणता, चित्त हिर्मोड झालें ॥

तुझें वाटमारे तुझे जातभाई । कळेना तया माळ कीं अंबराई ॥
पथा दाविती तेथ वेताळ खाई । अरे वाट ही सद्गुरू मायबाई ३६

न गेला कुणाचें घरीं कृष्ण बाळ । व्रजें मांडिलें व्यर्थ सारे कुटाळ ॥
वरी राधिकेचाहि घेतात आळ । असें काय या बोलण्या मेळ ताळ ३७

शिरें प्रेम अंगीं फिरें रोमरोमीं । मला सांडूनी तें भरीं सर्व रामीं ॥
गुरू व्यापिला अंतरीं देह धामीं । मला मात्र नामू परी सर्व ब्रह्मीं ३८

न राहील अंतीं कुठें दुःख ताप । न राहील रत्नासि ही मोलमाप ॥
सुखीं ऐस, सेवी गुरूमायबाप । न राही तुझें नाम किंवा प्रताप ३९

बुधा तूं धरी ऐल कीं पैल तीर । बुडालेत संदेहिं पंडीत वीर ॥
गुरूपाय चुंबी, पदा ठेवि शीर । जगाचे खळाळीं धरी शांति धरी ४४०

---

४३० हरीवैरी–पाखांडी. ४३६ माळ–माळरान. ४३७ मेळताळ–यशोदा म्हणते इवलेसे बाळ आणि राधेचा आळ ! काय गोष्ट आहे.

जनाची कथा मात दुर्गंध वात । स्मरे तू रमानाथ, राही सुखांत ॥
जरी मानिसी बात, होईल घात । तुझे सारिखे फार झाले जगांत ४१

कधीं शालजोडींत झालो अमीर । कधीं कांबळ्यामाजिं झालो फकीर
कसें काय याची न काढूं जिकीर । रिकामी कहाणी पिकें तेथ शीर ४२

तुझी वक्र दृष्टी दिसे ज्या गुणानीं । बळीचेहि यज्ञावरी जाय पाणी ॥
ध्रुवा झाकिले तू कृपेच्या परानीं । बसे तो ऋषी मंडळाचे शिराणी ४३

बहू रम्य कैलास वैकुंठ पेठ । दयाळू धणी श्रीहरी सांब श्रेष्ठ ॥
मिळें तेथिलें येथ आम्हासि थेट । हरीची हराची गुरू पायिं भेट ४४

लयाचें जळें सिंचिलें बीजमूळ । वियोगानळीं चेतला आत्मशूळ ॥
जगीं हिंडतो मी जसी वाहटूळ । बघे कोठल्या जागिची माझि धूळ ४५

करी बंद दृष्टी, पडे चित्त दृष्टीं । तया दिव्य दृष्टीं दिसें अन्य सृष्टी ॥
जरी सृष्टिला देखसी दिव्य दृष्टीं । तरी सर्वदा तूज लाभेल तुष्टी ४६

जगावीण कांहीं तुला ते नसेंच । हताशा, जगा सोडिसी कीं तसेंच ॥
तुला वाटतें या जगीं मी वसेच । तुझें पूर्वजे कल्पिलें कीं असेंच ४७

मला शून्य सेजेहुनी जागवीलें । गुरू मंडळीं प्रेम तें पेय दीले ॥
प्रसादासि मी मागतो काय केले । मना मारुनी सुप्रसादा ठिवीले ४८

गुरूमाय प्रेमांत मी पोहताहे । सदा माउली या उरा माजिं राहे ॥
नको पाहु माझें करीं काय आहे । असे हस्त माझे शिरीं तोचि पाहे । ४९

बुधानीं न सेवा जगत्ताप मेवा । तयाचा परीणाम तूम्हासि ठावा ॥
वयाला न वाऱ्यांत नेऊन ठेवा । गुरूप्रेम मागूनि घ्या, तेचि सेवा ४५०

---

४४१ बात=थाप. ४४२ शीर—डोकें. ४४३ बळीचे—बळीराज्याचे यज्ञावर वामनानी पाणी फेरले. ध्रुवा—ध्रुव बालक. ४४४ पादयोः विष्णुस्तिष्ठतु हस्तयोः हरास्तिष्ठतु लघुन्यास. ४४८ पेय=पीण्यास. ४४९ करीं—अर्जित कर्म. माझा अधिकार पाहु नको मजवर जी गुरूची दया आहे ती पहा. ४५० जगत्ताप=जगाचा ताप.

नको काळजीनें करू आत्मघात । जमा ठेवण्या वित्त ते श्वेत पीत ॥
तुझा उष्ण हा श्वास होईल शीत । सख्या संग खा जे पुढे शत्रु खात ५१

मिळे पूर्णता भोळिया भाविकाला । लभे राज्य ते पायिच्या पाइकाला ॥
शिवा ताडि जो मन्मथू सायकाला । ठिवी माउली लोचनीं बालकाला ५२

जळे देह जो पैं चितेचें धुणीला । धरी मी हरी सावळे साजणीला ॥
तुम्ही आपुले आवरा जाचणीला । प्रसूतिचिया वेदना गर्भिणीला ५३

तुवा चारिला ज्या नरा बोध गोळा । तुझेवीण कोणा न जाणेचि भोळा
जया देसि बोला, न येतोसि डोळा । जया येसि डोळा, न देतोसि बोला ५४

मिळे ज्या गती आपुले डोळियाची । कळे त्या स्थिती राजया योगियाची
स्वयें शोधकू, सिंधु, मुक्त स्वयेंची । अरे शोध अर्था, बहु खोलि याची ५५

निरे संत ते एक राजे धरित्री । तयाना गुरू मंडळी मीच मंत्री ॥
बहू दाविती दंभ पाताळयंत्री । परी शिष्य माझेचि ते कूट तंत्री ५६

जधीं चाळिती या तनूचें सपाट । कहाणींत माझा करीतील वीट ॥
तिथें सांगण्या काय होईन धीट । करा मातिचो माउली पायि वीट ५७

विकासे कुमोदी सुधा साठवाया । मिटे पद्मिनी पोटिं भृंगा ठिवाया ॥
तुझे दारिं वाहाण ही होऊ काया । अहा धन्य कीं गौसणी होत पाया ५८

नव्हे चांगलें माझिये साधनासी । मना सारखें विश्व नोहे कुणासी ॥
गुरू माउले प्रेम देसी न देसी । तरी जाण कीं विश्व जायी लयासी ५९

‘मना रे’ किती स्वर्ग आहेत कोठे । ‘बुधारे न घेतीच ही मात मोठे’ ॥
‘मना लोक ते बोलती काय खोटे । ‘बुधा घोकणी हीच देईल तोटे’ ४६०

---

४५१ श्वेत पीत—चांदी सोनें. सख्या—मित्राबरोबर. ४५२ पाइकाला=सेवकाला. मन्मथ—मदन. सायक—बाण. ४५४ गोळा—लाडू. ४५५ शोधकू—पानबुडा. सिंधु—समुद्र. मुक्त—मोती. ४५७ वीट=निर्भत्सना. वीट—आपले विठामाउलीचे पायाखालची. ४५८ सुधा—चंद्रामृत. ४६० मनबुद्धि संवाद.

स्वता प्रेम खड्गें चिरीशील मान । प्रभूला तधीं होसि जीवा समान ॥
तुला पाहिजे प्रेम आणीक मान । दुराशाचि ही, पूर्ण नांहेल जाण ६१

न कापे चिदात्मा जगाच्या सुरीनें । कटेनाहि कर्मोचिया कातरीनें ॥
दया केलि जीवावरी श्रीहरीनें । जगा लोटिजें जात तैशा परीनें ६२

मला पेटवीले तुवा प्रेमजोतीं । सखे सौंगडे शेकती हे सभोतीं ॥
वरी स्नेह घालूनी फुंकीन प्रीती । तरी सौंगडे पूर्ण ते पेट घेती ६३

उनाधीक नोहें कधीं आयु अन्न । न व्हावे भल्या ओखटा पायिं खिन्न
जसें कर्म तैसा असे भोग भिन्न । वळाया स्वहस्तें असे काय मेण ६४

इथें रास केला हरी गोपिकानीं । हरी गोपिका रातल्या नृत्य गानीं ॥
भला भेटला कृष्ण सर्वां ठिकाणीं । वदे मी "पुरें हें," परी कोण मानी ६५

हरी देइ तू गोड गोपाळकाला । तुझा वेणु आनंदवी गोपिकाला ॥
असे वेळ तो फार कल्पांत काला । करू आम्हि ते न स्मरे अंतकाला ६६

तुझे पायिं या तापसांचे न चाले । स्वता ताप तापूनि बेजार झाले ॥
तनूबुद्धि सिद्धीमधे बद्ध झाले । नरा प्रेमळा देखुनी क्रुद्ध झाले ६७

बहू पाळिले पोसिले त्या घटाला । अता फोडुनी फेकिला तो हटाला
तरी लाथ मारू नका खापराला । अहो रुंड हे शोभवीते हराला ६८

ग्रहाचार हे फक्त शोकासि देती । इथें आणिती एक, दूजासि नेती ॥
इथें आमुची होत जी कां फजीती । जरी जाणती, कोणि जन्मा नयेती ६९

सखा तो तुला देतसे काय ताप । अरे एक चिंताचि जीवासि पाप ॥
सुखी ऐस तू, विश्व हे मायबाप । न चाले तुझा येथ युक्ति प्रताप ४७०

---

४६१ मान=गळा. मान=मान्यता. ४६३ स्नेह–सख्य, तेल. ४६४ उनाधीक–कमीजास्ती. ४६७ तनूबुद्धि–देहबुद्धी. ४७० सखा–हरिसखा.

फिरे विश्व, चाखी फळा सद्विचारा। सुखाचें पदीं बेसुनी सेवि सारा॥
असे तो प्रभू पुण्य पापासि न्यारा। इथें साधि आधीं गुरू अर्थ प्यारा ७१

अरे पोहरे अमृताचे खळाळीं। गुरूचें धनें आज मांडी दिवाळी॥
अरे प्रेम अग्नी, दिशा सर्व जाळी। जगज्जीवनू, आसु ढाळूनि पाळी॥ ७२

गुरूचे चितें देह हे भस्म झाले। अणूरेणु ही वेगळाले उडाले॥
अहा मृत्युचे वीष ही गोड झाले। अहं कीं इदं नाहि कल्पांत काले ७३

बुधा वारुनी ठेवि सारा पसारा। जपूनी उरीं राखि चिद्रत्नसारा॥
जगीं येथ शिश्नोदराचा पुकारा। घडी एक बैसूनि वाटे सुधारा ७४

किती काळ डोळयांत ही धूळ फुंकी। किती वेळ हा गुंतवी क्षार पंकी॥
मला नावडे राहणे या कलंकी। उरे त्या वयाचे वरी चूळ थुंकी ७५

अरे जाग पोरा करीरे विचार। भरी चित्त पात्रा मधें प्रेमसार॥
घडी ही वयाची मिळाली उधार। पुनः मागता कोण दे सावकार ७६

सदाचित्त चोरा सवे जेवु खासी। दवा काळसर्पाचिया ही विखासी
गुरू प्रेम मी खातसें हें सुखासी। न खासी, करू काय, तू माति खासी ७७

नसो नीच मूढासि, प्रीति प्रसंग। जरी ठेविसी होतसे चित्तभंग॥
वितंडे रडे ओरडे होत दंग। खळीला चढे, नासलो प्रेमरंग॥ ७८

तुला नेमिलेल्या न आधीक पावे। दुराशा तरी वाहसी कोठ पावे॥
मनीं एवढें दुःख हावे वहावे। परी शेवटी येथ जावे त्यजावे ७९

तुझे पायिं मी वीट, वैकुंठ काय। नसे आस, कैलास ती पेठ काय॥
प्रभातीं वदे मी गुरू माय "हाय"। तरी गूज तो वेद बोलेल काय ४८०

---

४७२ प्रेमाग्नीने एका हरी वाचून सर्व इतर खाक होते पण प्रेमाश्रूच जगाचे जीवन आहे. ४७३ अहं–मी. इदं=जग. ४७५ पंकी–चिखलांत. ४७७ चित्तचोर–हरिसखा. खासी–उत्तम प्रभूची पंगत. विखासी=विषाला. ४७९ हावे–इच्छा. ४८० हाय–या अंत:करण भेदक शब्दानें जे प्रेम व्यक्त होते ते वेदपाठांत नाहीं.

भरीरे हरी प्रेम शुद्धांतरंगीं । मुनीमोहना नाच ये प्रेमरंगीं ॥
जगाची वहाट्टळ जाईल वेगीं । भरीरे मला तू भरीरे निजांगीं ८१

हरी संग येसी जरी नीज सेजें । सदा देखसी स्वप्न हें जागणें जें ॥
तुला भाग आहे तनूला त्यजीजें । गुरू अमृताला तरी कां न पीजे ८२

जिथें मूर्ति तूझी तिला मी पुजीन । जरी वीष देसी तरी मी पियीन ॥
तुझें प्रीतिनें जाहलो सर्व हीन । बरी हीनता ती महा शक्तिहून ८३

गुरूरे तुला धुंडिता धुंद सारे । तुला वर्णिता मूक हे छंद सारे ॥
सदा बोधिसी कान हे बंद सारे । सदा तू समोरी परी अंध सारे ८४

अरे बुद्धिहीना कलाहीन काला । बरें देखसीना कधीं सज्जनाला ॥
धना देतसी हीजड्या कंजुषाला । सदा फेरिसी तोंड सत्पूरुषाला ८५

विषा पाजिसी तूं तरी तेंचि गोड । उरीं फ़ोड देसी तयाचेचि कोड ॥
करी घात ऐसी जगानीच खोड । तरी त्यासि मस्तींत भोगूनि सोड ८६

असें विश्व हें आंधळें आणि नंगें । गुरू भक्तिला तू भरी राग रंगें ॥
तुझी वेळ येई तरी घे न मागें । दवा मृत्यूची येथ घ्यावीच लागे ८७

जगीं आड वापी असे मानवाला । सहावी व्यथा, जीव द्यावा यमाला ॥
वसे शांत जो एक जीवंत मेला । सुखीं जो न गर्भातुनी सृष्टि आला ८८

न सुस्ती धरावी, क्रिया आचरावी । गुरू माउलीची दया ती वरावी
न निंदा स्मरावी, न पीडा करावी । असे भाकरी ती जना संग खावी ८९

जरी प्रेम कीजे गुरूसी करावें । हरी सावळ्या सुंदराला वरावें ॥
न पाल्हाळ फोलें चव्हाटा धरावें । रुचीनें रितीनें रहस्यीं झुरावें ४९०

---

४८४ छंद=वेद. ४८५ हीजड्या कंजुषाला—कृपण नपुंसकाला. ४८७ दवा—औषध. ४८८ सहावी—सहन करावी. गर्भगोळे उघमांत, कोणाही नेणें.

मृगांबू पिऊनी तुझी पुष्ट काया। भरीलेस भांडार शुक्ती रुपाया ॥
खपुष्पीं निदेलास तू जीवराया। तुला कोण वंध्या सुता होय जाया
९१

सखे शुद्ध निभ्रांत प्रेमासि प्यावें। तिथें मोहना श्रीगुरूलाचि ध्यावें ॥
वधीले गुरूनें इथें जीव शीवे। परी सांगती ते गुरूलाचि गावे ९२

मिया देखिला एक कुंभार गोरा। करी कर्दमीं लेकुरा लाथ मारा ॥
वदे मृत्तिका तेथ त्या सान पोरा। उगी रे उगी भाग्य हें थोर थोरा ॥
९३

कळी कांडणीतूनि सांभाळ डोयी। वयामाजिं साधूनि घे सर्व सोयी ॥
नवाही रसानीं करावी रसोयी। रसा सेवुनी सांडिजे साल कोयी ९४

मना साधुनी घे मनोराज्य हेतू। तुझा बाग गुल्‌जार लावूनि घे तू ॥
भवाचे वरी बांधि तू धर्म सेतू। न राहीन मी राहसी रे कसें तू ९५

जगोद्धार केलासि सारा शरीरे। वया शेवटीं मूळ आलें घरीं रे ॥
जना सांगसी तू धरावा हरी रे। हरी ये न हातीं, जरी ये धरी रे ९६

गड्या काळजी कां जगाची निकामी। फुका गुंतसी जीर्ण जीना लगामीं
असें भूत गेलें, दिसेना अगामी। नसें त्या जगाची व्यथा का रिकामी
९७

तुला पंडिता सत्य नाहीच ठावें। गुरू सेवका मत्सरें का झटावे ॥
गुरू बालकानीं हरीसी नटावें। तुवा कुंथकुंथूनि काथा कुटावें ९८

इथें भाव लावण्य तारुण्य गोड। भले बाल गोपाल आनंद मोड ॥
अरे विश्व हे नासके आणि कोड। खराबा खराला खराबीत सोड ९९

धरी शौर्य, संसार निःशेष झोडी। स्त्रिया पुत्रका सर्व संबंध तोडी ॥
जरी घेसि काडी, बने ती पहाडी। कसें बंधनी चालसी, बंध तोडी ५००

---

९२ जीव शीवे–गुरूनें जीव शीव नाहीसे करून गुरूरूपच उरविले. ९३ गोरा-कुंभारानें भजन भरात लेकरास तुडविले ही कथा श्रुत आहे. ४९४ नवरस भक्तिचे. रसोयी-स्वयंपाक. ४९७ जीन=खोगीर. भूत–व्यतीत.

वयोमान शे दोनशे कांहि लाव। तुला सोडणें भाग हा जीर्ण गाव॥
असो चोर कीं साव कीं रंक राव। इथें शेवटीं वीकतो एकभाव १

जरी तूज दुश्चित, जा भांग घोटी। पचेना जरी गुंड, घे एक लोटी॥
तुला हें नको तें नको चीड पोटीं। तरी माजऱ्या खाय जा गारगोटी
२

पुढें जात जो कोण या लांब वाटे। फिरूनी न येऊन आम्हासि भेटे॥
तुझें काम साधूनि घे सर्व नेटें। पुनः येथ येशील कां याचि थाट ३

उडूनी अकाशीं जगीं फेकि धूळ। धरी प्रेम शोधी गुरू सौख्य–मूळ॥
अरे योगयागू असे पोर खेळ। पुनः येथ याया असे काय वेळ ४

शिवा मी स्मशानीं तुसीं गूज बोले। तुझेवीण ते योग कीं याग फोले॥
अरे आदि अंता तुझे सर्व चाले। मला तारि की मारि हें मी न बोले ५

अधीं सुप्त होतो चिदानंद डोहीं। मला आणिलें तूं जगाचें प्रवाहीं॥
अतर्क्या तुझी येथ आज्ञा मला ही। खुलें नेत्र ठेवी दिसें तें न पाही ६

तुझें मानसीं हंस मी फार थाटें। भुई येउनी भक्षिले हे सराटे॥
मला आपुला इष्ट कोणी न भेटे। फिरूनी उडे देख आल्याचि वाटें ७

अरे सृष्टि ही कल्पनेची करूनी। किती वेळ चिंतेंत जासी मरूनी॥
तनू दे गुरूला, बसे तू झुरूनी। सुटे बाण तो काय येई फिरूनी ८

कुणा काळ संकेत दावीत नाही। हरी संपवी देवकी पूतना ही॥
अयुर्दाय हे दोनदा देत नाही। जळें पिंजरा पंचि ही येत नाहीं ९

उठी सावळ्या सुंदरा सुप्रभाती। शिदोरीसि घे वाजवी वेणु प्रीती॥
अरे झोपले जे तया नाहि शांती। अरे येथ झाले पुनः ते न येती ५१०

---

५०९ संकेत—गुप्त हेतु. पंचि=पक्षी.

मनाची गती सारखी धावचाल । दरे टेकडे भूमिका उंच खाल ॥
इथें पाउला पाउलीं दुःख हाल । चलावें पुनः चालता दीर्घकाल ११

गुरूच्या अम्ही लाडक्या मस्त पोरी । गुरूचे घरीं श्रीहरीसी दुजोरी ॥
अहंता समूळीं हरी नेत चोरी । सदा सावळा निर्विकल्पू समोरी १२

धरीला अम्ही हाचि सैराट पंथ । सदा पाठपूजा असे प्रेम ग्रंथ ॥
गळा कृष्णही पोत आहेव तंत । जिथें नाथ तेथेचि हा देह जात १३

तुला नोव्हती जाग्रती कीं सुषुती । मधें घेरिले मायिका पंचभूतीं ॥
तुला देति ते तूज पासूनि घेती । करीती पुनः नागवा पूर्व रीती १४

अखंडीत आयुष्य राहो सख्याला । मला मोहिलें आजि मोहू तुम्हाला
मला घालुनी जाय डोळयांत डोळा । भलाई करी, आणि नामा निराळा १५

गुलावा मुखीं घाम लावण्य माय । प्रकाशे रवी, प्रेम'सेवीत जाय ॥
नको तूं निजू झोपही अंतराय । अझूनी मला भूक ही हाय हाय १६

अधीं प्रेरिसी रे मला तूचि कामा । पुनः बोलसी काय केलें गुलामा ॥
नडे मी धरी सोडिच्या या लगामा । जळीं कुंभ ठेवू कसा मी रिकामा १७

बुधा निर्मळा संग कोठेहि जावें । कुढ्यासी शता योजने दूर व्हावें ॥
बुधें वीष देता सुखानेचि खावें । जरी येर पक्वान्न देई जपावें १८

तनू कोवळी चंद्रिका ही दयेची । मना मोहितो सावळा हा स्वयेची ॥
पुनः सांगतो देह पाहू नयेची । नसे जोड ही सांगण्याची क्रियेची १९

अवज्ञू नको प्रेमळा सिद्ध शुद्धा । विकल्पासि मारूनि घे सिद्धपादा ॥
नरा दांभिका मारूनी टाक वादा । अव्हेरू नको प्रेमळाच्या प्रसादा ५२०

---

५११ सारखी—सतत. ५१७ नडे—संकटांत पडतो.

पळे शूक डोयीं जळाची पराती । भया दाविती शस्त्रधारी वराती ॥
" पडें थेंब भूमी गदा ये शिरा ती " । तुझ्या प्रेम पंथीं मला हीच भीती २१

अम्ही बाहुलया श्रीगुरू सूत्रधारी । गुरूची परी माव ही सत्य सारी ॥
इथें नाचलो रंगलो प्रेमतारीं । परी निर्विकल्पाचिया पैलपारीं २२

अरे वासना श्वान हें होय कैसें । तया धावणें होय वायूचि जैसें ॥
सदा हाड चोखी, तया कृत्य ऐसें । अला शेवटीं दात खावूनि बैसें २३

दिलें दान तू सांडिला नाथ भामे । तुळीं साधिला रुक्मिणीनेंचि प्रेमें ॥
बनें काम प्रेमें न कीं नेमधर्में । विना प्रेम धर्मार्थकामें हमामे २४

पदांगुष्ट तूझें मुखीं लावियेलें । तिथें गूज ओठासि अंगुष्ट बोलें ॥
गुरू श्री मुकुंदें हि ऐसेंचि केलें । मुखीं संचलें तें नखीं रोमिं आलें २५

अखंडीत साम्राज्य आनंद गावा । दिगंदीन ये वाटवा प्रेमभावा ॥
रवी सोम श्रीमंगला बूध गावा । गुरू शुक्र सुस्थीर छंदे भजावा २६

गुरू सांगिजे वृत्तिचा काय फंदू । " सुला वृत्तिची काहणी लांब छंदू
"असे वृत्ति चित्सागरीं एक बिंदू । तळीं बिंदुच्या दाटला पूर्ण सिंधू" २७

तुझें दास्ययोगांत नाही निमालो । तुझे दारिं लोटांगणीं नाहि आलो ॥
दयेला तुझ्या पैं न विन्मूख झालो । असे एक ते दोन नाही म्हणालो २८

बुधा ऊघडी उच्च दृष्टी भल्याची । करें सावरी धूळ या तानुल्याची ॥
तया " सांग ठेवूं नको पांच पेंची । रवीची दिठी बुद्धि वाचस्पतीची " २९

यमूनें तटीं रास आला विलासा । हरीवीण हा जीव झाला नकोसा ॥
सखीनो सुखें वाळतंटांत बैसा । हरी भोगिजे आमुचा माल खासा ५३०

---

५२१ जनकानें शुकाचार्यास चित्ताची तन्मयता दाखविली. ५२४ भामे—हे सत्यभामे. हमामे—पोरखेळ. सत्यभामेनें दान देऊन हरविला ॥ रुक्मिणीनें एका तुलसिदलानें गिरिधर प्रभु तुळिला. ५२५ बालमुकुंदपदांगुष्ट चाखून भृगुचे चरणामृतांचा सुखानुभव घेतो. जें हरिनाम मुखांत ते रोमरोमांत. पांच पेंची—पंचभूतात्मक जाळ्यांत.

नदी वाहते, कुंज शोभे, तमारी । करू पारणे, वेणु घेई मुरारी ॥
वदें तोय हें येथ गर्जोनि भारी । अम्ही चाललो नाहि येणार बारी ३१

वया तासिती तास हे दीस राती । वरी मूठ माती पडे, वीस राती ॥
उदोअस्त शांतीचि चित्ती वरा ती । न राहू अम्ही, दीस राती वरातीं ३२

प्रभू जाणसी अंतरंगा समस्ता । सदा हीन दीना धरीतोसि हाता ॥
अनूताप देई, क्षमापूर्ण ताता । दया सिंधु तूं बुद्धिचा एक दाता ३३

पळे सूर्य, कोठोनि आरंभ याला । पसारा कुठें जातसे हा लयाला ॥
नये जाणता जाणिवेच्या मनाला । नये तोलिता कल्पनेच्या तुकाला ३४

कळाहीन काळासि दुर्बुद्धि जाडी । पुरे कालचक्रा, तुला हीच खोडी ॥
कुणाचें मनाला न आनंद जोडी । करी काडिला माडि माडीस काडी ३५

पुढें येत त्याची न वाहेच भीती । असें तें टिकेना, तरी काय खंती ॥
असें श्वास हा एक, घे त्यात शांती । जिवंतापणीं नाडिजे काय भूतीं ३६

महाभारती जेथ संग्राम मोठा । जगे दीन पक्षी गजाचेनि घंटा ॥
वदे पक्षि तो कौरवाचे किरीटा । कैसा थाट हा दावितो गर्व ताठा ३७

तुफानीं समुद्रें स्वसीमें वसावे । तरी मानवे दानवू काय व्हावे ॥
भल्याना बुरें नेक दुष्टा न ठावे । कृतीनें भलें ओखटें ओळखावे ३८

मना गाउनी नाच, बैसे सुखाला । हरी रूप ध्याता तुझा बोलबाला ॥
अरे अंति हें सर्व जाई लयाला । लयाचें अधीं सेवी प्रीतीपयाला ३९

अता आर्जवू मी तुला कोठ पावे । रडे मी अता नाथ माझ्याचि नावें ॥
मुखा राख लावी गळ्यामाजि दावें । जिणें नासिलें कर्म संसार गावें ५४०

---

५३१ तमारी—अज्ञान विनाशक. बारी—पाळी. ५३२ वरातीं—मिरवणूकीत. ५३४ जाडी—कालचक्र जड, अज्ञानी आहे. ५३६ भूतीं—गत वस्तु. ५४० राख—भस्मे दावें—जानवें.

विधीरे तुझी बुद्धि शक्ती अचाट । तुझें कौशला वर्णिती शास्त्र भाट ॥
करीसी असा चांगला तूचि माठ । पुनः मातिला मेळवीसी सपाट ४१

जरी आनया ये, हरी होत तान्हा । न ये तोंवरी कां कपाळासि हाणा
हरीला त्वरें नीज सेजेसि आणा । धरा सावरीते पहा हा बिछाना ४२

सखे राधिके शत्रुची भीति सोडी । सुखे अमृता पीत जा थोडि थोडी
तुझी माझि जोडी, त्यजी द्वैत वेडी । अहंकार वस्त्रा सखे शीघ्र फेडी
४३

नको काळजी जाणिवे नेणिवेची । गुरू पाउलीं सर्व जीवत्व वेची ॥
वसे आत्मनिष्ठा सतांचे सवेची । रुची मुक्त होउनि घे राणिवेची ४४

तुझा कृष्ण राधे कुणा मागतेसी । तुझा दर्द त्याला दवा तूचि खासी ॥
झुरे एकली बैसुनी तू मनासी । तुझा प्राणनाथू तुझ्या तो उशासी ४५

हरी गोवळ्या खोवळ्यानें शिवावे । दिवा रात गावे, सुखा नाचवावें ॥
जरी गोड उच्छिष्ट हातास फावे । तरी खाइजे, शीत ही ना ठिवावे ४६

मथूरे पथीं देखिली कूबरी ती । हरीच्या ठिवी हात खांद्यावरी ती ॥
पुसे मी 'नसे थेरडे लाज भीती' । वदे 'तूहि चुंबी, हरी देत प्रीती' ४७

मला आलि साठी वया, बुद्धि नाठी । नसे भूक पोटीं, परी बोट चाटी
असे कूबडी वाकडी अंग आठी । मला पांगळ्या दूबळ्या कृष्ण काठी
४८

श्रुती शास्त्र बोलें जयाचा पवाडा । तपी योगि ही घालिती पैज होडा
मना उन्मना देत आनंद मोडा । अगे सर्व सोडा, हरी प्रेम जोडा ४९

मला वेधिलें सावळ्या डोळसानें । म्हणे "मी अलो तूज बाहेर जाणें"
जळें मी जिवाच्या अशा ओढताणें । दिठी दृश्य हो, श्रुष्टि दृष्टींत बाणे
५५०

---

५४१ माठ—घागर. ५४२ अनया=राधेचा पती. प्रेमास विघ्न. ५४५ खासी—स्वतः तूच चांगली ५४७ कूबरी—कुब्जा. ५४८ कुब्जेचे वाक्य. ५५० हरी घरांत आला मला म्हणतो निघ बाहेर.

मला मारिसी कायरे मस्त काळा । तुझ्या शक्तिच्या पार मी तो निराळा
रडे तूं अता, घे मुठीं अंतराळा । चिरंजीवता येत माझे कपाळा ५१

बहू शोक त्या दूरदर्शी नराला । फुका चिंतितो जें न आलें घराला ॥
नको चिंतु कांहि स्वताला पराला । पुसेना विधी लेख जो खापराला
५२

जरी ऐकसी सांगतो मात खास । नको पांघरू दांभिका चर्पटास ॥
सदाचा हरी, सृष्टि हा एक श्वास । हरी सांडिता अंतरीजे सुखास ५३

असो नेक ते एक, हो कोट पाप । तुला अर्पिले श्रीगुरू सर्व आप ॥
फळाचे कशाला अता घेउ माप । तुझे पायिची धूळ मी चूपचाप ५४

कुलाला घरीं जात मी काल रातीं । हजारो घडे मूक ही बोलताती ॥
वदू लागले सर्व ही एक सातीं । घडी कोण, दे कोण, घे कोण, माती
५५

सुखी ऐस रे एक दो तीन सांस । गुरू सावळ्याच्या वसे आसपास ॥
जितावी अखेरी, असी तूज आस । तरी होय तू पूर्ण, कीं पूर्णदास ५६

अता मी न मानीन शास्त्र स्मृतीला । दिघे दूरदर्शीपणा दुर्गतीला ॥
अहोरात्र जागेन सत्संगतीला । बहू वेळ आहे सुषुप्तिस्थितीला ५७

सदा साहजीं सेविजा रे सुखाला । तुला सूख कीं दुःख येई स्वकाला ॥
नको चिंतु राहू शनी मंगळाला । जयाची गती ती कळेना तयाला ५८

विवर्ते जगाचा कळेना विचार । परीणाम आरंभ नेणो अधार ॥
नवा वार आला करी थाट फार । नये वारला वार तो वारवार ५९

चिरंजीव संता चिरंजीव व्हावे । गुरूमाउलीच्या पयासी पियावें ॥
जिवाचें सुधासार प्रेमीं नहावें । गुरूचें उरीं पाळण्या पैं निजावे ५६०

---

५५२ लेख–लिखित. खापराला–कपाळाला. ५५३ चर्पट=फाटके कापड. ५५४ नेक–चांगले. ५५६ जितावी=जिंकावी. सांस–श्वास. ५५७ सुषुप्तिस्थिति=निद्रेची चिरकाल अवस्था, मरण. ५५९ परिचाम वाद आरंवाद, निराधारवाद, आहेत. वार=दिवस. वारला–गेला, गुजरला.

सखे मृत्युवातीं विझें प्राणवाती । तुझे स्नेह योगें जळो देह पंती ॥
कुलाला घडीसी जरी माझि माती । विकी तो घडा गोपिकेच्याचि हातीं ६१

तया वाल्मिका वाळवे तोडिताती । शिरा नाडिया हाड मज्जेसि खाती
परी वाल्मिकें केलि नाहीच खंती । इथें भोगिता होइजे शुद्ध अंतीं ६२

उरीं प्रेम गंगा, स्वरूपात जागा । हरी पाझरे निर्मला अंतरंगा ॥
जडा वासनानो न अंगास लागा । निरें प्रेम घ्यावे, मिळे कां महागा ६३

तया मानवा देखुनी विश्व लाजें । जयाचें मना दुःख संकोच भाजें ॥
हरी निर्मळ गाइजे आळवीजे । पुढें ही तनू होय काळासि खाजें ६४

उखा पातली, धूतली मोहराती । अनीरुद्ध कां स्तब्ध जागें प्रभातीं ॥
अरे धीर वीरा, धरी प्रीति हाती । तुला ती वघे, लाजसी काय भीती ६५

हरी शुद्ध आत्मा रमानोवरा हो । इथें पातला मृत्तिकेच्या घरा हो ॥
अता आदरातिथ्य प्रेमें करा हो । पुढें जाय बोले, "दया लोभ राहो" ६६

नवें गाडगें तें नवें वस्त्र शाटी । अहेरा ठिवी सिद्ध हा काळ चाटी ॥
पहा रे सदा काळ हा जीव कोटी । जळातूनि काढूनि मातींत लोटीं ६७

सखा काळ नोहे, अता त्यासि भांडा । आम्हा नाम नाहीं, अता रूप सांडा
गुरूसिद्ध हा अमृताचाचि हांडा । न सेवी तयाचें शिरीं हाचि धोंडा ६८

कळेना कली तूज कीं मोरि गंगा । न देसी मला एकही चिंधि अंगा ॥
तुला आवडे फूगडी आणि पिंगा । दळी रे दळ्या, घालितो मीहि धिंगा ६९

जगा रे किती तू मला त्रास देसी । नको दुःख देवू हरीचे प्रजेसी ॥
अरे वासना दुःख मी नित्य सोसी । कसा मीठ तू त्यावरी घासितोसी ५७०

---

५६१ मृत्युवातीं—मृत्यूचे वाऱ्यानें. वाती=दिव्याची वात. स्नेह=तेल भक्ती पंती—मातीचा दिवा. ५६२ तपाने पापक्षय. ५६५ उखा—बाणासुराची कन्या, पक्षीं प्रबोध पहाट. अनिरुद्ध श्रीकृष्णाचा नातू—पक्षी आत्मा. अनिरुद्धा उखेचे प्रेमानें पाणि ग्रहण कर. ५६७ चाटी—व्यापारी. अहेर—मृताला शेवटी करावयाचा तो. ५६८ सखा—मित्र. ५६९ दळ्या—नपुंसका.

न भीसी जरी कुंभिपाक प्रसंगा । अनूताप गंगा न होसी शुभांगा ॥
वयोदीप जेव्हां विझे वायु संगा । तुला भूमि देणार नाहीच जागा ७१

असें ज्ञान प्राचीन मी वेदराया । दिसें तें असें सर्व माझीच माया ॥
त्रिकालीं दिशा व्यापिती माझी काया ।असे वस्तु मी,विश्व माझीच छाया ७२

अरे कोठ पैं हा जगाचा खळाळ । त्वरें ऊठ, साधी सुखाचा सुकाळ ॥
हरी फूलला देख रे रान माळ । भरी प्रेम चित्तांत, टाकी विटाळ ७३

जगाची कहाणी त्यजी सर्व गाथा । तपोयोग सांडूनि घे प्रेमपंथा ॥
गुरू सेवि रे, टाक संसार चोथा । चढें शूर तें प्रेम पूर्णत्व माथा ७४

अरे विश्व हें कल्पना भासमात्र । न बाणे जया तो गुरूचा न पुत्र ॥
सुखी बैस, ये सेवि प्रीती पवित्र । अरे सांड हा भास मिथ्या विचित्र ७५

मना वायुचा अश्व तेथें न वाही । मला मोहिलें नावरें चित्त कांहीं ॥
परी देखणा दृष्टिला येत नाही । हरी नेत्र तो, कोण नेत्रासि पाही ७६

धरी भक्ति, कामा कृती ये न युक्ती । दया श्रीहरीची, मिळे जेथ प्रीती ॥
अरे केर ते, जे न प्रेमा वरीती । घरीं आणि घाटीं खराची फजीती ७७

फुलाहूनि या कोवळया सावळयाला । न सोडीन गोवीन मी गोवळयाला
कसें टाकिजें आवळया जावळयाला । जरी भक्ष्य झाली तनू कावळयाला ७८

अरे याज्ञिका, तें तुझें याग जाळी ' पुरे तार्तिका, बैसली कानठाळी ॥
धरी प्रेम, वस्तू असे का निराळी । किती संकटा एक ते प्रेम टाळी ७९

जिथें गोपिका श्रीहरी लागि गाती । तिथें सारसे नाचती हंस पंक्ती ॥
जरी गायना वीण होईल भक्ती । तरी सावळा घेतका वेणु हाती ५८०

---

५७१ तुझे वाईट गुणाने पृथ्वी जागा देणार नाहीं. ५७६ देखणा=सुंदर पक्षी द्रष्टा, साक्षी. ५७७ धोबीका गद्धा घरका न घाटका. ५८० भक्तीस भजन अवश्य आहे.

खरें तत्व येई न वादास ठाया। मिळेना जरी द्रव्य देसी लुटाया॥
अरे जन्म हा, आठवी नाथ पाया। तरी देखसी स्वानुभूती उपाया ८१

न ऐकू कथा दुर्गवासी यतीची। नव्हें हानि प्रेमें मती सद्गतीची॥
मनोल्लास शक्ती धृतीची स्मृतीची। धरू भक्ति संतांचिया पद्धतीची ८२

कुणी स्वर्ग नर्का न गेला इथून। कुणीही नसे पातला कीं तिथून॥
गुरू ब्रम्ह हें सार घ्यावें मथून। वृथा येर, ज्या शब्द जाती कथून ८३

अल्या धर्मयात्रे मधें दोन गंगा। दिसे एक, दूजी मनीं पाप भंगा॥
अरे जाय यात्रेसि संतांतरंगा। लभे कोट गंगा जरी चित्त चंगा ८४

गुरू पूर्ण चैतन्य, घे पूर्ण सेवा। अता शब्द रत्ना उरा माजि ठेवा॥
असें काय आश्चर्य याहूनि देवा। सदा मी भुकेला, उरीं प्रेम मेवा ५८५

वयो मुद्दला वेचितो हेकडीचा। कलीसी करी व्याप वाढी दिडीचा
उरासी सरंजाम साता पिढीचा। दिला नाहि काळे विसावा घडीचा ८६

नको एक ही कल्पना ती रिकामी। भरी रे भरी तू उरा रामनामीं॥
हरी संग खेळं सुखें आत्मधामीं। श्रिये संग का मात्रगामी हरामी ८७

मनोवारु हा वाहतो प्रेम भारा। क्रिये लागि संपादितो हाचि सारा॥
मनावीण प्रेमा असे कोण थारा। विना प्रीति चित्ता नसें अन्य चारा ८८

मला कायसी डाचणी या खळाची। बरी संपली रात्र ही गोंधळाची॥
किती मी पिवू पेज हाळाहळाची। हरीनें दिली संगती प्रेमळाची ८९

अम्ही एक चिंतू विधी अन्यथा रे। तरी आमुचें चिंतनें ती व्यथा रे॥
प्रभू चिंतितो ते जरी सत्य सारे। अम्ही चिंतिले होतसे ते वृथा रे ५९०

---

५८४ मन चंगा तो काटवटमे गंगा. ५८६ हेकडीचा=हेकडबुद्धीचा. सरंजाम-सामान. ५८७ श्री=लक्ष्मी माताश्री आहे. ५८८ मनोवारु=मनरूपी अश्व. ५८९ हाळाहळ—हळहळ, विष.

प्रभू विश्वकर्ता दयासिंधु भर्ता । दयेचा दुकाळ नसे त्या समर्था ॥
अहंकार मी वाहता पापकर्ता । क्षमापील जै होत मी नष्टवार्ता ९१

मिथ्या पातके लिंपिली सर्व भूमी । दया मेघ तूं सर्व धूशील स्वामी ॥
जरी दीन होताचि घेतोसि हामी । अतां दीन याहून होऊं कसा मी

आम्ही धावलो कल्पना पैं सवार । परी चोरवाडीत केलें विहार ॥
तुला कोवि देखो दिसेनाचि दार । हरे नाथ तूं प्रेमळाचा उदार ९३

प्रभू रे तुवा तिंबिली माझि माती । गुणाचा पिळा तूं वळीलासि चाती
भलें कीं बुरें होतसे दीस राती । तुवा नेमिलें, माझिये काय हाती ९४

सखे फूगडी खेळतो देख मी तूं । दिसे दोन हेतू परि एक तंतू ॥
सदा एक बिंदूवरी विश्व वर्तू । परि अंति आम्ही तुम्ही एक होतूं ५९५

असें विश्व हें चित्रदीप प्रभा हें । विचित्राकृती चित्र हें भासताहे ॥
रवी दीप हे विश्व कंदील आहे । आम्ही नाचतो चित्रसे. नाथ पाहे
९६

जगीं स्नेह सौजन्य, नेणो विखार । असे कोण वाहील जो प्रेमभार ॥
जगा राहिजे दूर, हा सद्विचार । दुरूनि नमस्कार, आभार फार ९७

मला बोलती भ्रष्ट, मी होय आहे । मला बोलती श्रेष्ठ, मी होय आहे॥
अरे रंग बाहेर कां देखताहे । गुरू अंतरीं सार राहेचि राहे ९८

हरीवीण मी या निमेषा न भंगीं । आतां रात्र ही रासरात्रीच रंगीं ॥
हरी नाम ओठीं हरी रूप अंगीं । धरीलें न सोडीन कल्प प्रसंगीं ९९

न जाईन मी वासनेच्या घराला । न वासीन तोंडा नरा पामराला ॥
असे मी क्रिया धर्म पंथा निराळा । कसा काय माहीत ते श्रीवराला
६००

---

५९१ नष्टवार्ता=मला कोणी स्मरणार नाही तेव्हां हरी मजवर दया करील. ५९२ हामी–पतकारा. तेषामहंसमुद्धर्ता मृत्युसंसार सागरात ५९४ गुणाचा–दोराचा, त्रिगुणाचा. ५९५ फूगडी संपली म्हणजे सख्या भेटतात. ५९६नाथ–साक्षी प्रभु.

स्वता मी जरी कां कधींही रहातो। तरी घोर पंकांत मी कां नहातो ॥
असें कीं नसे मी प्रभूचेचि हेतो । स्वता मी कुठें कोण कैं काय होतो १

वदे मी "हरी संग कोठें न जाई" । "हरी जार मी जारिणी काय होई"
तरी "आण घे" बोलती सासुबाई । वदे मी "घरीं आजि आणूनि घेई" २

स्तुती वेद-जिव्हेसि माझीच वाहे । मनोबुद्धिच्या डोळिया मीच पाहे
जगत्कुंडलाकार होवूनि राहे । असें त्यांत चिद्रत्न तें मीच आहे ३

तुझें प्रीतिनें संकटें येत मोठीं । परी सोडिता होय जन्मासि खोटी ॥
जरी काळ घालील आयुष्य पोटीं । तुझा जाच सोसीन मी कल्प-कोटी ४

निमेषार्ध जैं चित्त हें सूख पावे । तरी दुःख सिंधूत घे हेलकावे ॥
कुणाची जरी वाटते खीर खावे । जिवाच्या स्वता पापडाला तळावे ५

मृगांबू मधें केवि पोसेल ऊख । जरी सूख संसार दे, तेंचि दुःख ॥
असे वीख संसार, प्रीती पियूख । पियूखास घेता करी काय वीख ६

जिवीं नाथ गावा, विसावा नसावा । सदा कानिं पावा स्वानें वसावा ॥
कुलाला घडा जैं तनूचा घडावा । हरी-पादगंगे तुडुंबी भरावा ७

भवा फूगडी फू, मला भोंड आली । नको आवळू तू, मला सोड खाली ॥
जरी आवडे तूजला मूढ चाली । शहाणी तरी मी नसे फार झाली ८

पतीताचिया माळिके माजि मेरू । असे भ्रष्ट तो कोण आम्हासि थोरू
हरी सावळा रास रात्रींत चोरू । अम्हीं जीव वेचू, तया अंगिकारू ९

कशी सावळ्यावीण जीवंत राहू । अतां देह-भारासि मी केवि साहू ॥
अशी ती कधीं वेळ येईल पाहू । वदे नाथ 'घे घे' वदे मीच 'हूहू' ६१०

---

६०१ हेतो-हेतूनें. कैं=केव्हां. ६०२ गोपीवाक्य. आण घे-शपथ घे, घरीं आण. पुढल्या फळाची आशा. ६०५ खीर खावी-लाभ घ्यावा. ६०६ ऊख-ऊस. ६०८ जगासी फू-गडी फू. ६०९ गोपीवाक्य. ६१० राधावाक्य हूहूं=पुरे.

लवाडा जगासी करावी लबाडी । मला चोरट्याच्या चहाडींत गोडी ॥
तुझ्या सांगता राधिके 'सोड खोडी' । नसोडी हरी, सोडि जैं मी न सोडी
६११

आहे नाहि येताति माझे घराला । वसे मीच कालाचिया अंतराला ॥
परी जाणिवेचा मला त्रास आला । हरी जाणिवे नेणिवे पार झाला
६१२

पुनः मी न संसार चिंता वहातो । हरीश्रीगुरू भावसाराचि घेतो ॥
हरी सार, संसार माझा अरी तो । अम्ही आपुले शत्रुचे सार पीतो
६१३

अम्ही सांडुनी ते अहंकार खूळ । अणूसी अणू भक्षिला पै खगोल ॥
तनू पंक तो धूतला जी समूळ । धुळीचे अम्ही, श्रीगुरूपाद–धूळ ६१४

अरे पंडिता मी तुझेहून वीर । जरी बावळा, जाणतो फार दूर ॥
जना पीडिसी तू, छळी मी हुजूर । करी न्याय आता, असे कोण शूर
६१५

न भोगी न त्यागी, सदा मी विलासी । न धर्मी अधर्मी, सदा मी उदासी
न गोरा न काळा अशा शामलासी । न सोडी न भोगी, सदा मी उपासी
६१६

अरे व्यर्थ मी भूसकूटीं उडालो । इथें काळ–चक्कीत मी पीठ झालो ॥
निमेषामधें यथ लाजूनि मेलो । न संपे अशा, मीच संपूनि गेलो ६१७

अतां सोवळें सर्व फाटूनि गेलें । गुरुद्वार धूळींत नग्नें नहालें ॥
अम्हाला इथें श्रीगुरूनाथ लीलें । मिळे आयु जें जन्म जन्मांत गेलें ॥
६१८

अम्ही मंदिरी या महाराज आलो । परी नाहि पूजेचिया काज आलो
इथूनी आम्ही बूट चोरूनि गेलो । अतां फाटला तो, पुन्हां आज आला
६१९

दिसा जेविलो आज एकादशीस । न मी आग्रहें मोडिला जी उपास ॥
उपासी बहू पावलो मी श्रमास । मला जाहला पारण्याचाचि भास
६२०

---

६११ राधावाक्य. चोरटा–कृष्ण. चहाडी=कथा. श्रीहरीच्या चहाड्या सांगताना हृदयस्थ प्रेम झांकण्याची लबाडी राधा करिते. ६१३ संसार शत्रु त्याचे सार हरी आम्ही सेवितो. ६१४ खगोल=आकाश, ब्रम्हांड. ६१५ हुजूर=प्रभु. ६१७ अशा–आशा. चक्की–जातें. काळचक्की–काळचक्र. ६२० दिसा–दिवसा, उघड उघड.

मिया धुंडिलें विश्वरूपा अमूप । न बैसे दिसा रातिही नाहि झोप ॥
गुरु राजसे दाविले नीजरूप । तधीं पासूनी मीच कीं विश्वरूप २१

जगाची स्थिती एक आशाचि आशा । जगीं यत्न तो जातसे कीं विनाशा
दिस तोय जें कल्पनेच्या विभासा । पिपासाचि ती पातलीसे विलासा
२२

तनूच्या बहूकाळ फेरींत आलो । स्वभाग्याहुनी नीच गारींत झालो ॥
जसे चिंतितो तेचि येई न चालो । पुरें चिंतण्या चालण्या पायिं धालो
२३

मिया त्यागिली नाहि संपत्ती मोठी । त्यजूं काम, वेणूध्वनी येत पोटीं ॥
क्रियाचार लौकीक वार्ताहि खोटी । पळाल्या हरीनाम येताचि ओठीं
२४

इथें राहण्या काळ नाही अमूक । सख्याविण जीणें असे थोर चूक ॥
जुनी ती असो कीं नवी नांदणूक । नसे मी, जुनें कां नवे तें लटीक २५

अम्ही शुद्ध सोनें, इथें डाक झालो । अम्ही राजहंसू, जगीं काक झालो
सुधासार पै, ओक नाहाक झालो । अरे पूर्ण चैतन्य, पै खाक झालो
२६

मरे मी जधीं त्या यमाच्या कळीनें । जधीं वासना ऊपटीजे मुळीनें ॥
गुरू-उंबरा सारखा या धुळीनें । जिता होत मी संतपायातळीनें २७

प्रभूरे जरी मी बहू पाप केलें । तरी मत्तनू जीविता ताप केलें ॥
तुझें या दयेचें न मीं माप केलें । म्हणूनी पुनः पाप आपाप केलें २८

जरी प्रीत गोपासि शास्त्रा विरुद्ध । परी त्याचि योगें तुटे कर्मबंध ॥
अरे प्रीतिचे चार हे स्वानुबंध । अहं, श्रीहरी, पायिं, वेचे सबंध ॥ २९

अला प्राण मागील शोकें मुठींत । दुभंगीत बुद्धी उद्याचे तुटींत ॥
वृथा वासना आयुषाला लुटीत । असे शोक दुर्भाग्य माझे वटींत ६३०

---

६२२ विभास—विपरीत भास. मृगजळ केवळ मृगाचे तहानेचे रूप तद्वत् जग आप आपले वासनेचे चित्र. ६२५ अमूक=निश्चित. मीच नाहीं तर जुनें किंवा नवे व्यर्थ. ६२६ नाहाक—व्यर्थ. ६२७ कळीनें—कपटानें. संत चरण रजानें दिव्य काया होईल. ६२८ आपाप—सहज. ६२९ गोप=श्रीकृष्ण. ६३० तुटी—हानि. वटींत=पदरांत.

शिशूचा घडी थोर पंडीत झाला । घडी एक खंडीत गर्वेचि धाला ॥
तया आइका लाभ हातात आला । धूळीतून आला, तुफानांत गेला ३१

सख्या ये त्वरे, मात का वायद्याची । तुझ्यासी पुरे ही घडी फायद्याची
इथूनी अम्ही जात आहो उद्याची । हडे घेत तैं सैर साता नद्याची ३२

सख्या काळिया काळ येऊनि चावे । अम्ही एकमेकांत प्रेमें रहावें ॥
यमाचा सखा येथ पाठीसि धावे । न पाणी पियालाहि तो वेळ फावे
३३

बहू जाति राती, न हालेचि पाती । त्वरें काळियाकाळ चेपूत लाती ॥
हरी ऊठ गावू, उजेडे प्रभाती । उजेडे, परी प्राण राही न हाती ३४

वियोगें बहू सेविलें वीष दुःख । तुझी चंद्रिका या चकोरासि सूख ॥
उरीं संचले शुद्ध प्रीती पियूख । प्रभूरे नको कालवू त्यात वीख ३५

चव्हाट्यांत मी काय जी नीत जावे । फटिंगासवें काय बाता बकावे ॥
प्रभु अंतरीची स्थिती तूज ठावे । करी साह्य राजा, तुलाचि स्तवावे
३६

तुझे प्रीतिनें गर्व निःशेष जाई । तुझें चिंतनें बंध पावे खुलाई ॥
फली सेविता जैं तुझी हा मिठाई । तरी लागता मानवाचेचि पायीं ३७

सदा सूख आम्हा, नये दुःख लक्षा । न्यहारी पुरे, कोण सांजेसि रक्षा ॥
गुरू षड्से वाढितो सिद्ध भक्षा । तरी मागिजे काय कारान्न भिक्षा
३८

तुझें मंदिरी दीन होवोनि राहू । पतंगापरी त्वत्स्वरूपांत नाहू ॥
तुझे प्रेम गंगेत हे नाथ पोहू । समाधीसुखा देखता तूज लाहू ३९

सदा या जगानें दिली अंगमोडी । मला वैर ते, माझिया नीच खोडी ॥
अविद्याचि ती,जी विकल्पा न तोडी।कुबुद्धीचि ती,जी न शांतीसि जोडी
६४०

---

६३२ वायदा–मुदतीचा करार. ६३३ काळिया–सर्प–यमाचा सखा मृत्यु. ६३४ पाती–पापणी. उजेडे–उमजेल. ६३६ नीत–नित्य. ६३७ खुलाई=सुटका ६३८ सांज–संध्याकाळ. ६४० खोडी–दुर्वतन.

मला वासना ही सदा जिंकिताहे। सदा आपुल्या केलियालाचि साहे
जरी तूं क्षमीशील, तूझी दया हे। तुवा देखिलें पाप, ही लाज राहे ४१

तिथी वार संकल्प हा कोठ पावे। विधी कीटका सारखेची मरावे ॥
अता प्रीतिचें हें नरोटें भरावें। तनू गाडगें हें उकिर्डा पडावें ४२

मला पंडिता निंदिसी कोठ पावे। मिया भ्रष्ट उन्मत्त ऐसे असावे ॥
तुवा दांभिका गोमुखीं पैं बसावे। गुरू संग मी पूर्ण-कामें हसावे ४३

धरित्री वरी लोक सारे निदेले। धरे पोटिं ही बीज मोडा न आलें ॥
चिदाकाशिं मी देखता याचि काले। तिथें दीसती जीव येणार गेलें ॥
४४

नये मानवी देह हा बार बार। न लाभेल सत्संग हा प्रेमसार ॥
दिला श्वास हा, नाथजीचा अभार। परी भीति, हा श्वास जाई न पार
४५

सदा मत्त नामीं, अम्हा हीच रीती। नको मात कान्हा विना दूसरी तीं
अरे उध्दवा, सांगसी योग नीती। अम्हा चुंबिलें त्या हरीनेंचि प्रीती
४६

दयेसी तुझे पातका काय थोरी। अम्हा पांथिकाची हरी तू शिदोरी ॥
दयेने तुझ्या होत मी स्वच्छ गोरी। न भीईन जाण्या यमाचे समोरी
४७

सखी खेळिजे कान्हया संग होरी। अम्ही गात नाचू तयाचें समोरीं ॥
तया कोमलांगा करू शीरजोरी। धरू आवळोनी उरीं या कठोरीं ४८

असे जारिणी मी पराच्या घरासी। रते मी हरी संग वेश्या मिरासी
तुम्हा कल्पना येर शेजारियासी। अशी कीं तसी, मी हरीचीच खासीं
४९

हरी रंगणीं नाचरे विश्वभूपा। बसे लोचनीं, नाशि रे नामरूपा ॥
रचू रास या वाळवंटी अमूपा। पडो जा कुसंसार तो अंधकूपा ६५०

---

६४२ संकल्प=अद्य ब्राम्हणः-द्वितीय परार्धे श्रीश्वेतवाराहकल्पे इत्यादि अमुककर्म महंकरिष्ये. विधी-ब्रम्हदेव. ६४४ धाता यथा पूर्वमकल्पयत्. ६४६ गोपी उद्धवास म्हणतात. ६४८ होरी-होळी. ६४९ पराच्या-परक्याचा, परात्परांच्या. मिराशी-गाणारीण धंदेवाली. येर=भलत्या. खासी-आवडती.

धरा साजणी चोरट्याचे कराला । वळें त्यासि बांधूनि ठेवा उराला ॥
अतां पातली मात ऐशा थराला । कळालेचि हें सासऱ्याला दिराला ५१

गड्या तूजला सांगतो एक मात । खरा मानवाचा मुळीचा वृतांत ॥
धुळी लिंपिला शोक दुःखा वहात । चरे अल्पसा आणि झाडीत लात ५२

अम्ही होय हो, रास नाचूनि गातो । यमूना मिषें श्रीहरीला पाहातो ॥
तया देखता नग्न आम्ही नहातो । पुनः त्या चहाड्या यशोदे कथीतो ५३

वदे पद्मिनी "राधिका मीच प्यारी । मला भूलला कृष्ण सारंगधारी" ॥
पुसे मी, "तरी कोण तुझा मुरारी" । वदे "भोवरा, देख बंसी-बिहारी" ५४

तुझे कोवळे कुंतला सावरिलें । नको राग मानू, तुला मी धरीलें ॥
असें चित्त त्या रोमरोमीं पुरीलें । मिया आपुलें चित्त तें आवरीलें ५५

नसे मी जधीं तैं वसे मी स्वरूपी । जसा कां चढे लेवि ये अंधकूपीं ॥
अहा दाविले कौतुका माय बापी । असे मस्त मी तेवढा चित्स्वरूपी ५६

प्रभातीं सखी घ्या शिरीं घागरीला । यमूनापथीं देखिजे त्या हरीला ॥
तयाचे पदीं कुंभ फोडू भरीला । म्हणू "आग लागो तुझ्या बासरीला" ५७

हरीचे दिठीसी दिठी लावु पाती । नलक्षू पथीं लोक जे येत जाती ॥
उरग्रंथि ही आवळी व्यर्थ छाती । सुखी होइजे अर्पुनी नाथ हातीं ५८

कुलाला घरीं पाहण्या जाय मौजा । मला वाटलें मीहि तो एक कूजा ॥
पुढे कर्दमू होत हा देह माझा । भरू हा कुजा प्रीतिनें स्वामिराजा ५९

पुढे मृत्यु सामोर लागे पळावे । पिकें जेधवा पान, लागे गळावे ॥
जगा चाळुनी मोदकाला तळावे । पुढें आपुलें पीठ लागे मळावे ६६०

---

६५१ गोपीवाक्य. चोरटा=कृष्ण. उर-हृदय. ६५२ खरा मानवाचा बराबर वृत्तांत. ६५४ बंसी बिहारी=मुरलीधर. ६५८ उरग्रंथि=हृदयग्रंथि चिदचिद्ग्रंथि. ६५९ कर्दम-चिखल.

मला-वासना सासुचा जाच भारी । मुखे ही हरीनाम घेण्यासि चोरी
जगाचे बहू रावले कारभारी । परी मी अझूनी असे अज्ञ पोरी ६१

धराल तुवा, काव जावू सुटाना । कसे बोलुरे, बोल गेला अटोनी ॥
निघे जीव या आश्रुवाटे तुटोनी । उरीं राखिते तूज नेत्रा मिटोनी ६२

न येरा पुढें शब्द काढीन हाय । तुझें दुःख कोणासि सांगीन काय ॥
तुझेवीण तो शब्द कोणासि जाय । तरी तोचि माझे जिवासी अपाय ६३

तुला सोडु ऐसा नसे मी उदार । असो दर्द तूझा, नको ऊपचार ॥
तुझे दारिची धूळ इंद्रासि पार । त्रिलोकीं तुझा एकही वाल सार ६४

वसंतीं करू हौस आता मनाची । अम्हाला नसे लाज भीती जनाची
गुलालें भरू मूर्ति या मोहनाची । करू येथ रंगीत शालू वनाची ६५

अरी बोलती मीं असे ज्ञानयोगी । हरी, काय मी होय ऐसी अभागी
तुझ्या चिंतनें ऊर झालें दुभंगी । सख्या प्राणनाथा तुझ्या मीच जोगी ६६

रते मी हरीसी, परी नाहि दंगा । न ढुंकूनि पाहीन कोणासि अंगा ॥
असे हेतू हा माझिया अंतरंगा । कधीही न घालू अहंकार पिंगा ६७

जगानें न होई मला अंतराय । शिरीं मृत्युच्या ठेविते देख पाय ॥
मरावे निके, तेथ भीतीच काय । जिणें ओखटें, भीतसे त्यासि हाय ६८

जरी तेज होवोनि आकाश व्यापू । जरी आप होवोनि पापासि लोपू
अम्ही धूळ होवोनि श्रीपाद लिंपू । धुळीलाचि पायासि होतो मिलापू ६९

हरी वाजवी वेणु रे, दुःख भारी । मधूर ध्वनी चित्त संताप वारी ॥
मला भेट दे, देख दूर्वा मुरारी । उद्या होत मी शीघ्र दूर्वाचि सारी ६७०

---

६६२ गोपीवाक्य. श्रीहरिप्रत ६६३ प्रेम इतकें गुप्त असावे. ६६६ गोपीवाक्य. अरी-शत्रु ज्ञान-योगी=ज्ञानी, तत्वज्ञ. ६६८ निकें-खरें. ६६९ मिलाप-संयोग.

वड्रे मोगरा वित्त फेकीत आलो । हरी-दत्त वित्तासि वेचूनि घालो ॥
सुखें हासुनी खेळुनी पैं निमालो । हरीचे गळा शेवटीं माळ झालो ७१

वदे गेंद "मी येतसे काय कैसा । जणू एक वेडाचि आला विलासा" ॥
"मला देखुनीया तुह्मी सर्व हासा । उरा चीरिले मी प्रियाचे पिपासा" ७२

दिसें तें हरीचेचि भासांत भासें । हरीनें अम्हा दाविलें हेंचि रासें ॥
बघें चित्त डोळा हरीचें प्रकाशें । तमोज्ञान तो सर्व नेला विनाशे ७३

तुला वाहतो देइ ओ तूं अम्हास । तुझा शब्द झेलू अम्ही दासदास ॥
हरी साहसी आमुचा फार त्रास । तुझे साउली खेळतो आसपास ७४

जगीं धर्मशाळेत आलोत आम्ही । परी शीघ्र जाऊन सोडू रिकामी ॥
त्रिलोकीं त्रिकालीं वसे एक स्वामी । लया जात हें सर्व त्याचेचि धामीं ७५

न भीतेचि मी खंडला मंडलाला । न भीते कधीं विघ्न येती तयाला ॥
न पापासि भीते, प्रभू तू दयाला । हरी भीतसे मी तुझेवीण काला ७६

वळाव्या आम्ही येथ गायी कुटोरी । वढाळा चुकारी विपारी-मनेरी ॥
हरी ऊठ, आम्हासि देई सिदोरी । त्वरे राक्षसा सर्व आताचि मारी ७७

अम्ही काय आहोत रे मानवाचे । पुराणे गडी केशवाचे जिवाचे ॥
नव्हे रंगहे आज काला नवाचे । असे संग मी तूं नये जेथ वाचे ७८

दुरूनी अले, तू मला अंगिकारी । मला तूचि हो शीतला छत्रधारी ॥
टळेना तुझें दैव कोणें विचारीं । तुवा दैव केलें, मला तू सुधारी ७९

तुला देखता सूख झालें अरूप । तुझेवीण तें कोणतें आपरूप ॥
तुझे आंत माझेचि शोभे स्वरूप । मला अंतरीं एक श्रीरंग-रूप ६८०

---

६७१ वित्तेसि-द्रव्यासहित. ६७३ रासे-रासलीलेनें. ६७४ गोपवाक्य ६७५ साहानि तन्महच्छिद्रं साचांत जडमूढता यन्मुहुर्तं क्षणं वापि हरिनाम न चिंतयेत ॥ ६७७ गोपवाक्य. ६८० आपरूप-अपूर्व.

मऊ मेण होवू, तरी जाळितातीं । जरी दुर्ग होवू, तरी फोडितातीं ॥
जरी वक्र होवू, धनुष्या करीतीं । सुधा तीर होवू, तरी फेकितातीं ८१

सुखा आणि दुःखा असे खाण मीच । इथें न्याय अन्याय संस्थान मीच
अपूरा पुरा थोर कीं सान मीच । असे आरसा स्वच्छ मी, घाण मीच
८२

घडी ज्ञान बुद्धीसि लावूनि कामा । गमें लाधलें सार हातासि आम्हा
नको बुद्धि, वारांगना विश्वरामा । नको ज्ञान, आच्छादितें हेंचि प्रेमा
८३

बरें हेंच कीं, एकलें एक राहूं । जगाचें भलें कीं बुरें तें न चाहूं ॥
अधीं आपुलें काय होईल पाहूं । तरी आणिकाची कथा मात साहू ८४

अम्ही आपुले मोहना आजि भेटू । भल्या वाइटा विस्मृती माजि लोटू
जरी नेणता मस्त आणीक वाटू । परी शाहणीचा असे हाचि थाटू ८५

हरी सन्मुखीं, नोळखे मी तयाला । मला भेटला, घेतलें मी भयाला ॥
रिघे मी पुनः त्यासि धुंडावयाला । पडे तोच्चि कीं फेर आकाबयाला
८६

हरी नाच तू, वाजवू आम्हि टाळी । करू मुग्ध या पाझनीची टवाळी
असे गोड रात्रीं तरी फेर पाळी । रचूं आगळी रास आता सकाळी
८७

पडा वाळवंटात आता सुकाळीं । करा नाम कल्लोळ, न्या अंतराळीं ॥
सिदोरी करा एक, कांहो निराळी ? । निराळी पुढें होत दूर्वा हराळी
८८

तया शास्त्रकारा नमस्कार सांगा । अती नम्रते पाउला टांयि लागा ॥
पुसावे, ‘ मधू दुग्ध पूजेसि मागा । गुरू पात्रिचें कासया शेष त्यागा? ’
८९

तधीं तें स्मृती शास्त्र येताति बोला । ‘नमस्कार सर्वा गुरू बालकाला’ ॥
‘न आम्ही गुरू बालका नेम केला । निगूराचि नेमामधें बांधियेला ’
६९०

---

८१ दुर्ग—पहाड. तीर=बाण.सुधा=सरळ. भावार्थ—जगांत कसेंहि वागणें कठीण. ६८२ संस्थान=जागा. भावार्थ—जगांतील गुणदोष जीवकल्पित. ६८५ वाटू=वाट. ६८६ आकाबया=अवदसा. प्रत्यक्ष सगुण ब्रम्हास सोडून निर्गुणाचा शोधच दुर्भाग्य. ६८९–९० गुरुप्रसाद ग्रहणाविषयीं.

अनाद्यंत गूजासि मी तू न जाणू । कसें प्रेमबीजासि उच्चारिं आणू ॥
पटा आड मी तू, कहाणी पुराणू । पटा सारिता मी न तू, कोण नेणू
९१

प्रभू जीव, हा देह ब्रम्हांड गोल । इथें प्राण ते पार्षदांचा समेळ ॥
इथें भौतिका इंद्रिया सोड खोल । असें हेंचि अद्वैत, या वीण फोल ९२

जगाची नटी ही वहू येत जाते । सुखीं ऐस तू, देखसी कां तियेतें ? ॥
जरी ही नटी कां कुणा साथ देते । तरी का तुझें सन्मुखीं आजि येते ?
९३

असे लांछना, जे सुकीर्ती असावे । असे मूर्खता, जे जगासी रुसावे ॥
बरे मस्त ऐसे स्मशानीं बसावें । परी कर्म-गर्वी न नर्की धसावे ९४

उरीं दुःख हें, अंबिके तू निवारी । हरी तो हरी चित्त, तू माय तारी ॥
वनीं जात मी, संकटा तू निवारी । करीं सांपडो सावळा तो मुरारी ९५

अरे व्यर्थ कां दुःख योगें झिजावें? । वृथा मोह मोरी मधें का कुजावें? ॥
उगें गूढ कूटा मधें काय जावें? । सुखें सुंदरा श्रीधराला भजावें ९६

कसी काय सांगू कुणाही कहाणी ? । मनासी रडे मी, मनासीच हाणी
भरें माझिये लोचनामाजि पाणी । जिवा वेचुनी मी अता नाथ आणीं
९७

विचाऱ्या मना माझिया वेड लागें । हरीरे तुझेवीण कोठें न जागें ॥
तुवा लोचनीं देखिलें सानुरागें । जळे ऊर अद्यापि ही त्याचि आगें ९८

हटीं कीं मठीं येक ते वायफाट । घटीं कीं पटीं येर ते नायनाट ॥
वदे गोपिका एक तेथें अचाट । 'न भेटे सखा, ती असे काय वाट' ९९

सदा देखसी तू जगा खापराला । कळेना तुझे भार आहे उराला ॥
त्यजी कल्पना, आपुले जा घराला । दिसेना गती काय होते पराला
७००

---

६९५ गोपीचा कात्यायनीस नवस. ६९९ हटीं-योगात. मठीं=मंदिरांत. घटीं-पटीं=न्याय वेदांतात. श्रीमद्भागवतः—नैष्कर्म्यमप्यच्युत–भाव–वर्जितं न शोभते ज्ञानमलं निरंजनं ॥

वदे सासु ‘ जाई न नंदा घरीं तू । अगे त्यांत आहे तुझा काय हेतू ’ ॥
वदे मी ‘गळयाचाचि आहेव तंतू । तिथें सांडिला, तोचि कीं धम सेतू’ १

जरी विश्व माझें करी या रहातें । तरी फेकितो दूर काळासि हातें ॥
दुजें मांडितो विश्व मीं एकरातें । जिथें गोपिका संग श्रीकृष्ण रातें २

गड्यानों तुम्ही आयका बोल साचा ।त्यजा ध्यास निर्मूल फोला जगाचा
समाधान बैसा, सुखाचेनि मंचा । तमाशा पहा गुरु गारुड्याचा ३

अरे काळ कसा नसे काय लाज? । प्रभूसी तुवा मांडिलें काय झुंज? ॥
असें हें जरी सर्व तूझेचि राज । त्वरें टाकुनी देख जाशील आज ४

अलासी जरी राज्य भोगावयाला । तरी आपुल्या वेचिसी कां वयाला
अला तों तयारी असे जावयाला । सवें काय नेसील रे खावयाला ५

जरी जिंकिसी सर्व ब्रह्मांड गोल । तरी पाळिसी फक्त हा पिंड फोल
कसा प्रीतिचा पंथ माझा अमोल । जसे नाचतो, वाजवी माय ढोल ६

सखे देह पेला, तिथें जीव रंग । उषेच्या मुखा केशराचा सुरंग ॥
नव्हे गे सखे, देह हा प्रेमरंग । जिथें पेटला श्रीहरीचाचि संग ७

दहा पांच या थेरड्या गोपकांता । मला माय घे, तू न आईक बाता ॥
अगे येत जाता कथा मात गाता । कुणाचा नसे एकमेकीस पत्ता ८

असे एक इंद्रा घरीं काम धेनू । वशिष्ठा घरीं बांधिली अन्य नेणू ॥
जरी सावळा वाजवी जेथ वेणू । तिथें काम धेनूचि श्रीपाद रेणू ९

सुबुद्धी गुणें या भवाते तरावें । तुला हाव पैं, नेणसी जे करावे ॥
तुझें चाभडें चाबुकानें चिरावें । कळे तैं तुला, श्रीहरीला स्मरावे ७१०

---

७०१ गोपीवाक्य. आहेव तंतू=मंगळसूत्र, प्राणनाथ हरि. ७०२एकराते–एकारात्रींत. राते–रमतो. ७०४ गोपीवाक्य. ७०७ गोपी युगल संवाद. ७०८ श्रीकृष्णाचे यशोदेस वाक्य. दहा=इंद्रियवृत्ती. पाच–अंतःकरण वृत्ती. एकमेकाहून भिन्न दाखवितात.७०९मूळ.–नभी कृत्तिका तेथ नंदी स्वराशीं । दुजा भूतलीं नेत नंदी हरासी । नभा भूतला न्याह्ळी अंतराशी । गणी नंदिबैलांत पाचा खरासी ॥

सखे देखुनी शुद्ध सात्वीक भाव। मला बोलिला नाथ वैकुंठ राव॥
'सखे भेट दे, ओठ ओठासि लाव'। 'नको मी वदे, तैं धरू जाय पाव' ११

अरे सार तू या त्रिकालीं त्रिलोकीं। जरासा धरी धीर संसार शोकीं
गुरू माउली शब्द तू एक घोकीं। उडे दुःख निःशेष तें एक ठोकीं १२

जगीं सासुनें सारखी खोड केली। जगें सून जी होय ती अर्ध मेली॥
भली जी हरी संग रानांत गेली। सुखी जी फिरूनी न संसारिं आली १३

जगाई असी सासु साठींत नाठी। तिनें दाविल्या या मला दोन गोठी
करूं कीं जशाला तसी लाथ लाठी। लहुंकू तिला, नायकू मात पोटीं १४

जिवा होय पाणी, उरीं रक्त आटें। कळेना हरी कोणरीती रहाटे॥
मिळेना हरी या जगाचेनि वाटें। जगासी निराळा स्वतंत्राचि थाटें १५

अम्ही रासरंगांत भोगू मुरारी। कुणा दांभिकाची अम्हा येथ चोरी?॥
अम्हा कोण नेतो यमाचे समोरी?। अम्ही भोगिला बाळ तो ब्रह्मचारी १६

अहो भाउजी, मी हरी कां न सोडी। हरीसी रतूनी स्वधर्मासि जोडी
क्रिया वंचके त्यागिजे काम खोडी। जरी पाप प्रेमीं शिरीं याचि फोडी १७

जगाचा उरीं कोठपैं घेउ धोंडा। स्वताचें स्थितील नसें बूड शेंडा॥
गुरू प्रेम दीजे, नको सांड मांडा। मनीं मात जी, पातली तीच तोंडा १८

अरे भेकडा, वर्णिसी शास्त्रबाणा। न ठावे, परी सांगसी खूण खाणा॥
पुसे तूजला श्रीगुरू चित्त राणा। रडे आपुले, सांगसी का पुराणा १९

गुरूरे, मला ठेवि संसार सोपा। असें पाप तें नेई निर्मूल लोपा॥
सुखी आजि राखी, पुढे ने स्वरूपा। करी तूज साजेलसी स्वानुकंपा ७२०

---

७११ पाव–पाय. भावार्थ–शुद्ध भावास प्रभु स्वतः दयेनें सायुज्य देतो. ७१३ ते ७१७ गोपीवाक्य. श्लोक ७१३ भक्तिपर. ४८८ योगपर. ७१४ जगाई=सासूचे नांव जग. नाटी–नास्ति, मिथ्या. ७१८ कोठपैं–कुठवर. सांड मांडा–निषेध विधा. ७१९ रडे आपुले–स्वानुभव किंवा स्वतःचे दोष सांग.

मला काय? मत्कर्म तूतें पटावे। तुला मी झटावे, न गर्वे नटावे ॥
भलें कीं बुरें जें मना होत ठावे। हटावे पुढोनी, मला तू लुटावे २१

जुन्यासौंगड्या कोवळ्यागोवळ्याला। अताबांधिजे आपुलेया गळयाला
उरीं कोंडिजे सुंदरा सावळयाला। न ही मात सांगा कुणा बावळयाला २२

मला विश्व हा आरसा भेडवीतो। पहा काळ हा नीच कां आडवीतो?
हरी मी रडे. 'द्वैत कारे पहातो?' । रुसे मी, 'तरी ईषणा का वहातो?' २३

धुळीचे जगीं धुंडिती लाल मोती। दिठी लाभता पारखी रत्न होती ॥
दिठी माउलीचे वसे नेत्रपाती। तिचा लाल जो रत्न त्याचेचि हाती २४

स्मशानीं मिया देखिला एक नंगा। न भोगी विरागी न योगी निसंगा
न वादी न भेदी न वाईट चंगा। असा पीर वेडा शिरीं शुद्ध गंगा २५

बने तोवरी संत मादाचि सेवी। क्रिया कर्म तें सर्व गुंडूनी ठेवी ॥
गुरू प्रेम मात्राचि पोटांत घ्यावी। दयाभूत कोणा न गारींत लावी २६

जगाची रहाटी जयाना कळाली। तया पासुनी शोक दुःखें पळाली ॥
भली कीं बुरी येथ अंतीं गळाली। असो रोग कीं दिव्य मात्रा मिळाली २७

मनोवृत्ति गेली, न तीतें स्मरावें। न आली पुढें, तीगुणें नाझुरावे ॥
अरे भूत भव्यासि ऐसे तरावे। सुखे साहजीं ब्रम्हरूपा वरावे २८

अता तेज फाकें सहस्रा कराचे। गुरू वाक्य सेवूनि तू मस्त नाचे ॥
अरे ऊठ, घे फूल हें उन्मनाचें। करीं बाग येथें जनाचें वनाचें २९

तनूचे घटीं जीव हा वाहताहे। जिवाचें जलीं सावळा पोहताहे ॥
कसा चित्त गंगेंत प्रेमाग्नि राहे। जणू मौक्तिकाच्या उरीं लाल वाहे ७३०

---

७२१ यद्यत्कर्म करोमितत्तदखिलं शंभो तेवाराधनं. ७२४ सौंगडी–सखा. ७२३ गोपाचा कृष्णासी संवाद. 'द्वैत कारे पहातो' 'ईषणा का वहातो' हरीचे गोपास उत्तर. द्वितीयाद्भयं भवति. ७२४ दिठी–दिव्यदृष्टी. पारखी–परीक्षक, रत्न ओळखतो तो स्वता रत्न आहे. लाल–लाडका. ७२५ शिवाचे वर्णन. ७२९ सहस्रकर– बोधरवी. संपूर्ण जगदेव नंदनवनं सर्वेपि कल्पद्रुमाः

इथें संत येतील जेव्हां फिरून । जना भक्तिनें न्यावया उद्धरून ॥
तधीं मस्त आरक्त नेत्रा करून । बसे मी तुझा उंबरा रे धरून ३१

लुटारा जगीं कोठपैं फेर केला ? । रवी पूर्व पासून पश्चीम नेला ॥
अरे घे करीं कीं गुरू प्रेम पेला । वयाचा खिशातूनि पैकाहि गेला ३२

रिघे प्रेम पंथीं बहू निश्चयानें । भवा वाहवी नेत्रिच्या आसवानें ॥
सखा जेथ भेटेल तूतें दयेनें । तधीं जीव शीवासि सोडूनि देणें ३३

गुरूचे मुला आस कांही नसावी । उरीं आस तैं प्रीत कोठे बसावी ॥
जरी कोंबडी हंस संगे उडावी । तरी भिंत खेटूनि राडीं पडावी ३४

जगानें मसीं वैर केलें सुरेख । कुणा सूख दे, पैं मला सर्व दुःख ॥
सदा साम केला मिया त्यासि देख । मला दंड तें देतसे कीं अधीक ३५

कसा फेर ? अकाबयेला न लाज । बुडालेत साथी, रिकामें जहाज ॥
निमेषार्ध तू स्वस्थ सेवी स्वराज । उद्या देखसी काय रे ? देख आज
३६

असे जीव तें केळ, हा देह साल । जिवा चाखितो, श्रीगुरू तो रसाळ
असे काहि वस्तूस अस्तित्व मूळ । हरी बिंब, किंवा स्वता नंदलाल
३७

कुणी सांगता घे न मूढा विकारा । सुधा चाल, कोणा न दे लाथमारा ॥
उद्या सांगसीं 'लागले येरझारा' । न मानील कोणी, अता ये सुधारा
३८

मुला ऐक ह्या बोल, मी आण वाही । असे बोल अर्थासि हा खाण, पाही
न घेई असा मित्र, जो जाण नाही । न कीजेल तें कार्य, जें त्राण नाही
३९

हरी चेटकी नाटकी कोण ? तू, मी ? । इथें गाय वाघा बळी कोण ? तू ? मी ?
तुझा मी, न तैं त्वद्विना बोलका मी । जरी तूंच मी, बोलता तूच कां मी ?
७४०

---

७३१ देवभक्तांचे पुनरावतार. ७३६ अकाबाई=दुर्दैव, कालचक्र. ७३८ येरझरा—अकस्मात. ७३९ जाण—जाणता. त्राण=पोषक. ७४० गोपवाक्य. कार्मी=उपयोगी. सृष्टी ईशकृत अथवा ईशरूप आहे तर दोनी पक्षीं जीवावर दोष नाही.

कसें काय कोणासि हें गूज सांगू? । कहाणी वळाया कसा काय लागू?
वदाया स्थिती ही कुणा शब्द मागू? । असे गुप्त जें तें स्वतासीच भोगू ४१

यमूने तिरीं सावळा काल रातीं । मिया देखता नाकळे नेत्रपाती ॥
तिथें सुंदरें घेतला वेणु हातीं । ध्वनी ऐकता जाहली सुप्रभाती ४२

शिरीं घ्या घडा पाहुया मोहनाला । यमूने तिरीं मांडि गोपाळकाला ॥
नका सांडु हा वेळ गाठीस आला । सखे कोट जन्मीं असे एक वेळा ४३

झरा अमृताचा स्वओठीं धरीला । हरी पाजिसी मुर्लिला बासरीला
तुझा श्वास तीचें उरी ही भरीला । हिनें वंश सद्वंश तो उद्धरीला ४४

हुडा रावणाचा अकाशात जाय । जिथें देव ही होत गोगूलगाय ॥
तिथें पारवा बैसुनी एक गाय । करूं काय कैं काय कैं काय काय ४५

असे लाल ओठीं, हिरे दंत पंक्ती । तिथें शब्द जे अमृता सूख देती ॥
सगूणा अशा पंथ जे निंदिताती । जळो पंथ ते, सावळा घेउ हाती ४६

तुम्हा आवडे सेवणे प्रीति-सारा । मनाला सुधारा, न घ्यावे विकारा ॥
पचे प्रेम, जैं सर्व वृत्तीसि मारा । न कीजेल पीडा, कुणा वेडचारा ४७

दिठीं मुंगिच्या नाथ तूझेंचि तेज । पिसूचे मुखीं नाथ तूझा अवाज ॥
असें चांगलें सर्व तूझेंचि राज । नसें वाइटाचें तुझें माजि बीज ४८

अतां वेळ मी आणि तू नासण्याची । तनू जाय मी आणि तू राहण्याची
सरे हाल दृष्टीचिया पापण्याची । रवीचंद्र ते राहिले देखण्याची ४९

प्रभू मी तुझे शक्तिचा एक मोड । तुझे प्रीतिचा वाहतो फोड कोड ॥
तुझ्यासी मिया जुंपिली येथ होड । कृपा वाढ, कीं पाप माझेचि वाढ? ७५०

---

७४१ कहाणी=कथा, चऱ्हाट. यतो वाचोनिवर्तंते अप्राप्यमनसासह. ७४४ गोपी-वाक्य. मुर्ली—वेणू, मुरळी देवळांत सोडलेली. ७४५ हुडा=बुरूज. गोगुलगाय=दीन. कैं=केव्हां, कुठें. काय=देह. ७५० मोड—अंकुर. कोड—कौतुक होड—पैज. वाढ—थोर.

गुरू मोहिनीच्या करी तूचि चेंडू । उगे थाप खा, नीट जा, झाक तोंडू
तुझें भाग्य हें, तू नकोरे वितंडू । तिला आवडेसे तुला सांडु मांडू ५१

जुन्या नूतना प्रेम सारासि द्यावे । पदाचे रजा साठि स्वर्गा विकावे ॥
मला पुससी 'अंती कोठें रहावे?' । मला प्रेम दे, तू मनःपूत जावे ५२

उद्या कंस कृष्णा मथूरेसि नेई । मला ठार मारील ही सासुबाई ॥
मला आज दे भेट, ये हो कन्हायी । जळूनि उद्या धूळ लागेन पायीं ५३

कुडी सोडुनी जाय जैं दिव्य प्राण । कुडी होतसे अन्य जीवा गहाण ॥
सखे सोयरे दर्शना येति जाण । कळेना कुडी भोगिती कोण कोण ५४

जधीं देह सोडूनिया जात मीतू । विटानी पुरीतील खड्यांत मीतू ॥
दुजांचे समाधीस जै वीट होतू । पुनः थोपिती माति साच्यांत मी तू
५५

वुधारे नको होवु तू कामदास । असा आळका होतसी का मदास ॥
स्वतेजें दयेचा वने रामदास । असा धूळसा वाहसी कां उदास? ५६

गुन्हा जो करीना असे कोण ऐसा? । न केल्या गुन्हा वाचला जीव कैसा?
चुके मी, जरी देसि खोटाचि पैसा । बुरा मी, प्रभो काय तू होसि तैसा?
५७

गुरू गूढ भूटा जना गुप्त ठेव । धनाला जना पासूनी लुप्त ठेव ॥
करी येथ डोळा जनीं देवघेव । मना आत डोळ्यासि तू गुप्त ठेव ५८

प्रभो देह प्राणाचिया तूचि सारा । मला जीवकीं तूचि सारा पसारा ॥
मला तूचि अस्तित्व, माझा सहारा । तुझे पायिं मी लोपता तूचि सारा
५९

मना कोण सांगे तुला? 'होय पाणी । फिरे नातरी वासना कुंद घाणीं' ॥
टिकेनास केव्हां कुणेही ठिकाणीं । धसे आंत, कीं जीव बाहेर आणी
७६०

---

७५१ सहज स्थितीचे वर्णन. मोहिनी—महाविष्णूचा अमृत वाटणारा अवतार. ७५२ तू पुसतोस स्वर्गाला जावे कीं नरकाला? मला प्रेम असो. तू वाटेल तिकडे जा. ७५३ गोपीवाक्य. ७५४ मरणोत्तर देह दुसऱ्या जीवाच्या ताब्यांत. ७५६ आळका=लोलुप, वाहसी—चालसी. ७५७ मी निष्पाप आहे असी स्फूर्ती सुद्धां महत्पाप आहे. जीव वाचेल कैसा—जीवाचे पौरुष म्हणजेच ब्रम्ह विस्मृ-

इथें येत जाता कुणा काय होता? । वयाचोनि तंता कुणा ये विणीता?
दयाभूत संता बहू दुःख चिंता । परी चित्त देता असे कोण दाता? ६१

तपी नाचरे पाप, कीं तू कराली । करी पाप मी, माय कीं तू दयाली ॥
म्हणे तो कराली, वदे मी कृपाली । तुला आवडे नांव, कीं सांग गाली?
६२

न संसार अग्नींत जाळी तनाला । करूनी गता गोष्टिच्या चिंतनाला ॥
हरीवीण कोठें न टेवी मनाला । अभक्तीं न फुंकी वयाचें धनाला ६३

अम्ही प्रेमळा मंडळीं भक्त सारे । सदा दुःख संसार हे त्यक्त सारे ॥
गुरू माउली माजिं आसक्त सारे । सदा मस्त विश्रांत कीं मुक्त सारे
६४

गड्यारे मना, बैस थोडें उगेलें । फुका चिंतिसी काय दुःखासि मेलें ॥
तनू कांबळें जेथ फाटूनि गेलें । तिथें बोल ते फोल, केलें न केलें ६५

अरे आयु हें चावटी माजिं गेलें । फुका चित्त कीं अन्न हें घाण केलें ॥
न केला गुरू बोल, हें तोंड काळें । अनाज्ञाचि केलें, जिवा घोर झालें
६६

वयोमान येथें गणी वर्ष साठी । पदा चालवी प्रेमळाचेचि साठी ।
पुढें बांधिती मेलिया तूज ताटी । अता जेविजे माउलीचेचि ताटीं ६७

दुराशेसवे पाठिं टेकीत काठी । गरारा जगीं मारिसी तू भराटी ॥
अरे चालता चालता कल्प कोटी । सुखाची कुणा काय होईल भेटी?
६८

अम्हा आवडे श्रीहरी नंद लाल । विदीं गोकुळाचीच ऐने महाल ॥
बुरें कीं भलें कल्पना बोलचाल । अम्हाला नसे हो, अम्ही मस्तवाल
६९

मुखा नाथजी नाम कैवल्यधाम । दुरूनीच संसारिका रामराम ॥
गुरूची दया कोटि ब्रम्हा अराम । गुरुचा रजू कोटि जीवा विराम
७७०

---

तीचे पाप. ७५९ सहारा—आश्रय. ७६० धसे आंत—अंतर्मुख हो.
७६१ तुकाराम रडले, रामदास बोंबलले, कुणाला क्षिती ? ७६२ जगदंबेस उद्देशून. कराली—क्रूर, राक्षसी. गाली—शिवी. ७६३ तन=देह, गवत. ७६६ विधि त्याग व निषेध ग्रहण हे पाप आहेच त्याची क्षमा प्रभू करील; पण स्वताचें मनकल्पित आकल्प भ्रमण करवील. ७७० रजू=रज.

मला देखसी एकदा गा मुरारी । सर्व गोपिकांच्या फिरे मस्त फेरीं ॥
शिराहूनि हंडी करातूनि झारी । गळे. मी तुझे पायीं मेलेच सारी ७१

अम्हीं बाहुल्या चेटक्या सूत्रधारी । अम्हा खेळवीलेसि नाना विकारी
कसी याहुनी खेळु आधीक होरी? । हरी रंग तू रंगणीं, तूचि झारी ७२

वदे 'जाईना' आणि जाते प्रभाती । मिया घातिले नामरूपासि माती ॥
मला निंदिता काय हो मूढ रीती ? । असे मस्त मी श्रीहरी गूढ प्रीती
७३

हरी मी तुझेसाठिं घाठासि आले । जळीं धर्म मोक्षासि ही वाहवीले ॥
तुझा चेंडु काळाशिरीं तेथ हाले । उरीं माझिया दोन हे काय आले ७४

मला रोज वाटे उद्या मी न येऊ । अरे चित्तचोरा तुला मी न चाहू ॥
अता गोपिका चालल्या तूज पाहू । तरी एकली मी घरीं काय राहू? ७५

तुला विश्व हें जाहलें सर्व ठावें । उठें कल्पनें आणि तेथें मिटावे ॥
अरे दोन शून्यांत विश्वे अटावे । तरी सांच कल्पूनि कारे झटावे ७६

पडें पालथे हें नभाचें घमेलें । शहाणें उताणेचि देखूनि मेले ॥
दयाळा हरीच्या परी देख लीले । सुखें ओठ ओठासि लागूनि ठेले ७७

घडीले हरीरे तुला कोण ईशें । अरे चंद्र शोभे तुझीया प्रकाशें ॥
मुखीं गोपिका शोभती रास हासें । परी शोभला रास तूझें विलासें ७८

विरुद्धा जगाचें न दुःखा वहावें । गुरू माउलीचें सुधासार खावें ॥
अरे मात्र योनीतुनी येथ यावे । तरी पत्नि योनी मधें का रिघावे ७९

मिया देखिला सांब तो वृद्ध भोळा । सदा भांग धुंदींत डोळयासि डोळा
जणूं आश्रमातीत देहा निराळा । वदे ' रामजी या गुरूपायिं लोळा '
७८०

---

७७१ ते ७५ गोपीवाक्य. ७७६ मूळ—कळालें जगद्वृत्त काहींच नाहीं । अधिष्ठान वायूंत काहींच नाहीं ॥ अरे दोन शून्यामधें देह पाही । मधें पाहता सत्य काहींच नाही ॥ ७७७ घमेले—पातेलें. पालथें—उपडें. हें विश्वरूपी घमेले पालथें असल्यामुळें त्यांत कांहीं सार नाहीं. ओठ ओठासिं०—अबोल स्थिती.

घमंडी नको भाडिया वाडियाची । खपुष्पा तनू नाडिया काडियाची ॥
जिवाचा दिवा, सेज ही वारियाची । कसी बांधिसी भिंत ती पारियाची ? ८१

मनाची कधीं उन्मनीं नाहि झाली । परेच्या घरीं वैखरी नाहि आली
समाधी सुषुप्तींत नाही मिळाली । अरे जाग्रती घोर स्वप्नांत गेली ८२

तुझें गोड तें नाम राहो गळ्यांत । तुझें कानडें रूप तें डोळियांत ॥
तुझें प्रेम पेंचो मनाचे पिळयांत । हरी पोह ये रे जिवाचें तळयांत ८३

प्रभातीं गुरू ठेवि गोडींत गोडी । तुझी प्रीत दे माय वाढींत वाढी ॥
अम्हा राहु दे मास्ति गाढींत गाढी । अहंकार हा सर्व झाडींत झाडी ८४

नळीनी कुमोदीस तू येथ पाहे । रवी इंदुची त्यावरी कां कृपा हे ॥
कुमोदी दहा जीभ, पैं मूक राहे । दुजी आखडीते शताही करा हे ८५

मनीं तें जगीं जाहलें काय शेखीं? । विधी लेख ही वाचिलें काय शेखीं?
शतायू सुखा भोगिलें काय शेखीं? । चिरायू जरी राहिले काय शेखीं ? ८६

कुणा आवडे नाट्य गीत प्रमोद । कुणा हाव भावातला तो विनोद ॥
गुरू प्रेमळा एक गोविंद छंद । तयावीण ते बंध आणि प्रतोद ८७

निगूरे वनीं तापतां चूर झाले । नरा सांडुनी वानरीं शूर झाले ॥
वळूनी नखे एक ते खूर झाले । जटा दाढिचें पुच्छ भर्पूर झाले ८८

भुलूनी गजा वाजिया चाप बाणा । घमंडी कसा चालतोसी उताणा? ॥
अरे काळ हा घोर सोडील कोणा? । क्षणें खातसे रावणा कुंभकर्णा ८९

प्रभा देखुनी चित्त हें फूल हासें । फुला देखुनी कृष्ण आला विलासे ॥
अरे सावळ्या फूल सेजेसि बैसें । तुझेवीण कोमेजुनी जाय कैसें ७९०

---

७८१ खपुष्प–वैकल्पिक. ७८३ कानडे–मुग्ध. ७८५ नलिनी–सूर्य विकाशी कमल. कुमोदी=चंद्र विकाशी. दहा पाकळ्याचें फूल. मौन व अपरिग्रह प्रशंसा. ७८६ शेखीं–शेवटीं. रिद्धिसिद्धि चिरायुत्व व्यर्थ ७८७. बंध=निबंध. प्रतोद= कोरडे, चाबुक. ७८८ तापसाना उद्देशून.

अरे सांडरे सोवळ्याओवळ्यासी । उरा आवळीकोवळ्या गोवळ्यासी
तुझा चारिती पिंड पै कावळ्यासी । तरी पिंड आताचि दे सावळ्यासी
९१

फिरे एकला जीव तो घोरपंथीं । तनू स्वच्छ आहेचि मातींत माती ॥
अरे माति जीवांत कां कालवाती । तुझा जीव माझें जिवीं एकजोती
९२

नसें गोड तें सर्व गारींत लोटा । गुरू पासुनी घेइजे एक घोटा ॥
इथे दुस्तरा मोडिजे सर्व वाटा । पुरें एक हें प्रेम आब्रम्ह-कीटा ९३

तनू भू-जला-तेज-वायूंत झाली । जगाचें इथें घोर रानीं रिघाली ॥
तनू संगती सर्व दुःखांत घाली । तनू सोडिता पूर्ण शांती मिळाली ९४

बहू न्याय तर्कांत केला पुकारा । परी स्वप्न गर्वातला तो पसारा ॥
सख्या प्रेम दे एक रे अर्थ सारा । अरे बोलिला शब्द तो सर्व वारा ९५

करू लाडिगोडी तुझ्यासी दयाळे । अम्ही पुण्य कीं पाप तें वाळियेले
गुरू माउले आजि तुझेचि लीले । न केलेंहि केलेंचि, केलें न केलें ९६

तुझे पंथिं ते सारखे रंक राजे । तुझे दास्य इंद्रादिकालाहि साजें ॥
कलंकासि देतोसि सौभाग्य ताजें । प्रभूरे दयेचें कृपादान दीजे ९७

असो कीं नसो दाळ दाणा घरांत । बुडो दुःख कीं सूख तें सागरांत ॥
गुरू सेविजे मस्त प्रीती भरांत । गतश्वास येवो न येवो उरांत ९८

बहूता युगीं मी उपासें उपासी । करी दांडगायी गुरू उंबऱ्यासी ॥
सदा वाढितो प्रेम जेवावयासी । कधीं होय दासी, कधीं मीच खासी
९९

अम्हा उध्दवारे हरी सोडवेना । अम्हा आवडे सावळारे सुजाणा ॥
किती सांगसी योग नीती पुराणा । त्वरें जीव-जीवासि सन्मूख आणा
८००

---

७९१ पिंड-देह. ७९६ कमण्यकर्मयःपश्येदकर्मणिव कर्मयः ७९९ उपासी=उपासना करितो. उपासें, भुकेला. ८०० जीव जीव-जीवाचा जीव.

उधोजी अणा सावळा नंदलाला। त्यजू आम्हि तेव्हांचि या सर्व बोला
त्वरेनें निघा, जीन घोड्यासि घाला। तुटी होय नेणो तुम्हाला अम्हाला १

तया याज्ञिका फक्त तें कष्ट झालें। क्रिया वेशिला बांधुना भ्रष्ट झाले
गुरू गाउनीं संत संतुष्ट झाले। यथा पूर्व हें विश्व ही नष्ट झालें २

शरच्चंद्रिका प्रेमळाच्या उरीं रे। पडे राधिका मस्त पाया वरी रे॥
धुळीपासुनी तीजला सावरी रे। हरी लोटिसी काय वाऱ्या वरी रे? ३

अम्हाला तुवा प्रेम दीजे गुरू रे। उरी आग ती वीझवीजे गुरू रे॥
मनो बुद्धिला नागवीजे गुरू रे। तुझा पाय हातीं ठिवीजे गुरू रे ४

खुले उन्मनी, प्रेम आणी गुरू रे। क्रिया लौकिका सोडि पाणी गुरू रे
पुढे काळ आम्हासि हाणी गुरू रे। अम्हा प्रीति मार्जी नहाणी गुरू रे ५

प्रभातीं असे गीत वेळा गुरू रे। तुझे दारिं हा भक्त मेळा गुरू रे॥
उगी बैसुनी पाहि खेळा गुरू रे। करी त्या सवें तूहि लीला गुरू रे ६

त्वरें काळ हा देख जातो गुरू रे। तुझा भक्त तूतेचि गातो गुरू रे॥
अम्ही बंद या सर्व दारा करू रे। रवी बोध कोंडूनि तूते धरू रे ७

मिळे शांति प्रेमें, न नेमें गुरू रे। भरी आमुचें चित्त प्रेमें गुरू रे॥
अम्ही व्यर्थ चिंता तरी का करू रे। त्यजू दोन, एकासि हातीं धरू रे ८

गुरू अग्निसा व्यापिसी प्रस्तरू रे। जगाकार ही सिंधु तू दूस्तरू रे॥
अम्ही धूळसे आन कोणा स्मरू रे। मनो कल्पना वायु ही तू गुरू रे ९

अता कोठ पैं येथ जन्मू मरू रे। पुरे उंबरा एक तुझा धरू रे॥
शिराणी तुझे उंबऱ्याची करू रे। दिवाळी मला ती गुरूरे गुरूरे ८१०

---

८०२ याज्ञी=दंभानें भ्रष्ट. ८०५ नहाणी=स्नान घाल. ८०९ प्रस्तर--फत्तर, धोंडा. आन--अन्य.

अता जाग तू सुप्रभातीं गुरू रे । भरूनी उरे तूचि छातीं गुरू रे ॥
नव्या नूतना आजि बेता करू रे । असे तोहि हा श्वास आता सरू रे
११
जिवाचे अता होत पाणी गुरू रे । असे विश्व खोटी कहाणी गुरू रे ॥
गतायात चित्तांत नाणीं गुरू रे । उरीं माझिया लाथ हाणी गुरू रे
१२
तनू बाग फूले बहारी गुरू रे । मना उन्मनीं एकतारी गुरू रे ॥
कसे शोभती संत हारी गुरू रे । अता कोण कोणासि सोडू धरू रे १३

सहा चार ते काय कीजे गुरू रे । अम्हीं कासया आयकीजे गुरू रे ॥
अता बोल फोला त्यजीजे गुरू रे । अमोला तुझे माजिं जीजे गुरू रे
१४
विकल्पा मळाचा जिथें लेश नाहीं । असें प्रेम तू सोवि, देई मला हीं ॥
विलंबू कशाला गुरू माय बाई । पहा आपुली धूळ वाऱ्यांत जाई १५

पया रत्न सारासि देई गुरू रे । जिवाचाहि या घोट घेई गुरू रे ॥
मला प्रीतिचे वीण नाहीं गुरू रे । असे अंतरीं स्वच्छ, राही गुरू रे १६

हरी राधिका नांदता एक देहीं । जनीं कीं वनीं, प्रेम देहीं विदेहीं ॥
गुरू शिष्य ज्या नांदती चित्त गेहीं । सळेनाचि हें ही तया, आणि तेंही
१७
मला प्रेम मस्ती सवे काज सारे । जनाचें मनीं वादुगें का पुकारे ॥
हरीरे तुवा धुंद केले जना रे । दिसेना इथें एकही शाहणा रे १८

नसे प्रीतिचा पंथ हा खेळ पोरा । जळे जो समूळीं मिळे त्यासि थारा
असे पंथ हा शूर वीरासि थोरा । बिर्दीं या नजावे खबर्दार चोरा १९

गव्हा बाजरीची मिळे एक रोटी । असे पाणि पिण्यासि तुंबा नरोटी
हरी सावळ्याच्या सवें एक ताटीं । वनीं जेविता, इंद्र ही लाळ घोटी
८२०

---

८१२ गतायात=भूत, वर्तमान. नाणी=आणू नको. ८१३ हारी=पंक्ती. ८१४ जीजे–जगावे.

कुलाला विधीचे घरीं पाहियेले। जयं चक्रदंडें जगा चालवीले ॥
द्विजाचें शिरें शूद्र पायास केले। द्विजा शूद्र पायावरी ठेवियेले २१

रिघेना विधी-बुद्धि त्वत्पादुकाला। नसें पुण्य पापें क्षिती मालकाला
जरी धुंद पापीं, जपे मी भयाला। हरी आठवीतो तुला जी दयाला २२

तुला काम सारे जिवंता-मृताचे। तुवा विश्व शृंगारिलें सर्व साचें ॥
असे पातकी पोर मी केशवाचे। कुणा दोष? हें विश्व तुझें स्वताचें २३

सदा काळचक्रा मला देसि कष्टा। सुखाची तनू फाडिसी काय नष्टा?
मिया भक्षिता वायु अग्नि-प्रतिष्टा। करीतोसि मी अन्न खाताचि विष्टा २४

तुझी खीचडी रांधिली सर्वकाल। तुला सेवुनी तृप्त ते आत्प काल ॥
सुखीं ऐस तूते नसे कष्ट हाल। उद्याचा तुझा भाग तो दत्त काल २५

शिवा कुंभ माझा तुवा भंगियेला। सुखाचा दिवा तूच कीं मालवीला
तुवा जीव माझा धुळीं कालवीला। धुळी फाकितो मी, तुझी मस्त लीला २६

मनारे हरीचें पदीं रातलासी। तिथें गुंतूनी तू मला त्रासलासी ॥
हरी-दत्त तो घोट जैं घेतलासी। सुखाचेचि सेजे मधें मातलासी २७

कधीं स्थूल होतोसि-ब्रह्मांड गोला। कधीं सूक्ष्म होवूनि येसी न डोळा
स्वता माजि दावीतसी सर्व लीला। स्वता तूचि डोळा करीतोसि खेळा २८

घडा फोडिला काल मरतील एक। अशा तोडमोडींत ती फार चूक ॥
वदे कुंभ, 'होतो तुझे पै सुरेख। अता होसि माझे परी तूहि देख' २९

मनारे जरी झाडिसी देह धूळ। तरी निर्मळा पावसी आदि-मूळ ॥
चिदाकाश वस्ती तुझी, सांड खूळ। कसा कर्दमीं खात होसी गढूळ? ८३०

---

८२१ चक्रदंड-चाक काठी. चाक=फिरणारा काल. काठी-नियती. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य हे शिर, बाहू, मध्यभाग आहेत हे शूद्ररूपी पायाचे पायावर आहेत ८२२ विधिबुद्धि-ब्रम्हदेवाची बुद्धि. ८२५ हाल= वर्तमान. कष्ट-हाल म्हणजे वर्तमान तो हाल म्हणजे कष्टच आहे. परंतु तुझे स्वरूपांत काल नाही हंम्णून हाल नाही. ८३० खात=शेणमाती.

जगीं होम कुंडीं मिळे फक्त धूर। गतायात गोष्टीगुणें होसि चूर ॥
प्रपंची पडे भक्ति माजीं फितूर। फितूरा त्यजी, हो स्वराज्यात शूर ३१

कुलाला करी अल्पसा हा विचार। किती मानवी मातिला लाथ मार?
नृपा रावणा कंस बाणासि धीर। भुवंडीसी चक्रावरी बेफिकीर? ३२

प्रसिद्धी गुणें होसि तू ग्रामकंट। गुहें बैसता तूचि होसी पिसाट ॥
जरी ठेविसी शक्ति भक्ती अचाट। कळूने कुणा कोण तू काय वाट ३३

हरी सुंदरा सौख्यपादा सकाळीं। अम्हा लाव तूझें सुखाचे सुकाळीं ॥
दिवाळें निघे येत जाता दिवाळी। सदा शेवटीं फाल्गुना माजि होळी ३४

सदा वीषयाचें सुखाचे दुराशा। अशा शुद्ध जीवासि कां देसि फासा
कळेना कसे हेंचि नेती विनाशा। जयाची मनीं बाळगीतोसि आशा ३५

जरी जाणसी तू मुला सांग वेदा। तरी वाहसी व्यर्थ कां सांग खेदा ॥
नव्हे सिद्ध हे कार्य वादा विवादा। सुखी ऐस, सांडी जगाचे निनादा ३६

वदे एक वेश्येसि 'गे पापराशी। सदा धुंडिसी काय येरा नरासी' ॥
वदे ती 'बुवाजी असे मी मिरासी। अहा कां तुम्ही दाविता जे परासी?' ३७

जिथें देखते मी हरीचा विलास। असे कुंज वैकुंठ कीं स्वर्ग खास ॥
जरी पंढरी स्वर्ग, कारे उदास?। बसे येथ तू सज्जनासी सुखास ३८

जरी तूजला या जगीं शक्ति आहे। घडी ही न सत्संग सोडूनि राहे ॥
बहूता जनाची स्थिती येथ पाहे। जगातूनि सर्वांसि तोटाचि लाहे ३९

जगारे तुझें कृत्य हें तूज ठावे। सदा दुःख संताप देण्या झटावे ॥
खरा राज्य द्यावे, नराला कुटावे। तुझे दाम खोटें न संता पटावे ८४०

---

८३१ फितूर=विरुद्ध, बंड. ८३३ ग्रामकंट—गावगुंड. ८३६ सांग वेद—व्याकरण शिक्षाकल्प छंद, ज्योतिष, निरुक्तया अंगासहित. ८३७ मिरासी—पिढीजाद गाणारीण. ८३८ कुंज=कुंजवन गोकुळ.

अता हात जीवंत गंगेत धोई। सख्या सज्जनांच्या करी सर्व सोई॥
जगाची असे देख निःसार कोई। तुझा हात सोडुनिया पार होई ४१

गुगा माझिया जाणते माय राणी। अनंता दयेनें मला ही नहाणी॥
जसें पात्र माझें भरी प्रेम पाणी। मला आपुलीया स्थिती माजि आणी
४२

बुधा शोध खातें तुझें तूचि आता। मुळीं काय होतें, उरें काय हाता?
न ध्यासी हरी, घेकुनी मृत्यु वार्ता। मरावे तुवा, नाम घेता न घेता ४३

मिया देखिला चांगया पंढरींत। पुसे मी तया पूर्वकालीन वृत्त॥
वदे तो, 'गुरू गायरे तू अनंत। अरे संत गेले पुनः काय येत? ८४४

नव्यानें अलासी गड्या चिद्विलासीं। मला वाटलें तूच येथें अलासी
हरी कारजें सेधि प्रीती पयासी। पुनः नेणिजे मीच कां तू अहेसी ४५

मिया देखिले या,जगाचे कुलाला। सदा मृत्तिके माजि दावी कलाला
अहो मी बघे, ना दिसो हे कुणाला। कुलाला पदीं आपुलें पूर्वजाला
४६

अरे चार साहाचिया पूर्ण सारा। सहा चार गुंडाळ, ठेवी पसारा॥
गुरू सांवरे, घेई या सद्विचारा। तनू सांडिता जातसी पैलपारा ४७

किती प्रेम हें ठेविलें माय देहीं। मनोबुद्धि कुंठीत, चाले न कांहीं॥
जयें सेविलें त्या कधीं चैन नाहीं। स्वताचें स्वरूपा स्वहातांत पाही
४८

प्रभू तू मला पाठवी पाव रोटी। पडावी अयाचीत येवोनि ताटीं॥
मला प्रेम देवूनि तू बैस पाठीं। न चिंता अहंता पडावीच गाठीं ४९

गुरू खोल दारासि, तू खोलवीता। पथा दाखवी, पंथ तू चालवीता॥
न येराचिया मी धरी माय हाता। अरे नश्वरू येर, तू एक त्राता ८५०

---

८४१ कोई=कोय. ८४२ ये यथा मांप्रपद्यंत तांस्तथैव भजाम्यहं॥ मायराणी—हरिगुरुमाउली. ८४३ खातें-हिशेब जमाखर्च. ८४४ चांगया-चांगदेव. १४०० वर्षे जगलेला. ८४६ जन्मांतरीच्या—पूर्वजांचे देह कुंभाराच्या पायाखालीं तुडविलेले दिसतात. ८४७ सहाचार—शास्त्रवेद.

जरी जाणसी, तू त्वरें जाय मूढा । गुरू-प्रेम सेवी उरीं नित्य गूढा ॥
कृपेवीण नाहेंचि तो प्रेम ओढा । न मूढा मिळे जी दशा योगरूढा ५१

विधी कायरे वित्त देसी खटाला ? । घरा मंदिरा आणि देसी मठाला ॥
शिळी भाकरी श्रीहरीचे भटाला । परी ती न भेटेचि मिर्चीं मिठाला
५२

अरे सांड चिंतेस, सौख्यांत राहे । अनीती जगीं,-तूचि नीतींत राहे ॥
जरी अंतिं जातें लयाचें घरा हें । विदेहीच जीवंत तू मुक्त राहे ५३

तुरट कैरि कसी तरि अंबली ? । मधुरता रवितापनिं पावली ॥
हरि करीं भुलवीं मुरली भली । सुरसता हरि चुंबनि लाभली ५४

निजेच्छाचि येतो, तरी मी न येतो । निजेच्छाचि जातो, तरी काय जातो?
सुखाचा स्वधामींच शहात होतो । न येतो न जातो न येथें रहातो
५५

मनारे कळेना तुला ही भुलाई । कळेना तरी, लाग जा संत पायीं ॥
इथें संत प्रेमांत वैकुंठ येई । असें जेथ वैकुंठ, जाई न जाई ५६

जिवाचें जरी सर्व स्वारस्य घ्यावे । निमेषार्ध तें स्वस्थ चित्तें बसावे ॥
गुरू प्रीति वीना कधीं ही नसावे । घडी नें घडी गोडि स्वाजीं घसावे
५७

कधीं प्रेमळासी न होई कठोर । न सांडी कलंकें कधीं संतदार ॥
धरी प्रेम रे, प्रेम भक्तीचि सार । मिळो स्वर्ग कीं नर्क, वाया विचार
५८

प्रभू भार तू आवडी सावडीला । सदा पावसी संकटाचे घडीला ॥
वदू काय मी या मनाचे नडीला? । तुझा ठाव पैला परंचे थडीला ५९

गुरूमाय आम्हा चुकीतूनि गाळी । अगामी भयातूनि निश्चिंत पाळी ॥
न ठावें अम्हा तोंचि संत्रास टाळी । कृपेची करी नित्य ताजी दिवाळी
८६०

---

८५१ गूढ-रहस्य. ८५२ भट=वीर. ८५३ हें-इदंजग. ८५४ वृत्त बदललें. तुरट कैरी रवि किरणानें तप्त होऊन मधुर झाली. मुरली हरीनें स्वीकारून चुंबिल्यानें गोड झाली. ८५८ घडीला=वेळेस. ८५९ चुकी=मागें घडलेली. अगामी-पुढे-येणारे. ८६० गाळी=वगळी. संत्रास-संकट.

तुला माउले सर्वही ताप ठावे । दिनाचे दुखा वारण्या तू झटावे ॥
तुला वाहण्या आधिं तू येथ यावे । तुला सांगण्या आधि लाडा करावे ६१

उरीं तृप्त त्यांची दवा माउली तू । पुरे भाजले त्यांस ही साउली तूं ॥
अतां सांगतो तूजला गुप्तमातू । न बोलो तरी जाणसी लक्ष हेतू ६२

अरे आंधळ्या शोधिसी विश्वरूपा । सदा निश्चया माजिं घेसी विकल्पा
अधीं साध तू नाथ नेत्रानुकंपा । अणू माझिं तू देख विश्वा अमूपा ६३

जरी तुर्क तू जैन कीं जंगमैय्या । अहंता त्यजी, होत चैतन्य काया ॥
स्वपंथे भजे बाणसा नीट पाया । धनुर्वात दे तेढ, भोगी अपाया ६४

दुखीं घे समाधान, शांतीस पाही । त्यजी बंधना, मुक्त निर्द्वंद राही ॥
न देखूनि थोरा स्वता दुःख वाही । निकृष्टासि देखूनि संतोष लाही ६५

धरीसी करे माउले बालकाला । कृपेनें सदा झाकिसी पातकाला ॥
दया तू करी दीन या याचकाला । तुझेवीण नेणेच मी आणिकाला ६६

सुदाम्या दिली जी, पुरी सोनियाची । ध्रुवाला दिली जी, गती योगियाची
प्रभो काय वेचेल देता फुकाची । झुळूकी मला आपुले वारियाची ६७

स्वताला गणी तुच्छ जो तोचि धीर । स्वतालाचि शिक्षा करी तो अमीर
न शोभे पतीता दिला लाथ-मार । पतीतासि तारी हरीनाथ शूर ६८

असे होइजे शूर गंभीर वीर । दिसे त्यातुनी घेइजे बोध धीर ॥
न जाई जयाचे दिठीं देह केर । निरालंब निर्लेप स्वाराज्य शूर ६९

अरे सृष्टिचा तूचि तंतू अहेव । बहू गुप्त ही मात चित्तांत ठेव ॥
पशू पक्षि माणूस आणीक देव । जसे दाविसी, तूचि होसी स्वमेव ८७०

---

८६१ ठावे=माहीत. ८६४ तुर्क–मुसलमान. जंगमय्या=जंगम. स्वपंथे–आपआपले धर्मानें नीट बाणासारखा पदास जा. नाहीतर वाकडेपणांत धनुर्वात होऊन नाश पावशील. ८६७ जी=अहो. ( प्रभो ) ८६८ धीर=बहादुर. अमीर –राजा. ८६९ धीर–बुद्धिमान. ८७० तंतू आहेव=सौभाग्य सूत्र.

असे प्रीतिचा पंथ ऐसा सुरेख । जगाचें विखाही गणीजे पियूख ॥
सुकाळीं कुणीही गणीतील सूख । अपत्ती मधें जो सुखी तो विशेख
७१

मना सेविसी काय अज्ञान मद्या ? । अरे नश्वरा तू, तुझी माय वंध्या ॥
किती लेतसी फाटक्या मोह चिंध्या ? । किती मांडिसी गर्व पाखांड विद्या ?
७२

नको बुद्धिचा तोडु आहेव तंतू । नको तू इथें द्वंद्व गुंत्यांत गुंतू ॥
अरे पंथिका, धामतू, तूचि पंथू । स्वताचे पथा चूकसी काय हेतू ? ७३

रचीशील ब्रह्मांड, ती काय थोरी ? । जिवा एक ही तोषवी, तेचि भारी
गुरू मुक्त, तो बांधिजे प्रेम दोरी । असे सृष्टि आधीच ही मुक्त सारी
७४

नको एक ही वासना थोरिवेची । तुला थोरवी खास पाडील खाचीं
असे नम्रता रत्नखाणी सुखाची । कुणाला सरी नम्रतेच्या नखाची ?
७५

जगीं कल्पिता, एक ही कल्पना 'मी' । थके कल्पना कल्पिता रूपनामीं
गुरूची दया लाधले सूख नामीं । अतां कल्पना ती तगेना रिकामी ७६

उधोजी सगूणीं धरा आवडीला । करी नाथ तो सुंदरा वाकडीला ॥
अम्हा दाविसी पातक्यांच्या नडीला । वरू ब्रह्महत्या हरी रूपडीला ७७

उधोजी वृजीं तूहि गोपीच व्हावे । हरीलाचि ध्यावे, हरीलाचि गावे ॥
उरीं चित्त-चोरासि त्या खेळवावे । धरी प्रेम रे, काय योगा बकावे ? ७८

सखी आस त्यासावळ्याची कशाला । तयाची स्मृतीजीव आणी घशाला
तनूच्या जधीं पेठवू या मशाला । तधीं नाथ येऊन बैसे उशाला ७९

मरूं त्या अधीं श्रीहरी येथ आणा । करीती अम्हा सासरीं मारहाणा
हरीचे कृपा दृष्टि अम्हा नहाणा । उधोजी असे बोल, हा कां उखाणा?
८८०

---

८७१ विशेख—विशेष. ८७२ वंध्या=वांझ. ८७७ वाकडी—कुब्जा. वरू—स्वीकारू.
८७७ ते ८८० गोपी उद्धव संवाद. ८७८ धरा—स्वीकारा.

जगाइ मेला जाचिते सासुबाई । अता अस्थि कीं चर्म हें मात्र राही ॥
दवा मूढ कोणी हरीवीण देई । जळो मी चित्ते पैं, सुधा ही न घेई ८१

अरे उद्धवा चाहसी निर्गुणाला । तरी सांग, कां उत्तरा दक्षिणाला ? ॥
जरी देखिले, सांग त्याचे खुणाला ? । नसे खूण, तैं सांग घेसी कुणाला?
८२

अहोरात्र तू धुंडिसी श्रीवराला । परी आंधळ्या, पाहसी कां निराळा?
हरी तूजसी नांदतो सर्वकाळा । उभा देख प्रत्यक्ष आपाद-डोळा ८३

सुखाचें किती धुंडिसी साधनाला? । किती आर्जवीसी बहूता जनाला ?
कसा जासि बाहेर तू या तनाला ? । जरी जासि, तैं मूकसी आपणाला
८४

अरे तूचि ओंकार, तू वेद भायी । अखंडीत तूझी जगीं बादशाही ॥
जगीं जे असे, तूज बाहेर नाही । स्वतामाजिं तू इच्छिताथसि पाही ८५

नको तू विनोदे धरू-प्रेम पंथू । मिळाली नसे जोवरी सत्य वस्तू ॥
असे खेळ हा शूरधीरासि हेतू । शिवासी हमामा, जिवासी हुतूतू ८६

जरी आपुला कीं परावा हटेना । नमस्कार श्रीमाउलीला पटेना ॥
मनीं कीं जनीं चित्त जो पै विटेना । तुझा शोक संमोह तो पै तुटेना
८७

तनूमाजिं अस्तित्वचा जोवरी हे । हरीच्छा तनू वागवी नोवरी हे ॥
न भीमासि भी, अर्जुना ना वरी रे । सदा चित्त एकाचि नाथावरी रे ८८

जरी शूर तू, मारिजे देह बुद्धी । धरी प्रेम, होईल रे चित्त शुद्धी ॥
अनामा अरूपाचि तू अंति आधीं । अहंता त्यजूनी समाधान साधी
८९

प्रभाती रडे सुंदरा हंस मैना । 'गतायुष्य रात्रीतले खेळ नाना' ॥
पहा बिंबले या उषःकाल ऐनां । कसे घोर घोरीं तुम्हा हें कळेना ८९०

---

८८१ गोपीवाक्य जगाई—जगरूपी सासू. ८८२ चाहसी—इच्छितोस. उत्तरा दक्षिणा—दिशा. ८८४ तनाला=देहाला. ८९० ऐनां=आरश्यांत. घोर—भयंकर. घोरीं=निद्रेंत, घोरण्यांत.

तुला येत जे खावया पांघराया। करंट्या कसे जातसी हूडकाया ?॥
अरे फोलनिःसार जेसर्व वाया। तया वेचिसी काय आयुष्य माया?
९१

कधीं मांडितो हा विधी जीवमाया। कधी ठेवि गुंडाळुनीं चित्तकाया
कुणा नाहि धारिष्ट याते पुसाया। अरे मांडुनी मोडिसी काय वाया?
९२

उरीं सोसिता दर्द,पीयूख लाभें। पुरें साहता दुःख, तैं सूख लाभें॥
अतीं दान पैं, तुष्ट चित्तेंचि शोभे। तया माउलीचें कृपामूख लाभें ९३

स्वतासीं अर्धीं आमुचें सख्य केलें। अता कां मला दूर तू फेकियेले?
मला सांडिजे हे न तूं चिंतियेले। भवाच्या भुवंडींत कां लावियेले?
९४

अदृष्टासि मी प्रेम पोथींत पाही। तिथें राधिका-कृष्ण देती गवाही॥
'सुखाची कथा ऐक गे बाळुतायीं। तुला चांदणीरात्र आकल्प मायी'
९५

विसाव्यासि कोठेंहि जागाचि नाही। नसे अंत या वासनासाधना हीं
किती योनिच्या भोगिल्या यातनाही। दिसेना सुखाची परी कल्पनाहीं
९६

मला निंदिसी, थोर तूझी कृपा हे। उणीवेसि मी आपुले जागताहे॥
जसा मी असे तेचि आहेचि आहे। परी द्वेष तुझें उरीं व्यर्थ राहे ९७

अदृष्टा तुला काय मी सांग केले?। पुढें पोट. पाठीं मला हाकियेले॥
तुवा एक घासा जिवा घासवीले। तुवा एक घोटा मना घोटवीले ९८

विटाळा मधें जाहला एक गोळा। पुढें वासनांचा भरे धूर डोळा॥
गुरूचें पुढें भंगिला त्याचि वेळा। असे शुद्ध मी नामरूपा निराळा ९९

मना रे निरें एक पाऊल ठेवी। तरी मोहनाची उरीं हाव घ्यावी॥
प्रभू चिंतनीं रात्र जागोनि न्यावी। तरी भेटिची काहि आशा धरावी
१००

८९१ माया—भांडवल—धन. ८९४ देवास उद्देशून. ८९५ गवाही=साक्ष. ८९७ निंदकास उद्देशून.

तुला पाहिजे रत्न पैं तूचि खाण। जिता प्राणनाथासवे तूचि प्राण॥
तुला सांगतो सत्य वाहूनि आण। जया धुंडिसी, तूच आहेसि जाण १

तुला वाटते काळ सौख्यांत जावा। तुझा बोल सर्वां जनांना पटावा
तरी जीव मात्रांत गोविंद गावा। भला बोल दावी सुखाचा सुगावा २

गुरू ऐस तू शूद्र क्षत्रीय वैश। अरे ऐस तू ब्रम्ह कीं ब्रम्हखैस॥
चित्तेचे धुणीं सांगसी 'येथ बैस'। बसे मी, सख्या लोचनीं तूचि ऐस ३

कुणी तूज नांवें रडे नाइलाज। जगाचें फिरें पारडें नाइलाज॥
कुणी दीन जैं ओरडे नाइलाज। तुझें जाय तेव्हां मडें नाइलाज ४

अर्धीं खोल बोधांजने प्रेम डोळा। तरी डोळियाला मिळे दिव्य डोळा
गुरू दृष्टिचें अमृता त्याचि वेळा। सख्या पिउनी बैस कर्मा निराळा ५

तनू पात्र त्यामाजिं पीयूष आत्मा। अनूहात वेणू उरीं हा धमामा॥
असे देह कंदील कल्पीत नामा। गुरू त्यांत हा दीप साक्षी रिकामा ६

गुरूरे जगाचा बहू येत वीट। जनाचोंनि गाठीं मना माजि गांठ॥
त्वरें दावि मातें सुबोधीं पहाट। मला रूप दावी तुझें तें अफाट ७

गुरू माउले द्वैत तू दाखवीसी। असा तूज सेवीन मी हा उपासी॥
कुणी ही मला देखुनी ग्राम-वेसी। पुसे माउलीच्या सुता कोठ जासी ८

न देईन थापा, न घेईन तापा। सदा गातसे मी गुरू मायबापा॥
न होईन अग्नी, न जाईन आपा। न जाणेन पुण्या, न चिंतीन पापा ९

मला सांगती तू न प्रेमांत जायी?। असें प्रेम ही विंगळाचीच खायी॥
जरी सत्य हें, मी करू काय बायी। मला आवडे सावळी ही कन्हायी ११०

---

९०३ ब्रम्हखैस=ब्रम्हराक्षस. ९०४ जीवास उद्देशून. नीतीपर पर पीडनें दुर्भाग्य प्राप्ति होईल. ९०५ खोल—उघड—जीवास बोध. ९०६ नामा=नाममात्र. ९१० गोपीवाक्य. कन्हायी—कृष्णाई.

त्यजी सर्व मी, माउलीला त्यजीना। मला वर्ज्य सारे, गुरू वर्जवेना ॥
म्हणीं लौकिका होय कां मी शहाणा। हरी कोवि सोडू जिवाचा खजीना?

तुला वाटतें यांत कौतुक मोठें। उरीं रोविसी आमुच्या थोर काटें ॥
मतीला तुझ्या जाहलें ऊफराटें। अम्हावीण तूंतें असें स्थान कोठें ११२

जधीं चित्त हें रंगलें प्रेम नीरें। पडे ओस तें विश्व कांहीं न थीरें ॥
बुडी घेसि जैं नेत्रसिंधूत धीरें। जरी वाचसी, देखसी माउली रे ११३

स्वता मांडिसी पाश दाहीं दिशाला। पुनः बोलसी 'देख मारीन टोला' ॥
तुझा पाश, त्या मार्जि पाऊल गेला। वधूनि मला, बोलसी, 'पापि मेला'
११४

गतानूगतीची जगीं येथ रीत। म्हणूनी कसा होतसे जाच नीत ॥
कुणाला मिळेना इथें सत्य प्रीत। न शोधी कुणी आपलें जें स्वहीत
११५

बसे तूळसी श्रीहरीच्या उराला। अगे बासरे चुंबिसी श्रीधराला ॥
अरे दुष्ट नष्टा अद्रष्टा कराला। अरी तू परी घेसि माझें घराला ११६

मला द्वेष केव्हा शिवेना कुणाचा। सदा श्रीगुरूमाउली या सुवाचा ॥
असे आसरा काय देहा धनाचा। क्षणा भीतरी जात दोनीहि खाचा
११७

दिवाळी सरे, आणि फाल्गून आला। कसी लागली कीड ही आयुषाला?
जिवा शेविरे अच्युता पीयुषाला। असे हीच मात्रा भवाचे विषाला
११८

मना बाग हो श्रीहरीचे विहारा। त्वरें सांड दंभादिकाचा पसारा ॥
इथें शुद्ध सेवी गुरू भक्तिसारा। जगीं बोधि जो गोकुळाचि प्यारा
११९

मला दांभिकाचा बहू त्रास आला। गुरू देइरे नाम पीयूष प्याला ॥
मला प्रेम दे, जाळिं दंभ क्रियेला। मनीं लोचनीं राहिजे तूचि ठेला
१२०

---

९१२ भक्तांचे देवास भाषण. ९१३ माझे नेत्रांत बुडी मार—जर तगलास तर सद्‌गुरू माउलीचे दर्शन होईल. ९१४ देवास उद्देशून. दाही दिशा—दशेंद्रिय—पाश—विषय. ९१५ नीत=नित्य. गतानुगतिको लोकः न लोकः पारमार्थिकः

पुरें प्रेम नामीं पुरे नाथ गाथा । जगाया पुरे ग्रास, दे तू स्वहाता ॥
तुझा बोल मी ऐकिजे एकचित्ता । तरी स्वर्ग–संपत्ति ही राड ताता
२१

गुरू काय कीजे सहा पांच चार । नको वाद तो एक किंवा हजार ॥
मला धूळिला पाय तुझे अधार । मला बिंदुला तूचि सिंधू अपार २२

जगीं मायिका या नको मित्र शोधू । नको सांगु कोणासि हा गुप्त बोधू
जिवें सोसि दुःखा, नको वैद्य वैदू । सुखें साहि शोका, नको आप्त बंधू
२३

इथें साधनें जाणिवे लागि दोन । बरें कोट बोलाहुनी एक मौन ॥
असे भोग जो, राहिजे त्या त्यजून । असे संग जो, जाइजे त्या दुरून
२४

तुझें ऐक्य तें साधण्या शक्ति नाही । वियोगा तुझे जीव हाही न साही
नये सांगण्याला स्थिती ती कुणाही । अहा कष्ट प्रेमीं, किती गोड पाही ?
२५

प्रभूरे करीं सृष्टि आता नवीन । करीतोसि कैसें तरी मी बघेन ॥
जगातूनि माझी पुसीतोसि खूण । बडा भाग देतोसि किंवा अपून? २६

जरी ज्ञानि तू, व्यास किंवा वशिष्ठ । बळी रावणाहूनि होसी बलिष्ट ॥
तरी ध्यात जायी गुरूमाय इष्ट । तनू काळ दाढे मधें होय पिष्ट २७

उठी रे उठी श्रीगुरू मायबापा । भरी रे उरीं माझिया त्वत्स्वरूपा ॥
पुढें जात हें नाम का रूप लोपा । सुधा कुंभिची या शरावीं भरी पा
२८

गुरू माउले दे मला दिव्य प्रीती । अला प्राण कंठासि, नाहीच शक्ती ॥
अस प्रेम दीजे जयाचेनि मस्ती । तनाची जनाची न राहेचि भीती २९

गुरूमाय–वाणी सुचिद्रत्न खाणी । पदा अर्थि मुक्ताफळाचेचि पाणी ॥
गुरूवाक्य जो प्रत्यया हाति आणी । तरी तो सदाचाचि जीवंत प्राणी
१३०

---

१२१ गुरुस उद्देशून. १२८ शराव=वेळणी. तुझ्या घागरीतून माझी वेळणीभर.

महाराज श्रीसद्गुरू, संत-संग। मना उन्मनी हो अहंकार भंग॥
अस हेंच स्वर्गाहुनी गोड चांग। गुरूमाउली प्रेम वीणा मृदंग ३१

गुरू ब्रम्हणे तूचि प्रत्यक्ष ब्रह्म। त्रिलोकीं तुझा व्यापिला दासधर्म॥
तुझें पाउलाचें मिळें ज्यासि वर्म। तया जन्म मृत्यूंत फांसी न कर्म ३२

तुझा पाय आकाश पाताळ भेदी। कसा तत्पदा त्वंपदा लागि सांधी॥
आसे व्यक्त अव्यक्त ही खोल-बांधी। गुरूमायिला बालकाची उपाधी ३३

मनो शुक्तिकीं जीव मौक्तीक दाटे। तिथें व्यक्त चैतन्य आकार वाटे
इथें गुप्त जें तत्व तेव्हाचि भेटे। जधीं कल्पिताकार हा सर्व आटे॥ ३४

सतीनें तुझें कुंतला चुंबियेले। प्रवाळा वरी रेखिलें इंद्र-नीलें॥
रवीनें स्तुतीपत्र जैं धाडियेले। शशीचें मुखीं दिव्य तेजें लिहीलें ३५

तपस्वी सदा त्रस्त इच्छूनि स्वर्गा। असे भक्त तो मस्त, नर्कींहि जागा
शिवेना जरी स्वर्गि हृद्रोग अंगा। तरी स्थान तें योग्य बेदर्द मांगा ३६

कुठें चित्त तें ज्या अरी मित्र नाहीं?। कुठें नेत्रजो सारिखा सर्व पाही?
कुठें सद्गुरू माय देहीं विदेहीं। सदा संशयातीत निश्चिंत राही ३७

अधर्मीं सुधर्मीं असे एक स्फूर्ती। भयीं निश्चयीं कीं वसे एक स्फूर्ती॥
सुखी आपुली राखिजे एक स्फूर्ती। जगूंनी असें सार हे एक स्फूर्ती ३८

निजूं तो न आशा प्रभातीं उठाया। झटावे म्हणूनी गुरूसी पटाया॥
भरोंसा नसें विश्व कोणासि द्याया। सख्याचें मना राखिजे कीं उपाया ३९

जयाला नसे निश्चयो काहि येथें। न जाईच तो श्रीगुरू-प्रेम पंथे॥
फुला डाळिया माजि वायाचि गुंते। फुडें आज अंती यथा पूर्व-होतें १४०

---

१३३ कसा-बंधन. खोल बाधी-सोड बांध. १३४ शुक्तिकी=शिंपल्यांत. १३६ स्वर्गांत दया इत्यादिक हृदयास भेदक गुण नाहीत तर तें क्रूर खाटिकाचे योग्य आहे.

गुरू सावळ्या प्रेम दे, बोल वाया। पडो शीर माझें तुझीयाचि पाया॥
तुझें सारखें देइ गा प्रेम पेया। उतावीळ देखोनि चैतन्य काया ४१

असें विश्व हें माझियें मृत्तिकेनें। तेहेतीस कोटीस चित्तीं रहाणें॥
स्थिरा जंगमा जीव जातासि लेणें। दिलें तेज, माझाचि या साउलीनें
४२

अरे सावळ्या देवकीच्या किशोरा। श्रुती शास्त्र वेदाहुनी तूचि प्यारा
तुझ्या संगतीचा सुगंधीत वारा। मला पावता जीव मेला विचारा ४३

उरीं प्रेम, श्रीकृष्ण हातांत हात। अम्ही भाग्य हें वाढवू येथ गात॥
स्मरेना मला जें जगीं होत जात। हरीलाचि पाहूनि गाऊनि मस्त
४४

जयें प्रेम चित्तांतरीं शोधियेलें। तयाचें घरीं ब्रम्ह धुंडीत आलें॥
क्रिया योग विद्या बहू पंथ झाले। परी सद्गुरू धाम हें सिद्ध ठेलें ४५

बहू शोधिता ग्रंथ ही चाळियेले। सभे माजि पंडीत बोलोनि गेले॥
गुरू माउले थोरं आश्चर्य केलें। तृषाक्रांत मासे जळामाजि मेले ४६

दिसे तें निकें देखरे, नेक आहे। प्रभूची कृती हेतु कैं दोष लाहे?॥
पिसा दीन मी पैं, न तू द्वेष वाहे। सखा तो मला येथ ऐसाचि चाहे
४७

नसे योजिलें मीं विधीचें शराला। निषेधाचिया जाइजे कां घराला?॥
निकें ओखटें ठाउकें श्रीवराला। असावे सुखीं जोडुनी श्री कराला
४८

अता शोभतें कुंज हें वाळवंट। रचा रास आता हरीसी अचाट॥
उद्या नेमिता काय सामुग्री थाट?। अणावी उद्या ही घडी कोण वाट?
४९

मथूरेंत कुब्जा फिरे मस्तवाल। करानें धरीला तिनें नंदलाल॥
पुसे मी 'अगे थेरडे काय हाल?'। वदे 'घे हरी, विश्व हें वात-जाल'
१५०

१४७ चाहे–इच्छितो. नेक=चांगले. १४८ विधि=कर्तव्य प्रवृत्ति.

न सेवी गुरूला, तरी होय काचा । प्रकाशी गुजाला, तरी दांभिकाचा
बुधें कीं नृपें कीं विरक्तेंचि साचा । गुरू सेविजे, येर वाहे फुकाचा ५१

अता विश्व हें ब्रम्ह-आनंद झालें । जनीं कीं वनीं सिद्ध संपूर्ण ठेल ॥
हलें पान वायूसवें, वेद बोले । कुणी बोलता, गोपिका-गीत बोले ५२

मला वाटलें आत्म-विद्या शिकावी । गुरूमाउले जाणसी तैं वदावी ॥
वदे माउली 'ओ' म्हणे 'मी पुरावी' । उरीं एक या अक्षरें तू भरावी ५३

न तूझें, हरीचेचि अस्तित्व पाही । नव्हे चित्त तूझें, परी तेंचि मायी ॥
अरे साहजा नीज शोधीत जायी । तुझा हात श्रीनाथ हातासि वाही
५४

इथें गोड कीं क्षार एकाचि ताटीं । वियोगा विना गोड नोहेचि भेटी ॥
सुखाचे दिसाचा नसे ठाव सृष्टीं । जरी ठाव, तैं लोटिजे रात्र कष्टी ५५

न बुद्धी तुझे सुप्रभावासि पावे । विचार-व्ययें अव्यया कावि यावे?
तुझी पूर्णता पाविजे केवि जीवें । तुझेवीण पूर्णत्व कोठें पुरावें ? ५६

गुरू गुप्त-तत्वाचिया स्वामिराजा । गुणीं रंगलासी जगीं तूं विराजा ॥
जिवाला अती गूढ तू गूज-बीजा । समोरी जरी नांदसी तू समाजा
५७

दिठी माजिं डोळयांत डोळा दिसावा । जगाचा तरी लेश कांहीं नसावा ॥
दिठीं नाहि तूंतें, कसा तो दिसावा । हरी, सव तो, एक डोळा असावा
५८

मनें घोष केला जगीं स्वामितेचा । तनें सोस केला चिरंजीवतेचा ॥
कळेना तया, काळ पाडीत पेचां । फुका बोलता जातसे प्राण वेंचा
५९

गुरूचे दयेवीण बुद्धीच वाया । सरे बुद्धि ही आड रानीं रिघाया ॥
कृपेनें तुझ्या माउले बांधि पाया । स्वभावासि बुद्धीसि तू एक ठाया
९६०

---

९५१ काचा-कच्चा. ९५२ गोपिकागीत-प्रेमगीत. ९५३ एक अक्षरांत अः
विद्या. ९५४ मायी-माया वान ब्रम्ह. ९६० सरे-प्रवर्तते.

गुरू तूचि विश्वामधें पूर्णकाम। तुझें दिव्य धामीं तुझें स्तव्य नाम॥
मनाचेनि दुःखा तुझेनी अराम। स्रवे नैन हू दर्शनांती प्रणाम ९६१

ऋषीनीं बहू येथ केला विचार। तुझे द्वारवीना नसे पंथ येर॥
असे एक दीनत्व येथे अधार। क्रिया-जात ते व्यर्थ धोके असार ९६२

तरू लागिं चैतन्य जें दे फळाला। कसें देत मौक्तीक तें सिंपल्याला
प्रभूचें घरीं वैसली भक्तमाला। गुरूची कृपा नेणु कोणा मुलाला ९६३

दयेनें दिली द्वारका त्या प्रृथूका। अघाचे निधी वारिले एक हाका॥
प्रभूची दया होतसे ज्या नरा कां। करी मुक्त दृष्टीसवें तीन लोका ९६४

चिदानंद साम्राज्य तूझेंचि नावें। जरी स्वर्ग पाताळ तूझींच गावें॥
परी तू जरी मार्ग-देशीक व्हावें। तरी तू जना पैं स्वताला घिकावें ९६५

तुझे पानसे वर्ष आयुष्य लेखी। परी तू कहाणीच होशील शेखीं॥
असी कीं तसी ती कहाणीच लोकीं। तरी गोड व्हावी नसावी कलंकी
९६६

अनेका मतांचे तुझे मार्गि जाती। बढाया तरी आपुली आप गाती॥
न आलें खरें सूत्र कोणासि हातीं। वृथा आरडा ओरड्यानें फजीती
९६७

मनीं या तुझा जेथ आध्यास लागे। दहाही दिशा फाटती एक-रंगें॥
जिवाला बळी अर्पिजे पादगंगे। सुखें तृप्त होवोत गृध्रें मदंगें ९६८

न घे शोक, हा सूर्य जो पैं प्रकाशें। तुझें नाम कीं रूप विश्वीं विलासें
नभीं तारका खेळती सावकासें। जगीं सूख तो पैं तुझें रास-हासें ९६९

असें मी अहेवी तुझें आसण्यानें। तुझ्या आसण्यावीण माते न होणें
अर्धीं अंतिं आताहि तूझें रहाणें। उरे मी कुठें सांगरे तूजवीणें? ९७०

---

९६१ स्रवे ई० आश्रू हाच खरा प्रणाम. ९६२ खुंटला उपाय काय बोलावे आता तुकाराम. ९६४ प्रथुक—पोहे. हाका—गजेंद्राची हाक. ९६५ मार्ग देशीक—पुढारी. ९६६ जीवास उद्देशून. ९६७ व ९६८ देवास उद्देशून. ९६९ स्वगत. ९७० अहेवी=सौभाग्यवती.

अरे पंडिता लाभ नोहेचि मोटा । नसे तूज आकल्प कीं योगपट्टा ॥
सुखी ऐस, साऱ्या जगाचाहि लाठा । धनी होसि, राहील पैं आसपोटा
७१

विधी–लेख कोणेपरी पालटेना । असें तें कदापी वढेना घटेना ॥
तरी शोकवाया तुझा का तुटेना ? । करी शोक तू दुःख काही मिटेना
७२

खरा मर्द तो शोभवी बाह्य-अंग । मनीं आस लोकें गणीजेल चांग ॥
असे मर्द जो शोभवी अंतरंग । स्त्रियाना सजे राखडी मूद भांग ॥ ७३

न मी वींण जाडा अधर्मीं कुकर्मी । न मी वींण संस्था मिळे धर्म-वर्मीं
जगीं एक मी, आणि तोही विधर्मा । कुणाला मिळे कां गती जी स्वधर्मी ?
७४

असे कोण तो जो न संताप साहे ? । जगाचें विकारा कधींही न पाहे
चिदानद डोहीं सदाचाचि राहे । उदो अस्त सच्चित्सुखामाजिं नाहे
७५

वना जासि नाथा, मना होय पाणी । उरीं गूढ, तें नेत्र सन्मूख आणी
तुला नम्र कल्पद्रुमाची शिराणी । परी कल्पना ही पडे कीं उताणी
७६

वियोगें झरा लोचनातूनि वाहे । नखींचा शिखे माजिं वाहूनि राहे ॥
रडे आणि हा लेख मी लिहिताहे । तसी लेखणी रोदनामाजि नाहे
७७

हरीचे सखे आरसें एकमेंका । स्वताचे विषीं त्या नसे भीति शंका ॥
बने आरसा सांडिसी जैं कलंका । न पाहे कुणा, होसि आदर्श लोका
७८

बुधानीं जमीं येथ केला विचार । गुरू-प्रीतिचा मात्र केला स्विकार ॥
मिळाला जयाला गुरू कर्णधार । तयालाचि झाला भवीं या उतार
७९

प्रभूची स्थिती ज्या नराला कळाली । तयाचे दिठींतूनि सृष्टी गळाली
गुरूचे गवाक्षीं स्थिती ज्या मिळाली । गुरू संगमीं द्दष्टि ये वेगळाली
१८०

---

१७४ हा पूर्वपक्ष–उत्तरपक्ष. श्लोक ३८०. संस्था=निश्चय. १७८आदर्श=आरसा.

तपीया जपाचा तपाचा तपास । वसे ध्यान–योगी तुझे आसपास ॥
कळेना सख्या तोषसी तू कुणास । इथें बोलती सर्व माझाचि खास
८१

धनी खात मेवा मिठायींत मेला । मधू शर्करा दूध ही पीत मेला ॥
यती याचिता वाळल्या भाकरीला । जलीं कुस्करू खात खातांत गेला
८२

निकें कर्म कोणी निकें जे पहाती । इहा माजि घेती परत्रासि हातीं ॥
जरी पैरणा ऊफराटें शिवीती । सवासेचि लेवूनिया शोभवीती ८३

जळेना कधीं जीव तो रौरवांत । परी होतसे पातकाचाचि घात ॥
सुवर्णासि तापूनि बागेसरींत । जळे खेट सोनेचि तें शुद्ध होत ८४

नसे शुद्धि, हृद्रोग ऐसा अचाट । अला जीव कंठा न भेटे विकुंठ ॥
वयाचे नदीचा सुके येथ पाट । न पावे परी प्रीतिचा पैलघाट ८५

असो सूख केव्हा, कधीं होउ व्याधी । कधीं शालजोडी, कधी एक चिंधी
बुधा काळजी या स्थितीची न बाधी । असे मृत्यु पैं एक मोठी उपाधी
८६

तुला नोळखे तो करी यज्ञयाग । न पावे तुझा प्रेमळावीण माग ॥
मला सांगसी 'सोसणे नर्क भाग' । तुला नोळखे त्यासि ही मात सांग
८७

वयातीत मी गुंतले प्रेम पाशीं । म्हणूनी तुझें नाम येतें मुखासीं ॥
अता मोकळी जाहली कंस-दासी । बहू काळ होते तुझें मी उपासी
८८

क्रिया दंभ गेला, उरीं भाव आला । भरे रंग संगीत नृत्यादिकाला ॥
कसा मेळ साहित्य रागादिताला । बहू गोड सद्भाव तो भाविकाला
८९

सख्यानो जरी याल गोकूळ गावा । अती लालसे जीवनू आठवावा ॥
गुरू श्रीहरी तेथ गावाचि गावा । स्मरावेचिना आपुले रूपनावा ९९०

---

९८१ तपीया=तपस्वीला–ध्यानि. ९८३ इहा=इहलोकीं. ९८५ गोपीवचन विकुंठ–श्रीहरी. ९८६ पातंजल सूत्र=स्वरसवाही रूढोपितथाउ भिनिवेशः ९८७ गोपीवचन. माग–पत्ता. ९८८ कुब्जावचन. ९९० जीवनू=नाथ.

दरिद्री बनें प्रीतिनें दानशूर । करी भेकडा प्रेम संग्रामधीर ॥
बने प्रीतिनें वृद्ध तोही किशोर । करी प्रेमळाचा गुरू अंगिकार ९१

घरीं माझिया पातला नंदलाल । झणी उंच होऊनि व्यापी महाल ॥
'पुरेना' 'वदे हे तुझे तीन ताळ' । म्हणे मी 'तरी होयरे सानबाळ' ९२

वयो-मंदिरा वाहवी काळ पूर । पुराचेनि लाटा वयाचा सुमार ॥
मना सावधानें पहा काळ चोर । कसा नेतसे सर्व सामान पार ९३

अनूताप मोठ्ठानिया पाप केलें । अकीर्तीसि मी आपुले आप केले ॥
जरी वाकडी मी, तरी काय झालें? । हरीनें सुधे शुद्ध आपाप केले ९४

गुरू या उरीं शुद्ध प्रेमासि आण । मला श्वास झाला, दवा तूंचि जाण
अहंकार बाहेर नेलासि प्राण । जिवाची तुला आण, प्रेमासि आण ९५

कळी काळ साथीं करी नाच लोका । अविकाचि देतो मला दुःख शोका
जरी नेत्र खोलू, उरीं येत धोका । जरी शब्द बोलू, गुरू देत ठोका ९६

जरी पातका मी करी दीस-राती । उरीं राहसी श्रीहरी दीस-राती ॥
जगाला धरी मी दुरी दीस-राती । दयेला तुझे मी वरी दीस-राती ९७

प्रभातीं वदे मी तुला गूज नीत । तुझें उंबऱ्यासी मला फार प्रीत ॥
जना आर्जवू, तें नसे कीं उचीत । गुरू माउले साधिजे तूंचि हीत ९८

ससाणा उडे, शिंग फुंकी शिकारी । फिरे पक्षि तो आपुलीया अधारीं
दिसाचें तयाला निजस्थान दूरीं । म्हणूनी दिठी झाकिती त्यासि पूरी
९९

अरे सुंदरा कोमला शामलांगा । हजारो तुझ्या खोडिया आणि दंगा ॥
न पाहो कसें तुझिया रूपरंगा । तुवा दृष्टि माझारिं केलीस जागा
१०००

---

९९२ राधा वचन. तीन तीळ—तनुत्रय. ॥ तनव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ९९३ सामान—इंद्रियादिक. ९९४ कुब्जावचन. ९९६ खोलू—उघडू ९९७ देवास उद्देशून. ९९९योगाभ्यासपर. १००० राधावचन.

खुळया वंदिसी काय काषायवासा ?। नव्हे चिंधिनें पूर्ण आशा निराशा
नटा तू जरी पांढरा घेसि पेशा । पटीं चोहटीं सारखा तो तमाशा १

झणीं कोण राहे हरीला स्मरूनी ?। हरी बोलता, आयके कोण कानीं ?
झुरे सावळा, दावि रासा करोनी । बघे धन्य तो कोण डोळे भरोनी ? २

गुरू पुत्र तो श्रेष्ठ होका किशोर । विकल्पादिकाचा नसे त्यासि जोर ॥
वरी थोडक्या ही तपें होत थोर । समाधान खेळें दिठीचे समोर ३

जरी भक्त तू, बैस अक्षीं झुरोनी । वियोगीं सदा बैस नाथा स्मरोनी
हरीला उरीं देख डोळे भरोनी । जिवाला त्यजी, राहि नाथा धरोनी ४

नको पाहु मागें, नको धावु आगें । बसे आपणीं आप, प्रेमांत जागे ॥
सर्व शून्य सांडी, विकल्पासि त्यागे । तरी होसि अद्वैत सिंधू निजांगें ५

अनंता तुझे पंथ तेही अनंत । धरीला मिथा सद्गुरू-प्रेम-पंथ ॥
असो द्वैत—अद्वैत कीं शैव-शाक्त । तुला इच्छिती अच्युता, सत्य मात ६

उरीं जोवरी वाहते जीव-गंगा । वुधा नाहणी श्रीगुरूला अभंगा ॥
तुझी धूळ जैं वावरे वायु-संगा । करावा तुवा नाथ-वीदींत दंगा ७

उरीं पोळला भाजला राख झाला । स्वता पेटसी कुंभिपाकांत ज्वाळा
कराया दया सांगसी तू दयाळा । असा कोण पंतोजि तूरे धसाळा ? ८

वदता असे स्वर्ग पीयूष सार । मधु-क्षीर-कुल्या वहातात पूर ॥
अता याग कां ? झोडिजे मोति-चूर । भली रोख पै कोट होना उधार ९

तरू हा वयाचा जळे जैं सफाया । तनूची पिठी होतसे धूळ पाया ॥
करीती घडा तिंबुनी मृत्तिके या । भरीता सुधेनें बने दिव्य काया १०१०

---

१००१ पेशा—पेहराव. पटीं—नाटकाचे पडद्यांत. चोहटीं=रस्त्यांत, तुझा नटपणा सारखाच. १००४ अक्षीं—सदा. १००९ स्वर्गात भोग आतां कां त्याग ! १०१० प्रेमानेच अखिल सृष्टीचा उद्भव.

रते मी हरीसी, रते सद्विचारी। हरीसी रती फार सोपी प्रचारीं ॥
मला तो रती-दान मागे मुरारी। न मी रातल्या तो नव्हे ब्रह्मचारी ११

मिळे द्रोदिसा आड वीरासि रोटी। मिळे थंड पाणी भरोनी नरोटी ॥
तरी दास-वेडी न लेईल कंठीं। नरा पामरा नार्जवी दारवंटीं १२

किती वाहसी व्यर्थ चिंता जगासी। रडूनी नुरे काचरी काळजासी ॥
धरी भक्ति, खा पी, सदा घे सुखासी। पुढे मंडलातूनि बाहेर जासी १३

कुटिल-कुंतल धूसर सावळा। कपट-चौर्य-विशारद चित्कळा ॥
हृदयिं गाढानि त्या बहु आवळा। कधिंच सोडु नका हरि-गोवळा १४

कवण भीति मना उरिं तापसी?। उगिच काय यमा तरि लाजसीं? ॥
गुरू करी तुज निश्चल मानसीं। पडासि सत्य सुधारस पायसीं १५

भुवन-नाक-शिरार्पित पादुका। निज-तनू-धृत-विश्व-विचालका ॥
असिं-पदस्थित अच्युत नायका। करि कृपा मज माउलि बालका १६

—०——०—

असें मी तुवा निर्मिला वांझलेक। स्मरे मी तुझे ऊपकारा अनेक ॥
मला दैवदग्धा नसे दोष एक। तुझे पायिची धूळ मद्भाळिं नेक १७

घरें लाख आश्रूजलें ध्वस्त जीर्ण। रडू मी तरी कोटि चित्तें विदीर्ण ॥
नद्या पापण्यातून हृद्रक्त पूर्ण। मिटू पापणी, होत विश्वीं तुफान १८

असें प्रेम उद्बोध सूर्या अकाश। चरें चित्सुखीं प्रेम तो राजहंस ॥
नव्हे प्रेम भालू परी कैं उदास। मरे प्रेमळू, पैं न सोडित श्वास १९

हरि प्रेमिं जो बद्ध तो शुद्ध मुक्त। शिरी पंथ-धूळी धरी शोक-त्यक्त ॥
सख्याचा न मानीत संत्रास भक्त। सखा देत जें, तेंचि पीयूष-व्यक्त १०२०

---

१०१४ ते १६ वृत्त बदल. श्लोक १०१३ पर्यंत दक्षिण हैद्राबाद येथील प्रतीतून घेतले आहेत. श्लोक १०१७ ते १०२६ फेड्रिक रोजेन याचे हस्तलिखित प्रतीतून घेतले आहेत. १०१७ वांझलेक—वंध्यापुत्र. आत्म समर्पणांत पूर्वसंचित दग्ध होते. १०१८ ते १०२० भक्ति—लक्षण. १०१८ पूर्वपक्ष. १०१९ उत्तर पक्ष.

विधी सर्व सौंदर्य दे श्रीधराला । दिला घोर हृद्रोग माझें उराला ॥
सुखाचा नसो योग माझें घराला । वियोगाग्नि जाळी जगा शंभराला
२१

तुझा श्वास चैतन्य दे बासरीला । जगज्जीवना हा स्वधंदा धरीला ॥
दिला जीव तू, आर्पिते पायरीला । तुझा लाल तूझे वरी ऊतरीला २२

लिही अक्षरे मोतिये जो सुरेख । अधीं सद्गुरू चिंतुनी काढि रेख ॥
शिशूते गुरू रेखुनी देत एक । अनेकीं शिशू घोकितो 'एक-एक' २३

जरी विश्व शृंगारिलें तूज साठीं । न लागे बुधा लालसें त्याज पाठीं ॥
इथें आवका–जावकाची रहाटी । तुझा भाग तो साधुनी घेइ ओटीं २४

अधीं बिंदु होता, मिळे सागरासी । अणू सारवीला धरित्री घरासी ॥
जिणें हें असें या जगीं पामरासी । दिसे मक्षिका आणि लोपे अकाशीं
२५

भवाब्धी कसा कोठुनी वाहताहे । कुणी नेणती सत्यमिथ्या कथा हे ॥
इथें होत सर्वा भ्रमाची व्यथा हें । अनिर्वाच्य नेणू यथा कीं तथा हें
—०—०—
२६

सुधा बोध दे, या जिवारोग मोठा । असे प्रेमविद्धा सखा हा चखोटा
गणी थोर मी श्रीगुरू नाम घोटा । कटाहासि, जो लेत ब्रम्हा किरिटा
२७

नभीचा झरे मोगरा मेघ-धारा । निघाले फुलांचे थवे कीं विहारा ॥
भरू हृत्कमोदीं सुधा-पद्म-सारा । करू शामला सूमनांचा फुलोरा २८

चिदाकाश-सम्राट तू सिद्ध स्वामी । लगामीं तुझा अश्व हा वायु गामीं
न लिंपो तयाचे खुरा पंक, भूमी । म्हणूनी घडीली हिरे-पांच-हेमी २९

दवा दे, व्यथाग्रस्त हे अंतरंग । तुझा प्रेम आमोद वाहो तरंग ॥
भवध्वंस मात्रा असे दिव्य योग । सुधा-रत्न-भावे खलावे अभंग १०३०

---

१०२२ श्रीहरीस उद्देशून. १०२३ अनेकांत एकत्व. १०२४ जीवास उद्देशून. १०२६ माया अनिर्वाच्य. श्लोक १०२७ ते १०३८ बाडलियन हस्तलिखित प्रतीवरून घेतले. १०२७ कटाह—ब्रम्हकटाह. १०२७ चखोटा—उत्तम. १०२८ शामला—हृली. १०२९ आत्मा स्वयंसिद्ध.

जणू प्रेम पुन्नाग हृत्पद्मसारीं । जणू खेळतो लाल पात्रीं झिलोरी ॥
जणू पोहतो सावळा गांगधारीं । जणू भानु हा चंद्रिका घे समोरी ३१

अरी! (थंड हा दीस अङ्गी हिमाचा) । उरीं लालडा, घे रवी रंग ज्याचा ॥
तनू-चंदनें जोडि जोडा सुखाचा । करी एक वीणा, दुजा धूप साचा
३२

घनानंद आत्मा जया नाम देती । द्वा चित्त तापासि जें नाम घेती ॥
त्वरें आण त्यासी, रमू दीस-राती । हरीची रती बोलती कां अनीती?
३३

हरीचे सुधासार पीले निसंग । हरी-रंगणी रंगला चित्तरंग ॥
तनू बुद्धि वाचाळ, चारीन भांग । हिला घोर निद्रेत पाडीन गुंग ३४

मना नेणवे धान कीं दाम दोरा । कथी एक कर्मा कथी एकप्यारा, ॥
गुरू प्रीति मी रांधिला होय पूरा । नको यज्ञकुंडांत कच्चा निगूरा ३५

पुरे कोपरा, भाकरी दोन कोरी । झुगारू धना वैभवा दूर दूरी ॥
जिवा वेचुनी घेतली कीं फकीरी । फकीरी मधें साधिली ही अमीरी
३६

अरे त्यागिया सांड कीं देह कंथा । तनू वाहवी तूज संदेह-पंथा ॥
अरे दीनता कंबला घेइ माथा । स्वताचे वरी चालवी राज्य-सत्ता ३७

वदे कालचक्री गुजा मन्मनाला । तुला दाववी मी विधीचे खुणाला ॥
जरी स्वस्थिती राहते मत्काराला । भ्रमा पासुनी सोडवीते शिराला
३८

—०—०—

न केलें भलें, सर्वही दोष केलें । दया याचनेचें पुनः घोष केलें ॥
न होई दया. चाखिजें पेरियेलें । उगें कां नकेलें? नुगें काय केलें? ३९

रडे बिंदु 'मी सिंधुपासूनि न्यारा' । हसे सिंधू 'पूर्णासि मी पूर्ण सारा'
इथें व्यापकू व्याप्य तो नाथ प्यारा । परी भक्तिला मांडिला हा पसारा
१०४०

१०३१ प्रेमलक्षण—उत्प्रेक्षा. गांगधारी—चित्त गंगेत. १०३२-थंड निष्प्रेम जगातील वागणूक-बाह्यवर्तनांत वीण्याप्रमाणें गोड व अंतःकरणांत हरीकरितां धूपणे १०३८ ग्रहादिक भविष्य दर्शवितील पण पर-प्रेरित जड आहेत. १०३९ पासून निकोलाचे पॅरिसचे प्रतीवरून घेतले. १०३९ कर्मास अकृताभिगम व कृतपणास नाहीं. हे श्लोक ७६५ यास उत्तर; सिद्धांत पक्ष श्लोक ७९६.

फिरस्ता अेला संशयी मोह मांग । मलीं रौरवीं माखिला सर्व अंग ॥
न नारी नरू, भांगि मत्प्रेमरंग. । धिगैश्वर्य विद्याबला! सर्व सोंग. ४१

बुडो विश्व सिधूंत, होकां तुफान; । न लेखीन मी मस्त राई समान. ॥
मला नंदगेहीं ठिवीलें गहाण, । वदे सांवळा 'तारणा फार छान!' ४२

वदे सूज्ञ "तो एक नाना न कांहीं." । गणी अज्ञ नाथा अशी मित्रता ही॥
डुले सिंधुचीची स्वरूप प्रवाहीं; । गमे बुद्बुदा आपुली वाह वाही. ४३

वृजा ! धन्य तू बाल गोपाल संत, । इथें गोपिका रास नाचूनि मुक्त. ॥
न झाला कुणी शास्त्र घोकूनि भक्त, । जळो योग कीं याग, अज्ञानव्यक्त ४४

मिळें सूख तें घे. वहावी न भीती । जगा नश्वरासी दिखावी न प्रीती ॥
घडे स्नान संध्याचि काल-व्यतीतीं, । जिणे पैं न तैसें. धरी प्रेम चित्तीं ४५

जधीं दूत नेती यमाचे कचेरीं । तुला चित्रगुप्तापुढें येत घेरी ॥
तुझा बाप कैसा तुला तेथ तारी? । तया एकल्या सर्व ते होति भारी ४६

रचीलें विधीनें निळें मंटपाला । तिथें तोरणें लावि नक्षत्र-माला ॥
मला वेष्टितो, जोत जेवीं दिव्याला । तुझें प्रेमसूत्रांत आकल्प-काला ४७

कशाला कला गीत चातुर्य खेळ? । पहा प्रीति पैं कोण कैसा टिकेल. ॥
कुणी भाक पाळावया जो चुकेल, । तरी सर्व दोषामधें तो पिकेल ४८

शिव-व्याध आमीष पाशांत ठेवी, । जिवाला धरी, पिंजऱ्यामाजिं गोवी. ॥
भलें कीं बुरें सर्व जे विश्वदावी । करी तोचि, जीवावरी आळ लावी ४९

अम्ही येथ पाशामधें सर्व मैना, । सदा साहतो शोक संत्रास दैना, ।
नसें द्वार धावें, नसें मार्ग नैना । न आलो न गेलो निजेच्छा न चैना ॥ १०५०

---

१०४१ क्रोधाचें वर्णन, कूट. १०४२ तारणा=ठेव, पक्षीं उद्धार करण्यास योग्य. १०४५ कालातिक्रम सत्कर्माविषयीं करूं नय, १०४६ दुसऱ्यावर भिस्त व्यर्थ. १०४७ जीवाचें प्रभूशीं लग्न. १०४९ व १०५० पाशुपत मत.

दयेनें मला आठवीतोसि नाथा! । तुझेवीण कोणी मला नाहि त्राता. ॥
जरी संकटीं तूं धरीसी न हाता, । कुणा आळवूं? कोण तो सौख्य दाता? ५१

गुरु बोध दे, जो जगाचा तमारी । उरीं भक्ति दे, कीं हरी ये समोरी ॥
सुखीं राहिजे, पातकें धूत सारी । हरी, जो जगा नाहणी गांगधारी ५२

तुझें साजिरें नाम चैतन्य चारा । तुझें रूप आदित्य मोहांधकारा ॥
लवार्धीं मरूं त्वत्पदीं एकवारा । भलें तें जिण्याहूनि कल्पांत पारा ५३

उभे दारि गोपाळ हे वाहतातीं । तुझ्या खोडिया फार पैं साहतातीं ॥
त्वरें ये, तुझी वाट हे पाहतातीं । पुन्हां हे न तूतें वहाया रहातीं. ५४

निशीं या हरी चेतसी अंतरंगा, । सख्या त्वत्पदीं आजि मद्भाग्य तुंगा ॥
विझो दीप कीं चंद्रमा या प्रसंगा, । तुझें संन्निधीं कोटि-भानु-प्रभांगा ५५

वियोग ज्वरें जाहली धूर काया । वृथा साहतो दीन हा जीव घाया ॥
तुझें दर्शना कोट केलें उपाया । न देशील साथी, तरी यत्न वाया ५६

मला हिंडवी थेरडा काल फार । नसे मत्करीं यत्न आणी विचार ॥
कसा शृंखळा बांधुनी दार दार । मला नेत प्रारब्ध हा फौजदार ५७

भुईची धुळी भानु-कीर्ती जनांची । न पावे सरी शुक्र ज्यांचें मनांची. ॥
हळू सार धूळी हरी पादुकांची । असे पिंजरी दिव्य ही गोपिकांची ५८

हरीरे नसोसे मदास्तित्व ओझें । सदा चित्त गांजे, रिते हस्त कां जे, ॥
असत् पासूनी निर्मिसी विश्व ताजें । त्वदस्तित्व तें लोपवो शून्य माझें ५९

दिसे आकृती येथ अस्तित्व ठाणा, । असे मूर्ति त्याची घडीजो सुजाणा, ॥
नवे वीचिला लेत सिंधू पुराणा, । म्हणा लाट त्याला, परी सिंधु जाणा. १०६०

---

१०५३ एक निमिषाचे अर्ध । चित्स्वरूपीं होय सावध । तेणें होय सर्व दग्ध ॥ अनंत पापराशी ॥ १०५५ दीप चंद्रमा, मनबुद्धी. १०५६ प्रभुचे दयेवीण त्याचें दर्शन नाहीं. १०५७ कंठेबध्वा दृढं सूत्रं यत्रस्थो तत्र नीयते. १०६० कार्यांत कारण मूर्तिमंत.

गुरू तू विधी विश्व वंदी जयाला । शिवा ! इंदु लाजे तुला, कोर झाला ॥
गुरू तू हरी जोगवीता जगाला । गूरू शक्तितू सूख देसी सुखाला. ६१

जधीं वांकसी वाहता पाप भारा । नसे जाण त्याचे दये वीण थारा ॥
हरी ठेवितो येथ शिक्षा उधारा । जसा काल लोटे, जिरे कोपे सारा
६२

शताब्दीं मला कुंभिपाकांत वास । जरी जाहला, मी न मानीन त्रास ॥
न होवो प्रसंगू मला दुर्जनास । असे घोर दुःसंग मृत्यूपरीस ६३

तुझी सर्व लोकामधें बादशाही । इथें साधु त्वत्प्रेम पंथांत जायी ॥
तुझें गूज मी वेदवाणींत गायीं । इथें शेष तू, विश्व निःशेष नाही ६४

मिया कीटका पासुनी ब्रह्म-घाटा । खुले जाणले सर्व विश्वा अफाटा ॥
मिया झाडिल्या दुस्तरा कूट वाटा । निघेना परी पायिंचा मृत्यु-काटा
६५

प्रधाना नरा! मी तुझा मस्त झालो । पदाती तवाश्वामुळें त्रस्त झालो ॥
गजानें तुझ्या राव पैं, सुस्त झालो । तुझा वेध वेधूनिया मात झालो ६६

जिवाच्या जिवा! प्रेय कीं तूंचि प्रेमी । खुळें आंधळें त्वद्गुणा पांगळें मी ॥
दिठीं तूचि या लोचनीं, हें बघे मी । सख्या चित्त चैतन्य तू, हें बुझे मी
१०६७

॥ इति श्रीगुरुकरुणामृत विस्तीर्णमस्तु ॥

---

१०६१ मूळांत मूसा, महम्मद, येशू, व यूसफची नांवें गुरूस उद्देशून आहेत. गुरुर्ब्रम्हागुरुर्विष्णुगुरुर्देवो महेश्वरः या श्लोकाचे धर्तीवर आहे. १०६४ चौथें चरणांत कुराणाची आयत आहे. १०६५ स्वरसवाही विदुषोऽपि तथा रूढोऽभिनिवेशः १०६६ बुद्धिबळाचे रूपक. १०६७ येन चक्षुंसि पश्यति, ये नाहुर्मनोमतम्, तदेवब्रम्ह. उपनिषत्.

१०४२ पर्यंत निकोला (पॅरीस); १०४३ ते १०५० इस्तंबोल; १०५१ ते १०५६ अमृतसर; १०५७ व १०६२ लाइफस यकोज; १०५८ व १०५९ व १०६४ फर्दुसुत्तवारीख; १०६०,६१,६३,६७ खियाबान इरफान; १०६५ १०६६ लखनौ प्रतींतून उद्धृत.

## परिशिष्ट (अ) परिच्छेद ६१

## प्रो० पटवर्धननी जाड्या अंकांत दिलेल्या क्रिस्तेंजनच्या १२१ स्त्राय गुरुकरुणामृताशी संमेलन.

**पहाण्याची रीत:**—पहिलें आडवे खान्यांत क्रिस्तेंजनचा पहिला दशक १ ते १ दुसरें आडवे खान्यांत दुसरा दशक ११ ते २० चे, याप्रमाणें संमेलन मांडलें

**उदाहरण:**—क्रिस्तेंजन १ गु.क. ४१९ पटवर्धन ३९७, क्रिस्तेंजन ११, गु क.१६ पटवर्धन ३६५. क्रिस्तेंजन ८, गु.क. ३२५, पटवर्धन ३९२. क्रिस्तेंजन ८७, गु. ९२, पटवर्धन २६२. क्रिस्तेंजन १२१, गु.क. ९१८, पटवर्धन २५४.

| क्रिस्तेंजन | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गु. | ४१९ | १९३ | ५३९ | ४४६ | ५०३ | ५१२ | २९१ | ३२५ | ६२५ | २७९ |
| | प. | ३९७ | ३६९ | ४०९ | ३६१ | २६० | २८ | ३२७ | ३९२ | २३१ | २४३ |
| १० | गु. | १६२ | ३३३ | २०१ | ३२७ | १९६ | ४८९ | १०२४ | ८३८ | ७९३ | २५९ |
| | प. | ३६५ | ३२३ | ३४५ | ४२४ | २६९ | ४७१ | १८१ | ३६७ | ३८४ | २६४ |
| २० | गु. | २२१ | २१९ | १९७ | ६०८ | ६३३ | ६३२ | ८४७ | ८२० | १८६ | ४१८ |
| | प. | १३६ | ४२२ | २४५ | ११५ | २९५ | २४१ | ३२९ | ३५७ | २२१ | १३० |
| ३० | गु. | ५६४ | ७४ | ८५६ | ८५५ | ७५३ | ८२९ | ४२ | ६६ | ७६ | ६२७ |
| | प. | २७७ | २५२ | ३५८ | १०० | २८० | १२ | २३८ | १३ | ३६२ | ३०१ |
| ४० | गु. | १८ | ३२० | ७७७ | २१३ | ७९१ | ८७ | ५१० | २७७ | ६० | ४ |
| | प. | २६३ | ३८५ | १०९ | ३ | २७१ | १६ | ३३० | ४१३ | २६० | २८[illegible] |
| ५० | गु. | ८२ | ५०५ | ६४२ | १९२ | ६९ | ५०४ | ७२६ | २०२ | २०३ | ३४ |
| | प. | २७९ | २०४ | २७३ | ३२६ | ३६४ | ३३१ | ४३८ | १२७ | ३५३ | ३७ |
| ६० | गु. | ५४ | १२७ | २१७ | २१८ | ५२५ | ३७ | १४६ | ४९३ | ४७२ | ३८ |
| | प. | ३४८ | २४० | ४०८ | ४४१ | ३२८ | ४२८ | ३२ | ८ | ३७३ | ३८[illegible] |
| ७० | गु. | ६९६ | ५१३ | ५७९ | २ | २८२ | २७ | २३३ | ४१ | १२९ | ४९ |
| | प. | ३५० | ४२९ | ३८६ | ४५७ | ४२६ | २९८ | ६३ | ११० | २२१ | ६८ |
| ८० | गु. | ५५ | १४१ | ६५ | ७२ | ८१ | ९१ | ९२ | ९९ | १९५ | १५[illegible] |
| | प. | १७ | २३६ | १३४ | ४०६ | ६४ | १५ | २६२ | ४५० | १८ | २१८ |
| ९० | गु. | १९९ | २२० | २४६ | २६८ | २५० | २५१ | २६१ | ३२३ | ३८२ | ३५२ |
| | प. | १३५ | ४९६ | २८५ | ७४ | ६२ | ३१० | ३२० | २९७ | २६९ | ४३० |
| १०० | गु. | ४८० | ४७६ | ४८८ | ५२८ | ५४७ | ६०२ | ६०७ | ६१६ | ६३७ | ६९१ |
| | प. | ३९१ | ३१७ | ९६ | ४९५ | ४३२ | ३९३ | ३०० | ४४२ | ४३१ | ८५ |
| ११० | गु. | ६९४ | ७१३ | ७२७ | ७६१ | ७४५ | ८१० | ८२१ | ८३४ | ८५७ | ८९७ |
| | प. | ४५८ | ९५ | १५४ | ६७ | १ | ४२१ | ११ | ३२५ | ३४७ | ४५४ |
| १२० | गु. | ९१८ | पटवर्धनी जाडा अंक २८८ गु. क. १९५ | | | | | | | | |
| | प. | २५३ | | | | | | | | | |

REFBK-0004929
REFBK-0004929